तो ॥१८॥ प्राणायामाच्या आवृत्ती । होतां मनाच्या संकल्पवृत्ती । चित्तसंयम करितांच राहती । भाव ऐसा ॥ १९ ॥ या भावें मन एकाग्र करूनी । मागुती ह्मणे यतचित्त होऊनी । इंद्रियवृत्ति आणि क्रिया आवरूनी । योग योजावा ह्मणतसे ॥ २२० ॥ योग एथें कवण । वाखाणावा तरी ते खूण । बुद्धीच्या शुद्धीचें बोलतां कारण । सगुणध्यान सूचवी ॥ २१ ॥ जरी ह्मणावा कर्मयोग । तरी यज्ञादि कर्मे तेथें अंतरंग । तेव्हां स्त्री आणि ऋत्विगादिसंग । तो एकाकी अपरिग्रह ह्मणवेना ॥ २२ ॥ योगशब्दें हटयोग । बोलतो ह्मणावा श्रीरंग । तरी न तुटे वासनासंग । हटयोगें करूनी ॥२३॥ देहामुळें भोग नाना । त्याच्या जीवित्वाची वासना । धरूनि करिती काळवंचना । हटयोगी ॥२४॥ देह व्हावा अजर । देह व्हावा अमर । हटयोगें उपजे आदर । या जडा शवाचा ॥ २५ ॥ काळास वंचूनि देह । रक्षिती धरूनि त्याचा स्नेह । ऐसियानें त्यजिलें जरी गेह । तरी तें वैराग्य ह्मणवेना ॥ २६ ॥ कोणी स्त्री कर्कशा । ह्मणूनि टाकिती गृहाशा । तरी न तोडिती स्नेहपाशा । देहाचिया ॥ २७ ॥ जैसें वैराग्य त्याचें । तैसेंचि याचें । एवं वैराग्य तेंचि साचें । कीं प्रीति सुटे या जडा शवाची॥ २८ ॥ देहप्रीति सोडी बुद्धी । तेंचि बुद्धीची अत्यंत शुद्धी । या शुद्धीची सिद्धी । ध्यानें नारायणाच्या ॥ २९ ॥ बुद्धिशुद्धीकारण । योग योजावा ह्मणे श्रीकृष्ण । तेव्हां योगशब्दें सगुण । मूर्ति ध्यावी तयाचीच ॥ २३० ॥ योग आत्मस्वरूपाचा । तोही न बोले भगवद्वाचा । कीं शुद्धबुद्ध तेव्हां साचा । आत्मा स्फुरे बुद्धीसी ॥३१॥बुद्धीच्याच शुद्ध्यर्थ । एथें योग योजावा ह्मणे समर्थ । एवं सगुण ध्यावा हाचि समर्थ । बोलावा एथें ॥ ३२ ॥ आतां जों अशुद्ध बुद्धी । तो न घडे या योगसिद्धी । करी त्या बुद्धीचीच शुद्धी । तेव्हां योगशब्दें न घडे हें ध्यान ॥ ३३ ॥ कोणी एथें ऐसें बोलती । तरी हे शुद्धी कोणती । तांदूळ कांडिले सडिले तरी धुती । पाकसमयीं वारंवार ॥३४॥ कर्मयोगें शुद्धी । पावली ये जन्मीं अथवा जन्मांतरीं बुद्धी । तेव्हां आत्मानात्मविवेकसिद्धी । जाली गुरुमुखें ॥ ३५ ॥ कांडिले बरे तांदूळ । पाकचि होणें असे केवळ । तैसा योगारूढमात्र हा निर्मळ । होऊं पाहतो ॥ ३६ ॥ तथापि घालूनि जळ । निर्मळही जे तांदूळ । तेही करूनि अतिनिर्मळ । पाक करिती ॥ ३७ ॥ या आरुरुक्षूची बुद्धी । जरी पावलीच आहे शुद्धी । तरी योगारूढत्वसिद्धी । घडावी ध्यानें सगुणाच्या॥ ३८ ॥ आणि अष्टांगयोग ।

त्यांत ध्यान तें सगुणध्यानयोग । स्वस्वरूपीं चित्तवृत्तींचा वियोग । तो समाधी ॥३९॥ बाणे चित्तवृत्तीचा निरोध । अथवा बाणे सर्वात्मबोध । तोंवरी अभ्यास त्या अभ्यासाचा करितां शोध । तोचि धारणा॥२४०॥ सत्त्ववृत्तींत आत्मा स्फुरे । ते वृत्ति त्या स्वरूपातें स्फुरे। ते धारणा कीं जेथें नुरे । जडवृत्तीची धारणा॥४१॥ धारणाचि जेव्हां निश्चळ । तोचि समाधि केवळ । क्षणक्षणां वृत्ति चंचल । होतां धारणेचाच होतो अभ्यास ॥ ४२॥ एवं ध्यान तें सगुण । धारणा ज्याची तें निर्गुण । चित्स्वरूपीं स्थिति तें लक्षण । समाधीचें ॥४३॥ एवं आसनीं वैसोनि योग । योजावा तो ध्यानयोग । चित्तचैतन्यसंयोग । तो योग पुढें बोलेल ॥ ४४ ॥ अष्टांग योग भागवतीं । कपिलमुनि देवहूतीप्रती । सांगे तेथें ध्येयमूर्ती । सविस्तर सांगे मुकुंदाची ॥ ४५ ॥ आरंभीं कपिल मुनि । सबीजयोग सांगतों ह्मणोनि । ह्मणे आणि बीज तें पायांपासूनि । ध्यान सांगे मूर्तीचें ॥ ४६ ॥ द्वितीय स्कंधीं येचि रीती । एकादशस्कंधीं उद्धवाप्रती । जेथें अष्टांग तेथें बोलती । पुराणांतरींही ध्यान सगुणाचें ॥ ४७ ॥ आतां यानंतर श्लोक । तो कां बोले उत्तमश्लोक । त्याचें निमित्त सुज्ञलोक । परिसोत आधीं ॥ ४८ ॥ ध्यानयोगबुद्धिशुद्धीकारण । योजितां मूर्ति सगुण । आवडे तेव्हां अन्यत्र निपुण । विरक्त होय ॥ ४९ ॥ हेंचि अत्यंत शुद्धी । कीं विषयवैराग्य सिद्धबुद्धि । एवं या शुद्धीची सिद्धी । बुद्धीस जाली ॥ २५० ॥ परी भजन मांडलें द्वैत । मुख्य फल बाणावें अद्वैत । तो ध्यातां साकार अत्यंत । भेदसंस्कार उपजला ॥ ५१ ॥ ध्यान ह्मणतां दुसरें । ध्यावें हेंचि वाटे खरें । स्वस्वरूपध्यान एकसरें । केंवि घडे तयाला ॥ ५२ ॥ आतां सगुण ध्यानावरी । स्वरूपधारणा सांगावी परी । ते धारणा उत्तम जे दों प्रकारीं । न धरवे याला तेधवां ॥ ५३ ॥ आपली धारणा आपण । धरावी हे बाणावी खूण । आणि नाना अवयवध्यानीं जें निपुण । तें चित्त थारावें एकत्र ॥ ५४ ॥ याकारणें कमलेक्षण । सांगतो स्वनासाग्रनिरीक्षण । कीं ध्येय आपण ही खूण । बाणावी साधका॥५५॥ आणि मनास अनादि संस्कार । कीं स्मरावें नानाकार । जरी बिंबलें ध्यान साकार । तरी नानाकार अलंकार अवयव ॥ ५६ ॥ यालागीं स्वनासिकाग्रमात्र । जरी लक्षिती स्वनेत्र । दृष्टीसवें एकत्र । चित्त थारे ॥ ५७ ॥ आणि नासिकाग्रीं दृष्टि थारे । तरी मनाची कल्पनाही सरे । कीं दृष्टि सर्वत्र वावरे । ते थारली एकत्र ॥ ५८ ॥ या

संस्कारें चित्त । होय जेव्हां संस्कृत । निराकाराची निश्चित । धरूं शके धारणा ॥ ५९ ॥ यालागीं नासिकाग्रनिरीक्षण । बोलों पाहतो कमलेक्षण । त्याही पुढिल्या श्लोकीं लक्षण । धारणेचें बोलेल ॥ २६० ॥ आतां बैसोनि कोणे रीती । लक्षावें नासिकाग्राप्रती । तें बोलेल स्वयें श्रीपती । या श्लोकीं ॥ ६१ ॥

॥ श्लोक ॥ समं कायशिरोग्रीवं धारयन्नचलं स्थिरः ।
संप्रेक्ष्य नासिकाग्रं स्वं दिशश्चानवलोकयन् ॥ १३ ॥

॥ टीका ॥ काय शिर आणि मान । हीं तिन्ही धरूनि समान । असतीं अचळ वर्तमान । शरीर असें ऐसें करावें हा भाव ॥ ६२ ॥ कीं स्थिर होतां शरीर । अंतःकरण होतें स्थिर । तेव्हां आपण स्थिरतर । ऐसें वाटे ॥ ६३ ॥ एवं स्थिर शरीर । करूनि होऊनि आपण स्थिर । अभ्यासीं व्हावें तत्पर । तो अभ्यास उत्तरार्धें बोलतो ॥ ६४ ॥ उत्तरार्ध ॥ "संप्रेक्ष्य नासिकाग्रं स्वं दिशश्चानवलोकयन्" ॥ टीका ॥ कीं वरत्रिया प्रकारें । पाहूनि स्वनासिकाग्र बरें । दहा दिशा एकसरें । न पाहतां पहावें नासिकाग्रमात्र ॥ ६५ ॥ नासाग्र ऐसें लक्षूनि । या लक्षें मन संयमूनी । स्वरूपधारणा धरावी तेही सोडूनी । ऐसें बोलेल आतां या दुसरिया श्लोकें ॥ ६६ ॥

॥ श्लोक ॥ प्रशांतात्मा विगतभीर्ब्रह्मचारिव्रते स्थितः ।
मनः संयम्य मच्चित्तो युक्त आसीत मत्परः ॥ १४ ॥

॥ टीका ॥ पूर्वोक्तरीती निश्चित । मन संयमूनि व्हावें मच्चित्त । ह्मणजे चित्तीं प्रकाशक अत्यंत । जो मी स्मरावें त्या मातें ॥ ६७ ॥ ऐसा होय तेव्हां युक्त । ह्मणजे चित्त स्वरूपीं प्रयुक्त । आणि मत्पर ह्मणजे माझा भक्त । कीं मीच परसिद्धिदायक जयाचा ॥ ६८ ॥ कीं सगुणध्यानयोगीं । प्रीति वाणली माझियालागीं । मीचि थोर ज्यास ऐसा योगी । बसे धारणा ऐसी धरूनी ॥ ६९ ॥ सोडोनि नासाग्रनिरीक्षण । धारणा धरायाचें लक्षण । हें बोलिला कमलेक्षण । उत्तरार्धें ॥ २७० ॥ कीं यमनियमांचीं आंगें । पूर्वार्धीं त्याचिया प्रसंगें । सूचवूनि उत्तरार्धें श्रीरंगें । धारणा त्याची वर्णिली ॥ ७१ ॥ कीं यमनियमांविना । या साधनासि कोणी पावेना । हें सूचवावया साधकजना । आधीं यम नियम त्याचे बोलतो ॥ ७२ ॥ तत्रापि सगुणध्यान । करितां पावला समाधान । ह्मणोनि आतां यमनियमसाधन । विशेष पूर्वे यमनियमांहि परिस ॥ ७३ ॥ कीं प्रशांत ज्याची बुद्धी । ते ध्यातां सगुण पावली शु-

ती । प्रशांतता ज्यास त्यास इंद्रियजयसिद्धी । दृढ यम ऐसा जयाचा ॥ ७४ ॥ ब्रह्मचारी व्रती परम । या गोष्टींत सुचवी नियम । कीं योगास अनुकूळ तें स्वीकारी उत्तम । योगप्रतिकूळ तें टाकी ॥ ७५ ॥ टाकी योगप्रतिकूळ । धरी जें योगास अनुकूळ । या त्यागयोगीं भयविव्हळ । नव्हे कीं असे जो मत्पर ॥७६॥सिद्धिदाता माझा हरी । ऐसा भाव ज्याच्या अंतरीं । तो मत्पर भय न धरी । योगविघ्नाचें ॥ ७७ ॥ ऐसा पूर्वार्धेंकरूनी । साधक आधीं वर्णूनी । उत्तरार्धें मन संयमूनी। मच्चित्त असतो हें बोले ॥ ७८ ॥ या श्लोकीं हरी । धारणा बोलिला परी । समाधि हेंचि धारणा करी । न येती लय विक्षेप ॥ ७९ ॥ निद्रेस ह्मणावें लय । विक्षेपकल्पनाचा निर्णय । या दोहींकरितां होय । समाधिभंग ॥ २८० ॥ त्यांत युक्ताहारविहार । हीं नियमांगें बोले सर्वेश्वर । निद्रालस्याचा परिहार । त्या उपायें ॥ ८१ ॥ विक्षेप नानाकार । कल्पना उठे वारंवार । त्यास उपाय प्रत्याहार । अष्टांगाचें अंग तेंहीं ॥ ८२ ॥ त्यांत जन्मांतरयोगभ्रष्ट । ज्यास साधनें पूर्वजन्मीं यथेष्ट । घडलीं त्याला विना कष्ट । योग वाणे ॥८३॥ किंवा आत्मज्ञ आणि सगुणभक्त । सगुणीं प्रीतीविषयीं विरक्त । विक्षेपापासूनि मुक्त । चित्त त्याचें होतें अनायासें ॥ ८४ ॥ "तेषामहं समुद्धर्ता"। ऐसें द्वादशीं विश्वभर्ता । ह्मणेल कीं त्याच्या योगसिद्धीचा कर्ता । मी स्वयें होतसें॥ ८५ ॥ कीं "अनन्येनैव योगेन । मां ध्यायंत" ऐसें मधुसूधन । बोलेल कीं अनन्ययोगेंचि ध्यान । माझें जयां ॥ ८६ ॥ तयांचा ह्मणे मी उद्धर्ता । तेव्हां त्यांचा योगसिद्धिकर्ता । मी क्षीराब्धिकन्येचा भर्ता । सूचवी ऐसें॥ ८७ ॥ भक्त ऐसा धरी धारणा । तों तेचि समाधि आणे अंतःकरणा । नलगे त्या कृष्णशरणा । प्रत्याहाराची खटपट॥८८॥ प्रस्तुतीं शार्ङ्गधर । या साधकां ह्मणे मत्पर । यालागीं एथें प्रत्याहार । अंग अष्टांगाचें न दावी ॥ ८९ ॥ आणि अव्यक्तोपासक । योगभ्रष्ट जो साधक । तो पूर्वाभ्यासेंचि आत्यंतिक । समाधि पावे अनायासें ॥ २९० ॥ या योगभ्रष्टप्रकरणीं । याच अध्यायांत चक्रपाणी । बोलेल यालागीं एथें वाणी । न बोले प्रत्याहाराची॥९१॥प्रस्तुतीं योगी मत्पर । ह्मणूनि बोलिला जो साधक नर । त्याचा समाधिपर्यंत सर्वेश्वर । योग बोलोनि मग प्रत्याहार बोलेल ॥९२॥"संकल्पप्रभवान्कामांस्त्यक्त्वा" ह्मणोनी । प्रत्याहारलक्षण या श्लोकापासूनी । श्रीकृष्ण बोलेल बोलोनी । याचा समाधियोग तेथपर्यंत ॥९३॥एवं

ऐसा प्रत्याहार । तो विक्षेपाचा परिहार । लयपरिहारप्रकार । अपेक्षी तयां सर्वांसही ॥९४॥कीं प्रारब्धें लागला असे देह । जरी टाकिला त्याचा स्नेह । आहारनिद्रा निःसंदेह । पाहिजे त्यासी ॥ ९५ ॥ लय निद्रा समाधींत । न ऐथेंही भगवंत । या पुढिलिया श्लोकापुढें अव्यवहित । त्या श्लोकांत बोलेल ॥ ९६ ॥ या श्लोकीं धारणा । बोलिली ज्याच्या अंतःकरणा । त्याच्या प्राप्तीच्या विवरणा । बोलतो या श्लोकें ॥ ९७ ॥

॥ श्लोक ॥ युंजन्नेवं सदात्मानं योगी नियतमानसः ।
शांतिं निर्वाणपरमां मत्संस्थामधिगच्छति ॥ १५ ॥

॥टीका॥ अर्जुना या प्रकारें चित्त । जो सदा योजी योगव्रत । ज्या योगियाचें नियत । मन असे॥९८॥तो पावतो परम शांति । निर्वाण परमा जीस ह्मणती । परमनिर्वाण बोलती । कैवल्यातें ॥ ९९ ॥ कैवल्य तें परम । जें शुद्ध निर्गुणब्रह्म । तें सर्वदा सर्वत्र निर्धर्म । स्फुरे स्पष्ट ॥३००॥ कामादि अशांत ऊर्मी । लेश नसती त्या ब्रह्मीं । जेथें तूं आणि मी । भेद कांहीं दिसेना ॥ १ ॥ ज्यास बाणे हा अनुभव । त्यातें सहज शांतिवैभव । जीवन्मुक्त तो मानव । ह्मणावा तेव्हां॥ २ ॥ पावतो ऐशा शांतितें । जो अधिष्ठूनि असे मातें । कीं माझ्या ब्रह्मानुभवातें । नसे खंडत्व ॥ ३ ॥ अखंड निर्गुणाचा अनुभव । तेथें अखंड शांतीचें वैभव । हे माझी शांति ही पावती मानव । योगेंकरूनी ॥४ ॥ एवं ऐसी धारणा । तेचि समाधि बाणे अंतःकरणा । तेव्हां या शांतीच्या खुणा । तो पावे॥५॥आतां यानंतर श्लोक । तो कां बोलेल उत्तमश्लोक । त्या दों श्लोकांचें सुज्ञलोक । निमित्त आधीं परिसोत॥६॥ कीं स्वभक्त योगनिष्ठ । त्यांचें आपण पुरवितों अभीष्ट । ते सिद्ध होती न लागतां कष्ट । त्यांत हा मत्पर ह्मणूनि वर्णिला॥७॥कीं यमादि सात अंगें । समाधीपर्यंत वर्णिलीं श्रीरंगें । अनायासप्राप्तिप्रसंगें । प्रत्याहार नाहीं वर्णिला ॥८॥अनायासें पावे मत्पर । अथवा योगभ्रष्ट नर कीं । योगाभ्यासीं जन्मांतर । क्रमिलें ज्यानें॥९॥एवं विक्षेपकल्पना । स्वभक्तास कीं योगभ्रष्टास असेना । परि निद्राधर्म देहाचा सुटेना । देहपातपर्यंत ॥३१०॥ त्यास निद्रा आहारविहार । नियत होतां निद्राविकार । न करूं शके बलात्कार । त्यास समाधिमाजी ते निद्रा ॥११॥ योगाभ्यासी जन्मांतरीं । तोही नियत निद्रा आहार न करी । तरी निद्रासमाधीतें परिहरी । लयाच्याही ॥१२॥ आतां भक्ताचीं विघ्नें देव । परिहरी तो देवाधिदेव । तरी निद्रापरिहारही स्वयमेव । तोचि

कराल ह्मणावा समाधींत ॥ १३ ॥ धान्य भक्ताचे घरीं । तो स्वयें रांधी भोजन करी । त्यास पाहिजे कां परी । भगवंत॥ १४ ॥ चालायास उपाय। आपलेच दोन्ही पाय । एथें पाहिजे त्यास काय । परमगतिदाता भगवंत ॥१५॥पांडवांहातीं युद्ध । करवूनि दे त्यांस राज्यसमृद्ध । त्यांस असाध्य तें स्वयें सिद्ध । कार्य करूनि दाखवी॥१६॥ किंबहुना विश्वरूपीं । कौरव मारूनि दात्री तथापी । त्याचेच हातें ते पापी । मारविले समस्त ॥ १७ ॥ स्वयें भक्तांची योगसिद्धी । स्वयेंचि त्यांची साधनसमृद्धी । तथापि दावी ऐसी प्रसिद्धी । कीं तेही करिती योगप्रयत्न ॥ १८ ॥ तथापि इतरां दुर्लभ । तें त्यांस करी अति सुलभ । सोपे यत्न श्रीवल्लभ । त्यांचे हातीं करवितो ॥ १९ ॥ एवं जे स्वभक्त । आणि योगभ्रष्ट विरक्त । आणि याचि जन्मीं उपासिती अव्यक्त । योगयत्न इतुक्यांसही ॥ ३२० ॥ त्यांत योगी स्मरतां स्वरूप । जो नाना कल्पनारूप । तो परिहारणें विक्षेप । क्लेशसाध्य अष्टांगीं ॥ २१ ॥ त्या विक्षेपाचा परिहार। होय आणि सिद्धीतें सत्वर । स्वभक्त पावेच ऐसा सर्वेश्वर । स्वभक्तियोग देतो तयासी॥ २२ ॥ श्रवणकीर्तनें जैसा जैसा । मळ मनाचा जातो तैसा तैसा । चित्तीं चित्स्वरूपाचा ठसा । स्पष्ट दिसतो ॥ २३ ॥ प्रतिपदीं हें भागवतीं । शुकादि योगी वर्णितीं । अष्टांगयोगाच्या सांगतां रीती । सिद्धि ध्यानयोगें सगुणाच्या ॥ २४ ॥ एवं ध्यातां सगुणरूप । विघ्न न करी विक्षेप। समाधि स्थैर्य तो प्रताप । सगुण ध्यानाचा ॥ २५ ॥ सुगम निद्रापरिहार । युक्तनिद्रा आहारविहार । ह्मणोनि या प्रसंगें तो प्रकार । बोलतो या श्लोकें करूनी ॥ २६ ॥

॥ श्लोक ॥ नात्यश्नतस्तु योगोऽस्ति न चैकांतमनश्नतः ।
न चातिस्वप्नशीलस्य जाग्रतो नैव चार्जुन ॥ १६ ॥
युक्ताहारविहारस्य युक्तचेष्टस्य कर्मसु ।
युक्तस्वप्नावबोधस्य योगो भवति दुःखहा ॥ १७ ॥

॥ टीका ॥अर्जुना जो अत्यंत भक्षी । तो स्वस्वरूपातें काय लक्षी । तटतटती ज्याच्या कुक्षी । बोट न रुते रोंवितां ॥ २७ ॥ यालागीं जो भक्षी बहुत । त्यास योग नसे निश्चित । आणि त्यासही एकांत । न साधे जो कांहींच भक्षीना ॥ २८ ॥ कीं अन्नावीण । विकळ होय अंतःकरण । तो जरी योगनिपुण । न वाणे योग ते समयीं तैशासही ॥ २९ ॥ व्यतिरेक आणि अन्वय । दोन्ही योगीं हा निश्चय । योग आणि एकांतशब्दद्वय । दों

परी योजिलें या भावें ॥३३०॥ योगशब्द उभयत्रहीं । एकांतशब्द विशे-षें कांहीं । अन्वयाकडे जैसा तैसा नाहीं । व्यतिरेकाकडे ॥३१॥ कीं एका चित्स्वरूपांत । दिसे सर्वा जडाचा अंत । तो योग बोलावा एकांत । जैंवि एका हेमीं नाना अलंकार ॥ ३२ ॥ व्यतिरेकयोगीं योगियास । एकांताचा ऐसा न दिसे विलास । एकांत वाणोनिही त्यास । एकांत ऐसा दिसेना ॥ ३३ ॥ कीं जडावेगळें जें स्वरूप । त्यांत सत्त्वही जालें चिद्रूप । परी तेंचि सर्व हा प्रताप । न दिसे त्यांत अन्वय समाधीचा॥३४॥ज्यांत मन जालें उन्मन । तेंचि सर्वचैतन्यघन । एकांत या भावें सज्जन । निर्गुणसमाधीसही ह्मणती ॥ ३५ ॥ परि हा वेगळाचि अनुभव । न दिसे हें तेथें वैभव । बोले हृदयीं धरूनि हा भाव । योग एकांत हीं भिन्ननांवें भगवंत ॥३६॥ एवं द्वि-विध योगही निश्चित । न साधती त्यास जो भक्षी अत्यंत । आणि जो नसे कांहीं भक्षित । योग दोन्ही न साधती तयासीं॥ ३७॥ आणि जो निजे ब-हुत । असाध्य त्यातेंही निश्चित । अथवा अखंड जागाच अत्यंत । योग अ-साध्य त्यातेंही॥३८॥यालागीं युक्त आहार । आणि युक्त ज्याचा विहार । युक्त निद्रा युक्त जागर । आणि कर्मी चेष्टाही युक्त जयाच्या॥३९॥ यो-गसिद्धि त्याला । कीं युक्तपण इतुकिया गोष्टींत जाला । ज्या योगसिद्धींत बोलिला । नाश दुःखा अनादीचा ॥३४०॥ आहारयुक्त ऐसा । कीं ज्याचा आहार जितका जैसा । त्यांत योगास अनुकूळ तितका तैसा । घेणें आहार तो युक्त ॥४१ ॥ भक्षितां अन्न फार । पासला पडों पाहे नर । डरडरां येती ढेकर । योग कैंचा तयासी ॥४२॥ आणि न भरतां उदर । अल्प घेतां आ-हार । योगीं नव्हे चित्त स्थिर । नव्हतां शांति क्षुधेची ॥ ४३ ॥ जितकिया आहारें चित्त । योगीं थारे उल्हाससहित । हे खूण समजावी निश्चित । ज्याची त्यानें ॥ ४४ ॥ हा नव्हे हटयोग । कीं अन्न भरावें दोन भाग । एक उदकें चतुर्थ विभाग । रिता ठेवावा पोटाचा ॥ ४५ ॥ वायु-धारणा जेथें । हा हटनियम तेथें । तोचि नियम एथें । कीं चित्त उल्हासयुक्त थारे स्वरूपीं ॥ ४६ ॥ एवं ज्या देशीं जो आहार । त्यांतही पवित्र प्रकार । तोचि घ्यावा कीं दृढतर । अभ्यास त्याच अन्नाचा ॥ ४७ ॥ अन्न टाकूनि पर्ण । खातां लागे हगवण । साधील येऊनि कवण । योग त्याचा ॥ ४८ ॥ शरीर पर्णाहार सोसी । तरी अन्नाची धरूं नये असोसी । होऊनि अरण्यवासी । पर्णें भक्षूनि योग साधावा॥४९॥ऐसेंचि

कदन्न अथवा रूक्ष। सोसतां होऊनि साक्षेप। सदन्नसघृतदक्ष । योगाभ्यासी न इच्छिती ।। ३५०।। एवं योगास अनुकूळ । तें भक्षावें टाकावें प्रतिकूळ। ऐसाच अगत्य केवळ । विहारही तितकाच ।। ५१ ॥ विहार गमनागमन। योगार्थ करिती योगीजन । स्नान पान भोजन । गमनागमन यदर्थ ॥ ५२ ॥ तोही बहु विहार। करितां होय श्रांत फार। चित्त त्याचें स्वरूपाकार। नव्हे साधकाचें ॥ ५३ ॥ आणि विहार न करी कांहीं । एकाग्र मन नव्हे तयाचें-ही । कीं दडोनि राहणें याचा नाहीं। अभ्यास ज्याला ।। ५४ ॥ ज्याला फिरणेंचि नावडे। तो जरी एकेचि ठायीं दडे। त्याची योगसिद्धि घडे। तित-कियानेंचि॥५५॥एवं युक्ताहार ।आणि युक्त विहार। तोचि कीं जो करिता प्रकार। योगस्वरूपीं थारे चित्त ॥ ५६ ॥ कर्मीही याच रीती। युक्तचि अंगचेष्टा ज्याच्या होती । कीं योगार्थ रक्षणें शरीरस्थिती। तदर्थ अगत्य अंगचेष्टा ॥५७॥ वेदोक्त नित्यकर्मं करी । तें योगास अनुकूळ त्याचपरी। अत्यंत जपतपावरी । न धरी आदर ॥ ५८ ॥ गायत्रीचा जप उत्तम। तो एकसहस्र शत मध्यम । कनिष्ठ जपाचा नेम । दशकमात्र श्रुतिसिद्ध ॥५९॥ ॥श्रुति॥सहस्रपरमा देवीं शतमध्यां दशावराम् ॥श्रुत्यर्थ॥ स्पष्ट श्रुतीचा अर्थ। एवं शुद्धचित्तयोगाभ्यासीं कृतार्थ । अगत्यविधिपरिपालनार्थ । कर्मं करी ॥३६०॥ त्यांत गायत्रीचा जप। करितां स्फुरे जरी स्वरूप। विघरलें आणि थिजलें तूप । भिन्न नसती ॥६१॥ अन्वयें आत्मा स्मरे। त्यास जडीं नगीं आत्महेम स्फुरे। एवं जप आणि योग यासी नुरे। वेगळेपण॥६२॥"यज्ञानां जजपयज्ञोऽस्मि"। म्हणोनि कृष्ण अंतर्यामीं । पुढें बोलेल कीं जपयज्ञ मी । स-र्वां यज्ञांत ॥ ६३ ॥ ऐसा एकाग्रतेचा जप। तो जपयज्ञ भगवत्स्वरूप। योगास अनुकूळ हें तप। तो साधकही कर्मां युक्तचेष्ट॥६४॥ऐसा घडतां जप। परादिवाचांचें रूप। होय अवघें स्वरूप। बाणे समाधी ॥६५ ॥ कीं शब्द-स्फूर्ति राहे। तरी निर्विशेष योग होत आहे। आणि शब्दीं स्वरूप पाहे। तरी योग सविशेष तोही म्हणावा ॥ ६६ ॥ न बाणतां दोन्ही रीती । जे जपचि फार करिती। ते इतरांहूनि बरे परि योगगती। अंतरे योगि-याची ॥ ६७ ॥ तो नव्हे कर्मीं युक्तचेष्ट। कीं हे चित्तशुद्धीनिमित्त कष्ट। हा चित्त योजूं लागला स्पष्ट। स्पष्टतर स्वस्वरूपीं ॥ ६८ ॥ आतां निद्रा जागृती। उभयत्र युक्त ये रीती। कीं न बहु निजे अथवा अती। जागाच नित्य न असे ॥ ६९ ॥ कीं जरी बहुतांचि निजे। तरी तमोगुणें चित्त भि-

जे । भिजट फार होतां न शिजे । दाळ तुरीची जे रीती ॥ ३७० ॥ आणि काळ वेंचूनी । निद्रेंत जाय योगावांचूनी । जों जों निजे तों तों दिनदिनीं । वाढोंच लागे निद्राही ॥ ७१ ॥ जागाचि असे जरी । योगीं निद्रा लाघे तरी । एवं योगीं निद्रा न ये यापरी । तावन्मात्र करी निद्राही ॥ ७२ ॥ न बहु होय निद्रित । न बहु असे जागृत । त्यास योग बाणे जो अत्यंत । नाशी अनादि दुःखें तीं ॥ ७३ ॥ एवं आहार विहार । आणि कर्मीं चेष्टा हे सकळ प्रकार । बोलिले कीं ऐशियास विकार । लय न करी अभ्यासी ॥ ७४ ॥ कीं बहुत होतां आहार । निद्राच येऊं लागे फार । केवळ राहतां निराहार । निद्राच ये रूपें मूर्छेच्या ॥ ७५ ॥ बहुत होतां विहार । श्रमें निद्राच ये फार । कांहींच न करितां विहार । क्षुधामांद्य ॥ ७६ ॥ क्षुधा मंद जेव्हां । अन्न न चले तेव्हां । निद्रा नये आणि तेधवां । योगीं न थारे चित्तही ॥ ७७ ॥ तथापि चित्त लागे जरी । निद्रा घाला घाली वरी । एवं ही सर्व नियमाची परी । लय परिहाराकारणें ॥ ७८ ॥ एवं आहारादि नियम । होतां योग बाणे परम । तो समाधि अत्युत्तम । त्याचें लक्षण आतां या श्लोकीं ॥ ७९ ॥

॥ श्लोक ॥ यदा विनियतं चित्तमात्मन्येवावतिष्ठते ।
निःस्पृहः सर्वकामेभ्यो युक्त इत्युच्यते तदा ॥१८॥

॥ टीका ॥अगा जेव्हां विशेषें नियत । उक्तप्रकारीं नेमिलें जें अत्यंत । तें आत्मस्वरूपींच थारे चित्त । ह्मणावा योगारूढ तेव्हां तो योगी ॥३८०॥ आत्मस्वरूपींच स्थिर । चित्त होय ह्मणतां सर्वेश्वर । योगरहस्य चमत्कार । सुचवी एथें ॥ ८१ ॥ कीं जो स्फुरे आत्मप्रत्यय । तोंचिवरी चित्त चिन्मय । त्यांत कांहीं विस्मृति होय । समाधिभंग ते काळीं ॥ ८२ ॥ आत्मत्वें स्फुरे स्वस्वरूप । तेथें विस्मृति पडतांच विक्षेप । कल्पना उठे नानारूप । भंगे समाधी ॥ ८३ ॥ त्या विस्मृतीचें निमित्त । होतें तेथें तेंचि चित्त । कीं वैराग्य न असे अत्यंत । चित्तासि ज्या ॥ ८४ ॥ ज्याची ज्याची आवडी । त्यावरी पडे स्मृतीची उडी । एवं थिता समाधि मोडी । लेशाही प्रीति विषयांची ॥ ८५ ॥ ते नसे जयाला । समाधिस्थैर्य बाणे तयाला । ह्मणोनि कृष्ण ह्मणे याला । कीं निस्पृह जो सर्व कामापासूनी ॥ ८६ ॥ एवं निस्पृहा न विक्षेप । कीं ज्यास आवडे एक स्वरूप । लयपरिहाराचें तें जें रूप । तें युक्ताहारविहारत्वींच बोलिलें ॥ ८७ ॥ एवं

विक्षेप कल्पनेतें ह्मणती । तेव्हां स्वप्न किंवा जागृती । कीं निद्रेतही देखती । नानारूपें तें स्वप्न ॥ ८८ ॥ एवं स्वप्न आणि जागृती । कल्पनेंत अवस्था दोनी दिसती । निद्रा ह्मणावी नुसती । ते सुषुप्ति अत्यंत ॥ ८९ ॥ एवं विक्षेप आणि लय । तेव्हां स्फुरे अवस्थात्रय । जेव्हां चित्त स्वस्वरूपमय । तेव्हां तुर्यावस्था चतुर्थी॥३९०॥ एवं आत्मा तुर्यातीत । तेव्हां तदाकार होय चित्त । ते तुर्या ह्मणावी शुद्ध अत्यंत । शबल तुर्या अन्वय समाधी ॥ ९१ ॥ कीं दिसे स्वदेहादि विश्व । ते जागृति तदभिमानी अत एव विश्व । तें विश्व दिसे अविश्व । शबल तुर्या ते ह्मणावी ॥ ९२ ॥ एवं व्यतिरेकें अथवा अन्वयें । स्वचित्तीं स्फुरे आत्मा स्वयें । जोंपर्यंत तोंवरी निश्चयें । अवस्था तुर्या ते ह्मणावी ॥९३॥ प्रस्तुतीं ह्मणे अच्युत । कीं जेव्हां आत्मस्वरूपींच चित्त । थारे तेव्हां आरूढ निश्चित । ऐसें ह्मणतांच हे तुर्या ॥ ९४ ॥ चित्ताची प्रत्येक वृत्ती । तेव्हां आत्मयास प्रत्यगात्मा ह्मणती । तुर्याभिमानी अधिपती । तोचि तेव्हां तुर्येचा ॥ ९५ ॥ एवं लय आणि विक्षेप । निरसलें दोहींचें स्वरूप । चित्त चित्स्वरूपीं चित्स्वरूप । होऊनि जेव्हां थारलें ॥९६॥ तें चित्त कां होतें चंचळ । आणि कोण्या गुणें जालें निश्चळ । हें उपमारूपें घननीळ । बोलतो आतां या श्लोकीं ॥ ९७ ॥

॥ श्लोक ॥ यथा दीपो निवातस्थो नेङ्गते सोपमा स्मृता ।
योगिनो यतचित्तस्य युंजतो योगमात्मनः ॥ १९ ॥

॥ टीका ॥ अगा अर्जुना दीप । वारा लागतां पावे कंप । विषयवासनेनें ऐसें रूप । होतें पहिलें जया चित्ताचें ॥९८॥ ज्या स्थळीं चंचळ नसे समीर । तें स्थळ निर्वात ह्मणती नर । त्या निर्वातस्थळीं स्थिर । दीप जैसा ॥ ९९ ॥ ऐसें योगियाचें चित्त । जें वैराग्याच्या बळें यत । यत ह्मणजे नियत । नेमिलें वासनेवेगळें करूनि ॥ ४०० ॥ तें त्या योगियाचें चित्त । जो त्यास आत्मत्वीं होता योजित । ह्मणजे अभ्यासीं होता रत । समाधि बाणला तयासी ॥१॥ एवं वैराग्य आणि अभ्यास । दोंचि उपायें वळवावें चित्तास । हें अर्जुनातें श्रीनिवास । प्रश्नोत्तरीं याच अध्यायांत बोलेल ॥२॥ तोचि भाव एथें दावी । अर्जुनास हे कळा नसे ठावी । ह्मणोनि करितां प्रश्न या भावीं । उत्तर देईल श्रीकृष्ण ॥३॥ एवं ज्या आकाशीं दीप । समीरें होतां अति सकंप । निर्वात होतां स्थैर्यरूप । त्याच आकाशीं पावला ॥ ४ ॥ ऐसें ज्या स्वरूपीं चित्त । वासनेनें होतें भ्रमत । वैराग्याभ्यासें अ-

त्यांत। स्थैर्य त्याच स्वरूपीं पावलें ॥ ५ ॥ आतां यानंतर श्लोक । जो कां बोलेल उत्तमश्लोक । त्याचें निमित्त सुश्लोक । परिसोत आर्यी ॥ ६ ॥ निवातशब्दें निर्वासना। "आणि युंजतो योग" ह्मणतां सूचना । अभ्यासाची दाविली कीं या दों विना । न बाणे समाधी॥७॥ परि वैराग्य उपजे जयास । समाधीच बाणावा तयास । करणें लागे कां अभ्यास । स्थळ ऐसें पूर्वपक्षाचें ॥ ८ ॥ कीं स्वरूपास चित्त । स्पर्शे तेव्हां अभ्यास नियत । तेथें न थारतां उचित । अभ्यास करणें ॥९॥ तेथें न थारायास मूळ । विषयवासना ओंगळ । जो मुमुक्षु विरक्त प्रांजळ । न थारे चित्त कां तयाचें॥४१०॥ अभ्यास तेव्हां निश्चित । कीं स्वरूपास लागे चित्त । कीं वाचेस लागे श्लोकार्थसांत । अभ्यास घोषाचा तरी घडे॥११॥ गुरुमुखें वेदऋचा । आयके परि उच्चारूं न शके वाचा । घोष अभ्यास पाठ करायाचा । केंवि घडे तयासी ॥१२॥वासनारूप पाप । नसतां कां उठे विक्षेप । कां चित्त विसरे स्वरूप । कां समाधिभंग कां अभ्यास ॥ १३ ॥ स्वस्वरूपीं न लागे चित्त । तों अभ्यास न घडे निश्चित । स्वरूपीं लागतांच अत्यंत । समाधि बाणावा विरक्तासी ॥ १४ ॥ ऐसें संशयाचें स्थळ । परी येथें अभ्यासासि एक मूळ । कीं तेव्हां नव्हे चित्त चंचळ । विरक्ताचें ही ॥१५॥ कीं स्वरूपानंद चाखे । निजानंदें चित्त माखे । तेव्हां तें आपणास राखे । स्वरूपीं स्वरूपाकार करीं ॥ १६ ॥कर्दमजळांतलि मासा । क्षीरसागरीं पडतां जैसा । परम सुखी होय तैसा । भाव चित्ताचा निजसुखीं ॥ १७ ॥ आत्माच सुख केवळ । परि सुख न वाटे जों वृत्तीची चळवळ । वृत्ति राहतां निश्चळ । ये अनुभवास सुखरूपें ॥ १८ ॥ विवेकें वैराग्यधरी । परि चित्तास अभ्यास आकारीं । तें योजितां निराकारीं । कोंडणी मानी आपणातें ॥ १९ ॥ ह्मणोनि योजितां चित्त । योजिलें न राहे अत्यंत । तें पुनःपुन्हा योजितां त्यांत । थारों लागे हळुहळू ॥ ४२० ॥ जैसी राजपत्नी नवोढा मनोरमा । मातृमुखें जाणोनि भर्तृमहिमा । बैसोनि अंकीं ही परमा । जाऊंच पाहे उठूनि ॥२१॥ जों जों वाढे सलगी । तों तों अधिक थारे पलंगीं । गोडी घेतां अंगसंगीं । ढकलिली तरी ढकलेना ॥ २२ ॥ तैसें चित्त घडी घडी । अभ्यासीं घे स्वरूपाची गोडी । स्थिरत्व बाणतां न सोडी । अनुभव तो आनंदाचा ॥२३॥ पोटीं इत्यादि भाव । भरूनि अभ्यास देव । विरक्तासही बोलोनि देवाधिदेव । स्थिति सुखानुभवें बोलतो दों श्लोकीं ॥ २४ ॥

॥ श्लोक ॥ यत्रोपरमते चित्तं निरुद्धं योगसेवया ।
यत्र चैवात्मनात्मानं पश्यन्नात्मनि तुष्यति ॥ २० ॥
सुखमात्यंतिकं यत्तद्बुद्धिग्राह्यमतींद्रियम् ।
वेत्ति यत्र न चैवायं स्थितश्चलति तत्त्वतः ॥ २१ ॥

॥ टीका ॥ अगा जेथें निरोधिलें चित्त । उपरमातें असे पावत । ह्मणजे स्वरूपीं स्वरूपमय असे होत । जडवृत्तिस्मरण टाकूनी॥२५॥जेथें आत्मया-चकरूनी । चित्त आत्माकार होऊनी । आत्मयाचमाजी आत्मयातें लक्षूनी । संतोषतें॥२६॥जैसे नेत्र दीपेंच करूनी । दीपातें पाहती ज्या सदनीं । तें सद-नही दिसेना नयनीं । देहादिप्रपंच तेव्हां ये रीती ॥२७॥ज्याकरितां दिसे देहादि जग । दोरीं दोराचकरितां जैसा भुजंग । त्या दोरेंच तो दोर पाहतां मग । भुजंग दृष्टीस दिसेना ॥ २८ ॥ या भावें ह्मणे भगवंत । कीं आत्मस्वरूपेंच आत्मयास चित्त । पाहे तेव्हां असे पावत । संतोषातें ॥ २९ ॥ कीं आत्मा-न दिसे अन्य कांहीं । जडप्रपंच भासत नाहीं । भाव कीं वृत्तिप्रवाहीं । चित्त नसे ते समयीं ॥४३०॥ अगा तें ह्मणावें सुख । जेथें वृत्तीच दिसेना सुख । वृत्तिजडत्व तेथें दुःख । हें सुख तों आत्यंतिक त्या परतें ॥ ३१ ॥ आत्यं-तिक शब्देंकरूनी । मनीं सामवेदश्रुतीतें धरूनी । आत्मसुखानुभव त्या वरूनी । सूचविला येथें॥ ३२ ॥ श्रुति ॥ यो वै भूमा तत्सुखं नाल्पसुखम-स्ति । अथ यदल्पं तन्मर्त्यं तद्दुःखम् ॥श्रुत्यर्थ॥ भूमा ह्मणजे अनंत । सर्वथा न असे ज्यास अंत । जो ऐसा अनंत तोचि अत्यंत । सुख ह्मणावा ॥३३॥ ज्यास ह्मणावें अनंत । त्यासचि ह्मणावें अत्यंत । अत्यंततेंच निश्चित । आत्यंतिक ह्मणावें ॥३४॥ अंत नसे त्यास संत । आणि वेद ह्मणती अनंत । आणि जें अतिक्रमूनि असे अंत । तें अत्यंत अनंत तेंचि या अर्थें ॥ ३५ ॥ ज्यास असे अंत । सुख नसे त्यांत । वृत्ति तितकी अंतवंत । अत्यंत तें जें असे अतिक्रमूनि त्यातेंही ॥ ३६ ॥ श्रुतिही ह्मणे कांहीं । जें अल्प त्यांत सुख नाहीं । अल्पीं त्या सुख नसोनि हीं । अल्प तें दुःख आणि नश्वर॥३७॥ एवं आत्मा सुखस्वरूप । चित्त जड अल्प दुःखरूप । त्यास विसरोनि सदा सकंप । कांपे वासनासमीरें ॥ ३८ ॥ वैराग्य आणि अभ्यास । दोहींकरूनि चित्तास । इतर वृत्तिस्मृतिनिरास । होतां समरसे आत्मत्वीं ॥ ३९ ॥ तेव्हां अनुभवा ये स्वरूप । तेंचि आत्मसुखानुभवरूप । जेव्हां चित्त होय निःकंप । दीप जैसा निर्वातीं॥४४०॥जडवत्ति तितकी अंतवंत ।

अतिक्रमूनि ते सर्व अंत । असे तें सुख अनंत । अत्यंत ह्मणावें या अर्थे ॥ ४१ ॥ तें सुख अनंत परि निर्गुण । त्यांत नसे अनुभवाची खूण । अमृत गोड परि रसनेवीण । नेणे गोडी आपुली ॥ ४२ ॥ एवं चित्तवृत्ती-करूनी । सुख तें जाणावें तन्मय होऊनी । तें अत्यंतचि सुख ह्मणोनी । आत्यंतिक ह्मणावें त्या चित्तें ॥ ४३ ॥ या भावें ह्मणे हरी । कीं आत्यंतिक सुख यापरी । तें योगी जाणेल जेव्हां त्या उपरी । तत्त्वापासूनि तेव्हां च्यवेना ॥ ४४ ॥ सुखस्वरूपाची गोडी । लागतां चित्त त्यातें न सोडी । चंचलत्वादि सर्व खोडी । सोडी गोडी सुखाची लागतां ॥ ४५ ॥ तें सुख अतींद्रिय । कीं बुद्धि होतां तन्मय । त्या बुद्धीनें ग्राह्यही निश्चय । अगम्य इंद्रियां सुख तें ॥ ४६ ॥सुगंध पुष्पहार । परि अज्ञानें भासला सर्पाकार । निरसूनि दृष्टिभ्रमविकार । शुद्ध दृष्टीनें पहावा ॥ ४७ ॥ हारीं स्पर्शिले नेत्र । परि भ्रमें जाले भयाचें पात्र । बुद्धि स्पर्शोनि चिन्मात्र । भी इंद्रिय-भ्रमें जडत्वें त्या तेंचि ॥ ४८ ॥ सर्प भासला जरी हार । सुगंध सुख दे वारंवार । तथापि सर्पाकार । भय मागुती उपजवी ॥ ४९ ॥ तैसा आत्मा च विषय । आणि तोचि इंद्रियसमुदाय । विषयसुखही देऊनि भय । जड-त्वभासें उपजवी ॥ ५० ॥ सुख विषयभोगीं तेंची । जडीं सुखाची वार्ता केंची । परि न कळतां शुद्ध खूण त्याची । दुःख उपजे जडत्वें ॥ ५१ ॥ भ्रम सर्पत्वाचा निरसे । तेव्हां तो हार दृष्टी दिसे । तैसा इंद्रियांस न असे । साक्षात्कार स्वरूपाचा ॥ ५२ ॥ दार्ष्टांतिकीं बुद्धि दृष्टांतीं दृष्टी । भ्रम इंद्रि-यें सर्प हे सृष्टी । भ्रमा इंद्रियांवेगळी होतां तुष्टी । अधिष्ठान हार लक्षितां तें पावे ॥ ५३ ॥ बुद्धिग्राह्य तें अद्दय । आणि ह्मणे अतींद्रिय । त्याचा भावार्थनिर्णय । या प्रकारें ॥ ५४ ॥ आत्मा बुद्धीस दिसे । कोठें वेद बोलती ऐसें । कोठें मनास कोठें चित्तास दिसतसे । ऐसेंही बोलती ॥५५॥ अंतःकरण सत्त्व । त्यासचि चित्तमनबुद्धित्व । कोण्या एका सत्त्ववृत्तीस तत्त्व । कळावें न असे भेद अन्योन्य ॥ ५६ ॥ एवं योगभ्रंशाचें कारण । तोंच जों नसे सुखस्वरूपें स्वात्मस्फुरण । सुखनिश्चयें अंतःकरण । अनुभ-वितां नव्हे भ्रंश योगाचा ॥ ५७ ॥ अंतःकरण चिन्मय । तें सुखरूपीं सुख-चि होय । सुख तें हेंचि ऐसा निश्चय । करी तेव्हां त्यातेंचि बुद्धि ऐसें ह्मणा-वें ॥ ५८ ॥ ऐशा सुखें जरी निवाला । प्रारब्धभोग न सुटे त्याला । तो भोग सुखदुःखरूपें बोलिला । तरी न चळे हें वदे आतां या श्लोकीं ॥५९॥

॥ श्लोक ॥ यं लब्ध्वा चापरं लाभं मन्यते नाधिकं ततः ।
यस्मिन्स्थितो न दुःखेन गुरुणापि विचाल्यते ॥ २२ ॥

॥ टीका ॥ अगा लाधोनि स्वात्मसुख । देखे जरी विषयसुखाचें मुख । तरी स्वसुखाहूनि सुख आणिक । सुखपणें न मानी ॥ ४६० ॥ कीं इतर सुखाचा लाभ । गाभणा ज्यांत दुःखाचा गाभ । लाभ त्याचाच कीं जें स्वयंभ । आत्मसुख आत्मत्वें अनुभवी ॥ ६१ ॥ सुखभोगीं यापरी । दुःखही प्राप्त जालें जरी । तें थोर दुःखही असेना कां परी । त्या सुखापासूनि तो चळेना ॥ ६२ ॥ कीं ज्या स्वात्मसुखीं स्थिति । पावला असे ब्रह्ममति । तो न चळे जरी अति । दुःख प्रारब्धें पावला ॥ ६३ ॥ ज्याचा महिमा ऐसा । त्या योगशब्दाचा अर्थ कैसा । तरी तो जाणावा ऐसा । ह्मणूनि बोलतो या श्लोकीं ॥ ६४ ॥

॥ श्लोक ॥ तं विद्यादुःखसंयोगं वियोगं योगसंज्ञितम् ।
स निश्चयेन योक्तव्यो योगो निर्विण्णचेतसा ॥ २३ ॥

॥ टीका ॥ अगा दोंचा जो योग । तो ह्मणावा योग । आतां चित्तचैतन्यसंयोग । हा तों असे आयता ॥ ६५ ॥ अगा रज्जु स्पर्शोनि दृष्टी । आधीं जेव्हां होत असे उठी । तेव्हां सर्प दावूनि कष्टी । करी द्रष्टा जो तयातें ॥ ६६ ॥ चित्ताची ऐसी वृत्ती । स्पर्शली आत्मयातें आयती । तरी दुःखरूपा वृत्ति स्फुरती । चित्तासि त्या ॥ ६७ ॥ अंतरीं चित्तचैतन्ययोग । वरी दुःखवृत्तीचा संयोग । त्या जडा दुःखवृत्तीचा वियोग । होतां योगचि आयता ॥ ६८ ॥ जडचैतन्यशोध । करितां चित्तास आत्मबोध । होतां करावा वृत्तिनिरोध । तोचि योग ऐसें बोले पतंजली ॥ ६९ ॥ पातंजलसूत्र ॥ ॥ योगश्चित्तवृत्तिनिरोधः ॥ टीका ॥ योगशास्त्र करणार । पतंजलि शेषावतार । तो योगाचा वदे हाचि प्रकार । कीं योग ह्मणजे निरोध चित्तवृत्तीचा ॥ ४७० ॥ चेतवणें चित्ताचें लक्षण । रहस्य जाणती हें विचक्षण । कीं आत्मस्वरूपें सचेतन । आपण होऊनि चेतवी सर्व वृत्ती ॥ ७१ ॥ ते त्याची पराक् वृत्ती । कीं सत्त्व धांवे रजतमाप्रती । त्याचीच प्रत्यक् वृत्ती । जे परतोनि पाहे स्वप्रकाशातें ॥ ७२ ॥ प्रत्यक्वृत्तिस्वरूप । पाहतांचि होय तद्रूप । कीं दृष्टि पाहूं लागे दीप । अन्य न देखे ते समयीं ॥ ७३ ॥ ज्या दीपप्रकाशेंचि नेत्र । पाहती पदार्थ चित्रविचित्र । ते पाहूं लागतां दीपमात्र । पदार्थ तेव्हां न दिसती ॥ ७४ ॥ चित्त न चेतवी जोंवरी ।

वृत्ति न चेतती तोंवरी । ते थारे स्वरूपीं जरी । वृत्तिनिरोधें सहजचि । ॥७५॥ विसरतां स्वरूपा । वृत्ति उठती त्या दुःखस्वरूपा । आत्मप्रतीति स्मृति तों सोपा । योग कीं वृत्ति न असती ॥७६॥ एवं जडवृत्तिसंयोग । तोचि अनादि दुःखभोग । त्या वृत्तीचा होतां वियोग । योग बाणे आयताचि ॥ ७७ ॥ ह्मणोनि जो दुःखसंयोग । त्याचा होतां वियोग । तोचि जाणावा योग । कृष्ण ह्मणे ॥ ७८ ॥ तो योग योगसंज्ञित । तो योजावाच निश्चित । विरक्त करूनि अत्यंत । सर्वत्रही चित्तातें ॥ ७९ ॥ 'निर्विण्णचेतसा' ह्मणोनि । वैराग्य बोले या शब्देंकरूनि । 'अनिर्विण्णचेतसा' ऐसें हीं या वचनीं । अकारयुक्तही पद होत असे ॥४८०॥ तेव्हां अनिर्विण्ण ह्मणजे अवैराग्य । तें प्रपंचीं ह्मणतां अभाग्य । प्रपंचीं वैराग्य तेंचि भाग्य । मोक्षसिंहासनीं बैसवी ॥ ८१ ॥ आतां प्रपंचीं वैराग्य । आणि आत्मयोगीं अवैराग्य । तेव्हां अवैराग्यशब्देंही भाग्य । कीं अनुराग चित्तास योगाचा ॥ ८२ ॥ एवं योगाची प्रीती । असेल ज्या शुद्धचित्तीं । त्या चित्तें हे योगस्थिती । आधीं आधीं साधावी ॥८३॥ आतां यानंतर श्लोक । तो कां बोले उत्तमश्लोक । त्याचें निमित्त विवेकी लोक । परिसोत आधीं ॥ ८४ ॥अष्टांगाचीं अष्ट अंगें । त्यांत सात वर्णिलीं श्रीरंगें । अनायासप्राप्तिप्रसंगें । प्रत्याहार नाहीं बोलिला ॥ ८५ ॥ कीं स्वभक्त अथवा योगभ्रष्ट । त्यांस न लागती बहुत कष्ट । बाणे तयां समाधि स्पष्ट । न लागतां क्लेश अत्यंत ॥ ८६ ॥ आतां जे अव्यक्तोपासक । आणि योगाचे साधक । त्यांस द्वादशीं क्लेश अधिक । "क्लेशोऽधिकतरस्तेषां" ह्मणोनि बोलेल ॥८७॥ त्यांस त्यांचें चित्त । अनावर अत्यंत । प्रत्याहार त्यांकारणें भगवंत । बोलेल आतां एथूनी ॥८८॥ ह्मणोनि योगमहिमा बोलोनी । योग असावाच ह्मणोनी । बोलिला आतां जे संकल्प मनीं । ते आधीं टाकावे ह्मणतो या श्लोकीं ॥८९॥

॥ श्लोक ॥ संकल्पप्रभवान्कामांस्त्यक्त्वा सर्वानशेषतः ।
मनसैवेंद्रियग्रामं विनियम्य समंततः ॥ २४ ॥

॥ टीका ॥ अगा संकल्पापासूनि । जे कामसंस्कार बैसले मनीं । ते संकल्पापासूनि जाले ह्मणोनि । ह्मणावे काम ॥ ४९० ॥ त्या सर्वां कामांतें । टाकूनि मग त्या मनेंद्रियांतें । अत्यंत नेमावें जीं नानाविषयांतें । त्यांत होतीं मनीं निघोनी ॥९१॥ त्या सर्वां विषयांपासूनी । मनें त्या त्याइंद्रियांतें नेमूनी । आत्मस्वरूपीं योजूनी । कांहीं न चिंतावें ह्मणे या श्लोकीं ॥ ९२ ॥

॥ श्लोक ॥ शनैःशनैरुपरमेद्बुद्ध्या धृतिगृहीतया ।
आत्मसंस्थं मनः कृत्वा न किञ्चिदपि चिंतयेत् ॥ २५ ॥

॥ टीका । अगा आत्मस्वरूपीं मन । योजून आणिक चिंतन । कांहींच करूं नये जतन । करावें आत्मप्रत्ययातें ॥९३॥ तें न सोडी विषयचिंतन । परी असे बुद्धीआधीन । बुद्धीकरूनि तें मन । आत्मतत्त्वीं थारे ऐसें करावें ॥९४॥परि ज्या बुद्धीस कामना । ते कां आवरील तया मना । यालागीं अगा अर्जुना । बुद्धि वश करावी धारणेनें॥९५॥पदार्थ जो बुद्धीनें नसे देखिला । तो धारणेमध्यें न रेखिला । देखिला तेव्हां रेखिला । धारणेमाजीं ॥ ९६॥ ज्याची होय ओळखी । ते धारणेनें बुद्धि रेखी । आत्मा कळतां त्यास लेखी । आत्मत्वें ॥ ९७ ॥ श्रवण मनन निदिध्यास । तिहीं-प्रकारें बुद्धीस । दृढ बसे संस्काररस । आत्मा ऐसा ह्मणोनी ॥ ९८ ॥ चिदात्माचि आत्मा हा निश्चय । जों जों करी तों तों तन्मय । होतां धारणा तेंचि होय । आत्मा प्रत्यगात्माच ह्मणोनी ॥ ९९ ॥ ऐशा धारणें-करूनी । जे बुद्धि असे निश्चय धरूनी । ते बुद्धि 'धृतिगृहीता' ह्मणोनी । ह्मणावी अगा ॥ ६०० ॥ त्या बुद्धीकरूनि उपरमीं । हळू हळू पावावें गा पांडवोत्तमा । ह्मणजे योगावांचूनि इतर कामा । मनीं न धरणें सर्वथा ॥ १ ॥ एवं आत्मयाविना । कांहींच नलगे ऐसी भावना । तेंचि उपरमणें अर्जुना । ह्मणनि सूचवी श्रीकृष्ण ॥ २ ॥ कीं बुद्धि जे धृतीकरूनी । आपणाकडे ओढोनी । घेतली विषयांतूनि काढूनी । हळू हळू उपरमावें त्या बुद्धीनें ॥ ३ ॥ पावोनि ऐशा उपरमातें । योगीं योजितां मनातें । आत्मस्वरूपीं बुद्धिवंतें । स्थिर करावें॥ ४ ॥ मन आत्मत्वीं करूनी स्थिर । चिंतूं नये कांहीं इतर । आत्मस्फुरण निरंतर । योगीं बाणे ऐसें करावें ॥५॥ बुद्धीनें उपरमावें । आणि मन स्वरूपीं स्थिर करावें । ऐसें बोले गहन भावें । श्रीकृष्ण एथें॥६॥ बुद्धीनेंचि उपरमावें । बुद्धीतेंचि कां स्वरूपीं न योजावें । हेंही घडे परंतु देवें । गहन भाव एथें सुचविला ॥ ७ ॥ कीं प्रपंचापासूनि उपरती । दुःख समजोनि भले धरिती । प्रपंचदुःख आत्माच सुख ये रीती । निश्चय करणें हेंचि बुद्धी॥८॥ उपरमातें पावणें । तें ऐसें या बुद्धीच्या गुणें । तेंही सत्त्व आणि कल्पना करणें । तें मनही तेंचि सत्त्व ॥ ९ ॥ सत्त्व बुद्धी करितांचि निश्चय । तेंचि मन होतां कल्पनामय । सत्त्वकल्पना करीना तेव्हां होय । योगीं मन तें उन्मन ॥ ६१० ॥ यालागीं कमलनयन । उपरम

बुद्धीनें बोलोनि मन । स्वरूपीं योजावें आणि चिंतन । ह्मणे कांहीं करूं नये त्या योगीं ॥ ११ ॥कीं कांहीं कल्पना उठे । तरी समाधि सिद्ध तोही तुटे । कृष्णहृदयीं हा भाव दाटे । मुखें ह्मणे मन स्थिर करावें ह्मणोनी ॥ १२ ॥ तथापि हें मन । अभ्यासीं करूंच लागे कांहीं चिंतन । तरी राहोनि सावधान । प्रत्याहारें आवरावें ह्मणे या श्लोकीं ॥ १३ ॥

॥ श्लोक ॥ यतो यतो निश्चरति मनश्चंचलमस्थिरम् ।
ततस्ततो नियम्यैतदात्मन्येव वशं नयेत् ॥ २६ ॥

॥ टीका ॥ ज्या ज्या पदार्थीं मन । निघोनि करी चिंतन । योगियानें होऊनि सावधान । तेथें तेथेंचि आत्मत्वीं योजावें ॥ १४ ॥ आत्मप्रकाशाविना । कल्पना तों उठेना । तेथें तेथेंचि त्या मना । प्रत्यग्वृत्तीनें योजावें आत्मत्वींच ॥ १५ ॥ ज्या आत्मस्वरूपेंकरूनी । मन न निघे कल्पना कल्पूनी । त्या आत्मस्वरूपींच योजूनि । वश करावें आत्मत्वीं ॥१६॥ ज्या आत्मत्वीं राहूं लागलें । मन तेधवांचि वश जालें । तोंवरी अभ्यासीं प्राप्त जालें । करणें ऐसें ॥ १७ ॥ वश होतां तें मन । राहतां वृत्तीचें चिंतन । अनुभवा ये आनंदघन । जें सुख आत्यंतिक बोलिलें या मार्गें ॥ १८ ॥ मन होतां स्थिर । पूर्वोक्त सुख योगचतुर । कैसें पावतो हें सर्वेश्वर । बोलतो आतां या श्लोकीं ॥ १९ ॥

॥ श्लोक ॥ प्रशांतमनसं ह्येनं योगिनं सुखमुत्तमम् ।
उपैति शांतरजसं ब्रह्मभूतमकल्मषम् ॥ २७ ॥

॥ टीका ॥ अगा मन जेव्हां प्रशांत । ह्मणजे प्रकर्षें अतिशयें शांत । योगीं होतां सुख अत्यंत । अनुभवा येतें ॥ ५२० ॥ मन ऐसें ज्याचें प्रशांत । त्यास सुखलभ्य होतें अत्यंत । लक्षणें दोन्ही या श्लोकांत । त्या सुखाचीं भगवंत बोलतो ॥ २१ ॥ तें सुख ह्मणोनि उत्तम । दों प्रकारें सर्वोत्तम । उत्तमत्व त्याचें पुरुषोत्तम । बोलतसे ॥ २२ ॥ शांत जेथें रजोगुण । ह्मणतां सुचवी हें निपुण । कीं जेथें नसे इंद्रियांचा गण । तें सुख शांतरज ह्मणावें ॥ २३ ॥ जेथें इंद्रियें न दिसतीं । तेथें विषय कैंचे असती । सुखप्रतीति नुसती । वाणे जेथें ॥ २४ ॥ विषयेंद्रिययोगें । जें चित्सुख भोगावें जगें । विषयेंद्रियवृत्तिवियोगें । योगीं शांत रजसुख तेंचि ॥ २५ ॥ कीं होऊनि सर्पाकार । शैत्यसुगंधें पुष्पहार । दाखवूनि भयही अपार । दावित होता ॥ २६ ॥ तो मिथ्या सर्प गेला । पुष्पहारसा कळों आला ।

तेव्हां जो गळां घाली त्याला । भयरहित सुख होय तो हार॥ २७ ॥ रज-तमवृत्तियोगें । सुखविषय इंद्रियभोगें । संसारदुःख त्या वासनासंगें । सुख तरी तें आत्मसुख ॥ २८ ॥ जेथें नसे रज । तम तेथें नसे सहज । तें सुख ह्मणे शांत रज । संसारचक्रापलीकडे ॥ २९ ॥ अनुभविलें तें सुख । तो संसारचक्राचें न पाहे मुख । ऐसें सुचवूनि आणिक । लक्षण सांगे त्या सुखाचें ॥ ६३० ॥ कीं तें सुख अकल्मष । ह्मणजे नसे जेथें वृत्तिकल्मष । कीं उपजे दुःखाचें किल्विष । जडवृत्तिरूपें ॥ ३१ ॥ जेथें वृत्ति न दिसती । जेथें रजतम न असती । तेथें सत्त्ववृत्ति नुसती । ब्रह्ममय ॥३२॥ तें हें सुख ह्मणोनी । बोलिलीं लक्षणें दोनी । ऐसीं सुखलक्षणें वदोनी । लक्षण बोलतो त्या योगियाचें ॥ ३३ ॥ कीं तो ब्रह्मभूत । ह्मणजे ब्रह्मचि जाला निश्चित । ज्यास हें सुख अत्यंत । अनुभवा आलें ॥ ३४ ॥ तो ब्रह्मचि केवळ । परी अनुभवीं असे सत्त्व निर्मळ । तें ब्रह्मीं ब्रह्म निखळ । होतसे समाधीमध्यें ॥ ३५ ॥ योग बाणला केवळ । सुख पावला निष्कळ । जाला मनुष्यजन्म सफळ । तें ह्मणतसे आतां या श्लोकीं ॥ ३६ ॥

॥ श्लोक ॥ युंजन्नेवं सदात्मानं योगी विगतकल्मषः ।
सुखेन ब्रह्मसंस्पर्शमत्यंतं सुखमश्नुते ॥ २८ ॥

॥ टीका ॥ टाकूनि जडचिंतन । योगी योजी सदा ऐसें मन । त्या योगीं कल्मषाचें दहन । जालें ज्याच्या ॥ ३७ ॥ सकल कल्मषाचें बीज । मूळवासना जे सहज । ते गेली ऐसें अधोक्षज । सुचवी एथें ॥ ३८ ॥ कीं ब्रह्मस्पर्शजनित । जें योगसुख अत्यंत । तें अनायासें त्याचें चित्त । अनुभवूं लागे ॥ ३९ ॥ वृत्तिनिरोध आयास । न करितां समाधि बाणे ज्यास । त्या ब्रह्मानुभवसुखें ज्यास । वासना कैंची ॥ ६४० ॥ ऐसा व्यतिरेक योग । जेथें जडवृत्तीचा वियोग । त्यातें ऐसा श्रीरंग । वर्णिता जाला एथवरी ॥ ४१ ॥ आतां यानंतर श्लोक । तो कां बोले उत्तमश्लोक । त्याचें निमित्त सुज्ञ लोक । परिसोत आधीं ॥ ४२ ॥ व्यतिरेक आणि अन्वय । ज्ञानाचें हें प्रकारद्वय । दोंहीपरी ब्रह्म अद्वय । कळे मुमुक्षूतें ॥ ४३ ॥ आधीं उदक ओळखावें । मग तें तरंगांत सर्वांत लक्षावें । आधीं व्यतिरेकें जाणावें । मग चराचरीं पाहावें तें सर्व ॥ ४४ ॥ ज्ञान दोंहीपरी आलें । तें दोंहीपरी पक्क पाहिजे जालें । याकारणें बोलणें लागलें । योगरीती ॥ ४५ ॥ त्यांत बोलिला हा योग एक । जो समाप्त होय पूर्वश्लोक ।

त्यास ह्मणावें व्यतिरेक । कीं वृत्तिवियोगें योग हा वर्णिला ॥ ४६ ॥ परंतु उघडूनि नेत्र । देखेल जेव्हां जग विचित्र । तेव्हां प्रपंच सर्वत्र । दिसों लागे साचसा ॥ ४७ ॥ हें तों योगींच अद्वैत । डोळे उघडितां दिसे द्वैत । तेव्हां न ह्मणवे निश्चित । जीवन्मुक्त त्यालाही ॥ ४८ ॥ यालागीं अन्वयसमाधी । जोंपर्यंत योगी न साधी । जीवन्मुक्त नव्हे जरी निरोधी । योगी व्यतिरेकी वृत्तीतें ॥ ४९ ॥ आणि पूर्वश्लोकीं श्रीपति । बोले जीवन्मुक्तस्थिति । योगाची तों बोलिला रीति । व्यतिरेक मात्र ॥ ५५० ॥ हें संशयाचें स्थळ । कीं योगीं पावला ब्रह्म केवळ । डोळे उघडितां तोही कुशळ । प्रपंच सत्यत्वें देखेल ॥ ५१ ॥ जरी बाणला समाधिठसा । तरी कृतार्थ तो नव्हे ऐसा । कीं सर्वही आत्मया चिद्रसा । नाहीं चाखिलें ॥ ५२ ॥ या शंकेचा परिहार । हाच कीं योग द्विप्रकार । बाणला तरीच सर्वेश्वर । कृतकृत्यत्व त्याचें बोलिला॥५३॥ कीं "यतो यतो निश्चरति" । या श्लोकीं अन्वयाचीही रीति । दाविली परि विशद स्थिति । बोलिला नाहीं ॥५४॥ कीं जें जें कल्पी मन । तेथें तेथें आत्मचिंतन । करितां स्वरूपीं थारे हें साधन । वाटलें ॥ ५५ ॥ एवं व्यतिरेकयोग । वर्णिला जेथें वृत्तिवियोग । आतां अन्वययोग त्याचाच श्रीरंग । वर्णितसे या श्लोकीं ॥ ५६ ॥

॥ श्लोक ॥ सर्वभूतस्थमात्मानं सर्वभूतानि चात्मनि ।
ईक्षते योगयुक्तात्मा सर्वत्र समदर्शनः ॥ २९ ॥

॥ टीका ॥ एक आत्मा सर्वभूतीं । सर्व भूतें त्या आत्म्यांत असती । युक्तचित्त योगी तो ये रीती । ज्यास सर्वत्र समदर्शन ॥ ५७ ॥ श्लोकार्थ इतकाच रम्य । परि अन्वयज्ञानयुक्तिगम्य । कीं नाना वैषम्यांत साम्य । आत्मत्वाचें ॥ ५८ ॥ शब्दांत दिसतें द्वैत । परि अंतरीं असे अद्वैत । यांतही सूचवी अनंत । कीं अन्वयज्ञानही ऐसेंचि ॥ ५९ ॥ प्रपंच दिसे द्वैतरूप । परि असे अद्वैतमात्ररूप । कीं दृष्टीस विघरलें थिजलें तूप । रसनेस तों एकचि ॥ ५६० ॥ आत्मा सर्वभूतीं । ह्मणतां आत्मा भूतें भिन्न दिसती । सर्वभूतें आत्मयांत असती । द्वैत एथें तैसेंचि दिसतें ॥ ६१ ॥ कीं सर्व घटीं आकाश । त्याच आकाशीं सर्व कलश । या दृष्टांतें लवलेश । ऐक्य घटा आणि आकाशा घडेना ॥ ६२ ॥ तैसेंचि उदकीं घट । उदक आंत बाहेर निपट । याही दृष्टांतें उत्कट । द्वैताचि दिसे ॥ ६३ ॥ कीं घट जळीं अनेक । आणि घट बुडवूनि उरलें उदक । दृष्टांत पाहतां वाटे कौतुक ।

परि द्वैत साधलें अत्यंत ॥ ६४ ॥ एवं सुचवी ऐसें अच्युत । कीं जगीं द्वैतीं बाणे अद्वैत। तोचि अद्वैत वाखाणील निश्चित। द्वैतभास कीं या शब्दीं॥६५॥ कीं आत्मा सचराचरीं । जळ जेसें तरंगाभीतरी । चराचर त्यांत जैशा लहरी । एका जळांत॥६६॥ कीं प्रळयाचें जळ। त्यांत गारा जळाचे निखळ। गारा जळीं त्या गारांत केवळ । जळाचि तें ॥ ६७ ॥ गारांचें काठिणपण । दिसे उदकाहूनि विलक्षण । परी मदु उदकाचि आपण । असे गारांत॥६८॥ कठिण होऊनि गारा । उदक न पावे विकारा । तैसा चराचराचा पसारा । सारा निर्गुण ब्रह्मचि ॥ ६९ ॥ प्रलयजलास नाहीं अंत । त्या जळीं गारा ही अनंत । सव गारांत जें जळ तयांत । त्या गारा अवघिया ॥ ५७० ॥ आत्मा चराचरभूतीं । सर्व भूतस्थ ये रीती । आणि याचिपरि असती । सर्वभूतें आत्मयांत ॥ ७१ ॥ याहो काळीं मेघधारा । समुद्रावरी वर्षत। गारा । त्या अपरा जळीं अपारा । बुडती जेव्हां ॥७२॥ तेव्हां सर्वा गारांबही । नसे जळावांचूनि कांहीं । त्या समुद्रीं गारा असोनिही नाहीं । द्वैत गाराजळास ॥ ७३ ॥ हे अद्वैताची स्थिति । बाणे त्यास अन्वययोग ह्मणती । अन्वयसमाधिनिष्ठ मती । त्या योगियाची ॥७४॥ द्वितीयाध्यायांत अर्जुन । ह्मणे स्थितप्रज्ञ समाधिसंपन्न । तो काय बोले कैसा वर्ते ऐसा प्रश्न । करितां उत्तरही तैसेंचि पावला ॥ ७५ ॥ एवं चाले बोले उठे बसे । तरी अन्वयसमाधि लागला असे । कीं जडचैतन्यऐक्यांत समरसे । मानस त्या योगियाचें ॥ ७६ ॥ या योगाविषयीं हा श्लोक । बोलिला एथें उत्तमश्लोक । जडचैतन्य दोन्ही एक । पाहे जेथें योगिराज ॥ ७७ ॥ ऐसा योगी विचक्षण । त्याच्या अनुभाचें ईक्षण । आणि योगाचें लक्षण । कमलेक्षण वदे उत्तरार्धें ॥७८॥ उत्तरार्ध॥ "ईक्षते योगयुक्तात्मा सर्वत्र समदर्शनः"॥ ॥ टीका ॥ योगीं युक्त ज्याचा आत्मा । तो ह्मणावा योगयुक्तात्मा । एथें आत्मशब्दें परमात्मा । चित्त ह्मणोनि सुचवी ॥ ७९ ॥ तंतु आणि पट । माती आणि घट । यांचा आयता योगे निपट । आणि हेमालंकारांचा ॥५८०॥ दोंचा जो संयोग । तोचि ह्मणावा योग। एथें योगशब्दें प्रयोग । आत्मा आणि सर्वा भूतांचा ॥ ८१ ॥आत्मा सर्वभूतीं आयता । सोनें अलंकारीं तत्त्वता । न दिसती जेंवी नात्मसत्ता । हेम नग जैसे ॥ ८२ ॥ जळ आणि तरंग । यांचा आयता असे योग। त्या योगीं होतां दृष्टिसंयोग । जळ तरंगीं तरंग जळीं दिसती॥८३ ॥ तैसा आत्माच सकळ । परी चित्त

विषयभावें विकळ । तें त्या योगें निश्चळ । तो योगयुक्तात्मा ह्मणावा ॥ ८४ ॥ युक्तात्मा ह्मणजे युक्तचित्त । कीं आयत्या योगीं योजिलें चित्त । अर्थ हाचि यथार्थ निश्चित । ह्मणतां सर्वत्र समदर्शन ॥ ८५ ॥ सर्वत्र जें सम । त्याच समत्वीं दर्शन परम । सर्वत्र सम हा योगउत्तम । तेथें दर्शन ह्मणजे युक्तचि तत्त्व ॥ ८६ ॥ एवं व्यतिरेक योग । ज्या योगीं वृत्तीचा वियोग । हा अन्वययोगही श्रीरंग । वर्णी त्याचा ॥ ८७ ॥ व्यतिरेक समाधींत बैसे । तरी प्रारब्धीं शरीर असे । प्रपंचीं वर्ततांही गवसे । आत्माच सर्वत्र ॥८८ ॥ तरी त्या योगाचा अभ्यास जैसा । अभ्यास याचाही करी तैसा । तरीच वर्ततांहि नोचि ठसा । गवसे चित्तीं ॥ ८९॥ व्यतिरेकयोगीं प्रत्याहार । वर्णितां सूचविला हा प्रकार । मन परतायाचा चमत्कार । दाविला जेथें ॥५९० ॥"यतो यतो निश्चरति" । या श्लोकीं श्रीपति । ह्मणे जें जें मन चिंती । तेथें तेथेंचि योजावें आत्मत्वीं ॥९१ ॥ एवं निरोधितां वृत्ती । अनावर होऊं लागती । तेव्हां कल्पूनि जगदाकृती।सर्वत्र आत्मा पहावा ॥९२॥ जरी अभ्यास ऐसा असे । तरी कल्पनेंत आत्मा गवसे । मागुती मन स्वरूपीं समरसे । निरोधवृत्तीच्या मागुती॥९३॥ या श्लोकीं देव । बोलिला जो सर्वात्मभाव । तो दोहीं परी देवाधिदेव । सूचवी योग॥ ९४॥ कल्पनि चराचरध्यान । जडीं चित्स्वरूपाचें दर्शन । तरंगा देखूनि जीवन । पाहणें जैसें ॥९५॥ किंबहुना आधीं जळ दिसे । तेव्हां तरंगाकार गवसे । ऐसा अनुभवाचा ठसा बैसे । पाहतां ये रीती ॥९६ ॥ योग ऐसा बाणे । तरी जडास आत्मत्वें जाणे । जगीं योगी शहाणे । वर्तती ऐसे ॥ ९७ ॥ तेव्हां आत्मा सर्वभूतीं । आणि सर्वभूतें आत्मयांत दिसती । इत्यादि गहनभावें श्रीपती । बोलिला हा श्लोक ॥ ९८ ॥ आतां यानंतर श्लोक । तो कां बोले उत्तमश्लोक । त्याचें निमित्त सुज्ञलोक । परिसोत आतां एथूनी ॥ ९९ ॥ व्यतिरेकयोगप्रसंगें । अन्वययोग वर्णिला श्रीरंगें । कीं जीवन्मुक्त अन्वययोगें । व्यतिरेकयोगेंही बोलावा ॥ ६००॥ एवं व्यतिरेकयोग बरा । साधला तरी अन्वययोग दुसरा । न साधे तों न ह्मणावें त्या नरा । जीवन्मुक्त॥१॥तेव्हां अन्वययोगाविण । व्यतिरेकयोगेंचि नव्हे जीवन्मुक्तपण। तेव्हां अन्वययोगें निपुण । तोही तैसा ह्मणावा ।।२॥ कीं होतां वृत्तिनिरोध । समाधींत बाणे व्यतिरेकबोध । तो योग न बाणतां जाला सिद्ध । अन्वययोग ॥ ३ ॥ यास तेव्हां जीवन्मुक्तपण । नसें ह्मणावें व्यतिरेकयोगसिद्धीविण । तेव्हां

दोहीं योगीं निपुण । तो जीवन्मुक्त बोलावा ॥ ४ ॥ आणि पाहतां श्रुती । दोन्ही योग स्वतंत्र दिसती । जीवन्मुक्तस्थिती । दोन्ही योगीं ॥ ५ ॥ ब्रह्मवल्ली उपनिषदीं । दोन्ही योग हे यजुर्वेदीं । बोलिले जे वदनारविंदीं । निघाले एथें श्रीकृष्णाच्या ॥ ६ ॥ व्यतिरेकयोगविषयकश्रुति ॥ "यतो वाचो निवर्तंते अप्राप्य मनसा सह ॥ आनंदं ब्रह्मणो विद्वान्न बिभेति कुतश्चनेति" ॥ श्रुत्यर्थ ॥ जेथूनि वाचा परतती । जेथें न पावती मनोवृत्ति । ऐसी जे व्यतिरेकयोगस्थिति । त्या स्थितींत अनुभव निजानंदाचा ॥७॥ ऐसा ब्रह्मानंद ज्याला । व्यतिरेकयोगीं अनुभवा आला । कोणापासूनिही त्याला । भय नसे ॥ ८ ॥ ह्मणोनि ह्मणे श्रुति । कीं भिईना कोणास कोणे रीतीं । हे व्यतिरेकयोगस्थिति । ब्रह्मवल्लींत ॥९ ॥ त्याच ब्रह्मवल्लींत । अन्वययोगही बोलिला निश्चित । ती श्रुतिही या प्रसंगांत । वाखाणावी ॥ १० ॥ श्रुति ॥ "विज्ञानं ब्रह्म चेद्वेद तस्माच्चेन्न प्रमाद्यति ॥ शरीरे पाप्मनो हित्वा सर्वान्कामान्समश्नुते"॥ ज्ञान तें शुद्ध ज्ञान । विशिष्ट ज्ञान तें विज्ञान । अलंकाररूपें विशिष्टपण । जैसें सुवर्णासी ॥११॥ एवं ज्ञानशब्दें ब्रह्म केवळ । जैसें उदक निश्चळ । तरंगाकार जैसें जळ । विश्वाकार ब्रह्म विज्ञान॥ १२ ॥ व्यतिरेकें ब्रह्म परम । कळलें ज्ञान तें सुगम । समजोनि उमजणें विज्ञानब्रह्म । दुर्गम अत्यंत ॥ १३ ॥ कीं नित्या नश्वरा एकपण । जडा चैतन्याची ऐक्यखूण । सत्य असत्य विरुद्धलक्षण । विरळ समजे हें ऐक्य ॥ १४ ॥ ब्रह्म अतींद्रिय । प्रपंच पंचेंद्रियमय । या द्वैतीं पाहे अद्वय । विरळ कोणी ॥ १५ ॥ याकारणें श्रुति ह्मणे । कीं विज्ञानब्रह्म जरी जाणे । तरी जाणे ह्मणतां ये खुणे । विरळ पावे ऐसें तात्पर्य ॥ १६ ॥ व्यतिरेकें आत्मा जाणे । त्यास तों नित्य हें सहजेंचि बाणे । कीं अनित्या जडाच्या विपरीत खुणे । पावोनि नित्यत्वें ओळखे आत्मयातें॥१७॥ जडास अनित्यत्व ऐसें प्रसिद्ध । तेव्हां नित्य चैतन्यास भेद सिद्ध । भेद सिद्ध होतां असिद्ध । अद्वैत जालें ॥ १८ ॥ आतां जड मिथ्या ह्मणोनी । असत्य द्वैत यावरूनी । बोलावें तरी शब्देंचिकरूनी । प्रपंचमिथ्यात्व साधेना ।.१९॥ चोरटा आहे खरा । परि चोरी अंगीं न लावितां त्या नरा । ह्मणों जातां अरे चोरा । तुझा बाप चोरटा तो ह्मणेल ॥ ६२० ॥ ऐसें प्रपंच्याचें जोंपर्यंत । न कळे मिथ्यात्व निश्चित । तोंवरी मिथ्या ह्मणतां स्ववेदांत । मिथ्या होतो न लागतां मिथ्यात्व ॥ २१ ॥ पटीं सर्वत्र तंतु दिसे ।

तेव्हां पटाचें मिथ्यात्व गवसे । घट तेव्हां मिथ्या भासे । कीं दृष्टि स्पर्शे मातीसी ॥ २२॥ तंतूवेगळा न निघे पट । मातीवेगळा न निघे घट । एवं तंतु माती पाहतां निपट । पट घट होती असत्य ॥ २३ ॥ एवं तंतूचि पट । मातीच घट । ब्रह्मचि ऐसें निपट । प्रपंचीं दिसे तरी मिथ्या प्रपंच ॥ २४ ॥ नसोनि ऐसा अनुभव । कोणी दाविती युक्तिवैभव । कीं जडीं नश्वरत्व स्वभाव । मिथ्या ह्मणावें या करितां ॥ २५ ॥ नश्वरत्वें जरी । मिथ्यात्व साधे तरी । सर्पभास रज्जूवरी । तैसें मिथ्या कां ह्मणावें ॥ २६ ॥ प्रत्यक्षास विरुद्ध । तर्क तितुका असिद्ध । उपजला मेला ह्मणतां सिद्ध । मिथ्यात्व कैसें होणार ॥ २७ ॥ पिता मेला ज्याचा । पुत्र आहे जीवंत त्याचा । तेव्हां साचाच होता मेलाही साचा । तरी पुत्र साचा दिसतसे ॥२८॥ वांझेस पुत्र झाला । वांझेचा पुत्र मेला । ऐसें कोणी नाहीं बोलिला । धरणीवरी ॥ २९ ॥ सत्य उपजला सत्य मेला । सत्य पुत्र आपला विकूनि गेला । दिसतसे प्रत्यक्ष त्याला । केंवि मिथ्या ह्मणावें ॥६३०॥ प्रत्यक्षीं रज्जु सत्य । प्रत्यक्षीं सर्प असत्य । ऐसें सिद्ध होतां अगत्य । प्रपंच मिथ्या बोलावा ॥ ३१ ॥ आतां ज्ञान जरी जालें । प्रपंच मिथ्यात्व कळों आलें । प्रारब्धें शरीर आहे उरलें । प्रपंच तोंवरी दिसतसे ॥ ३२ ॥ तरी एकाच दृष्टांतें करूनी । अनुभव न साधे ह्मणोनी । धातु विकल्पभेदेंकरूनी । प्रपंचमिथ्यात्व सामवेदीं बोलिलें ॥ ३३ ॥ कीं कळतां एक मृत्पिंड । मृण्मय पदार्थ कळती अखंड । नामें आणि विकार उदंड । सकळ मिथ्या ॥३४॥ ज्यास पाहिजे कनक । तो भूषणें न टाकी याचक । एक ब्रह्म भासे अनेक । जीवन्मुक्त कौतुकें हें पाहे ॥ ३५ ॥ रज्जु कळतां नसे भुजग । ब्रह्म कळतां नसावें जग । तरी सोनें दिसोनिही दिसे नग । हा दृष्टांत घ्यावा ये स्थळीं ॥३६॥ ज्या दृष्टींत येतां भ्रम । निर्माण केला भुजंगम । तोच रज्जुदर्शनें गतभ्रम । होतां परिहरी सर्पातें ॥ ३७ ॥ अलंकार जाला हातें । हातेंचि मोडावें त्यातें । तैसें विश्व काळेंकरूनि होतें । नासतें काळेंचिकरूनी ॥ ३८ ॥ जों स्थितीचा काळ असे । तोंपर्यंत विश्व भासे । सोनें दिसोनिही नग दिसे । तैसें ब्रह्म दिसोनिही दिसे सर्व ॥३९॥ आणि मोडती अलंकार । सोनें न मोडे निर्विकार । तैसें मोडे घडे चराचर । शाश्वत असे ब्रह्मत्व ॥ ६४० ॥ आतां घडे आणि मोडे । हेंही न लागे कनकाकडे । कीं कनकत्व त्याचें न विघडे । दधिपणें विघडे जैसें दुग्धत्व ॥ ४१ ॥ हे सुवर्णाची

व्यक्ती । घडे मोडे पावे नानाव्यक्ती । दृष्टांत एकदेशी तथापि युक्ती चढती तोंपर्यंत चढवाव्या ॥ ४२ ॥ एवं प्रपंच अनित्य । आणि ब्रह्म नित्य । प्रपंच मिथ्या ब्रह्म सत्य । तथापि ऐक्य दोंहीस ॥ ४३ ॥ कळल्या इत्यादि युक्ती । बोलका बोलिला ऐशा उक्ती । तरी न पावतो मुक्ति । जों अनुभव ऐसा होय ना ॥४४॥ कीं अलंकारीं उघडें हेम । तैसें चराचरीं उघडें ब्रह्म । दिसे तेव्हां ज्ञानी उत्तम । वाचाळ शब्दवादीच तोंवरी ॥४५॥ ऐसें ब्रह्म चित्स्वरूप । आणि जडप्रपंचरूप । या विपरीत लक्षणासही ऐक्यप्रताप । करी श्रीगुरूचा ॥ ४६ ॥ जेथें अधिष्ठान सत्य । आणि विवर्त असत्य । दोंहींस ऐक्य मानावें अगत्य । कीं एक असे एक असेचिना ॥ ४७ ॥ विवर्त आणि अधिष्ठान । इतुकेंचि दोंहींचें अनुसंधान । कीं स्वयें प्रकाशे स्वप्रकाशज्ञान । अधिष्ठान ऐसें समजावें ॥ ४८ ॥ सूर्यप्रभा प्रकाशे स्वयें । मृगजळ त्याकरितां भासे निश्चयें । जितकीं परप्रकाशमयें । लटिकीं विवर्तें तीं जाणावीं ॥४९॥ सूर्यसत्तेनें दिसे मृगजळ । रज्जुसत्तेनें दिसे मृषा व्याळ । तरंगातें प्रकाशी जळ । सुवर्ण अलंकारातें प्रकाशी ॥ ६५० ॥ तंतूवांचूनि पट । मातीवांचूनि घट । न दिसती न असती निपट । जैसें मृगजळ तेजावांचूनी ॥ ५१ ॥ तैसें आत्मसत्तेविण । कोणत्या जडें जाणावें जड कवण । चिदधिष्ठानीं विवर्तपण । ऐसें जडाचें ॥ ५२ ॥ एवं जितकें जडाचें रूप । तितकें असे स्वात्मस्वरूप । इंद्रियदृष्टीस विघरलें थिजलें तूप । बुद्धिरसनेस रस एक ॥ ५३ ॥ परंतु माती घटीं उघडी । ऐसी आत्मसत्ता दिसे जडीं । तेव्हां या अनुभवीं वुडी । चित्त दे ॥ ५४ ॥ हें अवघें युक्तिजाळ । गुरुकृपेनेंचि होय सफळ । तोंपर्यंत अत्यंत अकळ । जडीं देखणें चित्स्वरूप ॥ ५५ ॥ सर्वत्र तंतु उघडा पटीं । दिसे माती उघडी घटीं । हे किल्ली असे पोटीं । गुरुकृपेच्या ॥५६॥ श्रुतींत "विज्ञानं ब्रह्म चेद्वेद" । हें या तात्पर्यें बोले वेद । कीं बहुत जाणती जडचैतन्यभेद । विरळ जाणे उभयऐक्य ॥५७॥ एवं विश्वरूप ब्रह्म । हें विज्ञानब्रह्म परम । 'चेद्वेद' ह्मणजे जरी जाणणें हें दुर्गम । अन्वयज्ञानविज्ञान ॥५८॥ ऐसें अकळही कळलें । आणि ध्यानीं चित्त नाहीं वळलें । तें कळोनिही खवळलें । जड जग यथापूर्व मानूनी ॥५९ ॥ ह्मणूनि ह्मणते श्रुति । कीं "तस्माचेन्न प्रमाद्यति"। ह्मणजे जरी त्यापासूनि मागुती । चित्त विस्मृतीतें पावेना॥६६०॥ विज्ञान ब्रह्म जाणे । जरी जाणोनिही त्या खुणे । न विसरे तरी मुक्ति बाणे ।

शरीर असतांही जीवंत ॥ ६१ ॥ एवं कठिण अन्वयज्ञान । जाणणें वि-
श्वरूप ब्रह्मविज्ञान । तैसेंचि जाणोनि करणें जतन । कठिण अत्यंत ॥६२॥
हेंही ऐसें जाणे । जाणोनिही जरी अखंडता बाणे । तरी शरीर असतांचि
तो मुक्त ह्मणे । हे श्रुति ऐसी ब्रह्मवल्लीची ॥६३॥ कीं अज्ञान गेलियावरी ।
जीवन्मुक्तीस इतुकीच उरी । कीं विषयभोगीं काम करी । भ्रमसंस्कारशेषें
पहिलिया ॥ ६४ ॥ सकळ पापाचें बीज । न कळणें स्वस्वरूप सहज । तें
कळलें असोनिही आत्मत्व निज । विरस पाडी हा काम ॥६५ ॥ एवं पापी
ह्मणावें या कामा । श्रुति यास्तव यास ह्मणे पाप्मा । तृतीयाध्यायीं याच
अधमा । पाप्मा ह्मणे श्रीकृष्णही॥६६॥"पाप्मानं प्रजहि ह्येनं" ह्मणोनी । या
कामातेंचि या गीतावचनीं । कृष्ण ह्मणे हृदयीं धरूनी । या श्रुतीतेंचि॥६७॥
तृतीयाध्यायश्लोकार्ध । "पाप्मानं प्रजहि ह्येनं ज्ञानविज्ञाननाशनम्"॥ टीका ॥
पाप्मा पापी हा काम । जो ज्ञानविज्ञान नाशी अधम । मारीं हा पापी परम ।
पाप्मा ह्मणोनि ज्याला श्रुति ह्मणे ॥६८॥ एवं ज्ञान व्यतिरेक ज्ञान । अन्वय
ज्ञान तें विज्ञान । काम पाप्मा उभयनाशन । गीता ह्मणे ॥ ६९ ॥ ऐसी
गीता आणि श्रुती । पाप्मा या कामास ह्मणती । श्रुति ह्मणे जीवन्मुक्तीप्रती
पावे मारूनियां पापी या कामातें ॥६७०॥ तरी दुःखाची निवृत्ति । आणि
नित्यसुखाची प्राप्ती । ते ह्मणावी जीवन्मुक्ति । कैवल्यांतही नसे हा लाभ
॥ ७१ ॥ कीं आनंदमात्र ब्रह्म । परी तें निर्गुण शुद्ध निर्धर्म । तें अनुभवा
येणें हाही धर्म । शुद्धसत्त्वाचा ॥ ७२ ॥ अमृत आपलें अमृतपण ।
नेणे तैसें सुख निर्गुण । सत्त्वें त्याच्या अनुभवाची खूण । जीवन्मुक्तास
कीं वैकुंठवासियास ॥ ७३ ॥ एवं ज्ञानही जालें जयास । हा पापी काम
त्यास । बेऊं नेदी विलास । जीवन्मुक्तिवैभवाचे ॥ ७४ ॥ परी जरी हें
विज्ञानब्रह्म । जाणे आणि बाणे परम । तरी या पापिया कामातें मारूनि
उत्तम । ब्रह्म सुख पात्रे शरीर असतांही ॥ ७५ ॥ काम टाकि-
ल्याविण । अनुभवा नये ज्या सुखाची खूण । श्रुति त्या सुखाचें लक्षण ।
बोलतसे ॥ ७६ ॥ "सर्वान्कामान्त्समश्नुते ह्मणोनी । श्रुति या सर्व काम-
शब्देंकरूनी । परमानंद सूचवूनी । बोलतसे ॥ ७७ ॥ कीं होती जे जे
कामभोग । ते ते दाविती सुखाचे योग । परी कामतृप्त नव्हे कीं संयोग ।
अपेक्षी आणखी कामभोगाचा ॥ ७८ ॥ ज्यास हें स्थावर जंगम । अवघेंचि
विज्ञानब्रह्म । कळलें बाणलें त्यास काम । कांहीं न उरला ॥ ७९ ॥ कीं

अभ्यासबळें काम । टाकिला बाणलें विज्ञानरूप ब्रह्म । त्यास अवघें स्थावरजंगम । सुखचि जालें ॥ ६८० ॥ यालागीं कामभोग । जे असतील त्या सर्वांचा संयोग । त्यास जाला बाणतां योग । विज्ञानब्रह्मस्वात्मतेचा ॥ ८१ ॥ एवं अन्वययोगेंचिकरूनी । जीवन्मुक्ति सिद्ध जाली यावरूनी । आणि "यतो वाचो निवर्तंते" ह्मणोनी । हे श्रुति व्यतिरेकयोगें हें बोले ॥८२॥ "यतो वाचो निवर्तंते" हे श्रुती । ह्मणे मन वाचा चारी जेथें परतती । जो जाणे त्या ब्रह्मानंदाप्रती । तो भीना मग कवणास ॥ ८३ ॥ एवं भयापासूनि मुक्त । तोही ह्मणावा जीवन्मुक्त । तेव्हां व्यतिरेक योगमात्रेंचि युक्त । तोही जीवन्मुक्त बोलावा ॥ ८४ ॥ या योगातेंही स्वतंत्रपण । ऐसें असोनि कमलेक्षण । पूर्वश्लोकीं अन्वययोगेंचि खूण । जीवन्मुक्ततेची कां वदे याचीही ॥ ८५ ॥ ऐसा हा संशय । ज्यास सहाय श्रुतिसमन्वय । या संशयनिरासें निर्णय । करूं पाहे श्रीकृष्ण ॥ ८६ ॥ कीं चित्तास वृत्तीचा वियोग । तो बाणला जरी व्यतिरेकयोग । भोगितां प्रारब्ध जग । जड दिसेल अन्वययोगावांचूनी ॥ ८७ ॥ व्यतिरेकयोग ऐसा । त्याच्र योगें जीवन्मुक्त कैसा । जडा तरंगांत चिद्रसा । न देखे जोंवरी ॥ ८८ ॥ यालागीं अन्वययोगाविण । व्यतिरेकयोगेंच्रि न घडे जीवन्मुक्तपण । ह्मणोनि व्यतिरेकयोगनिपुण । जीवन्मुक्त अन्वययोगेंचि बोलिला ॥ ८९ ॥ आतां "यतो वाचो निवर्तंते"। हे श्रुति फळ जें बोलते । तेथें पुनर्जन्मनिवृत्ति होते । परी जीवन्मुक्ति त्याचयोगें साधेना ॥ ६९० ॥ व्यतिरेक आणि अन्वययोग दोन्ही । एकही बाणतां या दोहींमधूनी । मुक्त निश्चयें ह्मणोनी । जन्ममरणास तो भीना श्रुति ह्मणे ॥ ९१ ॥ कीं ज्ञान झालियाउपरी । चित्तनाश नोहे जोंवरी । पुन्हा गर्भवास उदरीं । होणारचि त्याला मातेच्या ॥ ९२ ॥ त्या चित्तनाशास हे दोन्ही । उपाय असती ह्मणोनी । योगवासिष्ठीं वसिष्ठमुनी । बोले श्रीरामातें दों श्लोकीं ॥ ९३ ॥ योगवासिष्ठ श्लोक । "द्वौ क्रमौ चित्तनाशाय योगो ज्ञानं च राघव । योगो वृत्तिनिरोधो हि ज्ञानं सम्यगवेक्षणम् ॥१॥ असाध्यः कस्यचिद्योगो कस्यचि ज्ज्ञाननिश्चयः । प्रकारौ द्वौ ततः साक्षाज्जगाद परमः शिवः ॥२॥ " ॥ टीका ॥ दोन क्रम चित्तनाशाचे । अगा राघवा बोलिले साचे । एक योग एक ज्ञान ऐसें स्ववाचे । परम शिव वदला ह्मणे वसिष्ठ ॥ ९४ ॥ त्यांत योग ह्मणजे वृत्तिनिरोध । ज्ञान ह्मणजे अन्वयबोध । सम्यगवेक्षण शब्दाचा शोध । करितां अन्वय-

योग सिद्ध होतो ॥ ९५ ॥ कीं सम्यगवेक्षण ह्मणजे बरें निरीक्षण । बरें पाहणें याचें लक्षण । ये रीतीचें ॥९६ ॥ कीं एकास वस्त्र दाखवूनी । पुसावें काय आहे ह्मणोनी । आणि ह्मणावें कीं बरें अवलोकूनी । हें काय आहे तें सांग ॥ ९७ ॥ तो ह्मणेल वस्त्रमात्र । आहे हें बरें पाहती माझे नेत्र । हें वस्त्रचि आहे संदेहमात्र । नसे अवलोकनांत या माझ्या ॥ ९८ ॥ तंतुच आहे हे खूण । न कळे सत्य मानी पटपण । त्यास कैंचें सम्यगवेक्षण । कीं तंतु दिसोनिहीं न दिसे जयाला ॥ ९९ ॥ वस्त्राभावें पाहणार । त्यांतही दोन प्रकार । एक पांचा वर्षांचा कुमार । एक तरुण शाहणा ॥ ७०० ॥ तंतूचा रचला पट । हें कुमार नेणे निपट । तंतु विसरोनि शहाणाही निपट । सम्यगवेक्षण करीना ॥ १ ॥ पटांत तंतु जैसा । सर्वभूतीं आत्मा तैसा । ज्यास नसेच बोध ऐसा । तो या ज्ञानमार्गीं ह्मणावा बाळक ॥२॥ गुरुमुखें समजोनिही व्यतिरेक । अन्वय समजला अनेकीं एक । आणि न पाहे हें अद्वैतकौतुक । ध्यान न करी सर्वात्मकत्वें ॥ ३ ॥ तोही न ह्मणवे निपुण । कीं कळोनिहीं न करी सम्यगवेक्षण । ह्मणजे बरें न करी निरीक्षण । कीं आत्मतंतु जडपटीं पाहेना ॥ ४ ॥ तंतूचा पट हें जाणे तरुण । परी पट मिथ्या ऐसी न धरी खूण । त्यासही नसे सम्यगवेक्षण । जे रीतीं ॥ ५ ॥ वस्त्र दावूनि त्याप्रती । हें काय दिसतें ह्मणोनि जे पुसती । तो त्यास ह्मणेल बरविये रीती । म्यां पाहिलें परी असे हें वस्त्रचि ॥ ६ ॥ तंतूवांचूनि वेगळा पट । काढितां नसेचि कांहीं निपट । तरी पट नाहीं तंतुच आहे ऐसें नीट । न सांगे कीं सम्यगवेक्षण असेना ॥ ७ ॥ एवं कळोनिही अन्वयज्ञान । विश्वरूप ब्रह्मविज्ञान । एकाग्रचित्तें करी ध्यान । सम्यगवेक्षण त्याला ह्मणावें ॥ ८ ॥ एवं चित्तनाशास उपाय दोनी । प्रस्तुतीं बोलिला वसिष्ठमुनी । एक योग एक ज्ञान ह्मणोनी । त्यांत हें विवरण ज्ञान शब्दाचें ॥ ९ ॥ कीं ज्ञान ह्मणजे सम्यगवेक्षण । सम्यगवेक्षणाचें हें निरूपण । कीं जडीं चिदात्मनिरीक्षण । बरविया प्रकारें ॥ ७१० ॥ दोहींपरी चित्तनाश । कीं दोहींपरी स्फुरे एक आत्मप्रकाश । तोंवरी चित्त जोंपर्यंत लेश । स्फुरतसे चित्तीं जडत्वाचा ॥ ११ ॥ कीं चित्त चेतवी मन । तें करी जडविषयचिंतन । चित्तीं राहे अनुसंधान । जडत्वाचें ॥ १२ ॥ व्यतिरेकयोगीं चित्त । मुरे आत्मस्वरूपीं अत्यंत । अन्वययोगीं सर्वत्र निश्चित । आत्मा देखे तरंगीं जैसा समुद्र ॥ १३ ॥

आत्मप्रकाशेंकरूनी । जडास चेतवी ह्मणूनी । चित्त ह्मणावें जों असे विसरोनी । आत्मसत्ताप्रकाशातें ॥ १४ ॥ व्यतिरेक योगीं जड कांहीं । आत्मस्वरूपीं दिसत नाहीं । अन्वययोगीं चराचर ही । आत्माच वाटे ॥ १५ ॥ दोहींपरी ऐसें पाहे । तों चित्तचैतन्यचि होऊनि राहे । एवं चित्त ह्मणणें न साहे । दोहीं योगीं यापरी ॥१६॥ चित्तनाशें मुक्ति ह्मणूनी । एका श्लोकें वसिष्ठ मुनी । बोलिला हे प्रकार दोनी । श्रीरामचंद्रा जगद्गुरूतें ॥ १७ ॥ चित्तनाश प्रकार दोनी । एकही साधे जरी दोहींमधूनी । तरी चित्तनाश ह्मणोनी । वसिष्ठ ह्मणे ॥ १८ ॥ कीं स्वरूपीं चित्तास जों वृत्तीचा वियोग । कोणास हा व्यतिरेकयोग । असाध्य आणि आत्मभावें जग । पाहणें असाध्य कोणासी ॥ १९ ॥ कोणास व्यतिरेकयोग सिद्ध । त्यास अन्वययोग न असे सिद्ध । कोणी अन्वययोगीं प्रबुद्ध । व्यतिरेक योग असाध्य त्यालागीं ॥ ७२० ॥ एवं या दोहींमधूनी । चित्तनाश भलत्या एका योगेंकरूनी । ह्मणूनि बोलिले वसिष्ठमुनी । ऐसेंच श्रुतीही बोलते ॥२१॥ "यतो वाचो निवर्तंते"ह्मणोनी । श्रुति या व्यतिरेकयोगेंकरूनी । या योगाचा अनुभवी कोणापासूनी । भय न पावे ह्मणतसे॥ २२ ॥ व्यतिरेकयोगीं चित्त । नाश पावलें निश्चित । तेव्हां मोक्ष त्याला हस्तगत । मग तो निर्भय कां नव्हे ॥ २३ ॥ परंतु विज्ञानब्रह्मयोगश्रुती । शरीर असतां जीवन्मुक्ती । अन्वययोगें बोले ऐसी उक्ती । व्यतिरेकयोग श्रुति वदेना ॥ २४ ॥ कोठें व्यतिरेकयोगीं । वर्णूनीही त्यालागीं । जीवन्मुक्ति वर्णिली जगीं । तरी अन्वययोगही त्यास असल जाणावें ॥ २५ ॥ कीं तोचि जीवन्मुक्तयोगी । कीं पटीं तंतु तैसा आत्मा जगीं । देखोनी वर्ते त्याचिलागीं । जीवन्मुक्तपदवी बोलावी ॥ २६ ॥ याचि भावें भगवंत । व्यतिरेकयोग आधीं या अध्यायांत । बोलोनि शेवटीं अत्यंत । अन्वय त्यातेंचि बोलिला ॥ २७ ॥ कीं अन्वययोगावांचूनी । द्वैतदर्शन घडे ह्मणोनी । अन्वययोगेंचिकरूनी । जीवन्मुक्तत्व व्यतिरेकयोगियातें ही ॥ २८ ॥ यालागीं "सर्वभूतस्थमात्मानं" ह्मणोनी । या पूर्वश्लोकेंकरूनी । व्यतिरेकयोगही बोलोनी । वर्तणूक अन्वययोगें बोलिला ॥ २९ ॥ तों संशय उपजला या भागीं । कीं व्यतिरेकसमाधिसंपन्न योगी । जाला तरी पाहिजे तयालागीं । अन्वययोग जीवन्मुक्तीकारणें ॥ ७३० ॥ तेव्हां अन्वययोगनिपुण । ज्यास बाणेल सर्वात्मखूण । त्यानेंही व्यतिरेकयोगप्रवीण । जालें पाहिजे ॥३१॥

कीं त्यास अपेक्षा याची । तेव्हां यासही अपेक्षा असेल त्याची । आणि वेदवाणी तों योगद्वयाची । प्रशंसा स्वतंत्रत्वें बोलते ॥ ३२ ॥ शंका ऐसी उपजली । तों वेदांची पाहतां बोली । वसिष्ठादि मुनिमतें सिद्ध जाली । मुक्ति दोहींत एका योगेंकरूनीही ॥ ३३ ॥ परी जीवन्मुक्तिदशा श्रुती । अन्वययोगियातेंचि बोलती । आणि पाहतां अनुभवाची ही रीति । द्वैत न दिसे अन्वययोगियातेंचि ॥ ३४ ॥ श्रुति युक्ति इत्यादि कोटी । श्रीकृष्ण धरूनि आपुले पोटीं । या दों श्लोकीं ह्मणे अगा किरीटी । थोर अन्वययोग दोहींत ॥ ३५ ॥ पोटीं ऐसा भाव । तों दों श्लोकीं देवाधिदेव । ह्मणतो व्यतिरेकयोगावांचूनिही स्वयमेव । स्वतंत्र अन्वययोग जीवन्मुक्तीस ॥३६॥ आणि योगीं प्रवर्तला । तो कोणी नाहीं परतला । ह्मणूनि बोलतो या बोला । प्रथम या श्लोकीं ॥ ३७ ॥

॥ श्लोक ॥ यो मां पश्यति सर्वत्र सर्वं च मयि पश्यति ।
तस्याहं न प्रणश्यामि स च मे न प्रणश्यति ॥ ३० ॥

॥ टीका ॥ अगा मातें पाहे सर्वत्र । आणि मजमाजीं हें सर्व विचित्र । पाहे हा योगारंभमात्र । जो करी ॥ ३८॥ तो योगारूढ नसे जरी जाला । योगभ्रंश न घडे कदापि त्याला । कीं मी मग त्या योगियाला । अंतर नेदीं कदापी ॥ ३९ ॥ जो ऐसें पाहों लागला । मी अंतर नेदीं कदापि त्याला । आणि तो न सोडी मजला । अगा कदापी ॥ ७४० ॥ श्लोकार्थ इतकाचि परी । कोणी ह्मणतील याउपरी । कीं आत्मा देखेल चराचरीं । तो योगारूढचि बोलावा ॥४१॥तरी जेव्हां योगारूढचि जाला । अंतर न देणें काय उरलें तयाला । मग अवकाश न दिसे या बोला । कीं मी अंतर नेदीं तयातें ॥ ४२ ॥ कीं आत्मत्वें जगीं । जो पाहे कृष्ण जगदात्मयालागीं । तो कृष्ण जाला योगी । त्यास न सोडी हेंही अपूर्व काय ॥४३॥ यालागीं योगारूढ बरवा । हा योगी न वाखाणावा । कीं योगारूढ तेव्हां ह्मणावा । जेव्हां अखंडता बाणे या अनुभवाची ॥ ४४ ॥ कीं जडत्व न दिसे कांहीं । किंबहुना जड कांहींच नाहीं । या अखंडतेनें विदेही । देह धरूनि जो वर्ते॥४५॥ आणि सर्वत्र भगवंत। त्या भगवंतीं सर्वभूतें निश्चित । भूतें भगवंत ऐसें द्वैत। देखोनि अद्वैत जो पाहे॥४६॥त्यास एथें ये रीती । त्याचा अनुभव दावूनि विश्वपती । वर्णी कीं योगारूढ स्थिती । नसे अद्यापि हा भाव ॥४७॥ एवं योगाचा अभ्यासक । सिद्ध नव्हे हा साधक । परी अद्वैतभजन आत्यंतिक । वर्डों

लागलें या योगीं ॥ ४८ ॥ आणि हा ज्ञानी । सर्वात्मयोगीही होऊनी । अभ्यास करितां लागला भजनीं । सगुणाचिया ॥ ४९ ॥ कीं जे निर्गुणचि ध्याती । त्यांस व्यतिरेकयोगींच अत्यंत रती । जे ज्ञानी सगुण भजती । त्यांस आवडी अन्वययोगाचीच अत्यंत ॥ ७५० ॥ अत एव पूर्वश्लोकें करूनी । "सर्वभूतस्थमात्मानं" ह्मणोनी । आत्मदर्शनचि बोलोनी । या श्लोकें मातें सर्वत्र जो पाहे ह्मणतसे ॥ ५१ ॥ कीं आत्मा सर्वत्र दिसे । तोचि आत्मा सगुणपरमात्मा असे । ऐसी सर्वभूतीं समरसे । भक्ति माझी हा भाव ॥ ५२ ॥ "वासुदेवः सर्वमिति" । सप्तमाध्यायांत श्रीपती । बोलेल आणि अष्टादशाध्यायाचे अंतीं । भक्तिरहस्य हेंचि बोलेल ॥५३॥ "ब्रह्मभूतः प्रसन्नात्मा" या श्लोकीं । श्रीकृष्ण अष्टादशीं बोलेल कीं । ब्रह्म जालाच तरी या लोकीं । तो सम सर्वभूतीं मद्भक्ति पावतो॥५४॥ "समःसर्वेषु भूतेषु ह्मणोनी ।"मद्भक्तिं लभते परां"ह्मणे यावरूनी । भक्ति थोर सर्वात्मकज्ञानीं । हा सिद्धांत गीतांतीं स्थापिला ॥ ५५ ॥ द्वादशीं "अनन्येनैव योगेन मां ध्यायंत उपासते" ऐसें स्ववचन ।बोलोनि तेषामहं समुद्धर्ता' 'कमलनयन । ऐसेंही बोलेल ॥ ५६ ॥ तो हा अन्वययोग । कीं मातें सर्वत्र पाहे आणि सर्व जग । मजमाजि पाहे भक्तियोग । सुचवी ऐसा या श्लोकीं ॥ ५७ ॥ पूर्वश्लोकीं आत्मा सर्वत्र । पाहे आणि आत्मयांत जग विचित्र । पाहें ह्मणे कमलनेत्र । भाव दावी निर्गुणीं ॥ ५८ ॥ तोही अन्वययोगी । परी जो न भजे सगुणालागीं । तो व्यतिरेकनिष्ठ त्याचें जगीं । जीवन्मुक्ति अन्वययागें वर्णिली ॥ ५९ ॥ तो स्वयत्नेंचि तरणार । ह्मणोनि त्याचा मी उद्धरणार । त्यास मी न अंतर देणार । ऐसें न ह्मणे ॥ ७६० ॥ कीं मी कल्पवृक्षस्वभाव । सर्वसम देवाधिदेव । जो जैसा धरी भाव । फल तैसें देतसें तयासी ॥६१॥"ये यथा मां प्रपद्यंते" ह्मणोनी । हा निर्णय चतुर्थाध्यायांत करूनी । एकदां बोलिला त्यावरूनी । ज्ञानी सगुणभक्त सुचविला या श्लोकीं ॥६२॥ कीं "तस्याहं न प्रणश्यामि"। ह्मणजे त्यास अदृश्य न होणार मी । यावरूनी सूचवी जगत्स्वामी । कीं ज्ञानी योगी सगुणोपासक ॥ ६३ ॥ कीं जरी तो भजे मातें । मी अदृश्य नव्हे तयातें । हें न ह्मणे निर्गुणोपासकातें । कीं दयालुत्वधर्म न असती निर्गुणत्वीं ॥ ६४ ॥ मीच असें निर्गुण । परी तेथें नसे दयालुत्व गुण । देयकरितां सगुणपण । अवलंबावें लागतें ॥ ६५ ॥ तें सगुणपण जरी। त्या निर्गुणोपासका दाऊं तरी । विषमता रोकडी मजवरी ।

स्थापेल॥६६॥जो भजे जैसा । मी प्रगटतों त्यास तैसा । तरीच विषमत्वाचा ठसा । मजवरी बैसेना ॥ ६७ ॥ एवं सगुणभक्तयोगियास । न लगती योगसिद्धीआयास । इत्यादि भावें तयास । गौरवूनि बोलतो आतां या श्लोकीं ॥ ६८ ॥

॥ श्लोक ॥ सर्वभूतस्थितं यो मां भजत्येकत्वमास्थितः ।
सर्वथा वर्तमानोपि स योगी मयि वर्तते ॥ ३१ ॥

॥ टीका ॥ अगा मी सर्वभूतीं असें । सर्व कल्पूनि सर्वांत वसें । तोचि मी आत्मा आपुला ऐसें । व्यतिरेकें कळलें जयासी ॥ ६९ ॥ तो सकळाहूनि प्रिय । आपला आत्मा हा निश्चय । कीं पुत्रकलत्र इत्यादि होय । प्रिय त्याच आत्मयाकारणें ॥ ७७० ॥ तो ऐसा आवडता अत्यंत । अर्जुना तोचि मी सर्वभूतीं भगवंत । सुखसमुद्र उरलों अनंत । चराचर तरंगा व्यापूनी ॥ ७१ ॥ एकत्व त्या मजसीं ऐसें । अनुभूनि सर्वात्मभक्तिरसें । तो भजे योगी ओरसें । निवृत्तिमार्गं ॥ ७२ ॥ अर्जुना तो श्रेष्ठ अत्यंत योगी । हें काय नवल सांगों तुजलागीं । कीं सर्वसंगपरित्यागी । आणि भक्त माझा ॥ ७३ ॥ अगा तो सर्वांहीं प्रकारीं । नांदला जरी घरदारीं । आणि प्रवर्तला जरी पुत्रदारीं । तरी मजमध्येंच तो योगी वर्ततो ॥ ७४ ॥ अगा सर्वथा प्रपंचीं वर्तणें । आणि मजमध्येंच असणें । त्यास आश्चर्य न वाटे या लक्षणें । परी आश्चर्य तुम्हां सर्वांसी ॥ ७५ ॥ कीं पश्चिम दिशे असे निधान । तदर्थ पूर्वाभिमुख करी धावन । तैसा प्रपंचीं प्रवर्तोनि साधन । करणें मोक्षमार्गाचें ॥ ७६ ॥ परंतु ज्याला अमृत । तो विष भक्षितांही नव्हे मृत । तैसा सर्वात्मभक्त अत्यंत । प्रपंचीं वर्तला परी पदच्युत होईना ॥ ७७ ॥ कां नव्हे पदच्युत । याचा हेतुही अच्युत । सूचवी कीं तो असे वर्तत । सहजचि मजमाजीं ॥ ७८ ॥ तो नव्हे पदच्युत । जो सर्वभूतीं देखे अच्युत । जरी प्रपंचीं अत्यंत । तो वर्तला ॥ ७९ ॥ सर्वथा प्रपंचीं वर्तला । तरी अर्जुना ऐसें जाण त्याला । कीं मजमध्येंचि वर्ततो या बोला । बोलिला गहन भावें ॥ ७८० ॥ कीं जरी नसे माझी आवडी । तरी मजमाजीं चित्त न थारे घडी । एवंच मजमाजीं वर्ततो या शब्दें गोडी । अत्यंत आपली दाखविली ॥ ८१ ॥ एवं सुवर्णाची प्रीति । त्यास सर्वालंकारीं तेचि स्मृति । तैसी स्त्रीपुत्रधनवाहनादि आकृति । भगवद्रूप जो पाहे ॥ ८२ ॥ तो सर्वथा वर्तोनिही प्रपंचीं । प्रपंचवार्ता त्यास कैंची ।

भगवद्वाणी स्थिति तयाची । ऐसी सूचवी या भावें ॥ ८३ ॥ एवं ऐसा सर्वात्मभक्त । प्रपंचीं वर्तला तरी विरक्त । प्रारब्धभोगूनि अनुरक्त । भक्तिमार्गीच ॥ ८४ ॥ एवं होऊनिही ज्ञानयुक्त । प्रपंचीं वर्तोनिही विरक्त । आणि सर्वात्मभावें भगवद्भक्त । अन्वययोगी होतसे ॥ ८५ ॥ एवं अन्वययोगाचें महत्त्व । नसे व्यतिरेकयोगीं हें तत्त्व । या दों श्लोकीं श्रेष्ठत्व । अन्वययोगाचें ये रीती ॥ ८६ ॥ आणि विश्व भगवद्रूप निपुण । पाहे हें परम भक्तियोगाचें लक्षण । या भावें कमलेक्षण । श्रेष्ठत्व अन्वययोगाचें बोलिला ॥ ८७ ॥ या योगें भगवद्भक्ति । ह्मणूनि या गीतेंत भगवदुक्ति । स्थळस्थळीं त्याची अभिव्यक्ति । दाखविलीच या टीकेंत ॥ ८८ ॥ गीताशास्त्र सूत्रप्राय । गूढ एथें जो भगवदभिप्राय । याच्या अर्थबोधाचा उपाय । विशद श्रीमद्भागवतीं ॥ ८९ ॥ श्रीभागवत महापुराण । तेथें वेदव्यासरूपी नारायण । विशद गीतार्थनिरूपण । पदोपदीं करीतसे ॥७९०॥ प्रस्तुत अन्वययोगरीति । स्वभक्तियोगीं श्रीपति । योजूनि बोलिला हेचि स्थिति । विशद भागवतीं सर्वत्र॥ ९१ ॥ त्यांत प्रल्हाद पुण्यश्लोक । भक्तियोगीं हा एक । बोलिला असे हा श्लोक । सप्तम स्कंधीं ॥ ९२ ॥ सप्तमस्कंधश्लोक ॥ एतावानेव लोकेस्मिन् पुंसः स्वार्थः परः स्मृतः । एकांतभक्तिर्गोविंदे यत्सर्वत्र तदीक्षणम् ॥ टीका ॥ प्रल्हाद ह्मणे या श्लोकीं । स्वार्थ स्वपुरुषार्थ परम हा कीं । एकांतभक्ति उत्तमश्लोकीं । वेदवेदांतवेद्या गोविंदीं जरी घडे ॥ ९३ ॥ श्लोकाचे तीन चरण । एकांत भक्ति महत्त्व निरूपण । आतां चतुर्थचरणीं विवरण । एकांतभक्तीचें तेंचि करितो ॥९४॥"यत्सर्वत्र तदीक्षणं" ह्मणोनी । या चतुर्थचरणें करूनी । अर्थ एकांत भक्तीचा विवरूनी । बोलतसे प्रल्हाद ॥ ९५ ॥ कीं जें सर्वत्र तदीक्षण । ह्मणजे सर्वाठायीं त्याचें निरीक्षण । हें एकांतभक्तीचें लक्षण । कीं एकामाजी अंत सर्वांचा ॥ ९६ ॥ सर्वांचा अंत । एका त्याच्या स्वरूपांत । त्यास ह्मणावें एकांत । त्याचा अर्थ कीं सर्वत्र त्यातें पाहणें ॥ ९७ ॥ दृष्टांतें हा अर्थ । सिद्ध होतो ज्यांत परमार्थ । अंत समुद्रांत तों यथार्थ । सर्वां तरंगां ॥ ९८ ॥ पाहतां सर्वां तरंगीं । समुद्र जळचि दिसे अंतरंगीं । चित्समुद्रीं श्रीरंगीं । हेंचि एकांत भक्ती ॥ ९९ ॥ कीं तरंगमात्रीं सागर । तैसा चराचरीं सर्वेश्वर । तेव्हां तरंगसागरीं तैसें चराचर । अंत पावलें एका गोविंदीं ॥ ८०० ॥ अंत ह्मणजे अभाव । कीं चराचरीं देखतां भगवद्भाव

जडत्वास न उरे ठाव । हा एकामाजि अंत सर्वांचा ॥ १ ॥ एका आत्म-सुवर्णाआंत । सर्वाजडा अळंकाराचा अंत । या ज्ञानाचें नांव एकांत । भक्ति हेच भजतां सगुणत्वें ॥ २ ॥ इत्यादि दृष्टांत कोटी । प्रन्हाद आठवूनि पोटीं । अन्वययोगीं हे दाखवी गोमटी । भक्ति गोविंदाची ॥ ३ ॥ हे अर्थ सूत्रप्राय । गीतेंत दाखविले अभिप्राय । कीं ब्रह्मभूत सर्वत्र सम होय । तो परम भक्ति माझी पावतो ॥४ ॥ एवं भक्त अन्वययोगी । त्या एकांतभक्तीस उपयोगी । आणि अव्यक्तोपासकालागीं । द्वैतनाशक हाचि योग ॥ ॥ ५ ॥ ह्मणऊनि वारंवार । या योगाचा अत्यंत बडिवार । प्रकरण तो पाहतां प्रकार । योगाचेंचि ॥ ६ ॥ आतां यानंतर श्लोक । तो कां बोले उत्तमश्लोक । त्याचें निमित्त सुज्ञलोक । परिसोत आर्धा ॥ ७ ॥ व्यतिरेक अन्वययोग दोन्ही । बोलोनि दोहींमधूनी । भक्तीस योग्य ह्मणोनि । श्रेष्ठ अन्वययोग बोलिला ॥ ८ ॥ या योगाचे अनुभवी । पावती भगवद्भक्तपदवी । सर्वात्मत्वें नित्य नवी । गोडी भक्तिरसाची जयास ॥ ९ ॥ कोणी अनुभवी गाढे । त्या सुखांत जाले वेडे । ते न पाहती सुखदुःखाकडे । जनाचिया ॥ ८१० ॥ सर्वभूतीं भगवंत । ज्यासि हेंचि पाहणें अत्यंत । जीवांच्या सुखदुःखपर्यंत । दृष्टि न देती ते भक्त ॥ ११ ॥ सर्वांतरंगीं सागर । सर्वभूतीं तैसा ईश्वर । सागरीं तरंग तैसें चराचर । वासुदेवांत देखती ॥ १२ ॥ ऐसे सर्वात्मतेचे अनुभवी । पावले भक्तीची परम पदवी । परी चराचरदेहांचा गोसांवी । ईश्वरास नाहीं तिहीं गौरविलें॥१३॥त्याच्या अंतरीं दया । असोनिही गेली वायां । आणि परम विभूतिदर्शन तया । न घडे स्वसुखसोहळे अनुभवितां ॥ १४ ॥ पुढें बोलिजेतील जेथें विभूती । तेथें परम विभूती हे कीं सर्वभूतीं । मज सुख हो ऐशा आशयांत असती । जे जीव अंश ईश्वराचे ॥ १५ ॥ "अहमात्मा गुडाकेश । सर्वभूताशयस्थितः" ऐसें हृषीकेश । ह्मणेल प्रथम उपदेश । हा विभूतीविषयीं ॥ १६ ॥ विभूतिरूपें कृष्णभजन । करावें या कारणें अर्जुन । प्रश्न करील त्यास जगज्जीवन । प्रथम विभूति हेंचि सांगेल ॥ १७ ॥ कीं सर्व भूतांचा आशय । मज सुखचि हो दुःख न हो ऐसा निश्चय । त्यांत मीं आत्मा देहाभिमानमय । अगा असें ॥ १८ ॥ पाहूनि भगवद्विभूती । भजन यथायोग्य सर्वाभूतीं । सर्व भूताशयामाजीं मी जगत्पती । जीवात्मा ह्मणतां हें सूचवी ॥ १९ ॥ कीं आशय नसे आणखीं । आशय हाचि कीं स्यां असावें सुखी ।

आणि कधीं नसावें दुःखी । सर्व आशयशाखा याच्याच ।। ८२० ।। सुखप्राप्ति दुःखपरिहार । ज्याच्या आशयांत हाचि प्रकार । कोटि-वर्षे शोधितां निर्धार । इतकाच सर्वां आशयांचा ।। २१ ।। त्या आशयांत आत्मा । तो प्रतिबिंबांश जीवात्मा । नानाजळीं सूर्य तैसा परमात्मा । मीच असें आशयांत सर्वांच्या ।। २२ ।। हे प्रथम विभूती । ह्मणतां दया करणें सर्वभूतीं । हें अर्जुनातें जगदात्मा श्रीपती । सुचवील आशयशब्दें करूनी ।। २३ ।। कीं मज सर्वभूतीं भाविलें । त्यास माझ्या ऐक्यें सुख फावलें । परी मज नाहीं पावलें । सुख कांहीं भूतदयेवांचूनी ।। २४ ।। सूर्यास उपचार दीपाचा । अमृतास नैवेद्य गुळाचा । कीं गंगेस थिल्लर जळाचा । अभिषेक ।। २५ ।। अखंडसुखाचा अनुभव । हें जयाचें वैभव । त्या मज कोण मानव । काय सुखी करील ।। २६ ।। प्रतिबिंबरूपें दुःख । तेथें दुःख हरूनि दे सुख । या वेगळा उपाय आणिक । नसे सुखी करावयाचा ।। २७ ।। यालागीं सर्वभूतीं । आशयांत माझी विभूती । त्या जीवात्मयांतें यथामती । सुख देतां मी सुखी होतसें ।।२८ ।। सुख द्यावें ईश्वरातें । ऐसें वाटे जयातें । त्याणें प्रतिशरीरीं जीवात्मयातें । सुख द्यावें ।। २९ ।। राज्यभ्रष्ट क्षितिपती । त्यास जे सुखी करिती । तो पाळितां ही सर्व जगती । स्मरे तया उपकारातें ।। ८३० ।। प्रतिबिंबरूपें ईश्वर । ऐसा लक्षूनि चतुर । जे सुख करिती सादर । तिहीं बिंबरूपीं सुखी केला ।।३१।। जीवास दुःख दीधलें । त्यानें ईश्वरास दुःखी केलें । हें सतराविया अध्यायांत आपलें । गुह्य सांगेल श्रीकृष्ण।।३२।।"कर्षयंतः शरीरस्थं" या श्लोकें करूनी । "मां चैवांतःशरीरस्थं" ह्मणोनी । ह्मणेल कीं अशास्त्र तपें देह कष्टवूनी । दुःख देती मज अंतःशरीरस्थातें ।।३३।। एवं अन्वययोगी । सर्वात्मता साधोनि ही जगीं । भूतदयेविना एका आंगीं । उणा पडला ह्मणावा ।। ३४ ।। इत्यादि भाव कोटी । श्रीकृष्ण धरूनि पोटीं । सर्वांभूतीं दया करावी हे धाटी । ज्यास तो थोर ह्मणतसे या श्लोकीं ।। ३५ ।।

।। श्लोक ।। आत्मौपम्येन सर्वत्र समं पश्यति योऽर्जुन ।
सुखं वा यदि वा दुःखं स योगी परमो मतः ।।३२।।

।। टीका ।। अगा अर्जुना योगी । मज सर्वत्र पाहोनिही जगीं । जरी दयेकरूनी जीवालागीं । सर्वत्र पाहे ।। ३६ ।। तरी तो योगी अत्यंत । थोर आणि मज संमत । ह्मणोनि या भावें भगवंत । दयालुत्व रीति त्याची व-

र्णितो ॥३७॥ कीं ब्रह्मात्मरसें मातला । सुखदुःख कांहिं नावडे त्याला । तथापि स्वपूर्वानुभवें ज्याला । दया करणें सर्वभूतीं तो थोर ॥ ३८ ॥ कीं सर्वत्र भोक्ता जीवात्मा । पिपीलिका हो अथवा ब्रह्मा । एका देहीं मीं जैसा हे उपमा । सुखदुःखीं पाहे सर्वत्र ॥ ३९ ॥ आपणास लागे क्षुधा । तेधवां वाटे प्राणांत बाधा । जे पक्वयोगी त्यांच्याही बोधा । डगमग आणी घडी एक ॥८४०॥ दुःख अत्यंत ये रीती । क्षुधा तृषादि करिती सर्वभूतीं । अन्नउदकादियोगें त्यांची शांती । होतां सुख होय अत्यंत ॥ ४१ ॥ एवं योगी आणि पूर्वकर्मबळें । पावतो धनधान्यादि फळें। त्यानें क्षुधादिनिवृत्ति मूळें । अन्नादिकें द्यावीं स्वसम पाहोनी ॥ ४२ ॥अन्न द्यावें क्षुधिता । उदक द्यावें तृषिता । वस्त्र द्यावें शीतपीडिता । कन्यादिविवाहानिमित्त धन द्यावें॥४३॥ ऋणी ऋणापासूनी । मुक्त करावे धन देउनी । राजदंडातें चुकवूनी । सुटत ऐसें धन द्यावें ॥४४ ॥ हरिकीर्तनादि उत्सव । करावे यथावैभव । सकळ जनकर्णद्वारा देव । त्यांच्या हृदयीं निघे ऐसें करावें ॥४५ ॥ कोण्हीं भजनीं तत्पर । आणि कुटुंबार्थ निरंतर । श्रमती न सांपडे अवसर । भजनाकारणें ॥ ४६ ॥ त्याचा कुटुंबनिर्वाह । ऐसा करावा कीं इतर स्नेह । टाकूनि भजती निस्पृह । निष्काम देवाधिदेवातें ॥ ४७ ॥ त्यांस उपदेश परमार्थाचा । करावा दाखवावा मार्ग साचा । स्वधन आणि स्ववाचा । दोहोंकडोनि सुख द्यावें तयांस ॥ ४८ ॥ कीं आपणातेंही । तिसरे गोष्टींत असणें नाहीं । भजन कीं तदर्थ देहरक्षण कांहीं । अन्नउदकवस्त्रें करावें ॥ ४९ ॥ याच दों गोष्टींविण । दुःखी होइजे तें आपण । याच दों गोष्टींत देखे निपुण । सुख आपणातें ही ॥ ८५० ॥ कीं जरी पक्वज्ञानी । दुःखी होतोच क्षुधादिकें करूनी । त्या प्रारब्धभोगार्थ पावोनी । जीवदशा भोगणें निःसंदेह ॥५१॥ येथें कोण्ही ह्मणती । कीं ज्ञानियास क्षुधादिकेंचि नसती । आणि पुसतां तेंचि बोलती । देहप्रारब्धाचा त्यांचा ह्मणोनी ॥५२॥ प्रारब्धकर्मक्षय । भोगेंचि होय ऐसा निर्णय । भोगीं सुखदुःख हा निश्चय । सुखदुःख कीं तें स्पर्शे भोक्त्यातें ॥ ५३ ॥ हें बोलणें वारंवार । पूर्वी जालें पुढें होणार । प्रस्तुत भूतदया प्रकार । स्वोपमेनें ऐसा योगियातें ॥ ५४ ॥ त्यांत ज्ञानयोगी । दों प्रकारींच जगीं । प्रारब्धें विभव ज्यालागीं । तो योगी इत्यादि रीतीं दयाळू ॥५५॥ ज्यांस नसेल विभव । तिंही सर्वभूतीं देवाधिदेव । धन साध्यावेगळें स्वयमेव । सुख व्हावें सर्वां भूतांचें ॥ ५६ ॥ काया वाचा

मन । हें तों आपलें निजधन । दुःखहरण सुखकरण साधन । उदंड इतुकीं ॥ ८७ ॥ सर्वांसि प्रिय बोलणें । चुकवूनि कृमिकीटकांतें चालणें । स्वोपमेनें सुख पाहणें । इत्यादिस्थळीं समसधन निर्धन योगियां ॥८८॥ स्वोपमेनें स्वसम । सुखदुःख पाहणें उत्तम । यास्तव बोले श्रीकृष्ण कीं स्थावरजंगम । भूतें सुखी करावीं दुःखें हरूनी ॥ ८९ ॥ त्या सकळ दुःखाचें मूळ । अविद्या अनादि हृदयशूळ । तीस करूनि निर्मूळ । परममंगळ स्वसुख द्यावें जीवांतें ॥८९०॥ हृदयीं दयेचा ठसा पडे । तरीच ब्रह्मविद्यादान घडे । जे स्वलाभेंचि जाले वेडे । ते भगवत्प्रिय न होती अत्यंत ॥ ९१ ॥ सर्व जगन्निवास । त्यास जे देवकीच्या गर्भी वास । ते जना दिसो नेदी कंस । बंदी घालोनि बहिण आपुली ॥ ९२ ॥ तैसी ज्ञानियाची वाणी । जींत ब्रह्मसुखाची खाणी । तीस पाडिली घाणी । मौन धरोनी ॥ ९३ ॥ मुक्ति साधली आपणा । परी मनीं नसे करुणा । तैसा मोक्ष तो अवलक्षणा । कंसासही जाला ॥ ९४ ॥ आपण मिष्टान्न जेवी । जिवलगा उच्छिष्टही न दावी । तैसा ह्मणावा तो मुक्त गोसावी । जो प्रकट न करी भजन मार्ग ॥ ९५ ॥ आपण जाला पृथ्वीपती । सखे सोयरे भिक्षा मागती । तैसा पावोनिही ब्रह्मस्थिती । जो अविद्या न नाशी जीवांची ॥ ९६ ॥ आपली जातां अविद्या । सुख पावला पावोनि विद्या । तरी इतरांसि ही सुखरूपा आद्या । दावितां ऐसें सुख तेही पावती ॥ ९७ ॥ ऐसें स्वोपमेकरूनी । सर्वत्र सुखदुःख देखोनी । जीव उद्धरी ज्ञान देऊनी । तो थोर अर्जुना मज संमत ॥ ९८ ॥ सुखदुःख सर्वयोगीं । स्वसाम्यें पाहे जगीं । तो थोर याचि लागीं । कीं दुःखें हरूनि सुख दे तयातें ॥ ९९ ॥ सर्वांचें दुःख हरणें । आणि सर्वांस सुख करणें । लौकिकें परमार्थे याचि विवरणें । हीचि कीं यथाशक्ती ॥ ८७० ॥ त्यांत मुख्य दुःख हरणें । आणि सर्वांस सुख करणें । त्याचें हेंचि विवरण । कीं अधिकार पाहोनि उपदेश ॥ ७१ ॥ आणि स्वशक्ती जरी नसे । ब्रह्मविद्या तों त्यापासीं वसे । एवं सुख देणें तें हेंचि दिसे । कीं अविद्यादुःख नाशावें ॥ ७२ ॥ आतां दोन यानंतर श्लोक । श्रोता पार्थ पुण्यश्लोक । अन्वययोग असाध्य मानूनि कितीएक । प्रश्न करितो अर्जुन ॥ ७३ ॥

॥अर्जुन उवाच॥ योयं योगस्त्वया प्रोक्तः साम्येन मधुसूदन ।
एतस्याहं न पश्यामि चंचलत्वात्स्थितिं स्थिराम् ॥ ३३ ॥

चंचलं हि मनः कृष्ण प्रमाथि बलवद्दृढम् ।
तस्याहं निग्रहं मन्ये वायोरिव सुदुष्करम् ॥ ३४ ॥

॥ टीका ॥ अर्जुन ह्मणे जी मधुसूदना । मधुकैटभादि असुरमर्दना । अवतरोनि देवकीनंदना । उपदेश दीनास मज करिसी ॥ ७४ ॥ तुम नित्यमुक्ता सर्व सुगम । परी मज अत्यंत वाटे दुर्गम । जो हा अन्वययोग सर्वोत्तम । बोलियेला तुवां ॥ ७५ ॥ योग बोललासी दोनी । त्यांत हा आलीकडे साम्यें करूनी । सर्व भूतस्थमात्मानं ह्मणोनी । या श्लोकापासूनि वदलासि योग ॥ ७६ ॥ त्याहूनि पूर्वील योग जेथें वृत्तीचा वियोग । चित्तचैतन्याकार संयोग । त्या आलीकडे साम्ययोग हा ॥ ७७ ॥ कीं आत्मा सर्वत्र सम । हा साम्यें करूनि योग परम । जो वदलासि हा सुगम । न वाटे मजला ॥ ७८ ॥ या योगाची स्थिती । स्थिर राहों नेदी मनाची गती । त्याच्या चंचलत्वें मती । विषमत्व अवलंबील तत्काळ ॥ ७९ ॥ अजी कृष्णजी हें मन । परम चंचळ आणि मथन । करूनि इंद्रियकाष्ठांचें दहन । करी विवेकाचें ॥ ८० ॥ हें बळवंत नावरे । धरूं जातां अधिक वावरे । मोट बांधों जातां भरे । गगनीं जैसा महावायु ॥ ८१ ॥ हें मन परम दुर्लभ । याचा निग्रह परम दुष्कर । भावगर्भ नारायणातें नर । पुसे कीं केवीं साधे हा योग ॥ ८२ ॥ प्रश्न करितां अर्जुन । अंगीकारूनि त्याचें वचन । जिंकोनियां ऐसेंही मन । योग साधावाच ह्मणतसे भगवंत ॥ ८३ ॥

॥ श्रीभगवानुवाच ॥ असंशयं महाबाहो मनो दुर्निग्रहं चलम् ।
अभ्यासेन तु कौंतेय वैराग्येण च गृह्यते ॥ ३५ ॥

॥ टीका ॥ अगा येविषयीं नाहीं संशय । कीं कठिण करणें मनाचा जय । हें चंचल केला न जाय । निग्रह याचा ॥ ८४ ॥ हें असाध्य निःसंदेह । परी याचाही करील तो निग्रह । कीं अजिंकही शत्रुसमूह । जिंकिले तुवां ॥ ८५ ॥ महाबाहो ह्मणोनी । गूढ भाव दावी या वचनीं । कीं अजिंकही या बाहू करूनी । जिंकिलें तुवां ॥ ८६ ॥ आणि तूं कौंतेय । आमची आत कुंती तिचा तनय । परम समर्थ होउनि काय । लेखा धरिसी मनाचा ॥ ८७ ॥ अगा जो प्रपंचीं दक्ष । तोचि परमार्थी साधील मोक्ष । मन जिंकवेना ऐसा हा पक्ष । तुज योग्य नव्हे हा भाव ॥ ८८ ॥ ज्याला असेल दक्षपण । तो जिकडे निघेल तिकडे निपुण । या प्रयत्नीं तूं आपण । प्रवर्तसी तेव्हां हेंही साधेल ॥ ८९ ॥ आतां दक्षही जाला । तरी सा-

धनसंपत्ति पाहिजे त्याला । तरी मनाच्या निग्रहार्थे तुजला । सांगतों वर्म ॥ ८९० ॥ कीं मुख्य येथें अभ्यास । वैराग्यसाधन त्यास । मन जिंकणें ज्यास । हीं दोनी अगत्य त्यास असावीं ॥ ९१ ॥ आत्मत्व आधीं कळावें । मग मन अभ्यासीं वळावें । अभ्यासीं त्यासि कवळावें । वैराग्ययुक्त बुद्धीनें ॥ ९२ ॥ स्थिर कराया मना । स्थळ आत्मया विना । मायिक पदार्थी कांहीं असेना । वावरोंच लागे अन्यत्र ॥ ९३ ॥ ज्यास पाहिजे सुख । तें सुख चैतन्यावांचूनि नाहीं आणिक । चित्स्वरूपीं करितां अंतर्मुख । स्थैर्य पावे ॥ ९४ ॥ निखळ चैतन्य सोनें असे । अथवा चराचर अळंकाररूपें दिसे । परी सुवर्ण याचकास गवसे । सुवर्ण भलत्या प्रकारें ॥९५॥ तृषितास जळधारा । अथवा सांपडोत गारा । निखळ अथवा प्रपंच सारा । चिद्रूप दिसावा मनातें ॥ ९६ ॥ तेथें स्थिरत्व मन पावे । परी पूर्व संस्कार त्याला आठवे । ह्मणूनि विषयांकडे धांवे । विषय ते जडत्वें मानूनी ॥ ९७ ॥ तेव्हां पाहिजे वैराग्य । त्या वैराग्यें स्वानंद सौभाग्य । जतन होय नासे अभाग्य । विषयवासना ॥ ९८ ॥ चित्स्वरूपीं मन । लाविताही करी विषयचिंतन । तेथें पाहिजे वैराग्यसाधन । त्या वैराग्यसंस्कारें तें परते ॥ ९९ ॥ स्वरूपीं लागणें अभ्यास । तेथूनि उठतां त्यास । परतवूनि योजणें यास । वैराग्य पाहिजे ॥ ९०० ॥ एवं वैराग्य अभ्यास दोनी । उपाय या दोहीं करूनी । मनाचा निग्रह ह्मणोनी । श्रीकृष्ण बोलिला ॥ १ ॥ उपाय नाहीं याविना । ह्मणोनि या उपायें मना । न आवरी त्यास योग साधेना । ह्मणोनि ह्मणतो या श्लोकीं ॥ २ ॥

॥ श्लोक ॥ असंयतात्मना योगो दुष्प्राप इति मे मतिः ।
वश्यात्मना तु यतता शक्योऽवाप्तुमुपायतः ॥ ३६ ॥

॥ टीका ॥ अगा मनास चैतन्याचा योग । तेधवां सिद्ध होतो योग । त्यास आवडती जड विषयभोग । योग तेथें मग कैंचा ॥ ३ ॥ ह्मणोनि जें मन नव्हे संयत । जें नसेल आवरिलें अत्यंत । त्या मनें करूनि निश्चित । अघटित सिद्धि योगाची ॥ ४ ॥ हे अर्जुना माझी मती । जें बोलिलों तुजप्रती । कोणी उपायांतर जाणती । तरी जाणोत ॥ ५ ॥ एवं उपाय अत्यंत । तो हाचि निश्चित । आणि जें मन असंयत । त्या मनें योग साधेना ॥ ६ ॥ दळिल्या कांडिल्या कुटिल्या विना । नुसत्या गोधूमाचे पदार्थ नाना । कोणी सुगरणी ऐसी दिसेना । कीं शेवया मालत्या सिद्ध करी ।

॥ ७ ॥ एवं मन वश आधीं करावें । या मनातें अभ्यासीं भरावें । तेव्हां यत्न करणारिया पुरुषें पावावें । योगातें उपायें करूनी ॥ ८ ॥ आतां या नंतर श्लोक । त्यांत पार्थ पुण्यश्लोक । प्रश्न करील सुज्ञ लोक । निमित्त त्याचें परिसोत ॥ ९ ॥ कीं योगाचीं साधनें । ऐकिलीं अर्जुनें । तीं अत्यंत कठिणें । वाटलीं तया ॥ ९१० ॥ परी ऐकोनि योगफळा । घोटूं लागला लाळा । जरी अनावर चाळा । या मनाचा ॥ ११ ॥ तथापि करावा उपाय । हा उपजला निश्चय । परी ह्मणे जरी योगसिद्धि होय । तरी बरेंचि अत्यंत ॥ १२ ॥ तो यत्न नव्हे थोडा । कीं योग साधे रोकडा । जरी मध्येंचि मोडे गाडा । परम पद पावणें मग कैचें ॥ १३ ॥ तरी त्यास कोण गती । हें पुसें ह्मणे महामती । ह्मणोनि संतांच्या स्वामीप्रती । प्रश्न करितो अर्जुन ॥ १४ ॥

॥ अर्जुन उवाच ॥ अयतिः श्रद्धयोपेतो योगाच्चलितमानसः ।
अप्राप्य योगसंसिद्धिं कां गतिं कृष्ण गच्छति ॥ ३७ ॥

॥ टीका ॥ अर्जुन ह्मणे कोणी अयती । ह्मणजे यत्न योगसिद्धीप्रती । न करी आणि ज्याची मती । युक्त श्रद्धेंकरूनि पाहतां ॥ १५ ॥ कीं आत्मा कळों आला । परी योगसिद्ध पाहिजे जाला । ह्मणोनि श्रद्धा ज्याला । आस्तिक्यबुद्धि ऐसी अत्यंत ॥ १६ ॥ योगें निःसंदेह मोक्ष । ऐसी श्रद्धा परि नव्हे दक्ष । तोडावया संसारवृक्ष । असंगशस्त्र जों नेघे ॥ १७ ॥ आणि योगही आरंभिला । परि योगापासूनि चळला । पुन्हा योगीं न लागेसाच जाला । मनोभाव ज्याचा ॥ १८ ॥ योगाची सिद्धि वरवी । ते न पावला मुक्तिपदवी । कृष्णजी त्याची गति मजला सांगावी । कीं कोण्यागतीप्रति तो जातो ॥ १९ ॥ कृष्णजी ह्मणसील मातें । कीं कां हा संदेह जाला तूतें । तरी या गोष्टीनें संदेहचित्तें । मानिला ह्मणोनि ह्मणतो या श्लोकीं ॥ ९२० ॥

॥ श्लोक ॥ कच्चिन्नोभयविभ्रष्टश्छिन्नाभ्रमिव नश्यति ।
अप्रतिष्ठो महाबाहो विमूढो ब्रह्मणः पथि ॥ ३८ ॥

॥ टीका ॥ अजी ऐसें वाटतें मला । कीं उभयभ्रष्टता असेल त्याला । कीं प्रतिष्ठा नाहीं पावला । ब्रह्ममार्गीं ॥ २१ ॥ प्रतिष्ठा ह्मणजे अत्यंत स्थिति । ते ब्रह्ममार्गीं त्याची मति । जरी निश्चयेंशीं पावती । तरी पावतांच मोक्ष ॥ २२ ॥ तरी अयति यत्न न करी ह्मणोनी । चळला योगापासूनी । यालागीं मोक्षातें न पावोनी । विमूढ होऊनि राहिला ॥ २३ ॥ आतां स्व-

गास जावें । तरी यागादि न करी काम्यभावें । कीं ब्रह्ममार्गीं यालागीं स्वभावें । निष्काम तो ॥ २४ ॥ उभयभ्रष्ट यालागीं ॥ मज वाटतो तो योगी । अभ्रांचें थिगळ आकाशमार्गीं । उभयभ्रष्ट जे रीती ॥ २५ ॥ कीं वायूचें होतां बळ । तुटे अभ्राचें एक थिगळ । तें वितळोनि नासे निष्फळ । मधींच्यामधीं ॥ २६ ॥ ज्या मेघापासूनि चळे । त्या मेघांत न मिळे । अथवा मेघांतरांतही न मिसळे । व्यर्थ जाय वितळोनी ॥ २७ ॥ ऐसें मज वाटलें । ह्मणूनि पोटीं होतें तें निवेदिलें । परी तुज असे सर्व कळलें । ऐसेंचि होय कीं नव्हे तें सांग ॥ २८ ॥ हें मज पुसणें अगत्य । आणि सांगणार तूंचि सत्य । ह्मणूनि उत्तर देऊनि कृतकृत्य । करी ह्मणतसे या श्लोकीं ॥ २९ ॥

॥ श्लोक ॥ एतन्मे संशयं कृष्ण छेत्तुमर्हस्यशेषतः ।
त्वदन्यः संशयस्यास्य छेत्ता न ह्युपपद्यते ॥ ३९ ॥

॥ टीका ॥ कृष्णजी या माझ्या संशया । अशेषें छेदावया । योग्य तूंचि सर्वां सर्वज्ञांचिया । शिरोमणि जगद्गुरू ॥ ९३० ॥ तुजवांचूनि यातें । छेदी संशयातें । ऐसा न सांपडे मातें ॥ भुवनत्रय धुंडितां ॥ ३१ ॥ नारायणातें नर । प्रश्न करितां पार्थ चतुर । सर्वज्ञ याचें देतो उत्तर । पूर्ण षड्गुण श्रीभगवान् ॥ ३२ ॥

॥ भगवानुवाच ॥ पार्थ नैवेह नामुत्र विनाशस्तस्य विद्यते ।
नहि कल्याणकृत्कश्चिद्दुर्गतिं तात गच्छति ॥ ४० ॥

॥ टीका ॥ पृथा कुंती तिचा सुत । तो पार्थ या नांवें विख्यात । त्यातें ह्मणे श्रीभगवंत । अगा पार्था ह्मणोनी ॥ ३३ ॥ अगा पार्था ज्ञानमार्गीं । निघोनिही प्रवर्तला योगीं । उभयभ्रष्टत्व त्याहीलागीं । बापा घडों शके काय ॥३४॥ करणारे स्वकल्याण । ते या मोक्षमार्गींचे साधक जाण । त्या विषयीं बोलतों हें प्रमाण । कीं त्यांत कोणीही दुर्गतीतें नच जाय ॥ ३५ ॥ बापा या कल्याणमार्गीं प्रवर्तला । तो कोणीच वायां नाहीं गेला । तूं पुससी हा तों चळला । श्रद्धेनें प्रवर्तोनि योगमार्गीं ॥ ३६ ॥ ज्या जन्मीं योगापासूनी । तूं पुसतोसि चळला ह्मणोनी । त्यानंतर इहलोक परलोक दोन्ही । कामधेनू होती तयासी ॥३७॥ इहलोकीं त्याचा नाश । न परलोकीं त्यातें क्लेश । दोहीं लोकीं त्याचा लेश । पार्था बापा नाश नव्हे ॥३८॥ दुर्गतीतें तो नच जाय । येविषयीं आश्चर्य काय । या कल्याणमार्गीं न होय । दुर्गती कोणासही ॥ ३९ ॥ अगा सत्संगें उपजली मुमुक्षा । अपेक्षूं लागला

मोक्षा । अद्वैतबोधाची अपेक्षा । तो न पावे दुर्गति कदापि ॥९४०॥ हा तों योगीं प्रवर्तला । तेथूनि मार्गे घसरला । दुर्गति होणार कीं काय याला । पार्था बापा काय पुससी ॥४१॥ पार्था ताता ह्मणोनि । या श्लोकीं या दों संबोधनें करूनि । कृपासमुद्र आळवीन आवरूनि । भरितें कृपेचें ॥४२॥ जरी प्रस्तुत भ्रंश जाला । तरी प्रिय तो अधोक्षजाला । सागरकृपेचा हेलावला । गोष्टी त्याची परिसतां ॥ ४३ ॥ त्यांत तो उभयभ्रष्ट कीं काय । ह्मणोनि शब्द कानीं जाय । त्यास उत्तर कीं हाय हाय । काय बोलिलास हें ह्मणोनी॥४४॥ पार्था बापा ह्मणोनी । या दों शब्देंकरूनि । अंतरींचा कळवळा ऐसा सूचवूनी । बोलिला श्रीकृष्ण ॥ ४५ ॥ आणि तुटतां हा संशय । योग आरंभावा ऐसा निश्चय । साधक सर्व करिती ह्मणोनि धनंजय । गोड वाटला या प्रश्नें ॥४६॥ यालागीं ताता बापा ह्मणोनी । एथें या तातशब्देंकरूनी । आवडीनें अर्जुनातें आळवूनी । हा संशय निरसितो ॥ ४७ ॥ अठरा अध्याय गीता । परी अन्यत्र कोठेंही ताता । ह्मणोनि अर्जुनातें जगत्पिता । ऐसा गौरवूनि बोलिला नाहीं ॥४८॥ एथें स्वविषयीं अर्जुन मनीं । शंकला योग साधावा ह्मणोनि । कीं चळलों जरी या योगापासूनि । ह्मणी दुर्गतीस जाईन ॥ ४९ ॥ यावरूनि कृपासागर । ताता बापा ह्मणूनि उत्तर । देतो कीं मोक्षमार्गीं सादर । त्यास दुर्गति हे घडेना ॥ ९५० ॥ कीं हे गीता योगशास्त्र । श्रद्धेनें आइके कानीं मात्र । तोही होउनि पवित्र । जाय उत्तम लोकातें ॥ ५१ ॥ योगाचीच श्रद्धा ज्याला । कीं योगें मुक्ति होईल मला । आणि योगीं प्रवर्तोनि चळला । बापा तो केंवि जाय दुर्गतीतें ॥ ५२ ॥ आणि योगशास्त्र गीताच हे । अर्थज्ञान नसोनिही ह्मणताहे । त्यासिही ज्ञानिया योगियासमान पाहे । कृपाळू हा श्रीकृष्ण॥५३॥गीतेचा अर्थ कांहीं । ज्या पुरुषास कळत नाहीं । गीता पठनमात्रें त्यानेंही । मज यजिलें ज्ञानयज्ञें ह्मणतसे ॥५४॥ "अध्येष्यते च य इमं" या श्लोकीं । "ज्ञानयज्ञेन तेनाहं" ह्मणोनि बोलेल कीं । पठनमात्रें त्याणें या लोकीं । ज्ञानयज्ञेंचि जाणों मज यजिलें ॥ ५५ ॥ ज्ञानाग्नि ह्मणजे ब्रह्म । त्यांत दोंपरी वृत्तीचा होम । चित्त तन्मय अथवा तेंचि सम । दिसे द्विविधयोग हा ज्ञानयज्ञ ॥ ५६ ॥ योगशास्त्रीं या गीतेभीतरीं । ज्ञानयोगयज्ञ ऐसेपरी । तिच्या पठनमात्रें मोक्षाधिकारी । प्रिय भगवंताचा होत असे ॥५७ ॥ या योगशास्त्रपठनें येरझारा । चुकती पुन्हा नये संसारा । पावतो ऐशा अधिकारा । हा तों चळ-

ला अभ्यास करितां योगाचा ॥ ५८ ॥ त्यास आणि दुर्गती । हे शंका आइके संतांचा पती । ह्मणोनि बापा पार्था ऐसा अर्जुनाप्रती । आळवी दावी कळवळा ॥ ५९ ॥ गीता अध्याय अठरा । परी ऐशा कळवळियानें पांडूकुमारा । ताता बापा ह्मणोनि एकसरा । उचंबळला नाहीं करुणार्णव॥९६०॥ कीं बापा हें काय घडे । ऐसा तो कैसा दुर्गतींत पडे । अमृतपान एकदां सांपडे । तो मरेना ॥६१॥ असो आतां यानंतर श्लोक । तो कां बोले उत्तम श्लोक । त्याचें निमित्त सुज्ञलोक । परिसोत आधीं ॥ ६२ ॥ योगापासूनि भ्रष्टला । अर्जुन पुसे तो काय उभयभ्रष्ट जाला । श्रीकृष्ण त्यास बोलिला । कीं दोंहीं लोकीं नाश त्याचा होइना ॥ ६३ ॥ न स्वर्ग अथवा मुक्ति । त्या उभयभ्रष्टशंकेनें अर्जुनाची उक्ति । त्या उक्तीची प्रत्युक्ति । जाली नाहीं अद्यापि ॥ ६४ ॥ दोंहीं लोकीं नाश त्याचा । न घडे ऐसें कृष्ण स्ववाचा । पूर्वश्लोकीं बोलिला तो कृपेचा । कळवळा अत्यंत ॥६५॥ स्वर्गमोक्ष दोंहींपासूनी । भ्रष्ट होणार कीं काय ह्मणोनी । हे शंका अर्जुनाचे वचनीं । याचें उत्तर हें नव्हे ॥ ६६ ॥ परी एके शंकेचा परिहार । करी याच गोष्टींत परमेश्वर । कीं स्वर्ग नव्हे याचें उत्तर । जालें उभयलोकीं नाश नाहीं ह्मणतां ॥ ६७ ॥ आतां उत्तमकुळप्रसूत । होऊनि मुक्ति पावे निश्चित । ऐसें बोलणार तेव्हां अत्यंत । होणार समाधान अर्जुनाचें ॥ ६८ ॥ कळवळियानें अत्यंत । दोंहीं लोकीं नाश नाहीं निश्चित । ह्मणोनि बोलिला भगवंत । तें विशद बोलणें या श्लोकीं ॥ ६९ ॥

॥ श्लोक ॥ प्राप्य पुण्यकृतांल्लोकानुषित्वा शाश्वतीः समाः ।
शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते ॥ ४१ ॥

॥ टीका ॥ अगा योगभ्रंश जाला । त्यानंतर तो जेधवां मेला । तेधवां तो पावला । उत्तमोत्तम लोकांतें ॥ ९७० ॥ राजसूय अश्वमेधादिक । पुण्य अगण्य पुण्यश्लोक । करूनि पावती जे लोक । योगभ्रष्ट त्या लोकांतें पावतो ॥ ७१ ॥ पृथ्वीदानादि दानें । करूनी अधिष्ठूनि दिव्य विमानें । पावती पदें सुखनिधानें । योगभ्रष्ट त्या लोकांतें पावतो ॥ ७२ ॥ परी अर्जुनातें पुण्यश्लोक । जैसे पावती पुण्यलोक । तैसा त्यांत हाही एक । ह्मणी ऐसें मानिसी ॥ ७३ ॥ अगा त्यांचा अवधि काळ । सरतांचि लोटिती तत्काळ । राहों न देती एक पळ । त्या लोकीं तयातें ॥ ७४ ॥ ते या देखतां नेणो किती । त्या लोकांस येती आणि जाती । इतकीं अगण्य वर्षें लोटती ।

योगभ्रष्टातें त्या लोकीं ॥ ७५ ॥ ऐसीं वर्षे शाश्वत । वास करून त्या लोकीं अत्यंत । शुचि आणि श्रीमंत । त्यांच्या घरीं योगभ्रष्ट जन्मतो ॥ ७६ ॥ एवं परलोक त्याचा तैसा । आणि इहलोक त्याचा ऐसा । नाश त्याचा ह्मणावा कैसा । दोहीं लोकीं ॥ ७७ ॥ आतां योगभ्रष्ट द्विविध । कीं होतां अन्वयव्यतिरेकबोध । योगीं प्रवर्ते करी वृत्तिनिरोध । किंवा ध्यानीं सर्वात्मत्वीं मन योजी ॥ ७८ ॥ दोहीं परी योग एक । अन्वय अथवा व्यतिरेक । परी योगभ्रष्ट होती साधक । ते द्विविध जाणावे ॥७९॥ त्यांत कोणी संगदोषेंकरूनी । पुन्हा विषयासक्त होउनी । यत्न सोडितां योगापासूनी । भ्रष्ट जाले ॥ ८० ॥ कोणी ज्ञान पावोनी । योगयत्नीं । प्रवर्तोनी । न वाणतां योग मेले ह्मणोनी । मुक्ति नाहीं पावले ॥ ८१ ॥ एथें कोणी वेदांताभिमानी । शब्दज्ञानी अनुभवी ह्मणोनी । जडनिषेधमात्रें मुक्ति उपपादुनी । आत्मज्ञानी नव्हे ह्मणती योगभ्रष्ट हा ॥ ८२ ॥ आत्मा जड-निषेधें समजला । तरी शब्दज्ञानचि ह्मणावें त्याला । जों चित्तनाश नाहीं जाला । अन्वययोगें अथवा व्यतिरेक योगें ॥ ८३ ॥ अगत्य पाहिजे योग । परी हे दोनीं योग नव्हती हटयोग । चित्त चिन्मय वृत्तिवियोग । अ-थवा चित्स्वरूप लक्षावें जडमात्र ॥ ८४ ॥ वेदशास्त्र पुराणें वेदांत । या सर्वांचाही सिद्धांत । कलियुगीं ज्ञानमार्गींही जे भ्रांत । ते उडविती योग । आणि सगुण भजनातें ॥ ८५ ॥ असो आतां योगभ्रष्ट द्विप्रकार । त्यांत कोणी दुष्टसंगें विषयविकार । गोड मानूनि योगाचा विचार । सोडोनि देती ॥ ८६ ॥ कोण्हीं योगीं प्रवर्तले । परी साधक ते सिद्ध नाहीं झाले । आयुष्य सरतां मेले । देहांतीं विस्मरण पावोनी ॥ ८७ ॥ जो देहांतीं आत्मा स्मरे । त्याचा देह मात्रचि मरे। तो सच्चिदानंद उरे । कीं अंतीं जें स्मरे पावे तयातें॥८८॥"यं यं वापि स्मरन् भावं"ह्मणोनी। अष्टमाध्यायांत या वचनीं । हा सिद्धांत होणार यावरूनी । देहावसानीं आत्मस्मृतीनें कैवल्य ॥ ८९ ॥ परंतु अष्टमाध्यायांत । त्याच श्लोकीं भगवंत । ह्मणेल कीं सदा जो भाव अत्यंत । भाविजे तोचि देहांतीं आठवे ॥ ९० ॥ योग याकारणें । नरा-स या अध्यायांत नारायणें । विशद वर्णिला कीं मोक्षपरायणें । आत्मा स-मजोनि योग साधावा ॥ ९१ ॥ एवं चित्स्वरूपीं चित्त जडे । कीं सर्व आ-त्मा हा ठसा पडे । तरीच देहावसानीं घडे । आत्मस्मृति ॥ ९२ ॥ अवि-द्याच नाहीं गेली । जों चिन्मय बुद्धि नाहीं झाली । ज्ञानाभिमानियांची

बोली । असो परती असंमत ॥ ९३ ॥ एवं योगभ्रष्ट दोंपरी । एक पडोनि विषयांवरी । एक वैराग्य असोनि अंतरीं । योग साधितां मृत झाला ॥९४॥ त्यांत अर्जुनें पुसिला । तो विषयासक्तीनें परतला । तरी "विमूढो ब्रह्मणः पथि" ह्मणोनि बोलिला । विशेषण त्याचें अर्जुनें॥९५॥कीं न होतां योगारूढ । विशेषें जाला मूढ । भावार्थ यांत गूढ । कीं तोचि विमूढ जो विषयासक्त ॥ ९६ ॥ दोंहीं लोकीं नाश । त्याचा नव्हे लेश । ह्मणोनि बोलतां हृषीकेश । जन्म बोलिला शुचि श्रीमंतगृहीं तयाचा ॥ ९७ ॥ कीं देहावसानीं चित्त । विषयांकडे त्याचें होतें रत । ह्मणोनि जे श्रीमंत । त्यांच्या गृहीं तो जन्मतो॥९८॥कीं संयोग पूर्वबुद्धीचा।त्या जन्मीं त्यास होतो ऐसें स्ववाचा। कृष्ण ह्मणेल तोंपर्यंत तो सुत श्रीमंताचा । पूर्वसंस्कारें भोगितो विषयांतें ॥९९॥परी ते श्रीमंत । शुचिर्भूत अत्यंत । या भावें ह्मणे भगवंत। कीं प्रवृत्ति न घडे त्याची कुमार्गी॥१०००॥ आणि जो पूर्वबुद्धिसंयोग । होय तों आरंभीं सत्कर्मयोग । आणि करी विषयभोग । यथान्यायें ॥ १ ॥ जो विषयासक्त होउनी । योगभ्रष्ट मेला तो येरीती करूनी । शुचि श्रीमंतगृहीं जन्मे ह्मणोनी । सर्वज्ञशिखामणी बोलिला ॥ २ ॥ आतां ज्यास होती विरक्ती । योगसिद्धि न होतां न पावला मुक्ती । इतकियांत मेला परंतु विषयासक्ती । नव्हती पोटीं तयाच्या ॥ ३ ॥ तोही पुण्यलोकांतें जातां । शाश्वत काळ तेथें राहतो । पुन्हा या लोकीं जन्मतो । योगसिद्धीकारणें ॥ ४ ॥ तो श्रीमंताचे गृहीं । उत्पन्न होत नाहीं । कीं विषय भोगावे हा कांहीं । संस्कार नव्हता ॥ ५ ॥ त्यासही प्रारब्धाच्या बळें । जरी भोगणें विषयभोग फळें । तरी तोही यथाकाळें । श्रीमंतगृहीं जन्म पावे ॥ ६ ॥ जरी प्रारब्धही तैसें नसे । आणि तदनुरूप संस्कारही नसती तैसे । तरी तो जन्मतां न दिसे । श्रीमंताच्या ॥ ७ ॥ ह्मणोनि त्यास परम लोक । वर्णूनि आतां उत्तमश्लोक । इहलोकजन्मीं कांहीं एक । वैपरीत्य वदतो अथवा ह्मणोनि या श्लोकीं ॥८॥

॥ श्लोक ॥ अथवा योगिनामेव कुले भवति धीमताम् ।
एतद्धि दुर्लभतरं लोके जन्म यदीदृशम्॥ ४२ ॥

॥ टीका ॥ अथवा योगियांचें कुळ । जे योगी बुद्धिमंत प्रांजळ । कीं अपेक्षूनि मुक्ति केवळ । योगचि अनुष्ठिती जे योगी ॥ ९ ॥ कुळीं तयाच्या तैशिया । जन्म योगभ्रष्टा तया । कीं संस्कार नव्हता जया । विषयभोग यत्नाचा ॥ १०१० ॥ अर्धश्लोकें करूनि । प्रकारद्वय जन्म वर्णूनि । बोलतो

उत्तरार्ध वचनीं । महिमा योगभ्रष्ट जन्माचा ॥ ११ ॥ अगा अर्जुना । या लोकीं बहुतां जना । जन्म होती परी येना । सरी याच्या जन्माची॥ १२ ॥ मोक्षास विलंब त्याला । होऊ नये तथापि जाला । परी हा योगभ्रष्ट जन्म-पावला । तो परमदुर्लभ या लोकीं ॥१३॥ अनायासें धनंजया । योगसिद्धि ऐशा जन्मीं तया । ह्मणोनि बोलतसे आतां या । दों श्लोकें करूनी ॥१४॥

॥ श्लोक ॥ तत्र तं बुद्धिसंयोगं लभते पौर्वदेहिकम् ।
यतते च ततो भूयः संसिद्धौ कुरुनंदन ॥ ४३ ॥

॥ टीका ॥ पूर्वदेहीं मुमुक्षा । अत्यंत मोक्षाची अपेक्षा । ते विना सत्सं-गादि शिक्षा । स्फुरों लागे बुद्धीतें ॥ १५ ॥ बुद्धीचे दोन प्रकार । एक स-त्त्ववृत्ति निश्चयाकार । एक विवेकें विचारनिर्धार । तेही ह्मणावी बुद्धि ह्म-णोनी ॥ १६ ॥ एकें विचार सांगितला । ते बुद्धि ह्मणती दिधली त्याला । त्याची बुद्धि गेली आली याही बोला । लोक बोलती ॥ १७ ॥ निश्चय क-रणारी सत्त्ववृत्ती । ते तो होतीच त्याच्या चित्तीं । परी स्वहितविचार-प्रवृत्ती । बुद्धि ते गेली आली ह्मणावी ॥ १८ ॥ एवं मोक्षमार्गप्रवृत्ती । आणि विषयमार्गीं निवृत्ती । हे पूर्वदेहसंस्कारवृत्ती । स्वयेंचि स्फुरों ला-गे बुद्धीतें ॥ १९ ॥ तो पूर्वदेह बुद्धीचा । संयोग ह्मणे कृष्ण स्ववाचा । लाभ त्या बुद्धिसंयोगाचा । होतो त्या जन्मीं तयातें ॥ १०२० ॥ जोंजों वाढे शरीर । बुद्धी जों जों होय चतुर । तों तों उमटे पूर्वसंस्कार । हृदया-मध्यें ॥ २१ ॥ बाळपणींच एक । तरुणपणीं कितीएक । पूर्वदेहबुद्धिवि-वेक । या योगभ्रष्ट जन्मीं लाधले ॥ २२ ॥ ऐसा पूर्वबुद्धिसंयोग । होतां पुन्हा आत्मयोग । आरंभितो संतसंग । अलभ्यलाभ पावोनी ॥ २३ ॥ हर-पलें ज्ञानरत्न । तें ईश्वरें त्या कारणें केलें होतें जतन । न करितां फारसा यत्न । गुरुरूपें त्याचें तयातें पाववी ॥ २४ ॥ कोणाम संत प्रसिद्ध । तेचि भेटलें ज्ञानवृद्ध । कोणी जाले ज्ञानसिद्ध । ईश्वराचि भेटतां गुरुरूपें॥ २५ ॥ कोण्या एक्या प्रकारें । ज्ञान पावोनि आदरें । योग प्रयत्न पूर्वसंस्कारें । क-रूं लागे अत्यंत ॥ २६॥ प्रयत्न मुक्तीलागीं । अत्यंत करितो योगी । सक-ळां पूर्वजालागीं । उद्धरितो आपुल्या ॥ २७ ॥ भाव ऐसा ह्या वचनीं । सूचवी कुरुनंदना ह्मणोनी । अर्जुनातें या नावें करूनी । आळविलो ॥२८॥ कीं आनंदवी कुरुवंशातें । कुरुनंदन ह्मणावें त्यातें । येथें सूचवी अर्जुनातें । कीं तूंही स्वपूर्वजांस उद्धरिसी ॥ २९ ॥ ऐसा तो वंशोद्धारक । जन्मांतरीं-

या साधक । स्वयेंचि स्वहितीं प्रवर्ते कौतुक । आइक ह्मणतो श्रीकृष्ण या श्लोकीं ॥ १०३० ॥

॥ श्लोक ॥ पूर्वाभ्यासेन तेनैव ह्रियते ह्यवशोऽपि सः ।
जिज्ञासुरपि योगस्य शब्दब्रह्मातिवर्तते ॥ ४४ ॥

॥ टीका ॥ अगा पूर्वजन्म अभ्यास । त्याचिया चित्तास । ओढूनि ने विना प्रयास । योजी मोक्षमार्गींच ॥ ३१ ॥ जो स्वहिताविषयीं रत । तो स्ववश ह्मणावा निश्चित । कीं आपणास आपण अत्यंत । बुद्धींद्रियासहित वश असे ॥ ३२ ॥ अवश ह्मणावें त्याला । कीं स्वहिताचरण न घडे ज्याला । तैसा हा जरी अवश जाला । पूर्वाभ्यास त्याला न सोडी ॥३३॥ संसारबंधापासूनी । आपणास सोडवावें ह्मणोनी । हा पूर्वाभ्यास सिद्ध होऊनि । होता संस्काररूपें बुद्धींत ॥ ३४ ॥ प्रपंच्याचा विलास । जरी गोड लागे तयास । तरी पूर्वजन्मस्वहिताभ्यास । योजीच त्याला मोक्षमार्गी॥३५॥ आतां आपलें हित । मोक्षप्राप्तीच निश्चित। परी शुद्ध करावया चित्त । कर्मयोगही पहिल्यानें पाहिजे ॥ ३६॥ तरी काय पूर्वाभ्यास । कर्मयोगीं योजितो यांस । ह्मणोनि वाटेल अर्जुनास । ये स्थळीं ॥ ३७ ॥ तरीं कर्मयोगें करूनी । हा शुद्धचित्त होउनी । काम्यकर्मे सर्व टाकुनी । जन्मांतरींच ज्ञानयोगीं प्रवर्तला ॥ ३८ ॥ मग योगापासुनि चळला । कीं मेला अथवा कुसंगें खवळला । या जन्मीं स्वहितीं वळला । पूर्वाभ्यासें ॥३९॥ जन्मांतरीं शुद्धचित्त । जाला करूनि कर्मे निर्निमित्त । मग ज्ञानीं श्रद्धाउपजली अत्यंत । कर्मी उपजली अश्रद्धा ॥१०४०॥ ज्ञानाचि तारक गमे ज्यास । शुद्धचित्त ह्मणावें त्यास । तेव्हां कर्मी अनादर हा अभ्यास । पूर्वजन्माचा ॥४१॥ तो पूर्वील अभ्यास । कर्ममार्गी कां ओवील त्यास । ज्ञानचि तारक ऐसी जयास । श्रद्धा होती पूर्वींच ॥ ४२ ॥ या लागीं हा अर्थ । ज्या वरूनि समजे पार्थ । ऐसें बोलतो आतां समर्थ । या श्लोकाच्या उत्तरार्धे करूनि ॥ ४३ ॥ ॥ उत्तरार्ध ॥ जिज्ञासुरपि योगस्य शब्दब्रह्मातिवर्तते॥ ॥टीका॥ अगा आत्मा कळोनि योगास । आरंभ करावा ऐसी पूर्वजन्मीं जिज्ञासा ज्यास । तोही अतिक्रमूनि वेदास । ये जन्मीं वर्तती ॥ ४४ ॥ इतकाच वाक्याचा अर्थ । तो विशद बोलतां यथार्थ । प्रगट होतो परमार्थ । ये रीती ॥४५॥ कीं ज्यास आत्मानात्मविवेक । कळला अन्वयव्यतिरेक । त्यास मुक्तीस साधन उरलें एक । कीं चित्तचिद्रूपयोगीं करावें ॥ ४६ ॥

आत्मजिज्ञासु पूर्वी होता । तो आत्मा कळला तत्त्वतां । आतां चित्तास चिन्मयता । कैसी होय हा यत्न यानंतर ॥ ४७ ॥ तेव्हां योगाचें लक्षण । जाणों इच्छी विचक्षण । त्यास ह्मणे कमलेक्षण । योगजिज्ञासु ह्मणोनी । ॥ ४८ ॥ आत्मा जाणों इच्छितो । आत्मतत्त्वजिज्ञासु बोलावा तो । मग योगरीती जाणेन ऐसें अपेक्षितो । तो आत्मज्ञ योगजिज्ञासु ह्मणावा ॥ ४९ ॥ आणि अर्जुनें ज्याचा प्रश्न केला । तो योगाभ्यासीं घसरला । कीं अर्जुन बोलिला । "योगाच्चलितमानसः" ह्मणोनी॥१०५०॥ वृक्षापासूनि पर्ण गळे । तैसें योगापासूनि मन चळे ।"योगाच्चलित"या शब्दें स्पष्ट कळे । अर्थ ऐसा ॥ ५१ ॥ तो शब्दब्रह्म वेदातें अतिक्रमी । कृष्ण ह्मणे हें काय सांगों मी । योगजिज्ञासु तोही कर्मी । न प्रवर्ते प्रवर्ते या जन्मीं योगींच ॥ ५२ ॥ अर्जुना तुवां ज्याचेविषयीं प्रश्न केला । त्याहूनि नीच पायरीचा जरी असला । तोही अतिक्रमूनि वेदांला । प्रवर्तो हा भाव ॥ ५३ ॥ वेदांचें अतिक्रमणें । हेंचि कीं वेदोक्त कर्मादर न धरणें । काम्यकर्मे तों याणें । टाकिलें पूर्वजन्मींच ॥ ५४ ॥ एथें ऐसें बोलिला । आणि शुचिश्रीमंत-सदनीं त्याला । जन्म बोलिला तेव्हां प्राप्त जाला । विरोध कांहीं तोही परि-हरिला पूर्वींच ॥ ५५ ॥ कीं पवित्र शुचिष्मंत । आणि ते श्रीमंत । त्यांचा पुत्र तोही अत्यंत । सादर कर्मी होणार॥ ५६ ॥ तरी अनुभवूनि ब्रह्म । जी-वन्मुक्तही करी कर्म । हें लोकसंग्रहाचें वर्म । तृतीयाध्यायांत वर्णिलें ॥५७॥ हाही सत्कर्मी प्रवृत्त । परी या कर्मेंचि माझें स्वहित । ऐसें मानूनि नव्हे रत । कर्ममार्गीं ॥ ५८ ॥ तोही पूर्वबुद्धिसंयोग । होय तोंवरी कर्मयोग । अनुष्ठी तारक ह्मणोनि मग । करी लोकसंग्रहाचिकारणें ॥ ५९ ॥ परंतु कर्मी अनादर । कीं नव्हे तो विधिकिंकर । यालागीं योगींच होऊनि तत्पर अतिक्रमी वेदातें ॥ १०६० ॥ एवं पूर्वाभ्यास । ज्ञानमार्गींच योजी त्यास। कर्ममार्गीं नसे ज्यास। आदर ऐसा श्लोकार्थ ॥ ६१ ॥ या भगवद्गीतेंत जो संक्षेप । श्रीमद्भागवतीं त्याचें विशद रूप । एकादशीं सच्चिदानंदस्वरूप । उद्धवाप्रति बोलिला हें ऐसेंचि ॥६२॥ भागवत श्लोक॥ "कुयोगिनो ये विहि-तान्तरायैर्मनुष्यभूतैस्त्रिदशोपसृष्टैः। ते प्राक्तनाभ्यासबलेन भूयो युंजंति योगं न तु कर्मतंत्रम्"॥१॥ टीका ॥ श्रीकृष्ण ह्मणे उद्धवा । ज्ञानी होऊनि यत्न-वरवा । योगाकारणें न करी तो ह्मणावा । कुयोगी ह्मणोनि ॥ ६३ ॥ ऐसे कुयोगी । यत्न न करिती आत्मयोगीं । देव घालिती विषयभोगीं । बळा-

त्कारें तयांतें॥६४॥देव विघ्नें करिती । विषयकामना नाना रीति । देऊनियां चेववितीं । होऊं न देती योगसिद्धीतें ॥ ६५ ॥ ते देव इंद्रियाभिमानी । त्यांच्या इंद्रियांतें खवळूनी । स्त्रीपुरुषांच्या इंद्रियांतें क्षोभवूनी । विघ्नें करिती कुयोगियांतें ॥ ६६ ॥ करिती प्रजाशासन । जे राजसेवक जन । अतिक्रमूनि त्यातें नृपदर्शन । प्रजांस होतां ते क्षोभती ॥ ६७ ॥त्या प्रजा रायाप्रती । न पावत ऐसीं विघ्नें करिती । राजकृपा होतां न लेखिती । प्रजा त्या आपणातें ॥६८॥ मनुष्य यजिती देवांतें । ते वृष्ट्यादि फळ देती त्यांतें । जे मुमुक्षु त्या निष्कामांतें । उपेक्षा तयांची ॥ ६९ ॥ ह्मणूनि देव क्षोभती । योगसिद्धि होऊं न देती । दोघांस त्यांचीं विघ्नें न बाधिती । कुयोगी ते या दोहींवेगळे ॥ १०७० ॥ या द्विविधा ज्ञानिया योगियांत । एक सेविती सगुण भगवंत । एक निर्गुणोपासक ते अत्यंत । क्लेशें देवकृत विघ्नें परिहरिती ॥७१॥ "क्लेशोधिकतरस्तेषां"ह्मणोनी । द्वादशाध्यायांत या भावें करूनी । श्रीकृष्ण बोलेल त्या वचनीं । समजावा हा अर्थ ॥७२॥ जे ज्ञानी होऊनि सगुणाची । कांस न सोडिती त्यांची । देवकृतविघ्नें हरूनि योगाची । सिद्धि अनायासें ईश्वर देतसे ॥७३॥ "तेषामहं समुद्धर्ता" ह्मणोनी । द्वादशाध्यायांत या भावेंकरूनी । श्रीकृष्ण बोलेल कीं सकळ विघ्नें हरूनी । मी उद्धरणार भक्तांतें ॥ ७४ ॥ हाचि अर्थ भागवतीं । पुनःपुनः स्कंधस्कंधाप्रती । निरूपिला तीं प्रमाणें किती । वाखाणावीं ये स्थळीं ॥ ७५ ॥ ग्रंथ वाढेल फार । ह्मणूनि दाविजे तो अनुकार । एवं देवकृत विघ्नें परिहार । अनायासें भगवद्भक्तां ज्ञानियांचा ॥ ७६ ॥ ज्ञान जालियाउपरी । सगुण सोडोनि निर्गुणाचवरी । प्रीति धरूनि बरी । अवलंबिली जिहीं असंगता ॥ ७७॥ देव त्यांस विघ्नें करिती। परी ते अतिक्लेशें परिहरिती । निःसंग होऊनि धरिती । अभ्यास आत्मयोगाचा ॥ ७८ ॥ तेहि ह्मणावे सुयोगी । देवविघ्नें तयांलागीं । न बाधती आणि जे कुयोगी । देवविघ्नें बाधकें होती तयांतें ॥ ७९ ॥ जे आत्मा समजोनी । आणि योगींहि प्रवर्तोनी । अभ्यास बरा न करिती ह्मणोनी । कुयोगी ह्मणावें तयांतें ॥ १०८०॥ गोष्टी तयांची प्रस्तुत । कीं देव त्यांस विघ्नें अत्यंत । करिती निघोनि इंद्रियांत । त्यांच्या आणि मनुष्यांच्या ॥ ८१ ॥ विघ्नें मनुष्याकृती । त्यांत कांहीं पुरुष कांहीं युवती । योगास विघ्नें करिती त्या किती । प्रसिद्ध गोष्टी बोलाव्या ॥ ८२॥ एवं जे कुयोगी । देव विघ्नें करिती ज्यांलागीं । ते योगभ्रष्ट होऊनि मेले

जगीं । मुक्ति नाहीं भेवले त्या जन्मीं ॥ ८३ ॥ ते शुचिश्रीमंतसदना । पुन्हा उत्तम जन्म पावोनी । साधनाभ्यासबळें करूनी । आत्मयोगीं यो-जिती चित्तातें ॥ ८४ ॥ परंतु कर्माकडे न भरती । आत्मयोगींच चित्त योजिती । ऐसें उद्धवातें श्रीपती । श्रीमद्भागवतींही बोलिला ॥ ८५ ॥ एवं या प्रस्तुतीं । गीतेंत अर्जुनाप्रती । "शब्दब्रह्मातिवर्तते" ऐसें जगत्पती । तोचि बोलतो ॥ ८६ ॥ एवं बालदशेपासूनी । मोक्षाची इच्छा धरूनी । कर्म-मार्गीं रत नसे तरी सज्जनीं । त्यास उपदेश मोक्षमार्गींचा करावा ॥ ८७॥ कीं तो जन्मांतरीं । ज्ञानमार्गींच होता यापरी । परीक्षा करूनि अंतरीं । अधिकारी जाणावा यज्ञाचा ॥ ८८ ॥ एवं या गीताश्लोकीं । श्रीकृष्ण ऐसें बोलिला कीं । तो जरी गुंते लौकिकीं । पूर्वाभ्यास मोक्षमार्गींच ओढी तयास ॥ ८९ ॥ तो अतिक्रमूनि कर्म । धुंडूं लागे परब्रह्म । योग साधूनि उत्तम । मोक्ष पावे हें पुढें बोलिजेल ॥ १०९० ॥ आतां यानंतर श्लोक । तो कां बोले उत्तमश्लोक । त्याचें निमित्त सुज्ञ लोक । परिसोत आधीं ॥ ९१ ॥ योगभ्रष्ट या जन्मीं । स्वहित साधी परब्रह्मीं । परि न पडे कर्मीं । ऐसें बो-लिला श्रीकृष्ण ।। ९२ ॥ आणि त्याचा पूर्वाभ्यास । बळेंचि त्याच्या हि-ताकडे त्यास । ओढी ऐसेंही जगन्निवास । पूर्वश्लोकीं बोलिला ॥ ९३ ॥ या दों गोष्टींत दोनी । संदेह उपजले पार्थाच्या मनीं । कीं या जन्मीं काय म्हणोनी । यत्न करावा त्यानें योगाचा ॥ ९४ ॥ कीं तो पूर्वाभ्यासेंचि सिद्ध । होणार हें जालें प्रसिद्ध । तरी त्यानें विषयसमृद्ध । यथेष्ट कां न भोगावें ॥ ९५ ॥ आणि " यतते च ततो भूयः " म्हणोनी । पूर्वश्लोकीं या वचनीं । मोक्षार्थ यत्न अत्यंत त्याचा दावूनी । स्वयें बोलिला॥९६॥ आणि पूर्वजन्मीं शुद्धचित्त । कर्में करूनि जाला निश्चित । तरी शुद्ध वस्त्रही असें होत । मलिन बहु काळेंकरूनी ॥ ९७ ॥ तरी याही जन्मीं । चित्तशु-द्धि करणें कर्मीं । कां रत नसावें वेदोक्त कर्मीं । ऐसी शंका दूसरी॥९८॥ शंका दोनि यापरी । उपजतां अर्जुनाच्या अंतरीं । तत्परिहारवाक्यें बरीं । आतां या श्लोकीं बोलतो ॥ ९९ ॥

॥ श्लोक ॥ प्रयत्नाद्यतमानस्तु योगी संशुद्धकिल्बिषः ।
अनेकजन्मसंसिद्धस्ततो याति परां गतिम् ॥ ४५ ॥

॥ टीका ॥ अगा मुक्ति जे कां परम गती । प्रयत्नेंचि करूनीच ते गतीं-प्रती । पावतो ऐसें श्रीपती । बोलोनि परिहरी एक शंका ॥ ११०० ॥ कीं

पूर्वाभ्यास त्याचा । बळेंचि त्यास ओढी हें स्ववाचा । बोलिलों अर्थ साचा । त्याचा इतकाच ॥ १ ॥ कीं ज्ञानमार्गीच सादर । त्यास करी पूर्वसंस्कार । कर्म अतिक्रमूनि निर्धार । ब्रह्मींच करितों वास्तव ॥ २ ॥ अगा जो ग्रंथ जेथवरी । पाठ करूनि विसरे तेथवरी । पूर्वाभ्यासें झडकरी । पाठ होय त्या पुढें लागे प्रयत्न ॥ ३ ॥ एवं ज्ञानमार्गच उत्तम । इतकेंचि पूर्वाभ्यासें सुगम । पुढें स्वरूपीं चित्तसंयम । हा यत्न करणें लागेच ॥ ४ ॥ परी इतरासारिखे श्रम । त्यास न लागती करितां चित्ताचा संयम । कीं अश्रुत वेदही होती सुगम । योगाभ्यासीं पूर्वीं विरूढली वाणी जयाची ॥ ५ ॥ एवं सुगम रीती । प्रयत्न त्यासही लागती । शंका एक जगत्पती । परिहरी ऐशिया भावें ॥ ६ ॥ आतां पूर्वजन्मीं शुद्ध चित्त । तरी काळ लोटला अत्यंत । पुन्हा त्याच्या सिद्धीनिमित्त । कर्मयोग कां न करावा॥७॥ऐसी शंका दुसरी ।अनेक"जन्मसंसिद्धः"या वचनें हरी । "संशुद्ध किल्बिषः" ह्मणोनिही हरी । द्वितीय शंका ॥ ८ ॥ कीं अनेक जन्म । अगा करितां निष्काम कर्म । आत्मत्वें जाणावें ब्रह्म । हे जिज्ञासा उपजते ॥ ९ ॥ ब्रह्मजिज्ञासा उपजली । तेव्हांचि शुद्धि बुद्धीची जाली । कीं भोगवासना वाईट वाटली । दोहीं लोकांची जेधवां ॥ ११० ॥ आतां ह्मणशील योगभ्रष्ट जाला । तेव्हां पुन्हा मळ लागला । कीं धौतपटही मळला । बहुतां काळें जे रीती ॥ ११ ॥ तरी विषयांचि गोड तत्त्वतां । ते अनादि बुद्धीची मलिनता । कठिणता आणि शामता । लोखंडाची जे रीती ॥ १२ ॥ त्या लोहातें लागे परीस । मग कठिणता शामता नये त्यास । ऐसा त्याचा पूर्वाभ्यास । "योगी विगतकल्मषः" ह्मणतां सूचवी ॥ १३ ॥ निष्काम कर्मे ईश्वरीं । अर्पितां जन्मांतरीं । परिसास लोह लागे यापरी । विगतकिल्बिष पूर्वींच हा जाला ॥ १४ ॥ आतां योगभ्रष्ट जाला । ह्मणोनि ह्मणसी मळ लागला । तों तों वरील मळ चढला । सोनें मलिन जैसें धुळीनें ॥ १५ ॥ त्यास लागतांच हात । शुद्ध होय निश्चित । एवं लोहत्वीं किल्बिष अत्यंत । तैसा अनादि मळ किल्बिष तें नाहीं ॥ १६ ॥ ह्मणोनि शुद्ध किल्बिष त्याला ह्मणावें । तेथें संशुद्ध किल्बिष ह्मणे या भावें । संशुद्ध ह्मणतां जाणावें । कीं समीचीन प्रकारें तो शुद्ध ॥ १७ ॥ ऐशा शंका दोन्ही हरूनी । आतां योग थोर सर्वांहुनी । तो योग तूं अनुष्ठीं ह्मणोनि । योगी सर्वांत थोर ह्मणतो या श्लोकीं ॥ १८ ॥

॥ श्लोक ॥ तपस्विभ्योऽधिको योगी ज्ञानिभ्योपि मतोऽधिकः ।
कर्मिभ्यश्चाधिको योगी तस्माद्योगी भवार्जुन ॥ ४६ ॥

॥ टीका ॥ अगा अर्जुना तपस्वी । तपें पावती थोर पदवी । परी तीं तपें आणि फळें जाणावीं । नश्वरें दोन्ही ॥ १९ ॥ अगा तैसा नव्हे योगी । जो निजानंदपदींच चित्तालागीं । योजी आणि देह जीवंत असतां जगीं । प्राप्ति निजानंदपदाची ज्याला ॥ ११२० ॥ योगी तपस्वी याहूनि । अधिक कोटिगुणेंकरूनि । योगी होय ह्मणे ह्मणोनि । अर्जुना तूंहि ॥ २१ ॥ कोणीं कर्मेंचि करिती । नाना देवतांतें यजिती । उत्तम लोकासही जाती । शेवटीं सकळही नश्वर ॥ २२ ॥ कर्मकर्त्याहूनी यालागीं । कोटिगुणें अधिक योगी । ह्मणोनि होय तूंहि जगीं । योगी अगा अर्जुना ॥ २३ ॥ अगा ह्मणसी तीं सकामें । वाईट तपें आणि कर्में । मी जीं करीन तीं निष्कामें । त्याणें मोक्ष पावेन ॥ २४ ॥ तरी निष्कामाचें फळ । आत्मज्ञान केवळ । मागुती तेथें चित्त करणें निश्चळ । तो योग ॥ २५ ॥ एवं ज्ञानियाहीहुनी । योगी अधिक ह्मणोनी । यास्तव ह्मणतो कृपेंकरूनी । कीं तूं योगी होईं अर्जुना ॥ २६ ॥ एथें बोलिले ज्ञानी । कीं योगी थोर जयाहुनी । ते ज्ञानी शास्त्रज्ञानी । ऐसें कोणी बोलती ॥ २७ ॥ ज्याच्या मतें आत्मा कळला । मग योग कां पाहिजे त्याला । ते येथें बोलती या बोला । कीं आत्मज्ञानी तोचि योगी ह्मणोनि ॥ २८ ॥ आत्मा कळला ज्यालागीं । तितके ज्ञानेंचि तो योगी । ऐसें मत ह्मणोनि या प्रसंगीं । ज्ञानी तो शास्त्रज्ञानी एथें बोलती ॥ २९ ॥ एक वेदांताविणें । शास्त्रमात्र ज्याला दूषणें । योग थोर ह्मणतां येणें । लागेल योगशास्त्र ॥ ११३० ॥ तरी योगशास्त्रींच्या इतर रीती । टाकूनि योगचि जगत्पती । या गीतेंत बोले आणि श्रुती । वदती व्यतिरेक अन्वय दोन योग ॥ ३१ ॥ योग न साधे जोंवरी । देहात्मसंस्कार न तुटे तोंवरी । ह्मणोनि योग उपपादूनि यापरि । बोलती श्रुति ॥३२॥ श्रुति ॥ यदि पंचावतिष्ठंते ज्ञानानि मनसा सह । बुद्धिश्च न विचेष्टांते तमाहुः परमां गतिम् । तां योगमतिमन्यंते स्थिरामिंद्रियधारणाम् । अप्रमत्तस्तदा भवति योगोहि प्रभवाप्ययौ ॥ श्रुत्यर्थ ॥ जेव्हां पांचां ज्ञानेंद्रियांच्या वृत्ती । मनासहित निश्चळ राहती । बुद्धीची चेष्टा गती । राहे परमगती त्या गतीतें ह्मणावें ॥ ३३ ॥ ऐसी जे परमा गती । तीतें योग ह्मणोनि ह्मणती । त्या योगाची हेचि स्थिती । कीं स्थिरा इंद्रियांची धारणा ॥ ३४ ॥ कीं प्रपंच

ह्मणावें तया । जों अनुभवा ये पांचां इंद्रियां । शब्द स्पर्श रूप रस गंध यां । वेगळा प्रपंच काय असे ॥ ३५ ॥ चित्त जालें चिन्मय । तेव्हां कोण्या विषयातें कोण कल्पी इंद्रिय । प्रत्यगात्मस्मृतीचाच निश्चय । तन्मयत्वेंचि उरे बुद्धीचा ॥ ३६ ॥ ऐसी धारणास्थिती । तीस योग ऐसें ह्मणती । परि अप्रमत्त तेव्हां जेव्हां ये रीती । स्थिति बाणे॥३७॥ ज्यास स्वरूपाची विस्मृती । त्यास प्रमत्त ह्मणती । स्मृति जातां पदच्युती । प्रमत्तातें॥३८॥ ऐसा योग न बाणे । श्रुति त्यातें अप्रमत्त ह्मणे । कीं योगसिद्ध शहाणे । ते स्वचिदात्मता न विसरती ॥ ३९ ॥ चिदात्मता आपली विस्मरे । तेव्हां देहात्मता आयती स्फुरे । मग काय ते समयीं उरे । अंतर ज्ञानिया अज्ञानियास ॥ ११४० ॥ कोणी एथें ह्मणती । कीं आपणास सौभाग्यवती । ऐसें जरी सुवासिनी न स्मरती । तरी अहेवपण गेलें काय त्यांचें ॥ ४१ ॥ तरी सौभाग्यातें विसरती । आणि क्षौरकातें आतळती । तरी तीस स्मृति धरणें लागती । अगत्य आपल्या सौभाग्याची ॥४२॥ बुद्धीस जेव्हां चिदात्मता । न स्फुरे स्फुरे तेव्हां देहात्मता । हा संस्कार न्हावी आयता । सिद्ध बैसला मुंडनातें ॥ ४३ ॥ कोणी ह्मणती ब्राह्मण । न स्मरे कीं ब्राह्मण आपण । तरी तें काय गेलें शहाणपण । मूर्ख कोणी दावितो ॥ ४४ ॥ जो भ्रष्टोनि शुद्ध जाला । मी शुद्ध जालों हें न स्मरे ज्याला । तो विसरूनी अन्न भक्षूं लागला । इतर नीच जातींचें ॥ ४५ ॥ पूर्वसंस्कारें देहात्मत्व । जरी न मानी ज्ञानियाचें सत्त्व । तरी चिदात्मत्व विस्मरणें पूर्णत्व । न जाय ऐसें अंगीकारूं ये ॥ ४६ ॥ असोत दांभिकाचे बोल । परमार्थेंही न फोल । परी त्यातें मानूनि सखोल । वायां जाती उपेक्षूनी योगातें ॥४७॥ एवं "अप्रमत्तस्तदा भवति" । येथपर्यंत श्रुती । योगशब्दें हे स्थिती । विशद व्यतिरेक यागीं बोलिली॥४८॥उरला शेवटील चरण । त्यांत अन्वय योगीविवरण । ज्या योगीं मायेचे तिन्ही गुण । तेही निर्गुणाचि लक्षावें ॥ ४९ ॥ श्रुत्यंतिम चरण । "योगो हि प्रभवाप्ययौ" ॥श्रुत्यर्थ॥ प्रभव ह्मणजे उत्पत्ती । अप्यय नाशास ह्मणती । या दोहींतें ह्मणे श्रुती । योग ह्मणोनि ॥११५०॥ कीं सृष्टि आणि संहार जगास । ब्रह्म हेमीं जैसें नगास । नग उपजणें असणें नाशणें तिघांस । अधिष्टान सोनें तैसें जगासही ब्रह्म ॥ ५१ ॥ एवंच ब्रह्मचि नहोनि विश्व जालें । ब्रह्मचि त्याचा नाश जें अंतीं उरलें । स्थितिकाळीं ही ब्रह्मचि या बोलें । सूचविलें श्रुतीनें ॥ ५२ ॥ कीं सोनेंचि अळं-

कार जो जाला । उरलें नाशूनि तेंचि नाश त्यांच्या बोला । होऊनि नासे तों-पर्यंतही त्याला । सोनेंचि कीं ह्मणावें ॥ ५३ ॥ एवं अलंकाराचें उपजणें । सोनें आणि सोनेंचि त्याचें नाशणें । तेव्हां सोनेंचि असणें । उपजोनि नासे तोंपर्यंत ॥ ५४ ॥ तरंगउत्पत्ति जळ । त्याचा नाश तेंचि केवळ । तरंग आहे तोंवरीही निखळ । उदकचि असे ॥ ५५ ॥ कार्यीत निखळ कारण । पाहाणें यास योगनिपुण । योग ह्मणती श्रुतीही खूण । हेंचि दात्री ॥ ५६ ॥ ज्याचें जें उपादान कारण । त्या कार्यास प्रत्यक्षीं कारणपण । त्याचें उप-जणें नाशणेंही आपण । कारणचि दिसे ॥ ५७ ॥ येविषयीं प्रमाण श्रुती । आणीकही उदंड असती । परंतु पावेल विस्ताराप्रती । ग्रंथ हा ॥ ५८ ॥ एवं योगशास्त्ररीती । टाकूनि गीता पुराणें श्रुती । वाखाणावया ज्ञानस्थिती । योग बोलती तो मोक्षातें अगत्य ॥ ५९ ॥ हा अर्थही या प्रस्तुतीं । स्पष्ट बोलिली श्रुती । "कीं अप्रमत्त स्तदा भवति" । श्रुति ह्मणे ॥ ११६० ॥ कीं देहात्मसंस्कारें प्रमत्त । नव्हे तेव्हां ह्मणावा अप्रमत्त । ऐसा अप्रमत्त तेव्हां कीं जेव्हां चित्त । चिन्मययोगीं होतसे ॥ ६१ ॥ या गोष्टीचा प्रसंग । या-वरूनि कीं योग । ज्ञानी न साधी तों नव्हे भंग । देहात्मत्वसंस्काराचा ॥ ६२ ॥ कोणी न मानिती हा सिद्धांत । साभिमान जाले वाचूनि वेदांत । आत्मज्ञानी ह्म-णवूनि भ्रांत । देहात्मभावें सर्वदा ॥ ६३ ॥ योग थोर बोलिला जेथें । ते आत्म-ज्ञानमात्र वाखाणिती तेथें । प्रस्तुतीं ज्ञानियाहूनि योगी थोर एथें । तो ज्ञानी शास्त्रज्ञानी ऐसें बोलती ॥ ६४ ॥ जड चैतन्य भाग दोनी । समज-ला तोचि योगी अनुभवी ज्ञानी । तो ज्या ज्ञानियाहूनि थोर ह्मणोनी । व-र्णिला तो शास्त्रज्ञानी ह्मणती ॥ ६५ ॥ कीं आत्मत्वमात्र समजला । योगी शब्दें तोचि ह्मणती एथें वर्णिला । त्याहूनि उणा ज्ञानी बोलिला । तरी तो ह्मणती शास्त्रज्ञानी ह्मणावा ॥ ६६ ॥ आत्मा कळल्यावरी । चित्त चिन्मय करावें त्याउपरी । ऐसें ते मानिते जरी । तरी आत्मज्ञानियाहूनि योगी थोर ते ह्मणते ॥ ६७ ॥ असो आत्मज्ञानियाहुनी । योगी थोर ह्मणोनी । अर्थ या भगवद्वचनीं । बोलिला पाहिजे ॥ ६८ ॥ एवं तपस्वी कर्मी ज्ञानी । योगी थोर या सर्वांहुनी । श्रीकृष्ण ह्मणे ह्मणोनी । होय तूं योगी अर्जुना ॥ ६९ ॥ कीं तुज आत्मज्ञान । होईल मग आपलें मन । स्वरूपरूप करूनि मोहन । मोडी देहात्मतेचें ॥ ११७० ॥ ऐसा योगीही होउनी । मज सगुणातें भजे ह्मणोनी । योगी भक्त सर्वां योगियांहुनी । थोर ह्मणतो आतां या श्लोकीं ॥ ७१ ॥

॥ श्लोक ॥ योगिनामपि सर्वेषां मद्गतेनांतरात्मना ।
श्रद्धावान् भजते यो मां स मे युक्ततमो मतः ॥ ४७ ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे अर्जुनविषादयोगो नाम षष्ठोऽध्यायः ॥

॥ टीका ॥ अगा सर्वांत थोर योगी । ह्मणूनि पूर्वश्लोकीं बोलिलों तुजलागीं । त्याही सर्वां योगियांत जगीं । थोर जो योगी मद्भक्त ॥ ७२ ॥ जो श्रद्धावंत भक्त । ज्याचें अंतःकरण माझ्या स्वरूपीं अनुरक्त । त्या अंतःकरणें योगयुक्त । भजे मातें ॥७३ ॥ योगी तितुके ह्मणावे युक्त । परि ज्याचें चित्त सगुणीं अनुरक्त । वरकड युक्त तो युक्ततम भक्त । मज संमत बहुत तो योगी ॥७४॥ युक्त योगी ह्मणावा । युक्ततम तो थोर योगी गणावा । आणि मज संमत जो मनोभावा । मज सगुणीं योजी तो भक्तीनें ॥ ७५ ॥ ऐसेंच सप्तमाध्यायांत । ज्ञानी भक्त थोर अत्यंत । ह्मणोनि ह्मणेल भगवंत । द्वादशीं तरी दोहींत थोर यातेंचि ह्मणेल ॥ ७६ ॥ एथें निर्गुणोपासक । आत्मा कळतांच जे सगुणोपेक्षक । ते दाखविती पांडित्यकौतुक । जों पुसता नाहीं भेटला ॥ ७७ ॥ कोणी ह्मणती योगियांत । भक्त थोर ह्मणे भगवंत । ते योगी आत्मज्ञानंवत । ऐसें नव्हे ॥ ७८ ॥ जे यमनियमादि विचित्र । योगमार्ग अनुष्ठिती पवित्र । ते आत्मज्ञ न होती योगी मात्र । त्यांत स्वभक्त श्रेष्ठ ह्मणोनी श्रीकृष्ण ह्मणतो ॥ ७९ ॥ ज्ञानाभिमानी हो अरे । प्रसंग कोण हें विचाराना कां बरें । ऐसी क्लिष्ट कल्पना कल्पूनि खरे । टीकाकार जगीं ह्मणविती ॥ ११८० ॥ यामागें तिसरा श्लोक । तेथें बोलिला उत्तमश्लोक । कीं यतमान योगीं प्रयत्न अनेक । करूनि परम गतीतें पावतो ॥ ८१ ॥ तो तों आत्मज्ञानी ह्मणावा । आतां त्या पुढिल्या श्लोकीं जो श्रेष्ठ गणावा । तो ज्ञानहीन कोठोनि आणावा । तपस्वी कर्मी तेव्हां भक्त ज्ञानियाहूनि थोर ॥८२॥ त्या पुढिलिया श्लोकांत । "योगिनामपि" सर्वेषां ह्मणे भगवंत।तो श्रेष्ठ ज्ञानहीना योगियांत । अरे साभिमान हो कां ह्मणतां ॥८३॥ "योगिनामपि सर्वेषां"या वचनीं । योगियांतही सर्वांत युक्ततम ह्मणोनि । भगवंत ह्मणतो एथें कोठूनी । ज्ञानहीन योगी तुह्मीं आणिले ॥८४ ॥ मागें तिसरिया श्लोकीं योगी । मुक्ति बोलिली ज्यालागीं । तो ज्ञानियाहीहूनि थोर जगीं । या मागिल्या श्लोकीं वर्णिला ॥ ८५ ॥ तेशाही सर्वां योगियांते । माझा भक्त युक्ततम अत्यंत । ऐसें स्पष्ट बोले भगवंत ।

तें कांरे तुह्मीं मोडितां ॥ ८६ ॥ हा मुख्यार्थ मानाना जरी । अभिमान स्थापला तुह्मांवरी । आणि अंगीकाराल तरी । ज्ञानियांत भक्तज्ञानी तो थोर ॥ ८७ ॥ त्यांतचि अन्य टीकाकार । ते तेथें अन्य प्रकार । बोलती कीं नानादेवता इतर । त्यांचे उपासक ते योगी ॥८८॥ त्या सर्वां योगियांत । स्वभक्त थोर ह्मणतो भगवंत । एवं च ते योगी नव्हती ज्ञानवंत । ज्यांत भक्त थोर वाखाणिती ॥ ८९ ॥ तरी हें उपासना प्रकरण । नसतां क्लिष्टकल्पित विवरण । योगीशब्दाचें यांत स्फुरण । स्पष्ट दिसतें अभिमानाचें ॥११९०॥ मागिलिया तिसरिया श्लोकापासूनी । योगी थोर सर्वांहूनी । त्यांतही भक्त श्रेष्ठ ह्मणोनी । या श्लोकीं ह्मणे भगवंत ॥९१॥ हा शुद्धपक्ष अंगीकारा । टाकानि अभिमान सर्वेश्वरा । सगुणातें भजोनि तरा । सर्वात्मत्वें ॥ ९२ ॥ हा अध्यायाच्या अंतींचा श्लोक । जेथें ज्यांस सर्वात्मत्व अवलोक । ते भक्त-थोर ऐसा उत्तमश्लोक । स्थापिता जाला सिद्धांत ॥९३॥ हेंचि भक्ति विशद अत्यंत । उत्तराध्यायापासूनि भगवंत । द्वादशाध्यायपर्यंत । बोलेल आतां ॥९४॥ आत्मज्ञानाविण । भक्ती तें अन्न अलवण । आणि अन्नावांचूनि लवणचर्वण । भक्तीवांचूनि ऐसा आत्मबोध ॥ ९५ ॥ ऐसी टीका वामनी । हाचि अनुभव बरवा मनीं । जे पाहती दिनयामिनीं । ते भगवद्भक्ति आत्मयोगीं देखती ॥ ११९६ ॥

॥ वामनकृत संस्कृत श्लोक ॥

गोष्ठे दधारात्मकरेण योगं षष्ठेऽर्जुनायादिशदात्मयोगम् ।
स आविरक्तः स्थिरजंगमेषु सिंधूर्मिवच्चिज्जडसंगमेषु ॥ १ ॥
इति श्रीमद्वामनपंडितविरचितायां यथार्थदीपिकायां षष्ठोऽध्यायः ॥

अध्याय ७ वा.

श्रीमते भगवते भगवत्तमाय मायापतये सर्वोत्तमाय श्रीकृष्णाय नमः ॥

जय जय विजयसूत । जयजय गीतापीयूषजीमूत । जय जय चराचरभूत । परापरप्रकृत्यधिष्ठान ॥१॥ जयजय मायापते । जय जय प्रसन्न मायातीत गते । जय जय जगत्कल्पना मते । जगदात्मन् ॥२॥ जय जय सत्त्व रज तम फणिगुण । जयजयाशेषकल्याणगुण । जय जय मुक्त मुमुक्षु

सेव्य सगुण । जगद्गुरो ॥ ३ ॥ जय जय कामाकामसेवित । जय जया-परोक्षसंपन्न सद्भक्तसंमत । जय जय बुधभक्त सुप्रीत । परम गुरो श्रीहरे ॥ ४ ॥ जय जय बहु जन्म सिद्धोपासित । जय जय सर्व वासुदेवाच्युत । जय जय जडतरंगबोधामृत । देवाधिदेव ॥ ५ ॥ जय जय जगदावास । जय जय जगन्निवास । जय जय श्रीवल्लभ श्रीनिवास । श्रीवत्सांक शेषप-र्यंक । ॥ ६ ॥ जय जय चरण शरण ज्ञानप्रद । जय जयानाद्यविद्याध्वंस गोविंद । जय जय कैवल्यदायक मुकुंद । जगदेकनाथ ॥ ७ ॥ ऐशिया श्रीशेषशयना । वंदूनि तूतें कमलनयना । गीता सप्तमाध्याय टीकारचना । करीन तुझ्या प्रसादें ॥ ८ ॥ तूंचि गीता तूंचि गीताकार । तूंचि टीका तूंचि टीकाकार । गीतेंत हेंचि हाचि प्रकार । टीकेंतही ॥ ९ ॥ तुजवांचू-नि काय असे । तंतूचि जैसा पट दिसे । कीं मृगजळीं वसे । भानु एक ॥ १० ॥ आतां षष्टाध्यायावरी । सप्तमाध्याय कां परी । आरंभतो हें अजी हरी । बोलतों तुझ्या मूर्ती श्रोते त्यांप्रती ॥ ११ ॥ षष्टाध्यायामाजि योग । बोलतां योगभ्रष्टप्रसंग । अर्जुनें पुसतां श्रीरंग । विशद बोलिला ॥ १२ ॥ कीं उत्तमश्लोकांतें जाउनी । बहु काळ तेथें राहुनी । पुन्हा उत्तम जन्म पावोनी । त्या जन्मीं मुक्ति पावतो ॥ १३ ॥ सकळांमाजि यालागीं । श्रेष्ठत्वें वर्णिला योगी । त्या सर्वां योगियांतही जगीं । योगी अतिश्रेष्ठ जो स्वभक्त॥१४॥योगियांत योगी उत्तम । तो स्वभक्त युक्ततम । ऐसें बोलिला सर्वोत्तम । शेवटीं षष्टाध्यायांत॥१५॥ तरी सगुणीं भजे तो भक्त। आत्मत्वें भजे तो योगयुक्त । त्याचि योगीं केंवि अनुरक्त। सगुणा परमेश्वरातें॥१६॥ ऐसें अर्जुनाच्या मनीं । तत्काळ वाटलें म्हणोनी । तो प्रश्न करी जों तों स्वयें-चि एथुनी । तेंचि सप्तमाध्यायांत उपदेशितो ॥ १७ ॥ कीं सगुण चौं भुजांचा म्हणावा । तरी द्विभुज राम निर्गुण गणावा । आतां मनुष्याकार सगुण जाणावा । तरी मत्स्यकूर्मादि हे कोण॥ १८ ॥ आतां असावा आकार कांहीं । त्यावांचूनि सगुणत्व नाहीं । तरी चराचर साक्षी हाही । साकार ते-व्हां लेखावा ॥ १९ ॥ साक्षीही साकार । हाही अंगीकारावा प्रकार । म्हणूनि जरी ये विचार । एथवरी ॥ २० ॥ तरी साक्षी एक आहे । जो सर्वज्ञ सर्व पाहे । तो देखिला नसोनि बुद्धि साहे । काय म्हणोनि हे गोष्टी ॥ २१ ॥ तेव्हां वेदशास्त्रें बोलती । म्हणूनि अंगीकारावी हे रीती । तरी साक्षित्व वर्णिती श्रुती । सगुण आणि निराकार ॥ २२ ॥ श्रुति ॥ अपाणि-

पादौ जवनो गृहीता पश्यत्यचक्षुः स शृणोत्यकर्णः । स एव वेद्य न च तस्य वेत्ता तमाहुरग्र्यं पुरुषं पुराणं ॥ श्रुत्यर्थ ॥ नसोनि हस्त चरण । वेगवंत आणि करी ग्रहण । नसोनि चक्षु श्रवण । पाहे आणि आयके ॥ २३ ॥ हातांविणें घेणें । आणि वेग पायांविणें । दोन्हींही गोष्टी व्यापकपणें । घडती आकाशदृष्टांतें ॥ २४ ॥ कीं जें असेल जेथें । तें आकाशें आपणांत घेतलें तेथें । तैसें व्यापका वेगळें एथें । काय असे आकाशांत ॥ २५ ॥ पक्षी उडे गगनीं । तों गगन पुढें असे त्याहूनी । गगन वेगवंत ह्मणोनी । या गुणें ह्मणावें ॥ २६ ॥ तैसें हस्तावांचूनि ग्रहण । आणि वेग पायांवीण । ऐसें नसोनि चक्षु श्रवण । पाहे आणि आइके ॥ २७ ॥ विचारितां हें लक्षण । दिसतें शुद्ध निर्गुणपण । परि दर्शन आणि श्रवण । निर्गुणीं न घडे ॥२८॥ मायायोगें द्रष्टेपण । मायायोगेंचि श्रवण । तैसें सर्व पदार्थांचें ग्रहण । सर्व मजमाजी जो जाणे तयातें ॥ २९ ॥ मन धांवे जेथपर्यंत । त्याहूनि पुढें आपण अनंत । ज्यास ऐसें जाणणें वेगवंत । ह्मणावा तोचि ॥ ३० ॥ एवं पश्यति आणि शृणोति । ह्मणूनि बोले श्रुति । तेव्हां हेही धर्म त्यांत असती । कीं आपण गृहीता आणि वेगवंत ॥ ३१ ॥ ऐसें सगुण साक्षित्वाचें रूप । माया आणि शुद्ध चित्स्वरूप । ब्रह्म माया दोन्ही अरूप । उभय योगें साक्षित्वकार्य मायेचें ॥ ३२ ॥ तरीच माया आणि ब्रह्म । अव्यक्त दोहींचें नाम । ब्रह्मीं श्रवण दर्शनादि नसती धर्म । मायायोगें सधर्मत्व ॥ ३३ ॥ त्यास ह्मणावें सगुण । अवतारीं साकारपण । अवतार ज्याचे तो आपण । सगुण होउनिहीं निराकार ॥ ३४ ॥ अवतार त्याची कल्पना । कल्पनाच त्याची विश्वरचना । ज्ञानदृष्टि पाहतां असेना । चराचरास अवतार रूपास भिन्नत्व ॥ ३५ ॥ त्यांत इतकेंचि अंतर । कीं ईश्वरांश जीव कर्मानुसार । हे देह पावती आणि अवतार । स्वेच्छा कल्पित तारक तया जिवांचे ॥ ३६ ॥ तथापि माया कल्पित । अवतार आणि चराचर निश्चित । दोन्ही समान भगवंत । देह आपले मानितो ॥ ३७ ॥ लक्षूनि जिवांचें कर्म । स्वयें होतो स्थावर जंगम । लक्षूनि त्यांचा उद्धार सर्वोत्तम । अवतरतो स्वयें तोचि ॥ ३८ ॥ हे नेणती जीव । जैसें अविद्येस्तव । तैसेंचि नेणती अवतारविभव । परि भेद न देखे ईश्वर ॥ ३९ ॥ राजा शिरीं भूषणें धरी ।

१ घेणें २ ग्रहण करणारा. ३ धांवणारा. ४ साक्षिपणाचें काम. ५ अवताराचें वैभव.

त्याच हेमें नाना परी । गज रथ अश्वादि अलंकारी । समावेश आपलें तो पाहे ॥ ४० ॥ या प्रकारें चराचर । ईश्वरास वाटे आपलें शरीर । आणि अनुभव हा निरंतर । कीं शुद्ध निर्गुण आपण ॥ ४१ ॥ जैसा तंतूचि पट । आणि मातीच घट । ऐसें निर्गुणचि निपट । त्रिगुण विश्व ॥ ४२ ॥ ऐसें पाहणें बाणे । त्यास योग ह्मणती शाहणे । तो योगी दृश्य मिथ्या ह्मणे । त्याचा प्रकाशक आत्मा तो सत्य ॥ ४३ ॥ तंतु सत्य मिथ्या पट । माती सत्य मिथ्या घट । आत्माच आहे निपट । परी भास मिथ्या ते योगी मानिती ॥ ४४ ॥ भक्त योगीहि हेंचि जाणे । परी त्यास विशेष एक बाणे । कीं हे ईश्वरकल्पना तेव्हां ह्मणे । चराचर अवतार ईश्वराचे ॥ ४५ ॥ कीं मत्स्यकूर्मादि देह । भगवदवतार निःसंदेह । स्थिरचर तैसेंचि संदेह । काय एथें ॥ ४६ ॥ विष्णुप्रतिमा सुवर्णाची । त्यांत सुवर्णताचि साची । तैसी स्वरूपतांचूनि कैंची । सत्ता अवतारमूर्तीतें ॥ ४७ ॥ ऐसें निर्गुणत्वें सगुण । तो लक्षी जैसा निपुण । तैसें निर्गुणत्वेंचि त्रिगुण । विश्वही लक्षी ॥ ४८ ॥ अवताररूपीही माया । लटिकीच वाटे जया । प्रपंचरूपीं तया । काय सत्य वाटेल ॥ ४९ ॥ परंतु अवताररूपीं प्रीती । तैसीच प्रीति सर्वभूतीं । जैशा रामकृष्णादि मूर्ती । भक्त पाहे तैसें चराचर ॥ ५० ॥ नुसता योगयुक्त । आणि योगी होऊनि भक्त । त्यांत अंतर हेंचि कीं अनुरक्त । सगुणीं ह्मणूनि सगुणत्वें जग पाहे ॥ ५१ ॥ वर्णिला षष्ठाध्यायाचे अंती । योगयुक्त भक्त ये रीती । हें आइकोनि मती । साशंक जाली अर्जुनाची ॥ ५२ ॥ कीं योगीं भक्ति ये रीती । हे विदित नसे अर्जुनाप्रती । ह्मणूनियां अध्यायारंभीं जगत्पती । हेंचि आईक ह्मणतो ॥ ५३ ॥ ऐश्वर्य ज्ञान वैराग्य धर्म । यश श्री हा षड्गुणांचा क्रम । साहि गुण स्थावर जंगम । देह ज्याचा तो बोलतो श्रीभगवान् ॥ ५४ ॥

॥ श्रीभगवानुवाच ॥ मय्यासक्तमनाः पार्थ योगं युंजन्मदाश्रयः ।
असंशयं समग्रं मां यथा ज्ञास्यसि तच्छृणु ॥ १ ॥

॥ टीका ॥ पार्था माझ्या ठायीं आसक्त । मन गुंतलें ऐसा अनुरक्त । योगही योजूनि माझा भक्त । होसील तूं जैसा आईक तें ॥ ५५ ॥ सर्वही मीच ईश्वर । ऐसें ज्या प्रकारें तूं चतुर । मातें जाणसील तें आईक सादर । अगा पार्था ॥ ५६ ॥ मी सगुण ईश्वर अद्वय । तोचि मी सर्वही हें निःसंशय । तूंही हें जाणसील मदाश्रय । ज्या प्रकारें तें आतां आईक ॥ ५७ ॥

चित्त सर्वात्मयोगीं योजे । तथापि मायेचे भास दिसती जे जे । ते ते मी सगुण ऐसी विराजे । भक्ति माझी योगांतही ॥ ५८ ॥ योजित असोनि योग । घडे माझा भक्तियोग । योग भक्ति दोहींचा संयोग । एकेचि समयीं ॥ ५९ ॥ याकारणें योग योजितां । मी सगुण ऐसें चराचर भूतां । मद्रूप पाहसी तें आतां । अगा पार्था आईक ॥ ६० ॥ अर्थ उकलला ऐसे परी । भावार्थ प्रतिपदीं हरी । सुचवितो यावरी । कांहीं विशद बोलावा ॥ ६१ ॥ योग तरी योजिसी । त्या योगीं मज समभत्वें पाहसी । ज्या ज्ञानें ऐसा प्रवीण होसी । तें आइक ह्मणतो हा अर्थ ॥ ६२ ॥ तरी सर्वत्र दिसे ब्रह्म । हा सर्वात्मयोग परम । याही अनुभवावरि श्रम । हा किमर्थ ॥ ६३ ॥ किं त्रिगुणीं दिसे निर्गुण । मग तेंचि सर्वही ब्रह्म सगुण । पाहावें हें न जाणे जरी निपुण । तरी काय उणें अनुभवीं तयाच्या ॥ ६४ ॥ ऐसें ह्मणेल पार्थ । तरी हे गोष्टी यथार्थ । परी साधूनिही चतुर्थ पुरुषार्थ । भक्ति नाहीं साधली तयातें ॥ ६५ ॥ योगियांतही तो योगी थोर । जो योगी होऊनि सगुणीं सादर । हें पूर्वाध्यायाच्या अंतीं सर्वेश्वर । सिद्धांतरूपें बोलिला ॥ ६६ ॥तरी योगीही होउनी । जरी लागे सगुणमात्र भजनीं । तरी जतन होय जो मनीं । ठसा योगाचा ॥ ६७ ॥ कीं भक्तिसुखापुढें जया । मोक्षही नलगे तया । काय करावी घेऊनियां । योगसिद्धी ॥ ६८ ॥ आणि थोरपण आलें तेथें । कीं योग असोनि भक्ति जेथें । यालागीं बोलणें लागलें एथें । ऐसें श्रीकृष्णासी ॥६९॥ कीं माझेठायीं आसक्त मन । ह्मणजे मी जो साकार कमलनयन । त्या माझेंचि भजन चिंतन । करी लंपट होउनी ॥ ७० ॥ ऐसें माझे ठायीं । मन आसक्त लंपट माझे पायीं । त्या संयोगीं सगुण दावूनि या उपायीं । दोन्ही साधती ऐसें करावें ॥ ७१ ॥ कीं भक्ति नुसती ज्ञानाविण । न ठाउकी स्वात्मखूण । त्यास निर्गुण न कळतां सगुण । काय कळे ॥ ७२ ॥ निर्निमित्त आपली प्रीती । आयता आत्मा भक्ति आयती । अविद्येनें पडली भ्रांती । हें भक्तिरहस्य न कळे तयातें॥७३॥ तोंही आत्मा कळे । आणि चित्त योगीं न वळे । चित्स्वरूपीं न मिसळे । तोंवरि न तुटे अविद्यासंस्कार ॥ ७४ ॥ एवं योगाचा ठसा पडे । तरीच भक्तिसुख सांपडे । ते भक्ति तरी ह्मणावी कीं घडे । जरी भजन सगुणाचें ॥ ७५ ॥ अन्यथा नि-

---

सर्वत्र ब्रह्म पहाणें.

र्गुणोपासक । होतां फळीं क्लेश अधिक । ज्ञानी योगी सगुणसेवक । श्रेष्ठ सर्वांत हे पदवी ॥ ७६ । स्वयत्नें तरीं हा निश्चय । क्लेशें चित्त करिती चिन्मय । भक्तांस सगुणाचा आश्रय । योगसिद्धि अनायासें यास्तव ॥ ७७ ॥ अत एव या भावेंकरूनी । या श्लोकीं मदाश्रय ह्मणोनी । योगिया भक्तांचें विशेषण वदोनी । आईक ह्मणतो आपलें समग्रत्व ॥ ७८ ॥ कीं योग योजूनि मदाश्रय । ज्यास आश्रय मी जगदाश्रय । ऐसा होऊनि तूं निःसंशय । सर्व मी ऐसें जे रीती जाणशी ॥ ७९ ॥ तैसें सांगेन तुजला । आइक त्या माझ्या बोला । परी त्या समग्र विश्वरूपा मला । पाहाणें न घडे योगावांचूनी ॥ ८० ॥ आणि योग भक्तीवांचुनी । तो योगी भक्त नव्हे ह्मणोनी । योगातें योजित असोनी । समग्रातें मातें ये रीती जाणसी ॥८१॥ योजीत असोनि योगातें । जे रीतीं जाणसी समग्र मातें । तें आइक ह्मणतां एथें । न घडे अर्थ यावेगळा आणिक ॥ ८२ ॥ कीं सर्व ब्रह्म जाणे । योगयोजणें त्यातेंचि वाणे । ऐसें असोनी श्रीकृष्ण ह्मणे। "योगं युंजन् ज्ञास्यसि" ह्मणोनी ॥ ८३ ॥ योग योजीत असोनी । समग्रातें मातें जाणसी ह्मणोनी । ह्मणतां विरोध वचनीं । प्राप्त जाला ॥ ८४ ॥ तरी सर्वात्मत्वें योगातें । योजितां चराचरातें । माझीं सगुणरूपें ह्मणोनी मातें । जे रीती जाणसी तें आईक ॥८५ ॥ विरोध ऐसा परिहरे । अन्यथा वाक्यार्थ एथें विखरे । जे निर्मत्सर पाहती बरें । ते मानिती याचि अर्थातें ॥ ८६ ॥ योगशब्दें योगव्यतिरेक । समग्रत्वें अन्वयाचें कौतुक । व्यतिरेक योजीत एकीं अनेक । हा अन्वय बोल तो जरी ह्मणावा ॥ ८७ ॥ तरी व्यतिरेक आणि अन्वय । दोंपरी अद्वैत निश्चय । करूनि होऊनी निःसंशय । मग योग योजूं तो भलता ॥ ८८ ॥ व्यतिरेक योगीं मन । करूं लागतां विषयचिंतन । तेथेंच आत्मत्वाचें अवलोकन । करूनि मन योजावें स्वरूपींच ॥ ८९ ॥ हें पूर्वाध्यायांत ।"यतो यतो निश्चरति" या श्लोकें भगवंत । बोलिला तेव्हां असात्रा विदित । अन्वयबोध व्यतिरेक योगियातेंही ॥ ९० ॥ व्यतिरेक आणि अन्वय । द्विविध जाणोनि अद्वय । मग योगीं करूनी चित्त तन्मय । दोंहीं मधूनि योगीं योजी भलतिया एकीं ॥ ९१ ॥ विना व्यतिरेक न कळे अन्वय । विना अन्वय न कळे अद्वय । नव्हतां गुरुमुखें हे दोन्ही निश्चय । बोध कैंचा ॥ ९२ ॥ नाहीं अद्वैतबोध । तोंवरी वृथा वृत्तिनिरोध । कीं नाना द्वैत जडविरोध । केला असे अविद्येनें ॥ ९३ ॥ तोंवरी अविद्याच

नाहीं गेली । जों अन्वयाची न कळे किल्ली । अविद्यासंस्कारभंगार्थ लाग-
ली । साधनें योगसिद्धि अगत्य ॥ ९४ ॥ एवं व्यतिरेक योग योजित ।
समग्रातें मातें जाणसी निश्चित । ह्मणूनि बोलतो भगवंत । हा अर्थ न घडे
सर्वथा ॥ ९५ ॥ आतां योगातें योजित । ह्मणजे योगाचा अभ्यास करित ।
समग्रातें मातें जाणसी तें भगवंत । आइक ह्मणतो ऐसें कोणी बोलती ॥९६॥
त्या टीकेचा भाव ये रीती । कीं तेव्हां जो साधक त्याप्रती । सगुणलें
सांगे श्रीपती । न बोलतो सिद्धांतें ॥ ९७ ॥ साधकास उपदेश यालागीं ।
न भजती सगुणातें सिद्ध योगी । ह्मणूनि ते या प्रसंगीं । वाखाणी ऐसें
॥ ९८ ॥ तरी या श्लोकामागील जो श्लोक । पूर्वाध्यायांत तेथें उत्तम-
श्लोक । बोलिला त्याचा बरा अर्थावलोक । करितां साधक या-
तें न ह्मणावें ॥ ९९ ॥ कीं योगी थोर सकळांत । तैशाही योगियांत । भक्त
थोर ह्मणे भगवंत । ते तों योगीं न ह्मणवती साधक ॥ १०० ॥ जो सिद्ध
योगनिष्ठ । तोचि सर्वांत बोलिला वरिष्ठ । त्या तैशाही वरिष्ठांमध्यें श्रेष्ठ ।
स्वभक्त योगी बोलिला ॥ १ ॥ ज्यांत हा श्रेष्ठ बोलिला । सिद्धचि ह्मणावें
त्याला । तैसियासही साध्यांश उरला । भक्ति अलंकार योगसिद्धीचा ॥२॥
ह्मणूनि या पुढिलिया श्लोकांत । अर्जुनातें ह्मणे भगवंत । कीं तूं योग योजित ।
समग्रातें मातें जाणसी तें आइक ॥ ३ ॥ कीं सिद्ध जरी जाला । योग यो-
जीत असावें लागे त्याला । तैसा तूं योग योजीत मला । समग्रत्वें जाणसी
जैसा तें आइक ॥ ४ ॥ या अर्थे पूर्वश्लोकोक्त । सिद्ध होतो कीं पक्व योगी
आणि भक्त । तो योगियांत अत्यंत युक्त । आणि मज संमत ह्मणे श्रीकृष्ण
॥ ५ ॥ पुढें आर्त जिज्ञासु अर्थार्थी ज्ञानी । ज्ञानी भक्त त्या तिघांहूनी ।
श्रेष्ठ माझा आत्मा ह्मणोनी । याच अध्यायांत बोलेल ॥ ६ ॥ तेथेंही भक्त जो
ज्ञानी । तो ज्ञानसिद्धचि बोलावा ह्मणोनी । मागील पुढील विचार पाहोनी ।
तेथें सिद्ध योगीच बोलावा ॥ ७ ॥ कीं सर्वांत थोर ज्ञानी । तोही भक्त तरी
अतिश्रेष्ठ ह्मणोनी । श्रीकृष्ण ह्मणे यावरूनी । एथें सिद्ध योगीच बोलावा
॥ ८ ॥ सर्वांत बरा मानव । त्यांत बरें रूप अभिनव । त्यांतही अलंकारा-
दिवैभव । ज्यास तो बरा अत्यंत ॥ ९ ॥ तैसा ज्ञानी सर्वांमध्यें श्रेष्ठ ।
त्यांत थोर योगनिष्ठ । त्या योगियांत वरिष्ठ । जरी योगीं योजी सगुण-
भक्ती ॥ ११० ॥ याकारणें एथें भगवंत । ह्मणे कीं तूंही योग योजित ।
सर्वही मी ऐसें मातें निश्चित । जाणसी जैसें तें आइक ॥ ११ ॥ कीं "वासु-

देवः सर्व मिति । स महात्मा सुदुर्लभः" ऐसें याचप्रती । याच अध्यायीं जग-त्पती । बोलणार ऐसें पुढेंही ॥ १२ ॥ असो हा अति ग्रंथविस्तार । हें पुढें चालणें असे वारंवार । प्रस्तुत पार्था ह्मणूनि यदुवीर । या श्लोकीं या नांवें आळवी ॥ १३ ॥ कीं पृथा कुंती आपुली आत । पार्थ ह्मणजे तिचा तूं सुत । तीस असोनिही ज्ञान अत्यंत । असे ऐसीच भक्ति माझी ॥ १४ ॥ तुझी जननी पृथा ते । मातें भजोनिही हेंचि मागते । ऐक्यांत अद्वैतभजनीं दे ह्मणते । भक्ति तुझी ॥१५॥ तूं तिचाच सुत । आणि सखा माझा अत्यंत । ह्मणोनि सर्वात्मयोगांत । भक्ति माझी देत असें हा भाव ॥ १६ ॥ कीं ध्याना कुंती सदा । ऐसी भक्ति मागे मुकुंदा । ते प्रत्यक्षही एकदां । बोलिली ऐसें भागवतीं ॥१७॥ भागवतश्लोक । त्वयि मेनन्यविषया मतिर्मधुपतेसक्कृत् । रतिमुद्वहतादद्धांगंगेवौघमुपन्वति ॥ टीका ॥ मधुकुळ माझें माहेर । मधुकुळीं तयांत सर्वेश्वर । अवतरलास या भावें गंभीर । कुंती ह्मणे अगा मधुपते ॥ १८ ॥ ह्मणूनि ह्मणे कुंती । कीं अगा श्रीमधुपती । मी मागतें ऐसी प्रीती । तुझेठायीं दे मला ॥ १९ ॥ कीं अन्यत्वें कांहीं विषय । न स्फुरे स्फुरे अद्वय । ऐसी माझी वृत्ति निःसंशय । धरो प्रिति तुझी पुनःपुनः ॥१२०॥ ऐसी कुंती बोलिली । परि बोलोनि मागुती शंकली । कीं विशद न बोलतां आपुली । दिसेल वाणी विरुद्ध ॥२१॥ कीं आत्मत्वें ऐक्य जाणे । सर्वात्मत्वें अद्वैत बाणे । त्या बुद्धीस ह्मणती शहाणे । अनन्यविषया ह्मणोनी ॥ २२ ॥ ऐसी अनन्यविषया बुद्धी । जीस बाणली अद्वैतसिद्धी । वारंवार प्रीतिसमृद्धी । तीस भगवंतीं केंवि घडे ॥ २३ ॥ शंका ऐसी ह्मणोनी । गंगासमुद्र दृष्टांत देऊनि । श्लोकाच्या चतुर्थ चरणें करूनी । हे शंका परिहरिते ॥ २४ ॥ कीं अगा श्रीरंगा । सागरीं ऐक्य पावोनि गंगा । मागुती आपुल्या जळाच्या तरंगा । वारंवार समुद्रीं मेळविते ॥ २५ ॥ वस्तुतः पाहतां उदक । समुद्र नद नद्या अनेक । त्यांत भेद हरूनिही जाली एक । सागरीं गंगा मिळोनी ॥ २६ ॥ तथापि वरिच्यावरी । सागरीं मिसळती लहरी । कुंती ह्मणे ते हरी । भक्ति ऐसी मज देईं ॥ २७ ॥ एकदेशी दृष्टांत । परि भाव ऐसा यांत । कीं मेघबिंदुही समुद्रांत । होतीच ऐक्य ॥२८॥ मुमुक्षु तैसा निर्गुणीं । मिळे परि त्या एकपणीं । भक्ति न घडे ज्ञानी सगुणीं । भक्ति अद्वैतबोधें करिती ॥ २९ ॥ ते गंगा समुद्ररीती । भक्ति अजो मधुपती । दे मज ह्मणूनि कुंती । प्रार्थी ऐसें ॥ १३० ॥ ते कुंतीचें नांव

पृथा । ह्मणोनि तिच्या पुत्रा पार्था । तितें देऊनिया अर्था । तिच्या संततीसही देतसे ॥ ३१ ॥ अगा पार्था ह्मणोनी । या भावेंकरूनी । या श्लोकीं आळवूनी । तिनें मागितलें तें यातेंही देतसे ॥ ३२ ॥ आतां यानंतर । जें ज्ञान सांगेन ह्मणतो ईश्वर । त्याचा ऐसा विशद निर्धार । करूनि बोलतो या श्लोकीं ॥ ३३ ॥

॥ श्लोक ॥ ज्ञानं तेऽहं सविज्ञानमिदं वक्ष्याम्यशेषतः ।
यज्ज्ञात्वा नेह भूयोऽन्यज्ज्ञातव्यमवशिष्यते ॥ २ ॥

॥ टीका ॥ अगा निर्गुण निखळ एक । कळे ज्ञान तें व्यतिरेक । त्या एकीं अनेक अनेकीं तें एक । हें विज्ञानविशिष्ट ज्ञान ॥ ३४ ॥ या विज्ञानासहित ज्ञान । पावोनि मुक्त जाले मुमुक्षु जन । परि समग्रत्वें माझें सगुणभजन । न घडे तयां ॥ ३५ ॥ ते सर्वज्ञ विगतकिल्बिष । परि जाणण्यांत कांहीं असे विशेष । तो राहिला कीं जग अशेष । सगुणमूर्ति ईश्वराची न समजले ॥ ३६ ॥ ज्ञानविज्ञानसहित । त्यांस होऊनि गुह्य अत्यंत । जें शेष राहिलें तेंही निश्चित । तुज मी हें आतां सांगतों ॥ ३७ ॥ या भावें ह्मणे भगवंत । कीं ज्ञानविज्ञानासहित । तें अशेष सांगेन जें अत्यंत । गुह्य शेष तेंही न ठेवितां ॥ ३८ ॥ या अशेषपदेंकरूनी । जें गुह्य शेष वदतों तेंही ह्मणोनी । पूर्वार्धीं ऐसें वदोनी । स्पष्ट बोलतो उत्तरार्धें ॥ ३९ ॥ अगा जें पूर्वार्धें करूनी । बोलिलों तूतें सांगेन ह्मणोनी । तें ऐसें कीं जाणोनी । या जगीं जाणणें कांहीं उरेना ॥ १४० ॥ इह ह्मणजे या जगीं । ब्रह्मचि सर्वात्मयोगीं । देखिलें जरी तरंगीं । समुद्र जैसा ॥ ४१ ॥ तरी तरंगांचा आकार । तो नव्हे सागर । तैसें चराचरीं ब्रह्म परि चराचर । रूप माया मिथ्या ब्रह्म नव्हे ॥ ४२ ॥ निर्गुणोपासकां निर्गुण । अपेक्षित आणि न लगती मायागुण । हा मायाविलास स्वयें आपण । सगुण ईश्वर ऐसें त्याला कळेना ॥ ४३ ॥ ते मायेचे तिन्ही गुण । स्वयें केवळ देखती निर्गुण । कीं अलंकार तितकें सुवर्ण । ऐसें जरी जाणती ॥ ४४ ॥ तथापि होती अलंकार । त्यांत सोनें निर्विकार । तेव्हां करणें लागला निर्धार । कीं ते शक्ति सुवर्णाची ह्मणोनी ॥ ४५ ॥ तैसें ब्रह्म चराचरीं । सोनें जैसें अलंकारीं । द्वैत कांहीं नसे परी । तें चराचराकार माया ह्मणती ॥ ४६ ॥ ते निर्गुणमात्राचे उपासक । त्यांस निर्गुणचि पाहिजे एक । मायाविलास जे अनेक । त्यांस न घडे उपासना त्याची ॥ ४७ ॥ हें उणेपण एक अद्वैतभजनीं ।

कीं मायाविलास ईश्वर ह्मणोनी । हें रहस्य त्यांस न कळोनी । या जगीं अंश उरला जाणावयाचा ॥ ४८ ॥ जरी त्याचें ज्ञान दिव्य । या जगीं उरलेंचि कांहीं ज्ञातव्य । तेथें कारण हें कीं नसे सेव्य । सगुणत्वें ईश्वर तयाला ॥ ४९ ॥ इत्यादि भाव पोटीं । तों कृष्ण ह्मणे अगा किरीटी । मद्रूप पाहतां ब्रह्मांडकोटी । ज्ञातव्य न उरे कांहींच ॥ १५० ॥ याकारणें सांगेन ह्मणोनी । जें बोलतो प्रतिज्ञा करूनी । तें ऐसें असे जें जाणोनी । ज्ञातव्य कांहीं उरेना ॥ ५१ ॥ आणिक जाणणें असे कांहीं । ऐसी उरी ज्यांत नाहीं । ऐसें सगुणत्वें माझें ज्ञान तेंही । तुजला आतां सांगतों ॥ ५२ ॥ कीं उंच आणि नीच । मूढास दिसे प्रपंच । ज्यास हें ज्ञान कळलें साच । त्यास बरें वाईट सर्वही सर्वोत्तम ॥ ५३ ॥ जीवांची जे अविद्या । तेही ईश्वराची विद्या । विश्वरूपें त्या विश्ववंद्या । पाहती तेचि धन्य ॥ ५४ ॥ जो पशूंचा धणी । त्या आधीन त्यांची दावणी । बांधणें सोडणें दोहीं गुणीं । तोचि दिसे ॥ ५५ ॥ बंध बांधतां करी दावें । तेंचि पशु सोडितां मोक्ष ह्मणावें । धन्याचें तों स्वभावें । दोरखंड तें ॥ ५६ ॥ जीवांस वाटे अविद्या । शिवांस वाटे विद्या । सर्वही मिळोनि माया आद्या । ईश्वराची ॥ ५७ ॥ ऐसें त्याचें ज्ञान । पावूनि करूं लागे ध्यान । तोचि स्वयें जगज्जीवन । जो योग योजीत करी ये रीतीं भक्ती ॥ ५८ ॥ त्यास काय जाणणें उरे । ज्यास सर्वही निर्गुणत्वें स्फुरे । ईश्वरत्वें पाहतां झुरे । त्याज्य मायांशही जो कांहीं ॥ ५९ ॥ अर्जुनातें हें ज्ञान । सांगों पाहतो कमलनयन । एथें निर्गुणोपासक जन । हें निर्गुणत्वेंचि वाखाणिती ॥ १६० जों न कळे निर्गुण । तोंवरी काय कळे सगुण । परि निर्गुण ज्ञानीं होऊनिही निपुण । सर्व सगुण पाहे तो भक्त ॥ ६१ ॥ गीतेच्या शेवटीं मुकुंद । हेंचि अर्जुनातें ह्मणेल गोविंद । कीं तुझा माझा हा संवाद । ह्मणावा धर्म्य कीं नव्हे निर्धर्म ॥६२॥ "अध्येष्यते च य इमं" ह्मणोनी । "धर्म्यसंवादमावयोः" या श्लोकेंकरूनी । श्रीकृष्णें धर्म्यपद योजूनी । सगुणज्ञानसंवाद सूचविला ॥ ६३ ॥ ज्ञेय निर्गुणचि नुसतें । जरी या गीतेंत असतें । तरी या संवादाचें नाम होतें । निर्धर्मसंवाद ह्मणोनी ॥ ६४ ॥ हा धर्म्यसंवाद । ऐसेंचि ह्मणतो गोविंद । कीं निर्गुणज्ञान बोलोनिही मुकुंद । सगुणज्ञान बोलेल त्यावरी ॥ ६५ ॥ द्वादशीं पुसेल अर्जुन । तेथें ज्ञानी आणि सगुणभजन । तो

---

१ बाकी, शेष.

थोर ऐसें कमलनयन । म्हणेल म्हणूनि हा धर्म्यसंवाद ॥ ६६ ॥ आतां धर्महीं एथें बोलिला । म्हणोनि म्हणावें धर्म्य जाला । तरी मुख्य निर्गुण या गीतेंत जाला । ब्रह्मविद्यायोग यांच दोहींचा ॥ ६७ ॥ प्रति अध्यायाच्या अंतीं । "ब्रह्मविद्या यां योगशास्त्रे" म्हणती । कीं ज्ञानाहूनि कर्म श्रीपती । बहुत नीच म्हणे या गीतेंत ॥६८॥ "दूरेण ह्यवरं कर्म"। या श्लोकीं पुरुषोत्तम । ज्ञानापुढें अधमाधम । कर्म म्हणे ॥ ६९ ॥ संवाद एथें धर्माचा । म्हणूनि धर्म्य म्हणे कृष्ण वाचा । हा पक्षही नव्हे साचा । धर्म्य सगुणज्ञान हाचि अर्थ ॥ १७० ॥ आतां धर्म्यपदाचा अर्थ । पांडित्यबळें अन्यथा केला तरी व्यर्थ । हें धर्म्यपद होतें समर्थ । सगुणज्ञानाविषयींच ॥ ७१ ॥ कीं नवमाध्यायांत ।" राजविद्याराजगुह्य" या श्लोकांत । हें ज्ञान धर्म्य म्हणूनि भगवंत । प्रतिज्ञा करूनि सगुणज्ञान बोलेल ॥ ७२ ॥ "पश्य मे योगमैश्वरं " म्हणोनी । या ऐश्वर्यशब्देंकरूनी । हा ईश्वररूपयोग म्हणतां यावरूनी । हा सगुणज्ञानसंवाद हें सिद्ध ॥ ७३ ॥ एथेंही क्लिष्ट कल्पना । करिती त्या साभिमानजना । द्वादशाध्यायांत या धर्म्यवचना । दाखवितां होती निरुत्तर ॥ ७४ ॥ कीं "ये तु धर्म्यामृतमिदं" म्हणोनी । श्रीकृष्ण या श्लोकेंकरूनी । संपूर्ण द्वादशाध्यायार्थ यावरूनी । सगुणज्ञान परम ऐसें बोलेल ॥ ७५ ॥ हा द्वादशाध्यायांत अंतीचा श्लोक । तेथें धर्म्यामृत म्हणे उत्तम श्लोक । करितां अध्यायार्थाचा अवलोक । श्रेष्ठ सगुणभक्ति ज्यांत अत्यंत॥७६॥ ते भक्त ज्ञानहीन । ऐसें म्हणती ते जन । तरी ज्यांस नाहीं ज्ञान । ते ज्ञानियाहूनि श्रेष्ठ कैंचि होती ॥७७॥ निर्गुण सगुण उपासक । दों वर्गांतही कोण योगवेत्ता अधिक । हें अर्जुन पुसतां श्रीवत्सांक । म्हणे सगुणोपासक श्रेष्ठ तो॥७८॥ हें असे पुढें बोलणें । एथें धर्म्यपदाकारणें । बोलणें लागलें कीं श्रीकृष्णें । धर्म्यामृतपदें सगुणज्ञान बोलिलें तें ऐसें॥७९॥द्वादशीं ऐसें धर्म्यामृत । पाठ दुसरा धर्मामृत । दोहींचा अर्थ तोचि निश्चित । परि पाठभेदें शंकित न व्हावें श्रोतयांनीं॥१८०॥तैसेंच नवमीं आरंभीं धर्म्यपद । तें ज्ञान सांगोनि गोविंद । हा ऐश्वर्ययोग पाहें म्हणे मुकुंद । आद्यंत एकवाक्यता ऐसी॥८१॥याकारणें अष्टादशीं गीतांतीं। हा धर्म्यसंवाद म्हणे श्रीपती । तें या सप्तमापासूनि पार्थाप्रती । सगुणज्ञान बोलतो ॥८२॥अत एव होऊनिही ज्ञाननिर्गुण । विरळा हें ज्ञान सगुण । जाणतो म्हणूनि [२]कमलनयन । बोलतो आतां या श्लोकीं॥८३॥

---

१ धर्म; सगुणज्ञान. २ ओढून ताणून आणिलेला विचार.

॥ श्लोक ॥ मनुष्याणां सहस्रेषु कश्चिद्यतति सिद्धये ।
यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्त्वतः ॥ ३ ॥

॥ टीका ॥ अगा मनुष्यांचीं सहस्रें अनेक । त्या बहु सहस्रांत कोणी एक । आत्मज्ञानाचा साधक । यत्न करी आत्मज्ञानसिद्ध्यर्थ ॥ ८४ ॥ ज्ञानार्थ यत्न करिती । त्यांत आत्मज्ञही कोणी होती । आणि सिद्धीतेंही पावती । योगमार्गें ॥ ८५ ॥ तैशा सिद्धांच्या सहस्रांत । कोणी एक निपुण अत्यंत । विश्व समग्र भगवंत । ऐसें मातें जाणतो ॥ ८६ ॥ ह्मणसी ऐसें कां परी । श्रेष्ठ सर्वांत हें तरी । अपरोक्ष साक्षात्काराहीवरी । अनादि भक्तिपद हें आहे ॥ ८७ ॥ कर्मयोगावरी । जैसी ज्ञानाची पायरी । कीं चित्तशुद्धि नव्हे तोंवरी । नव्हे आत्मबोध ॥ ८८ ॥ तो आत्मबोध घडे । तरीच हा भक्तियोग ठायीं पडे । सर्व सगुणब्रह्म ऐसा सांपडे । अनुभव तेव्हां ॥ ८९ ॥ ह्मणतो या भावेंकरूनी । " मां वेत्ति तत्त्वतः " ह्मणोनी । कीं तत्त्वज्ञानावांचूनी । मज सगुणातें नेणवे ॥ १९० ॥ चित्तशुद्धीविना । ज्ञान जैसें होईना । तैसें मातें जाणवेना । तत्त्वज्ञानावांचूनी ॥ ९१ ॥ एवं कर्में चित्तशुद्धी । ज्ञान त्याहूनि थोर प्रसिद्धी । त्या ज्ञानें मग हे सगुणज्ञानसिद्धी । आत्मज्ञानाहूनि थोर यास्तव ॥ ९२ ॥ यालागीं ज्ञानसिद्ध । त्या सिद्धांत कोणी एक ज्ञानवृद्ध । मातें सगुणातें जाणोनि समृद्ध । होतो भक्तीकरूनी ॥ ९३ ॥ ऐसी भक्तीची पदवी । नुसती या ज्ञानाहूनिही बरवी । हे सर्वात्मभक्ति नित्य नवी । या गीतेंत श्रेष्ठत्वें वर्णिली ॥ ९४ ॥ गीतार्थ येच रीती । वाखाणावा ऐसें श्रीपती । स्वयें बोलेल अर्जुनाप्रती । अध्यायांत अठराविया ॥ ९५ ॥ " य इदं परमं गुह्यं " ह्मणोनी । या दों श्लोकेंकरूनी । ह्मणेल कीं त्याहूनी । प्रिय मज कोणी असेना ॥ ९६ ॥ कीं हें गुह्य परम । जें मथूनि काढिलें सर्व निगम । माझे भक्त भागवतोत्तम । त्यांत जो वर्णी ॥ ९७ ॥ प्रिय त्याहूनि या पृथ्वीवरी । कोणी नसे न होणार यापरी । भक्ति थोर करूनि जरी । वाखाणी या गीतेतें ॥ ९८ ॥ " भक्तिं मयि परां कृत्वा " ह्मणोनी । हा अर्थ या चरणेंकरूनी । दाखविला कीं सर्वांहुनी । भक्ति थोर मी बोलिलों या गीतेंत ॥ ९९ ॥ सर्वज्ञ हें भविष्य जाणे समर्थ । कीं यथारुचि गीतार्थ । वर्णितील परि यथार्थ । भाव आपला विरळा समजेल ॥२००॥ ह्मणूनि हे अष्टादशीं खूण । स्पष्ट दावील आपण । कीं प्रिय मज तो निपुण । भक्ति थोर करूनि वर्णी गीतेंत ॥१॥ ते भक्ति माझे ठायीं

ह्मणोनी । शेषशायी ह्मणे यावरूनी । सर्वात्मयोगीं सगुणत्वेंकरूनी । भक्ति चराचररूपीं सूचवी ॥ २ ॥ जे या रहस्यातें नेणती । ते हा चरण अन्यथा बाखाणिती । " भक्तिं मयि परां कृत्वा " एथें ह्मणती । भक्ति माझेठायीं करूनि मज पावेल ॥३॥ भक्ति करूनि भलता । भगवंतास पावेल तत्वता । गीतार्थकथनाचा आतां । काय महिमा वर्णील ॥ ४ ॥ इत्यादि अर्थ अमंगळ । पुढें उडतील सकळ । एवं गीतेंत ह्मणे मेघनीळ । भक्ति थोर करूनि बाखाणावी ॥ ५ ॥ आतां विश्व सर्वही सगुण । हें कळावया रहस्यखूण । आपरा परा प्रकृति आपल्या आपण । दोन्ही बोलतो दों श्लोकीं ॥ ६ ॥

॥ श्लोक ॥ भूमिरापो नलो वायुः खं मनो बुद्धिरेव च ।
अहंकार इतीयं मे भिन्ना प्रकृतिरष्टधा ॥४॥

॥ टीका ॥ पृथ्वी आप तेज वायू व्योम । हीं पंच भूतें मन षष्ठ बुद्धि सप्तम । यांसह अहंकार अष्टम । ऐसी अष्टधा भेद पावली ॥ ७ ॥ हे माझी प्रकृती । हे अष्टभेद जिचे दिसती । ते आठही पाहतां असती । माया मात्र ॥ ८ ॥माझी शक्ति माया । तेचि प्रकृति ह्मणावी धनंजया । इचें तत्त्व कळे तया । हे नाहींच मी असें ॥९॥ मृगजळाचे कल्लोळ । त्यांचें पाहतां मूळ । कल्लोळ अवघे मृगजळ । तेंही पाहतां असे तेज मात्रचि सूर्याचें ॥ २१० ॥ मुकुट कुंडलादि विकृती । ते सकल सुवर्णाचिच प्रकृती । ते प्रकृति आणि नाना आकृती । सोनेंचि अवघें ॥ ११ ॥ होऊनि नाना अलंकार । सुवर्णत्वीं नसे विकार । कनकीं सामर्थ्य एकप्रकार । ते शक्ति प्रकृति त्या सुवर्णाची ॥ १२ ॥ दुधाचें जालें दहीं । दूधपण त्या दधीपणीं नाहीं । सुवर्णासारिखें कांहीं । सामर्थ्य दुग्धास ह्मणवेना ॥ १३ ॥ याकारणें कनकीं । अद्भुत शक्ति मानावी कीं । नाना प्रकारें मिरवूनि लोकीं । कनकत्वीं न लागे विकार॥१४॥यालागीं जितके आकार । ते सुवर्णशक्तीचेचि विकार । त्या विकारीं निर्विकार उघडेंचि सोनें ॥ १५ ॥ जैसी सुवर्णशक्ति प्रकृती । त्या प्रकृतीच्या विविध विकृती । तैसी माझी प्रकृति आकृती । पावली भेद अष्टधा ॥१६॥ हेच अष्टधा प्रकृती । स्थावरजंगमाच्या आकृती । प्रकृतीच्या तेवीस विकृती । याच अष्टभेदांत ॥१७॥ पृथिव्यादि पंचभूतें जेथें । शब्द स्पर्श रूप रस गंध तेथें । एवं दहाही इंद्रियें येथें । अहंकारांत ॥१८॥ कीं कारण अहंकार । तेथें कार्य दश इंद्रियविकार । मीं पाहतों ऐकतों इत्यादि प्रकार । दश भेद एका अहंकाराचे ॥ १९ ॥ एवं तत्त्वें एकवीस । मन बुद्धि मि-

कोनि तेवीस । बुद्धि तेंचि महत्तत्त्व कार्य कारणास । भेद नसे ॥ २२० ॥ महाभूतादि तत्त्वें चोवीस । अध्यायीं त्रयोदशीं त्यांतही तेविस । बोलेल पुढिल्या श्लोकीं श्रीनिवास । तें परतत्त्व चोविसावें अव्यक्त ॥२१॥ या चोविसांचें क्षेत्र जेथें । इच्छा द्वेषादि मनोमळ तेथें । हें त्रयोदशीं त्यांत एथें । क्षेत्र या नवां प्रकृतींत दाविलें ॥ २२ ॥ त्यांत नववी परा प्रकृति ते । क्षेत्रज्ञाकडे लागते । एवं हे नवविधा प्रकृति दाविते । चोवीस तत्त्वें ॥ २३ ॥ जेवढीं पाहवीं क्षेत्रें । त्यांत हींचि विचित्रें । किंवा पृथिव्यादि भूतमात्रें । भेद अवघे प्रकृतीचे ॥ २४ ॥ प्रकृति भेद कनकाचे । ते कनकावेगळे न निघती साचे । आकार तैसे चराचराचे । स्वरूपावेगळे न निघती ॥ २५ ॥ इत्यादि भाव पोटीं । तों कृष्ण ह्मणे अगा कीरिटी । रचल्या ब्रह्मांडाच्या कोटी । ते अष्टभेद पावली प्रकृति माझी ॥ २६ ॥ आतां यानंतर लोक । तो कां बोले उत्तम लोक । त्याचें निमित्त सुज्ञलोक । परिसोत आधीं ॥ २७ ॥ मायाशक्तीकरूनी । ब्रह्मीं उपजले भेद दोनी । त्यांत जड भेद टाकिला निषेधूनी । अष्टधा प्रकृति बोलतां ॥२८ ॥ आतां सत्त्वचिच्छक्ती । त्यांत चिदंशा जीवाची अभिव्यक्ती । एका सूर्याच्या नाना व्यक्ती । जैशा नाना उदकांत ॥ २९ ॥ सूर्य गगनीं एक । प्रतिबिंबांश त्याचे अनेक । त्या अनेकत्व भेदास उदक । निमित्त जैसें ॥ २३० ॥ तैसें सत्त्वचित्त । चिदंशभेदाचें निमित्त । ते नवमीं प्रकृति अच्युत । बोलतो आतां या श्लोकीं ॥ ३१ ॥

॥ श्लोक ॥ अपरे यमितस्त्वन्यां प्रकृतिं विद्धि मे परांम् ।
जीवभूतां महाबाहो ययेदं धार्यते जगत् ॥ ५ ॥

॥ टीका ॥ पूर्वश्लोकीं पांडववीरा । प्रकृति बोललों ते अपरा । विलक्षण तीहूनि हे परा । सांगतों तेही माझी प्रकृति जाण ॥ ३२ ॥ थोर ते परा ह्मणावी । नव्हे परा ते अपरा गणावी । परा थोर ऐसी जाणावी । कीं जीवत्व पावली चिदंशें ॥ ३३ ॥ घटस्थानीं अपरा । जळस्थानीं परा । सूर्याचा प्रकाश दुसरा । ज्या जळीं ॥ ३४ ॥ प्रकाश जैसा घटास नसे । तैसा जळासही प्रकाश न दिसे । तथापि जळ समरसे । सूर्यप्रतिबिंबप्रकाशीं ॥ ३५ ॥ जळ प्रकाशसहित । होऊनि घटातें असे प्रकाशित । तैसें सत्त्व निर्मळ अत्यंत । परा प्रकृतीरूप जाणावें ॥ ३६ ॥ कीं त्यांत चैतन्य प्रति-

१ चिद्रूप अंश जीव त्याचें प्रगटणें.

बिंबांश । निर्मळत्वें करी प्रवेश । ते त्याकारितां भेऊनि सप्रकाश । प्रकाशी अपरा प्रकृतिभेदातें ॥ ३७ ॥ ह्मणूनि ते जीवभूता । परा प्रकृति या पंडुसुता । ह्मणे जगद्गुरु ज्ञानदाता । ऐसें जाण तूं तीतें ह्मणोनी ॥ ३८ ॥ प्रत्यक्षही पाहतां लोकीं । सूर्यप्रतिबिंब ज्या उदकीं । तो प्रतिबिंब सूर्य तें जळचि कीं । जालें प्रकाशें सूर्याच्या ॥ ३९ ॥ यालागीं जीवभूता ह्मणिजे । प्रतिबिंबांशें जीवेंचि सजीव जाली जे । तथापि तीमाजी विराजे । जीव प्रतिबिंब ईश्वराचा ॥ २४० ॥ सूर्यप्रतिबिंबें जळ । स्वयेंचि सूर्यरूप जालें केवळ । तरी त्यांत जें असे झळझळ । तें सूर्याचें प्रतिबिंब ॥ ४१ ॥ हें युक्तिसिद्ध । हेंचि गीतेंत पुराणीं प्रसिद्ध । " ममैवांशो " ह्मणूनि शुद्ध । पंचदशीं वदेल भगवंत ॥ ४२ ॥ " ममैवांशो " या श्लोकीं । श्रीकृष्ण ह्मणेल जीवलोकीं । जीवभूत ह्मणिजे जीव जाला कीं । उपाधियोगें पावला जीवत्व ॥ ४३ ॥ जीवलोक सत्त्वोपाधि जाणावा । चिदंश त्यांत जीवभूत जीव जाला ह्मणावा । प्रकृति जीवभूता हा शब्दही वाखाणावा । येचि रीती ॥ ४४ ॥ अंश जीवभूत ईकरितां । हे जीवभूता त्यांसि मिसळतां । एवं जीवत्व पाहतां । योगें याच दोन्हींच्या ॥ ४५ ॥ ऐसें असोनि कोणी ह्मणती । कीं क्षेत्रज्ञ चिदंश त्यातें श्रीपती । ह्मणतसे परा प्रकृती । तरी अर्थ ऐसा अयुक्त ॥ ४६ ॥ पूर्वप्रकृती तें अपरा । या प्रकृतीतें ह्मणे परा । जडा प्रकृतीच्या एकसरा । जीव चिदंश केंवि होय ॥ ४८ ॥ असो तें आतां हे कां परा । आणि ते कां ह्मणावी अपरा । ह्मणूनि हेतु बोलतो बरा । चतुर्थ चरणीं ॥ ४७ ॥ चतुर्थ चरण ॥ " ययेदं धार्यते जगत् " ॥ टीका ॥ कीं जे प्रकृतीकरूनी । हें जग धरिजेतें ह्मणूनी । हे परा थोर अपरेहूनी । प्रकृति माझी ॥ ४९ ॥ अर्थ इतकाच परी । विशद बोलावा याउपरी । कीं ईकरूनि ह्मणतो हरी । हें जग धरिजेतें ह्मणोनी ॥ २५० ॥ तें धरणें जगाचें कैसें । तरी कल्पिलें नगर जैसें । मनें कल्पूनि मनेंचि धरिजे ऐसें । धरिजेतें परेनें ॥ ५१ ॥ तें जग सकळही अपरा । तें अपरेतें कल्पूनि धरिते परा । याप्रकारें धरिजेतें चराचरा । त्यां ईश्वरें परा प्रकृतीकरूनी ॥ ५२ ॥ एवं ईश्वराची शुद्ध सत्त्वप्रकृती । तीपासूनि तिन्ही गुण प्रगट होती । नगर मनें कल्पिजे ये रीती । त्रिगुणसृष्टि हे समस्त ॥ ५३ ॥ ते अष्टधा वर्णिली अपरा । त्यांत पंचभूतें तमाचा पसारा । रज इंद्रियें गुण तिसरा । तें मिश्रसत्त्व मनबुद्धि ॥ ५४ ॥ आठवा अहंकार उरला । तो

त्रिविध सृष्टींत आला। यांत पांचभौतिक शरीरीं बोलिला। तामस सृष्टींत तामस अहंकार ॥ ५५ ॥ इंद्रियें राजसें ह्मणोनी। राजस अहंकार यांत अभिमानी। बुद्धींत आणि मनीं। या सत्त्वसृष्टींत सात्त्विक अहंकार ॥ ५६ ॥ मी कृश मी स्थूळ। इत्यादि तामस अहंकारकल्लोळ। मी पाहतों चाखतों हुंगतों हे खेळ। राजस अहंकाराचे ॥ ५७ ॥ मी ऐसें कल्पितों। मी ऐसा निश्चय करितों। विलास इत्यादि पाहतों। सात्त्विक अहंकार ॥ ५८ ॥ होतां गुरुकृपादृष्टी। अनात्मत्वें निषेधितां या त्रिगुणसृष्टी। आत्मानुभव ये ज्या दृष्टी। ते जीवभूता परा प्रकृति शुद्ध सत्त्व ॥ ५९ ॥ ते त्रिगुणसृष्टीस पाहे। तोंवरी तीस जीवत्व आहे। प्रत्येक दृष्टि पाहतां राहे। स्थिर होऊनि बिंबस्वरूपीं ॥ २६० ॥ परतोनि पाहे जेधवां। अधिष्ठानीं मिळे तेधवां। हे परा प्रकृति मानवां। न कळे गुरुकृपेवांचूनी ॥ ६१ ॥ ज्या परा प्रकृतीनें ईश्वरत्व। अपरेस तिचें अंशत्व। जें त्रिगुणावेगळें शुद्ध सत्त्व। ते हे परा ॥ ६२ ॥ हे व्यतिरेकबोधीं ये रीती। अन्वयबोधींही हेचि प्रकृती। चराचरा जडा आकृती। चिद्रूप देते ॥ ६३ ॥ हे ज्या परेचा अंश। त्या परेकरूनि जगदीश। प्रकृति अपरा हृषीकेश। कल्पूनि धरितो साक्षित्वें ॥ ६४ ॥ कीं कल्पनेनेंचि पाळी मोडी। साक्षित्वावांचूनि एकी काडी। कल्पिली दिसेना ॥ ६५ ॥ तोंचि कल्पिला पदार्थ असे। कीं साक्षित्वदृष्टि जों दिसे। एवं विश्वकल्पना उल्लसे। साक्षित्वांत ॥ ६६ ॥ शुद्धब्रह्मीं साक्षित्व। न घडे जेथें निर्गुणत्व। एवं हे परा शुद्ध सत्त्व। साक्षित्व या परा कृतीकरूनी ॥ ६७ ॥ एवं या जगाचें धरणें। घडे साक्षित्वाच्या गुणें। ह्मणूनि कृष्ण ह्मणे कीं जिणें। ज्यां धरिजे तें हें जग ॥ ६८ ॥ हें जग जीकरूनी। धरिजे ते परा ह्मणोनी। जाण माझी प्रकृति ऐसें बोलोनी। पुढिलिया श्लोकीं हेंचि विशद वदेल ॥ ६९ ॥ जीवभूता प्रकृती। ह्मणतां सूचवी श्रीपती। कीं हे चिच्छक्ति नुसती। नव्हे द्रव्यशक्ति अथवा क्रियाशक्ती ॥ २७० ॥ चराचर द्रव्यशक्ती। इंद्रियग्राह्य ते क्रियाशक्ती। ऐसें ह्मणावें तरी युक्ती। कुंठित येथें होतसे ॥ ७१ ॥ कीं विना अंतःकरण। इंद्रियांतें नव्हे स्फुरण। जग इंद्रियें यां सर्वांचें धारण। अंतःकरणें घडों शके ॥ ७२ ॥ अंतःकरण चिच्छक्ती। शुद्धसत्त्वाची अभिव्यक्ती। ते परा प्रकृति कीं भगवदुक्ती। जीवभूता ह्मणे परेतें ॥ ७३ ॥ जीवोपाधि शुद्धसत्त्व। त्यातेंचि अंतःकरणत्व। हें अंश ज्याचा

तें अव्यक्ततत्त्व । ते पराप्रकृति शक्ति ईश्वराची ॥ ७५ ॥ जीवीं जीवोपाधि हे ह्मणावी । परी ते अंशरूपें गणावी । ईश्वरीं हेचि जाणावी । ईश्वरशक्ती ॥ ७६ ॥ हें जग या प्रकृतीकरूनी । धरिजेतें ह्मणतो याचरूनी । स्थिति सूचवूनि ईजपासूनी । सृष्टीही ह्मणतसे या श्लोकीं ॥ ७६ ॥

॥ श्लोक ॥ एतद्योनीनि भूतानि सर्वाणीत्युपधारय ।
अहं कृत्स्नस्य जगतः प्रभवः प्रलयस्तथा ॥६॥

॥ टीका ॥ हे सकल भूतांची योनी । सकळ भूतेंही उपजती इजपासूनी । ज्याची उत्पत्ति जेथूनी । त्याची ते योनि ऐसें ह्मणावें ॥ ७७ ॥ इजपासूनि उत्पत्ती । सर्व भूतांची ये रीती । तूं जाण ह्मणे श्रीपती । गहन भावें ॥ ७८ ॥ कीं चराचरें भूतें । तूंही कल्पूनि वहुतें । पाहे आणि प्रकृतीतें । जाण अंशरूपें पराच हे ह्मणोनी ॥ ७९ ॥ आणि " इति उपधारय " ह्मणोनी । उपधारय या शब्देंकरूनी । गहन भाव सूचवूनी । जाण ह्मणे अनुभवें ॥ २८० ॥ इति ह्मणजे ऐसें । कीं म्यां जग कल्पिलें जैसें । ऐसें तूंहि कल्पूनि मानसें । धरीं तें त्याचि मानसें करूनी ॥ ८१ ॥ उपधारय ह्मणजे धरीं । म्यां कल्पूनि धरिलें ज्यापरी । उपधारय या शब्दाअंतरीं । अनुभव ये रीती सूचवी ॥ ८२ ॥ पूर्वश्लोकीं या प्रकृतीकरूनी । हें जग धरिजेतें ह्मणोनि वदोनी । या श्लोकीं चराचराची योनी । हेचि ह्मणूनि बोलिला ॥ ८३ ॥ कीं या प्रकृतीकरूनी । भूतें धरितो या प्रकृतीनेंचि कल्पूनि । तरी तूंही कल्पूनि धरीं ह्मणोनी । उपधारय या शब्दें सूचवी ॥ ८४ ॥ एवं कल्पना ते अपरा । कल्पना करणारी परा । कार्य कारणरूप सारा । खेळ दोहीं प्रकृतींचा ॥ ८५ ॥ या अर्ध श्लोकापर्यंत । ऐसें बोलिला भगवंत । तों निरीश्वर सांख्य मत । सिद्ध जालें ॥ ८६ ॥ कीं ते स्वयेंचि जग धरी । स्वयेंचि भूतें निर्माण करी । तेथें ईश्वर कां परी । पाहिजे तो ॥ ८७ ॥ प्रकृतीच विश्व करिते । प्रकृतीच विश्व धरिते । तेव्हां ईश्वर कैंचा प्रकृतीच ते । स्वयें समर्थ ॥ ८८ ॥ त्या मताचें निरसन । करीतसे जगज्जीवन । आणि अद्वैत सिद्धांत गहन । उत्तरार्द्धें बोलतसे ॥८९॥ उत्तरार्द्ध ॥"अहं कृत्स्नस्य जगतः प्रभवः प्रलयस्तथा"॥ टीका ॥ अगा सकळ जगाची उत्पत्ती । अंतीं संव्हार मध्यें स्थिती । हें सर्व मीच जगत्पती। स्वयें आपण॥२९०॥कीं मजमाजि जग । सुवर्णीत जैसे नग । कीं सागरीं नाना तरंग । कीं सर्प रज्जूंत जैसा ॥ ९१ ॥ नव्हे सोनेंचि ते नग । आणि

समुद्रचि ते तरंग । रज्जूच सर्प तैसें जग । सर्वही मी ॥९२॥ तरंगाचें उपजणें तेंहि । सागरावांचूनि अन्य नाहीं । तरंग नाशही कांहीं । समुद्रावेगळा असेना ॥ ९३ ॥ तरंग उपजती नाशती । तोंपर्यंत जे असती । त्या असणियास ह्मणावें स्थिती । ते स्थितीही तो समुद्र ॥ ९४ ॥ संहार आणि उत्पत्ती । ह्मगतां स्वयेंचि प्राप्त होय स्थिती । या भावें सृष्टि संहार मात्र श्रीपती । मीच ह्मणे ॥ ९५ ॥ एवं हे सृष्टि त्रिगुण । त्रिगुण सर्वही मीच आपण । येथें शुद्ध निर्गुणपण । त्रिगुण सृष्टांत दाविलें ॥ ९६ ॥ ऐसें बोलिला कमलनेत्र । परि निर्गुण अधिष्ठान मात्र । विकार आकार जे विचित्र । हे सर्व खेळ प्रकृतीचे ॥ ९७ ॥ तेव्हां तेच विश्व करिते । तेंचि विश्व धरिते । तेंचि स्वयें संहारिते । कां नव्हे ऐसेंचि ॥ ९८ ॥ तेव्हां प्रपंच होतां जैसा । तूं निर्गुणत्वें न होसी तैसा । एवं जे भासवी या भासा । कां स्वतंत्र नव्हे प्रकृतीच ॥ ९९ ॥ शंका येथें मागुती । प्राप्त जाली ये रीती । तेही हरितो जगत्पती । तथा ह्मणूनियां तथा शब्दें करूनी ॥ ३०० ॥ कीं सृष्टि स्थिति संहार जैसा । भासही भासवी प्रकृति तैसा । मीच सर्व सिद्धांत ऐसा । प्रकृति शक्ति माझी यास्तव ॥ १ ॥ जो जयातें प्रवर्तवी । तो तयाचा धणी गोंसावी । प्रकृति या कारणें ह्मणावी । पुरुषाआधीन ॥ २ ॥ जे ज्याच्या सत्तें करूनी । वर्तते तदधीन ह्मणोनी । विश्वाभास प्रकृति होउनी । मज निर्गुणा आधीन ॥ ३ ॥ तीवेगळा मी निर्गुण । सत्ता मात्र असतों आपण । परि मज निर्गुणाविण । ते असेना अथवा दिसेना ॥ ४ ॥ सुवर्णावांचूनि जैसा । अलंकार न कळे कीं आहे कैसा । प्रपंचाचा भास ऐसा । मजवांचूनी ॥ ५ ॥ होऊनि नाना अलंकार । सुवर्णास होऊं नेदी विकार । ऐसी सुवर्णशक्ति परि आधार । तीसही त्या सुवर्णाचा ॥ ६ ॥ कीं सुवर्णाच्या आश्रयें असे । परि असे ऐसी कदापि न दिसे । विचार करितां गवसे । शक्ति तेही ॥ ७ ॥ कीं शक्ति नसती ऐसी जरी । सोनें विकारातें पावतेंचि तरी । कीं दधि जालियावरी । शक्तीवांचूनि दुग्ध नासे ॥ ८ ॥ दुग्धपण न नासे । आणि दधिपण त्यांत भासे । दुग्धांत शक्ति ऐसी असे । तरी दुग्धत्व असोनि दधि होतें ॥ ९ ॥ सुवर्णी शक्ति ऐसी परी । ते त्याविण अनुभवा येती जरी । सत्ता आहे ह्मणूनी तरी । बोलिजे तें तीसही ॥ ३१० ॥ कारण शक्ति ऐसी हेमीं । तैसीच माया निर्गुणब्रह्मीं । विश्वरूप तीकरूनि मी । कनक अलंकाररूप साकार जैसें ॥ १ ॥

एवं सुवर्णशक्तींत सुवर्ण । धणी जैसें आपण । तैसें मायाशक्तीचें धणी-पण । निर्गुणा मातें ॥ १२ ॥ तेव्हां निर्गुणातेंचि ईश्वरपण । निर्गुणत्वेंचि मी सगुण । तोचि मी स्वयें आपण । सृष्टि स्थिति आणि संहार ॥ १३ ॥ ईश्वरत्व आलें निर्गुणीं । मिथ्यात्व साधलें त्रिगुणीं । तथापि मायाभास-गुणीं । न बोलवे निर्गुणत्व ॥ १४ ॥ तरी सृष्टि स्थिति संहार । प्रकृती भास त्रिप्रकार । तिन्ही मिळोनि माझा आकार । जो सर्वेश्वर सगुण मी ॥ १५ ॥ कीं चराचर व्यक्ती । ज्या अपरा परा माझिया शक्ति । पाह-तां चाळूनि युक्ती । मीच असें ॥ १६ ॥ शक्ति कार्य कारण । न निव-डतीं वेगळेपण । जैसी सुवर्णशक्ति सुवर्ण । न सांडी ती ॥ १७ ॥ जेव्हां जो जो अलंकार । सोनेंचि तो तो आकार । तैसे परा अपरा प्रकृतीविकार । मी निर्विकारचि होतसें ॥ १८ ॥ तें न ह्मणवे निर्गुण । तरी विश्व ईश्वर-रूप सगुण । "तथा" शब्दें ऐसी खूण । श्रीकृष्ण येथें सूचवी ॥ १९ ॥ ते प्रकृतीच आपण । ईश्वर ह्मणावा सगुण । तरी तें निर्गुणाविण । सांपडे-चिना ॥ ३२० ॥ जेथें सत्ता असे । धणीपण तेथेंचि गवसे । यालागीं ईश्व-रत्व दिसे । निर्गुणींच ॥ २१ ॥ तीवांचूनि ईश्वरपण । नसे तरी असे निर्गुण । त्यावांचूनि कांहींच खूण । न ये ईची ॥ २२ ॥ ईकारितां ईश्वर-पण । परी ईश्वर तेंचि जें निर्गुण । ह्मणूनि ईश्वराचें भासतें रूपही मी आपण । सगुण जो ऐसें बोलतसे ॥ २३ ॥ हें माझें कृष्णरूप । येथें ही माया आणि चित्स्वरूप । माया चित्स्वरूपचि विश्वरूप । तेव्हां चराचर रूपीं मी स्वयें ॥ २४ ॥ मी किरण हें मृगजळ । मीच या मायेचें मूळ । याकारणें सर्व खेळ । मीचि असें ॥ २५ ॥ यालागीं सृष्टि संहार स्थिती । तिन्ही अपरा परा दोन्ही प्रकृती । ते तथा ह्मणजे तसेंचि मी जगत्पती । शेवटीं ऐसें बोले श्रीकृष्ण ॥ २६ ॥ एवं सर्वही निर्गुण । योगीं ऐसी बाणे खूण । तरी माया भास तोही सगुण । योग योजीत असोनि जाणे ॥२७॥ निर्गुणत्वीं सर्वात्मयोग । सगुणत्वीं भक्तियोग । एका समयांत संयोग । ऐसा योग भक्ति दोहींचा ॥ २८ ॥ संपतां षष्ठाध्याय । श्रेष्ठत्वें ज्याचा जाला निर्णय । त्या योगियास योगद्वय । तें ऐसें दोन्ही वर्णिलें ॥२९ ॥ पुढें हा अध्याय आरंभला । आरंभीं हेंचि बोलता जाला । कीं योग योजित समग्र मजला । जैसें जाणसी तें आईक ॥३३०॥ तें समग्रत्व आपलें । ऐसें येथें वर्णिलें । सर्वात्मकत्व यांतचि दाविलें । योग योजावया ॥३३१॥

आतां यानंतर श्लोक । तो कां बोले उत्तमश्लोक । त्याचें निमित्त सुज्ञ लोक । परिसोत आर्धीं ॥ ३२ ॥ अपरा परा शक्ति दोन्ही । विश्व जाल्या ऐसें वदोनी । अंतीं ते सकळ मी ह्मणूनी । पूर्वश्लोकवरी वर्णिलें ॥ ३३ ॥ जेथें जग आणि आपण । दोन्ही दावूनि एकपण । बोलतां सूचविली । खूण । विवर्त्त अधिष्टान एकत्वाची ॥ ३४ ॥ कीं सर्वज्ञाचें वचन । अनुभवा ये ऐसें मनन । करावें जे युक्तीकरूनि चिंतन । मनन ह्मणावें तयातें ॥ ३५ ॥ तरी दृष्टांतीं जेथवरी । अधिष्टान विवर्त्त तेथवरी । अधिष्ठान सत्य मिथ्यावरी । विवर्तसर्प दोरीं जैसा ॥ ३६ ॥ अनुभवी हे खूण । पाहे अनुभवीं निपुण । कीं जडीं विवर्तीं दिसे निर्गुण । सुवर्ण जैसें अलंकारीं ॥३७॥ तरंगीं दिसे पाणी । निर्गुण ऐसें दिसे त्रिगुणीं । कीं तंतु जैसा पटपणीं । घटपणीं माती उघडी ॥३८॥ जोंवरी ऐसा नव्हे अनुभव । तोंवरी समजावें युक्तिवैभव । एवं मीच सृष्टि संहार ह्मणतो भाव । अधिष्ठान विवर्त्त एकत्वाचा सूचला ॥ ३९ ॥ कीं असोनि सत्य दोर । मिथ्या भासे सर्पाकार । त्या सर्पापलीकडे निर्विकार । दोरचि असे ॥४०॥ तो सर्प असत्य । त्यापलीकडे दोर तो सत्य । यालागीं मानावें अगत्य । कीं दोरचि सर्प तो ॥ ४१ ॥ तो दोरही होता असत्य । ब्रह्म कळतां सत्य । त्या दोरासहित अगत्य । जग हें ब्रह्म मानावें ॥ ४२ ॥ तरी त्याहि ब्रह्मापलीकडे । कांहीं असिलिया तेंही उडे । कीं सर्पापलीकडे । होऊनि उडे । दोर मिथ्यात्वें ॥ ४३ ॥ हेही शंका अनादि । परिहरिली अनादि वेदीं । श्रुति जेथें उपपादी । प्रकृति पुरुषा ॥ ४४ ॥ प्रकृति वर्णूनि अलीकडे । श्रुति ह्मणे पुरुष तीपलीकडे । मागुतीं श्रुति ह्मणे ऐसें न घडे । कीं पुरुषापलीकडे असे कांहीं॥४५॥श्रुति॥ पुरुषान्नापरं किंचित् सा काष्ठा सा परा गतिः ॥ श्रुत्यर्थ ॥ पूर्वीं जाला असे । प्रमाण एथें स्पष्ट दिसे । एवं संदेहास अवकाश गवसे । तरी श्रुति निषेधी तयातें ॥ ४६ ॥ कीं प्रकृति पुरुषाआलीकडे । पुरुष तीहूनि पलीकडे । परंतु ऐसें न घडे । कीं पुरुषापलीकडे असे कांहीं ॥४७॥ ऐशा अपरा परा प्रकृती । विवर्त्तरूपें वर्णी श्रीपती । शेवटीं ह्मगे अर्जुना प्रती । कीं मी अधिष्ठानचि असें सर्व ॥ ४८ ॥ परी मिथ्या सर्पापलीकडे दोर । त्या दोरापलीकडे ब्रह्म निर्विकार । तैसा ब्रह्मापलीकडे त्यास आधार । आणखीं असेना ॥ ४९ ॥ भ्रमें सर्प दृष्टी पडे । दोर असे त्यापलीकडे । तो कळतां सर्प उडे । प्रत्यक्ष सिद्ध ॥ ३५० ॥ ऐकतां वेदांत । वि-

दवसर्प ब्रह्मदोरांत । ऐसें परिसतां संशयांत । बुद्धि निघे ॥ ५१ ॥ कीं दोर कळतां सर्प उडे । तो दोरही राहे आलीकडे । ब्रह्म ऐकतां पलीकडे । तेव्हां दोरही जाला असत्य ॥ ५२ ॥ त्याही ब्रह्मापलीकडे । कांहीं असलिया हें आलीकडे । मिथ्या होऊनि उडे । प्रत्यक्ष सिद्ध ॥ ५३ ॥ स्थळ संदेहाचें ये रीती । जाणोनि एथें जगत्पती । येविषयीं अर्जुनाप्रती । आधींहींचि बोलतो या श्लोकीं ॥ ५४ ॥

॥ श्लोक ॥ मत्तः परतरं नान्यत्किंचिदस्ति धनंजय ।

मयि सर्वमिदं प्रोतं सूत्रे मणिगणा इव ॥ ७ ॥

॥ टीका ॥ मजपलीकडे धनंजया । कांहीं असेल ऐसिया । ह्मणी धरिशील संशया । मज पलीकडे कांहीं असेना ॥५५॥ अर्धश्लोकेंकरूनी । प्राप्त शंका परिहरूनी । आतां सर्वाश्रय आपणचि ऐसें वदोनी । स्वाश्रयत्व आपलें वदतो ॥५६॥ अगा मणि अनेक । त्यास आश्रय सूत्र एक । ते मणि सूत्र अवघें कनक । भेद मागुती असेना ॥५७॥ सर्वांस मी आश्रय । मी स्वाश्रय निराश्रय । सर्वथा न धरीं हा संशय । कीं मज आश्रय असेल कांहीं ॥५८॥ सुवर्णाचें सूत्र एक । सुवर्णाचे मणि अनेक । तैसा मी ईश आणि महदादिक । ब्रह्म असे सकळही ॥ ५९ ॥ तथापि ते मणिगण । मी सूत्र ईश्वर सगुण । विश्वरचनारूपें जाण । ओंविले असती मजमाजी ॥३६०॥ सूत्रावांचूनि जे रीती । मणिहार होऊं न शकती । विश्वरचनास्थिती । न ठाके महदादितत्त्वां मजविण ॥ ६१ ॥ ऐसें श्रीमद्भागवतीं । मैत्रेय ऋषि विदुराप्रती । बोले कीं करूं न शकती । महदादि तत्त्वें ब्रह्मांड जेधवां ॥ ६२ ॥ तेव्हां ईश्वरें आपली । शक्ती त्यामध्यें मेळविली । मग सुखें होऊं लागली । ब्रह्मांडरचना ॥ ६३ ॥ महदादितत्त्वांचा पसर[1] । मणिगण भूतें चराचर । त्यांत सूत्र स्वयें ईश्वर । आश्रय तयांचा ॥ ६४ ॥ आणि आपणास आपण । आश्रय ब्रह्म सगुण । या अर्धश्लोकें हेंही खूण । श्रीकृष्ण सांगे ॥६५॥ कीं सर्वही ह्मणतां आपण । उडालें सेव्यसेवकपण । ह्मणूनि सर्वाश्रयत्वें श्रीकृष्ण । आपण सेव्य सकळ सेवक ह्मणोनी सूचवी ॥ ६६ ॥ आतां यानंतर । विभूति बोलतो सर्वेश्वर । त्याचें निमित्त सुज्ञ चतुर । परिसोत आतां ॥ ६७ ॥ कीं समग्रत्व आपलें । बोलतां सेव्यसेवकत्व गेलें । [illegible]

1 समुदाय.

साधलें एकाच बोलें। कीं सूत्रमणिन्यायें तथापि मी आश्रय आश्रितांचा ॥ ६८ ॥ हे गोष्टी देवें साधिली। तों शंका आणखी प्राप्त जाली। कीं सेव्यता एक ईश्वरासि आली। त्या वेगळे सर्व सेवक ॥ ६९ ॥ तेव्हां जे जे श्रेष्ठ। ते न सेवावे वरिष्ठ। आणि ज्येष्ठातें जो कनिष्ठ। त्यानें किमर्थ सेवावें ॥ ३७० ॥ कीं जो तो माया आणि ब्रह्म। तेव्हां सकळही सम। ह्मणूनि ईश्वर सर्वोत्तम। भजावें एका तयातेंचि ॥ ७१ ॥ या संदेहाचें स्थळ परी। सिद्धांतीं हेचि गोष्टी खरी। कीं सर्वाश्रय एक हरी। तोचि सेव्य ॥ ७२ ॥ इतर सर्व सम। कोण उत्तम कोण अधम। सर्वाश्रय ह्मणूनि सर्वोत्तम। सेव्य तोचि सर्वा आश्रितां ॥ ७३ ॥ याकरितां हाचि सिद्धांत। अंगीकारूनि भगवंत। विभूतिवैभव आपलें अत्यंत। तें सांगतो ॥ ७४ ॥ कीं उत्तमत्व चित्रविचित्र। माझ्या उपाधीवांचूनि अन्यत्र। नसे तेंचि सर्वत्र। असे यथाविभागें या जगीं ॥ ७५ ॥ जें उत्तमत्व जेथें। ते माझी विभूति सेव्य तेथें। ह्मणूनि विभूति आपल्या एथें। बोलतो या श्लोकापासूनी ॥ ७६ ॥

॥ श्लोक ॥ रसोहमप्सु कौंतेय प्रभास्मि शशिसूर्ययोः।
प्रणवः सर्ववेदेषु शब्दः खे पौरुषं नृषु ॥ ८ ॥

॥ टीका ॥ उदकीं रस आपण। ऐसें ह्मणतां गोडपण। जें ज्यांत असेल त्यांत खूण। रस ह्मणोनी ॥ ७७ ॥ गुळचट कडू तिखट क्षार। इत्यादि रसेंना जाणे प्रकार। ते सर्व रस पाहतां विचार। उदकाचेच ॥ ७८ ॥ एवं ज्यांत जो गोड गुण। त्यास ईश्वराचें विभूतीपण। हे हृदयांत धरितां खूण। होय स्मरण ईश्वराचें ॥ ७९ ॥ श्रवणादि भक्ति नव। त्यांत स्मरणभक्ति जीव। श्रवणादि कोण भाव। घडे स्मरणावांचूनी ॥३८०॥ श्रवणादि भक्ति जेजे। तीस स्मरण आधीं पाहिजे। त्या आठांवीण स्वयें विराजे। स्मरणभक्ति स्वतंत्रत्वें ॥ ८१ ॥ आतां जों नव्हे श्रवण। तों न घडे ह्मणावें स्मरण। तरी श्रवणासी हेतु स्फुरण। स्वहिताचें ॥ ८२ ॥ स्वहितास हेतु प्रीती। त्या प्रीतीतेंचि भक्ति ह्मणती। ते भक्ति कळते आयती। श्रवणादिकींकरूनी ॥ ८३ ॥ ईश्वर आत्मा आपला। हें रहस्य नेणे त्याला। भक्तियोग नाहीं बोलिला। जो ह्मणावा अव्यभिचार ॥ ८४ ॥ भक्ति दों स्थळीं जाली। ते व्यभिचारिणी बोलिली। जैसी स्त्री भजों ला-

---

१ जीभ.

गली । पुरुषां दोघांतें ॥ ८५ ॥ कीं ईश्वरीं जे प्रीती । भक्ति तीतें म्हणती । परि भक्ति तेच करिती । चाड स्वहिताची ज्यांस ॥८६ ॥ आपणास आपण गमे गोड । तरीच आत्महिताचा निघे मोडे । या गोडीपुढें जाली सेंड । गोडी ईश्वराची ॥ ८७ ॥ आपणास पाहिजे धन मान । म्हणूनि रायातें सेविती जन । ऐसेंच आवडीनें भजन । आपणाकारणें देवाचें॥ ८८॥ हाचि आत्मा ईश्वर । ऐसें कळतां जो जो आदर । तो तो म्हणावा अव्यभिचार । कीं प्रीति दों ठायीं असेना ॥ ८९ ॥ पतिव्रतेचा दृष्टांत । तोहि येथें न साहे अत्यंत । कीं तेही अपेक्षूनि स्वहित । पतिसेवा करीतसे ॥३९०॥ एवं दों स्थळीं नसे प्रीती । ते अव्यभिचारिणी भक्ति म्हणती । प्रीतीसी दोन फांटे फुटती । व्यभिचारिणी ती म्हणावी ॥ ९१ ॥ एवं जे आपली प्रीति अत्यंत । तेच भक्ति होते निश्चित । त्या प्रीतीनें आठवे स्वहित । तें स्मरण आधीं श्रवण तेव्हां ॥ ९२ ॥ तेंही तरी घडे श्रवण । कीं श्रवणाचें जरी असे स्मरण । कीं स्मरण तेथें अंतःकरण । श्रवण अंतःकरणेंचि घडतें ॥९३॥ एवं श्रवणकाळीं पाहिजे स्मरण । परि स्मरणकाळीं नलगे श्रवण । कीर्तनादिकाची तों खूण । स्मरणाविणें सांपडेना ॥ ९४ ॥ आठां भक्तींची कळी । न उकले स्मरणावेगळी । ऐसी सर्वांत आगळी । स्मरणभक्ति ॥ ९५ ॥ सर्वां रसीं जळ । तें भक्षूनिहि उदक केवळ । पानार्थ पाहिजे ऐसी निखळ । स्मरणभक्तीहि लेखिली नवांत ॥ ९६ ॥ एवं पाहतां विभूती । होय ईश्वराची स्मृती । प्रस्तुतीं गोडी गोडी प्रीती । रस विभूतियोगें हरि स्मरावा ॥ ९७ ॥ एवं उदकीं मी रस । येथें बोले जगन्निवास । मूळ सर्वां रसास । रस जो दिसतसे जलरूपें ॥ ९८ ॥ ऐसीच चंद्रसूर्यांत प्रभा । मीच माझी विभूति ते शोभा । ज्या प्रभा व्यापूनि नभा । पडदा काढिती तमाचा ॥ ९९ सर्वां वेदांचें मूळ । जो प्रणव ओंकार केवळ । तो मीच संन्यासी निर्मळ । ज्या बीजमात्रातेंचि जपती ॥ ४०० ॥ आतां शब्द आकाशगुण । ज्या शब्दें कळे सर्वांची खूण । तो मी सगुण निर्गुण । म्हणून अनिर्वाच्य म्हणती ज्या शब्द ॥ १ ॥ पुरुषामाजीं पुरुषार्थ । तो मीच स्वयें समर्थ । एवंच जाण तूं यथार्थ । कीं पुरुषार्थ सर्वही मी असें ॥ २ ॥

॥ श्लोक ॥ पुण्यो गंधः पृथिव्यां च तेजश्चास्मि विभावसौ ।
जीवनं सर्वभूतेषु तपश्चास्मि तपस्विषु ॥ ९ ॥

---

१ अंकुर. २ शुष्क. ३ पिण्यासाठीं.

॥ टीका ॥ अगा सर्वत्र सुगंध । तो पृथ्वीचाच गुण गंध । यावेगळे जे दुर्गंध । ते विकार ॥ ३ ॥ यालागीं जो पुण्यगंध । ह्मणजे पृथ्वींत जो सुगंध । तो मी माझी विभूतिसंबंध । सुगंधमात्रीं तूं पाहें ॥ ४ ॥ मी तेज अग्नीभीतरी । कीं माझी विभूति वैश्वानरीं । सर्वभूतीं यापरी । जीवन तें मीच ॥ ५ ॥ कीं लिंगदेह आणि चिदंश जीव । जोंवरी असे तोंवरी सजीव । ह्मणावा अन्यथा शव । अमंगळ होतसे देह तो ॥ ६ ॥ तें जीवन मी जगत्पती । ह्मणिजे माझी विभूती । जोंवरी जीवन तोंवरी प्रीती । परम आप्तांचीही त्यावरी ॥ ७ ॥ आतां तपस्वियांत तप । अत्यंत ज्याचा प्रताप । तें मी माझ्या विभूतीचें रूप । तें तपही जाण तूं ॥ ८ ॥ ऐशा पाहतां विभूती । ह्मणी आत्मतत्त्वाची पडे विस्मृती । ह्मणूनि आत्मा सर्वभूतीं । पाहें कीं तें पाहणें विभूति ह्मणतो या श्लोकीं ॥ ९ ॥

॥ श्लोक ॥ बीजं मां सर्वभूतानां विद्धि पार्थ सनातनम् ।
बुद्धिर्बुद्धिमतामस्मि तेजस्तेजस्विनामहम् ॥ १० ॥

। टीका ॥ अगा मीं या माझ्या विभूती । सांगतों ज्या समस्तां भूतीं । त्या भूतांचें बीज मी जगत्पती । परि नव्हे इतरां बीजांसारिखा ॥ ४१० ॥ कीं उपजतां अंकुर । बीजनाश सत्वर । बीज होऊनिही मी नव्हे नश्वर । सनातन नित्य शाश्वत ॥ ११ ॥ तरी बीजत्वें कां गणावें । शाश्वत नित्य जेव्हां ह्मणावें । बीज ह्मणतां कोठोनि आणावें । नित्यत्व ॥ १२ ॥ कोणी ऐसें ह्मणती तरी । याच्या उत्तरार्द्धीं हरी । बोले ऐसी वैखरी । कीं बुद्धि मी बुद्धिवंतांत ॥ १३ ॥ ह्मणूनि हा अर्थ । ज्या दृष्टांतें साधे यथार्थ । त्या दृष्टांतें साधाया ऐसें समर्थ । सूचवी येथें ॥ १४ ॥ कीं बीजपण तरी घडे । आणि नित्यत्व तरी न विघडे । ऐशा विचारें उघडे । या वाक्यार्थाचें कवाड ॥ १५ ॥ सूर्यकिरणापासूनी । मृगजळ उपजे प्रतिदिनीं । पुन्हा त्यांत लय पावुनी । बीजांत वृक्ष ऐसें असे ॥ १६ ॥ बीजांत वृक्ष असे । कीं त्यांतूनि निघतां दिसे । आणि वृक्षांत बीज वसे । तरी उपजे वृक्षापासूनी ॥ १७ ॥ परि बीज नाशत असे । त्यांतील अंकुर जेव्हां दिसे । मृगजळ होतां तैसा नसे । नाश किरणांचा ॥ १८ ॥ आणि किरण सत्य । जळभास असत्य । स्वयें बीज सत्य तें असत्य । हें साधेल याच दृष्टांतें ॥ १९ ॥ इत्यादि भाव पोटीं । तों कृष्ण ह्मणे आगा किरिटी । ऐशा ब्रह्मां-

---

१ पिण्यासाठीं. २ नाशवंत.

जाच्या कोटी । बीज सनातन मी त्यांचें ॥४२०॥ बीज शब्द ऐसा वदन । बोलोनिया जगज्जीवन । बुद्धिमंतांत बुद्धि मी ऐसें वचन । त्यापुढेंचि बोलतसे ॥ २१ ॥ कीं रहस्य अत्यंत । हें गुह्य यासही बुद्धिमंत । यथार्थ जाणिती त्यांत । बुद्धि ते भगवंत मी असें ॥ २२ ॥ ते बुद्धिमंत तेचि बुद्धि । कीं ज्यास जे बुद्धीनें तत्त्वसिद्धी । त्या नित्य बीजाच्या अनुभवाची समृद्धी । ज्या बुद्धीनें धन्य ते ॥ २३ ॥ आतां जे तेजस्वी शूर । ज्ञानी तपस्वी चतुर सुंदर । धनवंत विद्यावंत कलावंत नर । त्यांतें तेज जें जें तें तें मी असें ॥२४॥ इत्यादि ज्यापाशीं जो गुण । तें तेज त्यांचें हे खूण । त्या तेजें तो तेजस्वी निपुण । परि भगवद्विभूति तें तेज ॥ २५ ॥

॥ श्लोक ॥ बलं बलवतां चाहं कामरागविवर्जितम् ।
धर्माविरुद्धो भूतेषु कामोस्मि भरतर्षभ ॥ ११ ॥

॥ टीका ॥ बलवंतांत मी बळ । परंतु तें बळ जें केवळ । कामविषयप्रीति ओंगळ । तें बळ नव्हे विभूति माझी ॥ २६ ॥ आणि धर्मास नव्हे विरुद्ध । स्वस्त्रीशीं यथाकाळें भोग शुद्ध । तो काम मी इतर अशुद्ध । विभूति माझी तो नव्हे ॥२७॥ एथवरी ज्या ज्या विभूती । बोलता जाला श्रीपती । त्यांत भाव दावी ये रीती । कीं उत्तम तितकें स्ववैभव ॥ २८ ॥ प्रस्तुत धर्मास अनुकूळ । तो काम विभूति आपली निर्मळ । धर्मास विरुद्ध तो अमंगळ । विभूति आपली न ह्मणावी हा भाव ॥ २९ ॥ तरी आपण सर्वसम । आपणास कां उत्तमाधम । या संशयें मतिभ्रम । अर्जुनादिकांचा होणार ॥ ४३० ॥ एथें हेंचि समाधान । कीं त्रिगुणचक्रीं मन । भ्रमतसे ह्मणूनि जन । गुणानुरूप फळ पावती ॥३१॥ त्यांत सत्त्वें उत्तम गती । तमें अत्यंत अधोगति होती । रजोगुणें मध्यें राहती । हें चतुर्दशीं स्पष्ट होणार ॥ ३२ ॥ प्रस्तुतीं धर्मास अविरुद्ध । तो काम सत्त्वगुणयोगें शुद्ध । सत्त्वगुणें उत्तमलोकगति सिद्ध । रजें मध्यम तमें अधोगती ॥३३॥ एकचि सोनें परी । त्याचे नग वेगळाल्या कुसरी । एकास एकाची सरी । येणार नाहीं ॥ ३४ ॥ लोखंडाचीच परि बेडी । लोखंडाचाच घन घडी । किंकरी[1] लोखंडाचीच तोडी । लोखंडाचेच बेडीतें ॥ ३५ ॥ तैसे प्रकृतीचे गुण । मीच स्वयें निर्गुण । कीं गारांचें कठिणपण । पाहतां अवघें मृदु जळ ॥३६॥ प्रकृतीचेच गुण । जाले नरक दारुण । त्या नरकप्राप्तीस कारण । तेचि जाले ॥ ३७ ॥ चुकती नरक दारुण । यासही निमित्त तेच गुण । त्यांत

---

1 पातळी.

सात्विका स्वभावाची खूण। स्वहिताचरण वेदोक्त॥ ३८ ॥ एवं धर्मास तो नव्हे विरुद्ध। सात्विकाचा काम शुद्ध। माझी विभूतिपण सिद्ध। त्या कामास याकरितां ॥ ३९ ॥ ते तिन्ही गुण। आणि यांचें लक्षण। आणि गति हें निरूपण। चतुर्दशांत होणार ॥ ४४० ॥ प्रस्तुत धर्मास अविरुद्ध। तो काम सात्विकांचा शुद्ध। ह्मणूनि ऐसें जालें सिद्ध। कीं त्रिगुण एथें बोलावे ॥ ४१ ॥ त्यांत सात्विकभाव माझ्या विभूती। सत्वानुरूप उत्तम गती। तरी मीच मायाधिपती। चाळक तिन्ही गुणांचा ॥ ४२ ॥ तथापि ते गुण असत्य। त्यांचें अधिष्ठान आपण सत्य। हें जे रीती साधे अगत्य। तैसें बोलतो या श्लोकीं ॥ ४३ ॥

॥ श्लोक ॥ ये चैव सात्विका भावा राजसास्तामसाश्च ये।
मत्त एवेति तान्विद्धि न त्वहं तेषु ते मयि ॥ १२ ॥

॥ टीका ॥ अगा धर्मास अनुकूळ काम। ह्मणूनि ऋतुकाळीं स्वस्त्रीसंगम। हा सात्विकभाव उत्तम। सात्विक भाव इत्यादि ॥ ४४ ॥ आणि अनादि वासना। जे उपजवी भोगकामना। विषयासक्त करी मना। राजसभाव इत्यादि ॥ ४५॥ विषयभोगनिमित्तक। क्रोधशोकमोहादिक। इत्यादि भाव अनेक। तमोगुणाचे ॥ ४६ ॥ हे गुणाचे भाव। परि मजपासूनि यांचा उद्भव। कीं ते गुण स्वयमेव। मजपासूनिच उपजले ॥४७॥ मजपासूनि त्यांची उत्पत्ती। परि त्यांत नसें मी जगत्पती। आणि ते मजमाजि असती। जाण ऐसें अर्जुना ॥४८॥ ऐसें जाण ह्मणोनी। बोलतां या स्ववचनीं। भाव दावी कीं ज्या दृष्टांतेंकरूनी। हें घडे त्या दृष्टांतें हें जाण ॥४९॥ कीं दृष्टांताविना अर्थ हा साधेना। ह्मणूनि जाण ह्मणे अर्जुना। तें दृष्टांतेंचि जाणा ह्मणतो ह्मणावें ॥४५०॥ कीं काय ऐसें असे। ज्यांत हा सर्वव्यापक नसे। हा त्यांत नसतां ते कैसे। यामाजी असती ॥ ५१ ॥ आकाश जैसें सर्वगत। हा तैसा त्याहीपुढें अनंत। जें असेल त्या आकाशांत। त्यांत तो नसेल कैसा ॥ ५२ ॥ वायु आकाशापासूनी। तो वायु वसे त्याच गगनीं। गगन वायूंत नसे ह्मणोनी। ह्मणेल कोण ॥५३॥ एथें याकारणें। लागलें जेव्हां विचार करणें। तेव्हां अगत्य लागलें येणें। दृष्टांतावरी ॥५४॥ सर्प ज्या रज्जूपासूनि होतसे। त्या सर्पी रज्जु तो नसे। कीं सर्प सत्य न दिसे। दोर त्यांत न असे यालागीं ॥ ५५ ॥ जळास भास किरणांपासूनी। उपजे परी मिथ्या ह्मणोनी। जें असत्य तें नसे यावरूनी। किरणें नसती मृगजळीं ॥ ५६ ॥ परी मृगजळ किरणांवांचूनी। न दिसे न असे या निमित्तेंकरूनी।

किरणींच आहे ह्मणोनी । ह्मणावें अगत्य ॥५७॥ ऐसे त्रिगुणाचे भाव । मजपासूनि ह्मणे देव । परी मिथ्यात्वें नसती वास्तव । ह्मणे त्या त्रिगुणभावांत मी नसें ॥ ५८ ॥ परी ते गुणांचे भाव आणि गुण । न दिसती न असती मजविण । सागरीं तरंगतें तरंगपण । तैसे असती मजमाजी ॥ ५९ ॥ इत्यादि दृष्टांत कोटी । उपजे असत्य सत्याचेच पोटीं । असत्य नाहीं वास्तव शेवटीं । सत्य नसे ह्मणावें त्या असत्यांत ॥ ४६० ॥ परी जें सत्य । त्यावांचूनि न दिसे असत्य । ह्मणोनि मानावें अगत्य । सत्यांतचि असत्य आहे ह्मणोनी ॥ ६१ ॥ एवं गुण गुणाचे भाव । असत्य आणि सत्य स्वयमेव । ऐसें सूचवूनि देव । सकळ मी ऐसें दावी समग्रत्व॥६२॥आणि मागुती गुण त्रिविध । त्या तिहींचे भाव विविध । जैसा भाव तैसाच फलसंबंध । त्रिगुणभावकर्मांचा ॥ ६३ ॥ त्यांत सात्त्विक शुद्ध । कामविलास त्याचे शास्त्रसिद्ध । ह्मणोनि धर्मास अविरुद्ध । तो काम मी ऐसें ह्मणे ॥ ६४ ॥ कीं कामादि शास्त्रसंमत । दिव्य फळ देती निश्चित । ह्मणोनी आपली विभूति भगवंत । ह्मणे त्यातें ॥ ६५ ॥ एवं सर्वात्मत्वस्थिती । त्यांत आपल्या विभूती । द्वैत नसोनि गती । गुणकर्मानुरूप ॥ ६६ ॥ हें इतकें सिद्ध जालें । जेव्हां गुणभावास मिथ्यात्व आलें। कीं भाव विविध तेव्हां साधलें । फळ विविधत्वें गतिविविधत्व ॥ ६७ ॥ अद्वैतामध्यें द्वैत । आणि द्वैतांत अद्वैत । प्रसंगें ऐसें भगवंत । तत्त्व सर्वांचें बोलिला ॥ ६८ ॥ कीं देखिलें ऐकिलें जें कांहीं । आणि देखिलें ऐकिलें जें नाहीं । जें जेथें जैसें असेल सर्वही । तेंचि तत्त्व सकळांचें॥ ६९ ॥ कीं सर्व या गुणांचेच भाव। त्यांचा प्रकाशक एक देव । परी हें तत्त्व नेणती जीव । याच गुणभावेंकरूनी ॥ ४७० ॥ हे गुणभाव ऐसे अनेक । यापलीकडे यांचा प्रकाशक । जीव नेणती हा विवेक । या गुणाचिकरितां ह्मणतसे या श्लोकीं ॥ ७१ ॥

॥ श्लोक ॥ त्रिभिर्गुणमयैर्भावैरेभिः सर्वमिदं जगत् ।
मोहितं नाभिजानाति मामेभ्यः परमव्ययम् ॥ १३ ॥

॥ टीका॥ अगा हे त्रिगुणमय भाव । याचकरितां जगीं जीव । मोहोनि जो यापरता मी देव । त्या मातें कोणी नेणती॥ ७२ ॥ त्यांत जो सत्त्वगुण । त्यासही रजतममिश्रितपण । अनादि अविद्येकरूनि खूण । नेणे माझी ॥ ७३ ॥ ज्यांस सत्त्वीं उत्तम गती । तेही गर्भवासा येती मागुती । न चुकती यातायाती । जो गुणापलीकडे मज नेणे ॥ ७४ ॥ चित्त बुद्धि मन सत्त्वगुण । इंद्रियें रज देह तमोगुण । अहंकारीं याचें एकपण । ह्मणि

मोह ॥ ७५ ॥ मोह ह्मणजे अविवेक । हा वेगळा द्रष्टा वेगळा हा विवेक । त्या अनेकीं आत्मा एक । अव्यय अविनाशी मी असें ॥ ७६ ॥ परंतु या तिहीं गुणांचे भाव । त्या भावीं मोहले जीव । त्यांचा आत्मा मी देवाधिदेव । त्या मातें न जाणती ॥७७॥ गुण हे कां ऐसे बलवंत । आणि ऐसियांसही तरूनि जाती संत । त्यास काय कारण हें भगवंत । गुह्य सांगतसे या श्लोकीं ॥ ७८ ॥

॥ श्लोक ॥ दैवी ह्येषा गुणमयी मम माया दुरत्यया ।
मामेव ये प्रपद्यंते मायामेतां तरंति ते ॥ १४ ॥

॥ टीका ॥ आइकें भगा धनंजया । गुण तिन्ही हे ह्मणावी माया । ते माया अति दुरत्यया । ह्मणजे जें न तरवे दुःखेंही ॥ ७९ ॥ "मा" ह्मणजे नसे । "या" ह्मणजे जें नसोनि भासे । या दों शब्दांचे दोन्ही ऐसे । अर्थ कीं ऐसेंचि तत्त्व तिचें ॥ ४८० ॥ मृगजळ वस्तुतः नसे । नाहीं ह्मणतां आहेसें दिसे । दों अक्षरांचे भाव ऐसे । माया ह्मणावी याकरितां ॥ ८१ ॥ नाहींच ह्मणावी ते । तरी विश्वरूपें दिसते । आहे ह्मणावी तरी होते । दूर कळतां जैसा सर्प ॥ ८२ ॥ तरंग जळीं दिसती । जळावेगळे कांहींच नसती । नाहीं ह्मणावे तरी भासती । नानारूपें ॥ ८३ ॥ माया ह्मणूनी हीं दोंनी अक्षरें । या भावें या प्रकारें । योजूनि म्यां अनादि चतुरें । नांव ठेविलें या शक्तीचें ॥ ८४ ॥ कार्यरूपी माया । ऐसी ह्मणावी धनंजया । कारणत्वीं ही आपुलिया । शब्दद्वयार्थातें न सोडी ॥ ८५ ॥ मध्यान्ह टळतां किरणीं । जैसें दिसेना असत्य पाणी । तैसी प्रलयकालीं निर्गुणीं । कार्यरूपी माया दिसेना ॥ ८६ ॥ तेव्हां ह्मणावी नाहीं ह्मणूनी । तरी प्रकटते पुन्हा त्यापासूनी । मृगजळ जैसें प्रतिदिनीं । किरणीं प्रकट होतसे ॥८७॥ जळाभास किरणीं नसे । कारणरूपें त्यांत तेव्हांही वसे । कीं कार्यरूपें दिसे । दुसरिये दिवसीं ॥ ८८ ॥ कीं बीजांत वृक्ष न दिसे । तरी ह्मणावा-च कीं असे । नसेचि तो कोठोनि गवसे । जेव्हां निघतो त्यांतूनी ॥ ८९ ॥ प्रपंच लय पावोनी । पुन्हा उपजे निर्गुणापासूनी । तेव्हां कारणरूपें असेच ह्मणोनी । प्रलयकाळीं ब्रह्मीं हे माया ॥ ४९० ॥ "मा" शब्दें तेव्हां माया नसे । कीं ब्रह्मीं इतर कांहींच न दिसे । "या" शब्दें तथापि तेव्हां ब्रह्मीं वसे । तरी निघतसे मागुतीं ॥ ९१ ॥ नसोनि इच्छा किरणीं । जळाभास उपजे ऐसी निर्गुणीं । इच्छा नसोनि कारणरूपिणी । कार्याभिमुख माया प्रकटते ॥ ९२ ॥ ते समर्थी निर्गुण । असोनिही निर्गुणपण । त्या मायेचा-

रूपिही होतें सगुण । त्रिगुण तेव्हां प्रकटती ॥ ९३ ॥ गुण तिन्ही आणि त्यांचे भाव । या कार्यरूपीं ते माया स्वयमेव । कारणरूपिणी वास्तव । समूळ मिथ्या खेळ इचे ॥ ९४ ॥ याकारणें धनंजया । हे ह्मणावी माया । त्रिगुणभावरूपें दुरत्यया । कधीं न तरवे ऐसी जाली ॥ ९५ ॥ गोंवी गुण त्रयाच्या भावीं । गुणमयी याकारणें ह्मणावी । शक्ति गुणशब्दाची पहावी । तो दोर ह्मणूनी अर्थ गुणशब्दाचा ॥ ९६ ॥ बंधनाचे प्रकार । फांसे दांवीं जाळीं इत्यादि इतर । यास साधन दोर । ते दोर संस्कृतीं गुण ह्मणावे ॥ ९७ ॥ त्रिगुणाचिया भावीं । जीवां संसारीं गोंवी । माया गुणमयी ह्मणावी । याकरितां ॥ ९८ ॥ ऐसी गुणमयी माया । आणि अत्यंत दुरत्यया । दुरत्यया ऐसी कीं ईस तराया । शक्त नव्हे कोणीही । ॥ ९९ ॥ कीं जरी हे सत्य असती । तरी नावा घालूनि तरली जाती । प्रलयसूर्यें शुष्क होती । सांपडती पायवाट ॥ ६०० ॥ धरूं जातां न सांपडे । धरणार अधिक फांसीं पडे । जों जों पाहेल तों तों बुडे । प्रवाहीं ईच्या ॥ १ ॥ ईमाजी जो बुडाला । बुडालों न वाटे त्याला । तरलों ह्मणे याही बोला । बोले बुडाला तोही दिसे ॥ २ ॥ सत्यलोकादिपर्यंत । बुडोनि सेवाळले अत्यंत । तरले ह्मणूनि तेथपर्यंत । चढले घसरले तेही तोंडघसीं ॥ ३ ॥ वासनासमीरें चंचळ । उठती कामनेचे कल्लोळ । धारं अहंकाराची लोळ । अत्यंत करी ॥ ४ ॥ काम क्रोध तिमिंगिलें । गिळिती चर्वळिती प्रबळ । लोभ नक्र अमंगळ । मिठी घाली न सोडी सर्वथा ॥५॥ मद मत्सर भुजंग । डसती वेष्टूनि सर्वांग । सर्व विषयझेंडू लागतां श्रीरंग । वांचे नये जो तारणार इजपासूनी ॥ ६ ॥ हे नदी तराया उपाय । जरी अर्जुना ह्मणसी काय । तरी हेचि माझे दोन्ही पाय । इतर उपाय ते अपाय अवघेही ॥ ७ ॥ " मामेव ये प्रपद्यंते " ह्मणोनी । यांत या एव शब्दें करूनी । इतर कोणी आपणावांचूनी । तारक नाहीं हें सूचवी ॥ ८॥ ऐसें कां ह्मणसी धनंजया । तरी दैवी आणि मम माया । या दों गोष्टींकरूनियां । निमित्त येविषयीं बोलतों ॥ ९ ॥ कीं सर्वांत थोर देव । तो अर्जुना मी स्वयमेव । त्या माझी शक्ति वास्तव । दैवी ह्मणावी ॥ ६१० ॥ मी देव माझी दैवी । हे माया दैवी ह्मणावी । यावरूनि हे जाणावी । कीं असे मजआधीन ॥ ११ ॥ मजआधीन माझी माया । या कारणें धनंजया । इच्या पाशापासूनि सोडावया । समर्थ मी एक ॥ १२ ॥ यालागीं मातेंचि भज-

१ धारा. २ लाटा. ३ प्रवाह. ४ मोठे मासे.

ती । ते माया नदीतें तरती । ज्यास पाय माझे नाव होती । ते बुडती हें घडेना ॥ १३ ॥ आतां यानंतर श्लोक । तो कां बोले उत्तमश्लोक । त्याचें निमित्त सुज्ञ लोक । परिसोत आधीं ॥ १४ ॥ पूर्वश्लोकीं माया । नदी वर्णूनि दुरत्यया । बोलिला तीतें तरावया । उपाय एक ॥ १५ ॥ कीं आपण जगज्जीवन । धणी इचा आपण हे आपले आधीन । ह्मणूनि मातेंचि भजती जन । तेचि तरती या मायानदीतें ॥ १६ ॥ ऐसें बोलतां भवभंजन । संतुष्ट जाला अर्जुन । कीं आतां सर्वजन । तरतील या मायानदीतें ॥१७॥ कीं हे गोष्टी आजिवरी । ऐसी कळली नव्हती बरी । यातें भजोनि याउपरी । तरतील सर्व ॥१८॥ हा त्याचा मनोभाव । समजोनि साक्षी देवाधिदेव । हें खरें परी पापी मानव । न भजती मज ह्मणे या श्लोकीं ॥ १९ ॥

॥ श्लोक ॥ न मां दुष्कृतिनो मूढाः प्रपद्यंते नराधमाः ।
माययापहृतज्ञाना आसुरं भावमाश्रिताः ॥ १५ ॥

॥ टीका ॥ अगा मातें भजते । तरी सर्व जन निश्चयेंचि तरते । हें प्रकट परी अंध होते । दृष्टि रविमंडळीं दिवांधाची ॥ ५२० ॥ अगा हे दुष्कृती पापी । ते हें ऐकती जाणती तथापी । माझें नाम सोपें तेंही कदापी । न आणिती वाचे ॥ २१ ॥ गोड अत्यंत शर्करा । ते कडू लागे पित्तातुरा । तैसा मूढा पापिया पामरा । गोड न वाटें मी सेव्य ॥ २२ ॥ दुष्कृता पापाचिया कोटी । ज्या पापियाच्या पोटीं । त्याचिया हृदयांत अगा किरीटी । वास माझा केंवि घडे ॥२३॥ सर्वत्र मी व्यापक असें । ते नाहींच जेथें मी नसें । परी सेव्य होऊनि हृदयीं वसें । पुण्यें अगण्यें करूनी ॥ २४ ॥ अग्नि असे काष्ठमात्रीं । परी मथिता आयता अग्निहोत्री । तैसा व्यापक हृदयेशतपत्रीं[1] । भजती त्यांचिया वसतसें ॥ २५ ॥ परी पुण्य अगण्य ज्यांचिया पदरीं । भजनेच्छा वसे त्यांच्या अंतरीं । जे दुष्कृति पापी कोणे परी । माझें भजन त्यांला नावडे ॥ २६ ॥ हृदयांत इत्यादि भाव । तो ह्मणे देवाधिदेव । कीं जे दुष्कृति अधम मानव । ते पापी मातें न भजती ॥ २७ ॥ जे केवळ पशुसम । त्यांतें एथें पुरुषोत्तम । न निंदी कीं ते नराधम । ह्मणूनि न ह्मणे तयांतें ॥ २८ ॥ आणि "माययापहृतज्ञानां" आणि "आसुरं भावमाश्रित" ह्मणे ज्या जनां । या शब्दीं सूचवी अर्जुना । कीं केवळ पशुही ते नव्हती ॥ २९ ॥ कीं स्वहितविषयीं तरी तत्पर । ह्मणूनि ह्मणावे ते नर । परी नरांत अधम कीं सादर । माझिया

---

१ हृदयकमलीं.

भजनीं न होती ॥ ५३० ॥ मुख्य फळ मोक्ष । मोक्षप्रद अंबुजनाभ अंबु- जाक्ष । ऐसें कळोनिही काम्य पक्ष । धरिती धरूनि भाव असुरांचा ॥३१॥ करितां मुकुंदभजन । मुक्ति निश्चय ऐसें ज्ञान । असोनि झाले अज्ञान । कीं तें ज्ञान हरिलें मायेनें ॥३२॥ मोक्ष विषयापलीकडे । तो मोक्ष त्यांतें नावडे । ज्यांच्या मनाची उडी पडे । विषयांचि वरी ॥३३॥ दृष्टि देऊनि विषयावरी । मोक्ष आणि मोक्षप्रद हरी । टाकूनि काम्यकर्माच्या कुसरी । काम्यफळें श्रेष्ठ बोलती ॥३४॥ ऐसें असोनि हरिलें ज्ञान । मायेकरूनि जाले अज्ञान । दिवांधा असोनि नयन । सूर्य न दिसे ॥३५॥ देह मी ऐसा भ्रम । मायेकरूनि प्रथम । मग आवडे विषयसंभ्रम । ह्मणोनि मुक्तिप्रदातें न भजती ॥ ३६ ॥ मा ह्मणजे नसे । या ह्मणजे जे नसोनि गवसे । तें प्रत्यक्ष एथें दिसे । देह मी ऐसें वाटतां ॥ ३७ ॥ देहावेगळा देहास जाणे । तो देह आपण ऐसें ह्मणे । न शिकतां न करितां अभ्यास बाणे । देहचि मी ह्मणोनी ॥ ३८ ॥ स्वप्नीं दिसे ऐसाच देह । तोही आपण निःसंदेह । वाटे आणि ऐसाच स्नेह । त्या देहाचाही आत्मत्वें ॥ ३९ ॥ जागा होतां तो नसे । तैसा आत्मत्वेंचि हा देह दिसे । स्नेह तैसाच असे । याहि देहीं ॥५४०॥ मी काय तें शरीर । किंवा हेंचि कलेवर । ऐसा विचार कोणी चतुर । करितां दिसेना ॥ ४१ ॥ हा देह वाटे जैसा । तोही आपणचि ह्मणोनि वाटे तैसा । परी एथें विचार न कळे ऐसा । कीं दोन्ही नव्हे आपण ॥ ४२ ॥ जरी जागृति देह आपण । तरी तो आपण ही न वाणती खूण । तेव्हां दोन्ही आपण नव्हे ऐसी खूण । न कळे मोह हा मायेचा ॥ ४३ ॥ देह मी ऐसें ह्मणे । तो काय देहास देहचि जाणे । तरी शव कां आपणातें नेणे । मी देह ह्मणोनी ॥ ४४ ॥ एवं देहावेगळा आपण । ऐसी विवेकें जो धरी आठवण । तोंपर्यंत देहात्मपण । विश्व धुंडितां न सांपडे ॥ ४५ ॥ दोर जोंवरी दिसे । सर्प तोंपर्यंत नसे । एवं मी देह ऐसा प्रत्यय वसे । सर्प दोरीं जे रीती ॥ ४६ ॥ देह तों आ- पण नसे । आणि देह मी प्रत्यक्ष ऐसें दिसे । प्रत्यक्ष हे माया वसे । प्रति शरीरीं ॥ ४७ ॥ मनुष्य पक्षी पशु कृमी । सर्वांस वाटे देह मी । विषय- वासना या मायाभ्रमीं । वसतसे ॥ ४८ ॥ वेदशास्त्रें वाचूनी । मोक्षप्रद हरि ऐसें कळोनी । विषयसुखलालसा धरूनी । सकाम जाले ॥ ४९ ॥ इतर देवतांतें भजती । काम्यफलार्थ त्यांतें यजिती । ज्ञान असोनि अज्ञान होती । मायेकरूनि ते ऐसे ॥ ५५० ॥ अत एव मूढ जाले । शास्त्रें वाचून मोहले । सहज मूढ ते भले । हे मायाहतज्ञान पढतमूर्ख ॥ ५१ ॥ टाकूनि विष्णु

भजन । करिती क्षुद्रदेवतायजन । असुररीतिपूजन । ते करिती ॥ ५२ ॥ वेद वेदोक्त कर्म । असुरांतें असे आणि स्वधर्म । परि भूतदयेचें वर्म । नसे तयां ठाउकें ॥ ५३ ॥या भावें ह्मणे देव । कीं ते धरोनि असुरभाव । मी जो देवाधिदेव । त्या मातें न भजती ॥ ५४ ॥ कीं असुरभाव ज्याला । हिंसात्मका क्रिया घडे त्याला । शास्त्रबोध ज्यांचा व्यर्थ गेला । मायेंकरू-नी ॥ ५५ ॥ कारण यास सुकृत । कीं जे दुष्कृति पापी अत्यंत । त्यांचेंचि ऐसें सूचवूनि वर्णी भगवंत । हृतज्ञानत्व असुरत्व ॥ ५६ ॥ " एषां त्वंतग-तं पापं " ह्मणोनी । पुढें इत्यादि भगवद्वचनीं । याच अध्यायांत याच प्रक-रणीं । होईल निर्णय ॥ ५७ ॥ कीं नाशिलें ज्याचें पाप । जे पुण्यवंत नि-ष्पाप । ते गुरु देव मायबाप । मातेंचि मानिती ॥ ५८ ॥ गर्भवास जरा मरण । यापासूनि सुटावया माझे चरण । दृढ धरोनि श्रवण कीर्तन स्मरण । ते निष्पाप माझेंचि करिती ॥५९॥ ते ब्रह्म अध्यात्म कर्म । सर्व मीच असें सधर्म निर्धर्म। माझें ज्ञान पावतील हें वर्म । याच प्रकरणीं याच अध्यायांत बोलेल ॥५६०॥ कीं अभक्ताचें ज्ञान । ज या मायेनें हरोनि केलें अज्ञान । ते माया असोनिही पुण्यवंत जन । मातेंचि भजती ॥ ६१ ॥ माझ्या भज-नाच्या प्रतापें । तरोनि मायानदी तपती तपें । प्रस्तुतीं ह्मणे बहुजन्मपापें । ज्यांच्या ग्रंथीस ते पापी मातें न भजती ॥ ६२ ॥ एवं भगवद्भजन । न करिती ते पापीजन । ते ज्ञान असोनि मायाहृतज्ञान । मूढ नराधम असें स्पष्ट या श्लोकीं ॥ ६३ ॥ आतां या श्लोकानंतर । चतुर्विध भक्त सर्वेश्वर । वदेल त्यांचें निमित्त सुज्ञ चतुर । परिसोत आधीं ॥ ६४ ॥ कोणी ह्मणती हरी । मोक्षचि देतो परी । काम्यफलसिद्धि न करी । ह्मणोनि इतरांतें भ-जावें ॥ ६५ ॥ कोणी ह्मणती नसे द्वैत । हें भल्याच्या मुखें कळलें निश्चित । जो तें जाणे न ह्मणे अद्वैत । त्यास विष्णुभजनचि मुख्य कां ॥ ६६ ॥ कीं जाणों इच्छितो अद्वैत । त्याणें कां आरंभींच अवलंबावें द्वैत । विष्णुच थोर ह्मणतां अत्यंत । द्वैत करणें लागतें ॥ ६७ ॥ जें भजावें दैवत । तें ब्रह्मचि निश्चित । विष्णुच काय अत्यंत । थोर जाला ॥ ६८ ॥ कळावया निर्गुण । वेद बोलती भजावें सगुण । तें निर्गुणचि सर्व ह्मणती निपुण । जरी जें दैवत तें सगुण कां नव्हे ॥ ६९ ॥ यालागीं जिज्ञासु जन । त्यांसही नलगे विष्णुभजन । कोणी ह्मणती जालिया ज्ञान । किमर्थ भजन विष्णूचें ॥५७० ऐसे तिन्ही पूर्वपक्ष । हरावया अंबुजाक्ष । त्रिविधही स्वभक्त आहेत हा पक्ष । बोलतो आतां या श्लोकीं ॥ ७१ ॥

॥ श्लोक ॥ चतुर्विधा भजंते मां जनाः सुकृतिनोऽर्जुन ।
आर्तो जिज्ञासुरर्थार्थी ज्ञानी च भरतर्षभ ॥ १६ ॥

॥ टीका ॥ अगा जे पापी जन । त्यांतेंचि नसे माझें भजन । वरकड अज्ञान सज्ञान । सकाम निष्काम मज भजती ॥७२॥ न भजतीच दुष्कृती । वरकड जेथवरी सुकृती । ते त्रिविधही मातें भजती । त्रिविध तेचि हे चतुर्विध ॥ ७३ ॥ आर्त अर्थार्थी दोघे सकाम । जिज्ञासु मुमुक्षु निष्काम । तिसरा ज्ञानी आत्माराम । त्रिविधांत ऐसे चतुर्विध ॥७४॥ सकामांत भेद दोनी । एक आर्त एक अर्थार्थी ह्मणोनी । हे द्विविधही सकामभजनीं । द्विविध फळेंही पावती ॥ ७५ ॥ परि सकामही भजती मातें । अत्यंत सुकृती ह्मणावें त्यांतें । कीं भजन माझें घडेना ज्यांतें । ते दुष्कृती पूर्व श्लोकीं निषेधिले ॥ ७६ ॥ त्या पुढिलया श्लोकीं । सुकृती ह्मणोनी बोलिलों कीं । सकाम तेही सुकृती या लोकीं । जे भजती आपणातें ॥ ७७ ॥ आतां चतुर्विधांचा अर्थ । क्रमेंचि बोलिला यथार्थ । द्विविध सकामही कृतार्थ । भगवद्भक्त चौंमाजी ॥ ७८ ॥ पीडेस ह्मणती आर्ती । ज्यास पीडा त्यास आर्त ह्मणती । रोगादि पीडा ज्यास होती । आर्त ह्मणावें तयाला ॥७९॥ आर्त शब्द प्राकृतीं । उत्कंठेतें लोक बोलती । ज्यास उत्कंठा त्यास ह्मणती । आर्त ह्मणोनी ॥ ५८० ॥ हा शब्द जाणावा प्राकृत । गीता वेदवाणी संस्कृत । संस्कृतें आर्त तो निश्चित । रोगादि पीडा जयाला ॥ ८१ ॥ गीतेंत ह्मणतो भगवंत । जो रोगादि पीडेनें पीडिला अत्यंत । तो रोगादि पीडा हरू अनंत । ह्मणूनि आर्त मज भजतो ॥ ८२ ॥ जिज्ञासु ह्मणावें त्याला । कीं तत्त्व जाणावयाची इच्छा ज्याला । तो भजतो भक्तीनें मला । कीं मुकुंदा कळोंदे हें तुझें तत्त्व ॥ ८३ ॥ हा तत्त्वजिज्ञासु निष्काम । आर्त बोलिला तो सकाम । आतां अर्थार्थी तो धनकाम । अर्थ धन अर्थी अपेक्षी जो त्यातें ॥ ८४ ॥ आर्त अर्थार्थी दोघे सकाम । अनिष्टनिवृत्ति इष्टप्राप्ति दोनी सकाम । आतां चतुर्थ आत्माराम । अपरोक्षानुभवसंपन्न ॥ ८५ ॥ भरत अर्जुनाचा पूर्वज । अर्जुन ज्याचा वंशज । भरतर्षभा ह्मणूनि अधोक्षज । ह्मणे त्यातें ॥ ८६ ॥ कीं भरतकुळ तुझें श्रेष्ठ । परि त्यांतही तूं वरिष्ठ । कीं भीष्मादि झाले मद्भक्तिनिष्ठ । परि गीता तुवांचि आइकिली ॥ ८७ ॥ गीतेंत हें निर्गुण गुह्य । मद्भक्ताचा श्रेष्ठत्वनिश्चय । हें आइकोनि मद्भक्त होय । धन्य तो स्ववंशांत ॥ ८८ ॥ तें गीतारहस्य तुजकारणें । मज लागलें प्रकट करणें । पुढें बहुतांतें तारणें । असे श्रवण पठण

कूर्चे करवूनी ॥ ८९ ॥ ऐसे चतुर्विध भक्त वर्णिले । त्रिविध पूर्वपक्ष हरिले । त्यांत भाव जे जे दाखविले । समजावे ते ते ये रीती ॥ ५९० ॥ अगा मी मोक्षाचाच दाता निश्चित । कीं कांजी न पाजी जो पाजी अमृत । परि कांजीचाच याचक अत्यंत । त्यास काम्यफळ कांजीही पाजितों ॥ ९१ ॥ परंतु कांजीच ज्यापाशीं । तो मागितल्याही अमृत त्यासी । पाजूं शकेना ऐसियासी । ओळखी पडली कांजीनिमित्त ॥ ९२ ॥ मजपासूनी कांजी सांपडे । तरी ओळखी अमृतदातयासी पडे । मग मागतांचि प्राप्ति घडे । अन्यत्र अलभ्य अमृताचीही ॥ ९३ ॥ याकारणें पुण्य । जरी पदरीं असे अगण्य । सोडोनि इतर देवता कंटकारण्य । काम्यही कल्पतरूस मज जाण मागे ॥ ९४ ॥ काम्य नेदी हरी । ह्मणूनि बोलते वैखरी । ते खरी नव्हे कीं ते खरी । मी सर्व देणार कल्पवृक्ष ॥ ९५ ॥ जाणों इच्छितो अद्वैत । त्याणें भजावें भलतें दैवत । आणि मज थोर ह्मणतां लागतें द्वैत । हेंही बोलणें मूर्खाचें ॥ ९६ ॥ जें भजावें दैवत । तें ब्रह्मचि निश्चित । तरी पशु पक्षी चांडाळपर्यंत । ब्रह्मत्व सम सर्वत्रही ॥ ९७ ॥ न भजोनि ऐसियातें । उत्तमत्वें भजावें देवातें । तेव्हां अंगीकारणें लागलेंचि यातें । उत्तम मध्यम कनिष्ठत्व ॥ ९८ ॥ तेव्हां टाकूनि सर्व देव । कां न सेवावा देवाधिदेव । तो थोर ह्मणतां द्वैतभाव । कैसा लागतो ॥ ९९ ॥ ब्रह्म सर्वत्र सम । परि उपाधि उत्तम मध्यमाधम । ईश्वरोपाधि एकचि सगुण ब्रह्म । जीवोपाधि इतर सर्वही ॥ ६०० ॥ लोखंडाची बेडी । लोखंडाचेंच शस्त्रें तोडी । सर्व ब्रह्म परि माझीच गोडी । तत्त्व जाणों इच्छिती तयातें ॥ १ ॥ सर्वांहूनि उत्तमत्वें मातें । भजे आणि मज आधीं न देवतांतें । उपाधिभेदें मानी तयांतें । द्वैतावलंब कां घडे ॥ २ ॥ याकारणें सकाम । आर्त जिज्ञासु निष्काम । मातें भजती आणि आत्माराम । ज्ञानीही मज सेविती ॥ ३ ॥ ज्ञान जालियावरी । मज भजों नये तरी । गुरूसही त्याउपरी । भजों नये ॥ ४ ॥ गुरूतें ईश्वरातें । ज्ञान जालिया भजे त्यांतें । कांहीं प्रत्यवाय कीं त्याच्या मोक्षातें । विघ्न होणार ॥ ५ ॥ इत्यादि मूर्खाचे पक्ष । छेदी एथें अंबुजाक्ष । चतुर्विध भक्त आपले दक्ष । जेव्हां वर्णिले या श्लोकीं ॥ ६ ॥ आणि ज्ञानियाचें ज्ञान । तेंचि कोणी ह्मणती भजन । ज्ञान असोनि येथें सगुणसेवन । गोफाटोनि नेती हा अर्थ ॥ ७ ॥ तरी आर्ताचें आर्तपण । जिज्ञासूचें जिज्ञासुलक्षण । तैसें ज्ञानियाचें ज्ञान निर्गुण । सगुण भजन इतरांसही ॥ ८ ॥ एवं निर्गुणाचें ज्ञान । ज्यांस त्या पुरुषांसही सगुण-

भजन । हा सिद्धांत कमलनयन । बोलिला एथें ॥ ९ ॥ चतुर्विध ह्मणजे चौं प्रकारींचे । मातें भजती ऐसें स्वभावाचे । बोलोनि विध चारीही त्यांचे । बोले त्यांत ज्ञानविध चतुर्थ ॥ ६१० ॥ जे आत्माराम सिद्ध मुनी । साध्यांश कांहीं नसोनी । निर्निमित्त सगुणभजनीं । वर्तती हें श्रीभागवतीं सर्वत्र ॥ ११ ॥ हीं मागें जालीं निरूपणें । पुढें ऐसींच प्रकरणें । तेथें असेच हें बोलणें । असो ग्रंथ वाढेल बहु फार ॥ १२ ॥ भक्त वर्णिले चतुर्विध । त्यांत ज्यास सर्वात्मबोध । तो ज्ञानी श्रेष्ठ ऐसा प्रबंध । श्लोकत्रयाचा एथूनी ॥ १३ ॥ चतुर्विधांतही उत्तमपण । कां ज्ञानियास तरी त्यांचें लक्षण । आधीं बोलतो कमलेक्षण । या श्लोकीं ॥ १४ ॥

॥ श्लोक ॥ तेषां ज्ञानी नित्ययुक्त एकभक्तिर्विशिष्यते ।
प्रियो हि ज्ञानिनोऽत्यर्थमहं स च मम प्रियः ॥ १७ ॥

॥टीका ॥ अर्जुना त्या इतकियांत । ज्ञानी श्रेष्ठ चतुर्विधांत । कीं भक्तिरहस्य गुह्य अत्यंत । ज्ञान त्या रहस्याचें तया असे ॥ १५ ॥ भक्ति ह्मणजे आवडी । ते खंडों नये एक घडी । ऐसी अत्यंत जे गोडी । ते कळली तयातें ॥ १६ ॥ आवडी माझी तोच भक्त । जेव्हां नावडी तेव्हां अभक्त । ऐसा भक्त तो नित्य युक्त । कधीं न ह्मणवे ॥ १७ ॥ करितां ऐसा शोध । ज्यास सर्वात्मकत्वबोध । तो हें जाणे उरलें त्रिविध । ते या भक्तिरहस्यातें नेणती ॥ १८ ॥ एक नित्ययुक्तत्व स्मृतीनें । एक नित्ययुक्तत्व प्रीतीनें । एथें नित्ययुक्तत्व मधुसूदनें । बोलिलें भक्तीकरूनि ॥ १९ ॥ सर्वांहूनि आवडी । ते आवडी तुटेना एके घडी । आणि ज्याकरितां सर्वांची गोडी । तो प्रिय एक आत्माच आपला ॥ ६२० ॥ पुत्र दारा आणि इतर । अथवा मी सर्वेश्वर । आवडी इतकी यांचीही नर । धरी एका आपणाचकारणें ॥ २१ ॥ अपेक्षूनि आपलें कल्याण । ईश्वरातें भजे निपुण । मूर्ख तोही प्रयोजनावीण । कोणासही भजेना ॥ २२ ॥ एवं ईश्वराहूनि । आपली आवडी ह्मणोनि । भक्तिच न घडे भेदेंकरोनि । ईश्वराची ॥ २३ ॥ आधीं ह्मणावा भक्त । तेव्हां तोचि नित्ययुक्त । अन्यथा अयुक्त युक्त हा विचार होतो प्रस्तुत । तें भक्तपणचि भेदें घडेना ॥ २४ ॥ तोही आवडीकरोनी । तसा तरी भजतसे ह्मणोनी । भक्त ह्मणावा तरी मनीं । जोंवरी स्मृति तोंचि भक्त भलतसा ॥ २५॥ देव न स्मरे जे क्षणीं । तेव्हां प्रीति आपुलीच अंतःकरणीं । जे स्वप्रीति सप्रेम स्मरणीं । देवाचियाही ॥ २६ ॥ कीं त्या देवाच्या प्रीतीचें कारण । हेंच कीं हो आपुलें क-

ल्याण । तेव्हां आवडीनें त्याचें स्मरण । आपल्याच आवडीनिमित्त । ॥ २७ ॥ तैसी स्फुरतां आपुली आवडी । न पडे त्याच्या प्रीतीची उडी । आवडीनें न स्मरे ते घडी । भक्तियुक्त नव्हे तो ह्मणावा ॥ २८ ॥ ज्ञानी आणि भक्त । तो कोणे क्षणीं न अयुक्त । ज्ञानी या चौघांत नित्ययुक्त । ह्मणे श्रीकृष्ण या भावें ॥ २९ ॥ निर्निमित्त आत्मा आपला प्रिय । तोचि परमात्मा निःसंशय । ऐसिया अनुभवें त्यासि होय । सिद्ध नित्ययुक्तत्व ॥ ६३० ॥ नित्ययुक्तत्व भक्तीचें । घडों शके ज्ञानिया भक्तास साचें । नुसतिया ज्ञानियास कैंचें । नित्ययुक्तत्व ॥ ३१ ॥ नुसत्या निर्गुणींच आसक्त । त्यास तों न ह्मणवेच भक्त । तोही स्मृतीनें होऊं शके नित्ययुक्त । परी नित्यस्मृतियुक्तत्व साधेना ॥ ३२ ॥ उपासिती जे अव्यक्त । द्वादशीं त्यांस ह्मणेन भक्त । तेथें भक्तांतेंचि नित्ययुक्त सततयुक्त । कृष्णार्जुन दोघेही बोलती ॥ ३३ ॥ तोंपर्यंत युक्तपण । कीं जों असे स्मरण । ज्ञानी झाला तरी खूण । न साधे तया ॥ ३४ ॥ कीं पक्व योगी जाला । तरी देहप्रारब्धाचा असे उरला । एके क्षणीं तरी त्याला । पडेलचि विस्मरण ॥ ३५ ॥ जों देह तों अवस्था । निद्रा न सुटे सर्वथा । ज्या क्षणीं सुषुप्ति तेव्हां कथा । आत्मस्मृतीची हे कैंचीं ॥ ३६ ॥ सुषुप्ति पडतां तत्काळ । बुद्धीस विस्मृति तितका काळ । नित्ययुक्तत्व फटकाळ । ज्ञानियास भक्तीवांचुनी ॥ ३७ ॥ ज्ञानी सगुणीं नसे अनुरक्त । तथापि आत्मप्रीतींत नित्ययुक्त । परी सगुणभक्ति उपेक्षितां नव्हे भक्त । नित्ययुक्तत्व मग कैंचें ॥ ३८ ॥ आतां आत्माच आपला । जरी ज्ञानी न स्मरे त्याला । तरी तो बोलिला । नित्ययुक्त ॥ ३९ ॥ ऐसें बोलती तेही वेडे । कीं चित्तेंचि आत्मप्रत्यय घडे । स्मृति घडे विस्मृति पडे । चित्तेंचिकरूनी ॥ ६४० ॥ सुखदुःखांचा भोग । न चुके जों प्रारब्धयोग । क्षणभरी तरी वियोग । होय चिदात्मत्वस्मृतीचा ॥ ४१ ॥ प्रस्तुतीं भक्तिप्रकरण । भक्तिप्रीति हेंचि भक्तीचें लक्षण । जों अप्रीतीचें नाहीं उठाण । तों प्रीति विघडली न ह्मणवे ॥ ४२ ॥ जरी पडे विस्मृती । तरी नव्हे जों अप्रीती । तों विघडली न ह्मणवे प्रीती । अप्रीतिखंडत्व प्रीतीचें ॥ ४३ ॥ स्मृतीचें खंडत्व विस्मृती । प्रीतीचें खंडत्व अप्रीती । अप्रियाची जों असे स्मृती । तोंवरी प्रिय तो तेही न ह्मणवे ॥ ४४ ॥ तैसी ज्याची प्रीती । त्याची पडली जरी विस्मृती । त्या विस्मृतीनें जाली अप्रीती । ऐसें न ह्मणवे ॥ ४५ ॥ एवं या प्रकरणीं नित्ययुक्त । ह्मणजे नित्य प्रीतियुक्त । आत्मत्वें भजतां नव्हे अयु-

क्त । कीं प्रीतिखंडत्व अप्रीति नसे आत्मत्वीं ॥ ४६ ॥ हे ज्ञानियाविना । खूण या तिघांतें कळेना । याकारणें अर्जुना । त्या चतुर्विधांत ज्ञानी नित्य-युक्त ॥ ४७ ॥ चतुर्विधांत याकारणें । ज्ञानी विशेषें बोलावा या गुणें । कीं खंडभक्तिदोष त्या निपुणें । टाकिला कळतां आत्मत्व ॥ ४८ ॥ भक्ति करूनि सर्वदा युक्त । तो या प्रसंगीं नित्ययुक्त । " अत एव " एकभक्ति-युक्त । तो ह्मणे ऐसें याचिपुढें ॥ ४९ ॥ कीं चराचर समूळ । जो परमात्मा सकळ । तो स्वआत्माच केवळ । जो प्रिय सदा कधीं विटेना ॥६५०॥ ऐशा भक्तीनें युक्त । तो भक्त ह्मणावा नित्ययुक्त । याकारणें ज्ञानी आणि भक्त । विशिष्ट होतो तो चतुर्विधांत ॥ ५१ ॥ चौघांसही माझें भजन । परंतु ज्ञानियावेगळे त्रिविधजन । त्यांस नाहीं आत्मज्ञान । रहस्य नेणती भक्तीचें॥५२॥कीं मातें तयांचें चित्त । प्रिय मानी त्या जीवानिमित्त । कीं आरोग्य मोक्ष अथवा वित्त । तिन्ही सुखाकारणें जिवांच्या॥५३॥ आवडी आपली आधीं । मग माझी तेही कधीं । नावडी होय जधीं । विलंब लागे फलप्राप्तीतें ॥ ५४ ॥ क्षणांत रोग जावा । आर्त भजे धरूनि या भावा । विलंब होतां ह्मणे अहा देवा । कां न पावसी अद्यापि ॥ ५५ ॥ देवांस भजलों उदंड । परि गळत चालिला पिंड । आरोग्याचें दिसेना तोंड । काय करूं ॥ ५६ ॥ जेव्हां ऐसा तळमळी । तेव्हां अप्रीतीची उकले कळी । पुन्हा प्रीतीच्या लतेची मुळी । वाळों नेदी जळें भजनाचिया ॥ ५७ ॥ इत्यादि करितां शोध । नसतां एक निजात्मबोध । नित्ययुक्तत्व एकभक्तित्व तें त्रिविध । आर्त जिज्ञासु अर्थार्थी नेणती ॥ ५८ ॥ ज्ञानी जाणे या कळा । यालागीं त्याहूनि आगळा । कीं आत्मज्ञानें जिव्हाळा । सांपडला माझ्या भक्तीचा ॥५९॥ अगा सर्वही मातें भजती । त्यांसही असेच माझी प्रीती । परि जैसी त्यांची तेचि रीती । प्रीति माझी त्यांवरी ॥६६० ॥ कीं कल्पवृक्षस्वभाव । मी देवाधिदेव । ज्यांचा जैसा आणि जितका भाव । तैसा तितका माझा त्यांवरी ॥ ६१ ॥ ज्ञानियास अत्यंत मी प्रिय । कीं सर्वभूतीं आवडे मी अद्वय । आणि मी अनंत अव्यय । ह्मणोनि प्रेमें मज अनुभवी ॥ ६२ ॥ ह्मणोनि अर्जुना अत्यंत । प्रिय मज भक्त ज्ञानवंत । त्यावरी माझी प्रीति तीसही अंत । असेचिना ॥ ६३ ॥ प्रेमदृष्टि त्याच्या अनंत । मी जेव्हां दिसतसें भगवंत । मग त्याची प्रीति तीस अंत । केवीं दिसेल मजलाही ॥ ६४ ॥ सर्वही मी ह्मणोनी । भक्त मज पाहे ज्ञानी । उतराई होऊं काय देऊनी । भक्ता तया ॥ ६५ ॥ इत्यादि भाव पोटीं । तों

श्रीकृष्ण ह्मणे शेवटीं । कीं त्यास अत्यर्थ प्रिय मी किरीटी । प्रिय अत्यर्थ मज तो ॥ ६६ ॥ ऐसी परस्पर प्रीती । वदतां हे भक्ति सगुणाचीच हे रीती । सूचवी येथें श्रीपती । कीं प्रीतिधर्म निर्धर्मी असेचिना ॥६७॥ आणि ध्यावेंचि निर्गुण । भक्तिप्रियत्व जेथें तें सगुण । यालागीं भक्तिनिपुण । सगुणाचीच करिती ॥ ६८ ॥ परंतु सगुणाचें तत्त्व । न कळे जों न जाणे निर्गुणत्व । यालागीं ज्ञानवंता भक्ताचें महत्त्व । विशेषें एथें वर्णिलें ॥ ६९ ॥ आतां परस्परें प्रियत्व अत्यर्थ । ह्मणे या अत्यर्थाचा अर्थ । विचारील त्यास समर्थ । उत्तीर्ण नव्हे मी ऐसें सूचवी ॥ ६७० ॥ प्रयोजनातें ह्मणावें अर्थ । प्रयोजन अतिक्रमणें अत्यर्थ । हा शब्द दोंपरी समर्थ । दोहीं कडे सूचवी ॥ ७१ ॥ नसोनि कांहीं प्रयोजन । प्रीतियुक्त मजवरी मन । प्रिय अत्यर्थ मी जगज्जीवन । ऐशा भक्ता ज्ञानियातें ॥ ७२ ॥ कीं नापेक्षीं मुक्ती । तेव्हां काय इच्छील तुच्छ मुक्ती । आत्मत्वें ऐसी माझी भक्ती । प्रिय अत्यर्थ मी ऐसा ॥ ७३ ॥ आत्मा कळे तोंचिवरी । मुक्तीच्या इच्छेनें भक्ति करी । मग ओंवाळूनि टाकी दुरी । मुमुक्षा मोक्षेच्छा मजवरूनी ॥ ७४ ॥ भक्तिरसीं चित्त लावी । तो मोक्षसुखास वांकुल्या दावी । आतां कोण्या निमित्तें वदावी । भक्ति त्याची ॥ ७५ ॥ माझीच लागली गोडी । माझेचि ठायीं आवडी । आत्मत्वें भजे न सोडी। पाय माझे ॥ ७६ ॥ प्रिय अत्यर्थ मी ऐसा । निर्निमित्त भक्तीचा ठसा । परि येऊं देऊं मी कैसा । गर्भवासास ऐसियातें ॥७७॥ कैवल्य देऊं जरी । आवडी त्याची भक्तीवरी । ह्मणूनि वैकुंठनगरीं । स्वयें मी होतों त्याकारणें ॥७८॥ प्रलयकालीं ह्या मूर्ति नसती । तैसी मुक्तांसह वैकुंठाकृती । जैशा ह्या मूर्ति उमटती । प्रगटे मुक्तांसहित वैकुंठ ॥ ७९ ॥ देऊनि अपुनेरावृत्तिगती । ऋणी त्याचा मी मागुती । देऊनि वैकुंठीं स्वसंगती । उत्तीर्ण नव्हें ॥ ६८० ॥ अगा मज मारावया आली । ते मुक्तिपदास पूतना नेली । अघा बकादिकांस गति दिधली । सगळेंचि गिळिलें जिहीं मज ॥ ८१ ॥ द्वेषें भयें मत्सरें कितीएक । शिशुपाळ कंस पौंड्रक । वैरें मारिले अनेक । मुक्ति त्यांसही म्यां दिधली ॥ ८२ ॥ ज्ञानी भक्त ऐसा । मोक्ष त्यासही देऊंनि तैसा । उत्तीर्ण होऊं मी कैसा । भक्तवत्सल ॥ ८३ ॥ पाहतां परम पुरुषार्थ । तो त्यास देऊनिही अर्थ । उत्तीर्ण नव्हे मी समर्थ । प्रिय अत्यर्थ मज ऐसा ॥ ८४ ॥ कीं परम पुरुषार्थ दिधला । परि तो अर्थ

---

१ वेडावणें; चाळविणें. २ पुनर्जन्म नाहीं अशी गति देऊन.

देऊनिही मला । अर्थ दिधलासा नाहीं वाटला । प्रिय अत्यर्थ मज ऐसा ॥८५॥ भक्त ऐसा ज्ञानी । वर्णितां अर्जुन कांहीं मनीं । ह्मणीं शंकेल ह्मणोनी । यापुढें श्लोक प्रवर्त्तला ॥ ८६ ॥ कीं प्रिय ऐसा अत्यर्थ । तेव्हां ते तिघे काय व्यर्थ । ऐसें ह्मणीं मनीं मानील पार्थ । ह्मणूनि बोलतो हा श्लोक ॥८७॥

॥ श्लोक ॥ उदाराः सर्व एवैते ज्ञानी त्वात्मैव मे मतम् ।
आस्थितः स हि युक्तात्मा मामेवानुत्तमां गतिम् ॥ १८ ॥

॥ टीका ॥ अगा हे सर्वही उदार । उदार ह्मणजे उत्कृष्ट फार । कीं होतां सुकृतें अपार । मातें भजों लागले ॥८८॥ मी चंद्र ते चकोर । मीं मेघ ते मयूर । सर्वांहूनि थोर । कीं सर्वोत्तमातें भजती ॥ ८९ ॥ त्यांत कोणी सकाम । ते क्षण न लगतां होती अकाम । ज्ञान पावोनि आत्माराम । मोक्ष निश्चयें तेही पावती ॥ ६९० ॥ आर्त गजेंद्र नक्रें धरिला । त्याणें धांवा माझाच केला । म्यां त्यांस मोक्षही दिधला । सोडवूनि नक्रातें ॥ ९१ ॥ मज गोपिका कामेंचि भजल्या । माझ्या सौंदर्यावरीच रिझल्या । सुरतलालसेनेंचि भिजल्या । माझिया प्रेमरसें ॥ ९२ ॥ रासक्रीडाप्रसंगीं । मज लंपट मानोनि रतिरंगीं । गोपिकांहीं कांहीं अंतरंगीं । गर्व केला ॥ ९३ ॥ ह्मणोनि पावलों अंतर्धान । तों वियोगें अतिशय घडलें ध्यान । मद्रूप जालिया नृत्य गायन । करूनि खेळोनि लीला माझिया ॥ ९४ ॥ मी अक्रूरसंगें । मथुरेस गेलों त्या प्रसंगें । विरहें ध्यातां अंतरंगें । वेडयाच जाल्या ॥ ९५ ॥ त्या मजकारणें सकामा । परंतु मज वाटल्या निष्कामा । कीं मूर्ति माझ्या विश्वाभिरामा । परमहंसासही आवडती ॥ ९६ ॥ ह्मणोनि आत्मज्ञानकळा । आणि आत्मयोगरीती सकळा । मी उद्धवमुखें बोधोनि अवळा । कुरुक्षेत्रीं स्वमुखेंही बोधिल्या ॥ ९७ ॥ बाळ होऊनि मजला । पदाकारणें शरण आला । ध्रुवपद दिधलें मी त्याला । परमपदचि ज्यातें याउपरी ॥ ९८ ॥ एवं अर्जुना जो मजला । कोण्या निमित्तें जरी भजला । तो मोक्षातेंचि पावला । सहज महिमा हाचि माझा ॥९९॥ रांधावया अन्न नर । पेटवी जरी वैश्वानर । तरी सीततमभयहर । होणार निश्चयें तो ॥ ७०० ॥ शाक रांधूनि पाला । दिव्य औषधीचा भक्षिला । तोही दावीच गुण आपुला । मी तों सर्वोत्तम सर्वेश देवाधिदेव ॥१॥ जरी सकाम भजती । तरी मोक्षातें पावती । कीं क्षण न लगतां होती निष्कामही ॥ २ ॥ अमृतफळाचा वेल । लावूनि निपतांच तोडी फूल । तें

न तोडी तेव्हांच अमोल । अमृतफळ तो वेल दे तयातें ॥ ३ ॥ विषवल्लीचें पुष्पफल । सर्वही अनर्थमूळ । अंगणीं अमृतफलवेल केवळ । धन्य तो होय न तोडितांच पुष्पातें ॥ ४ ॥ मोक्षफल काम्य फूल । दोन्ही देणार मद्भजनवेल । काम्यफळ न इच्छितांच होईल । मोक्ष मद्भजनशीळातें ॥५॥ रायाचे पोटीं उपजला । बाळपणीं राज्य न लगे त्याला । तरुणपणीं न अपेक्षितां जाला । आयता सार्वभौम ॥ ६ ॥ दरिद्र्याचा बाळ । बाळपणींही फटकाळ । आला तरुणपणाचा काळ । तरी काय देणार तो बाप त्या पुत्रातें ॥ ७ ॥ एवं सकामही भजे मला । तरी मनीं धरितांचि मोक्ष त्याला । इतर देवतोपासकाला । मुक्ति नसेच मुक्तिही फटकाळ ॥ ८ ॥ अनेक रीति मृत्युपरिहार । हिरण्यकशिपु मागे वर । चुकवूनि तितके प्रकार । नृसिंहें नखें सांजे द्वारीं अंकीं विदारिला ॥ ९ ॥ ऐसे ब्रह्मादिकांचे वर । आणि सकामही जे मत्पर । अढळपद पावूनि परात्पर । कैवल्यपदही पावले ॥ ७१० ॥ एवं सकामही मत्पर । ते सर्वही उदार । ह्मणूनि इत्यादि भावें सर्वेश्वर । ते त्रिविधही श्रेष्ठ बोलिला ॥ ११ ॥ ते त्रिविधही उदार । परंतु ज्ञानियाचा बडिवार । अत्यंत तो वारंवार । बोलावासाच वाटे अगणितत्वें ॥ १२ ॥ ह्मणूनि ह्मणे हरी । कीं ते त्रिविधही उदार परी । नये ज्ञानिया भक्ताची सरी । कीं तो आत्माच केवळ ॥ १३ ॥ लोकांसारिखा तोही । प्रारब्धें वर्ततां दिसे देहीं । ह्मणूनि महिमा त्याचा कांहीं । नेणती लोक नेणते ॥ १४ ॥ परि आईक माझें मत । कीं माझिया मतें निश्चित । तो आत्माच अद्वय सर्वगत । अगा अर्जुना ॥ १५ ॥ जन आपणासारिखा । ते मानिती यालागीं आणिका । महिमा त्याचा न कळे एका । मजवांचूनी ॥ १६ ॥ ह्मणूनि ह्मणे माझें मत । कीं तो आत्माच निश्चित । ज्ञानी भक्त यालागीं अत्यंत । त्या सर्वश्रेष्ठा त्रिविधापरीसही ॥ १७ ॥ ऐसा ज्ञानी आत्माच निखळ । ह्मणतां वाटलें शंकास्थळ । कीं आत्मा नेणे तोही केवळ । आत्माच असे ॥ १८ ॥ अज्ञानें आत्मा नव्हे साच केला । ज्ञान होतांच आत्माच जाला । ह्मणीं अर्जुनादिकां श्रोतयांला । वाटे ऐसें ॥ १९ ॥ आतां अविद्येकरूनी । देहास जो तो आत्माच मानी । यानें आत्मा ओळखिला ह्मणोनी । आत्मा ह्मणावा ॥ ७२० ॥ तरी आत्मा कळोनिही । चित्त आत्मत्वीं योजिलें नाहीं । त्यास वाटेच देहीं । आत्मता पूर्वसंस्कारें ॥ २१ ॥ तोही आत्मा ह्मणोनि । न ह्मणवे जरी आत्मज्ञानी । सदा दृढ अभ्यासेंकरूनी । मोडी देहात्मता तोचि आत्मा ॥२२॥ चित्त सर्वदा स्मरे आत्मा ।

तो ह्मणावा युक्तात्मा । ह्मणूनि ह्मणे श्रीकृष्ण परमात्मा । कीं तो युक्तात्मा आत्मा ह्मणतो यास्तव ॥ २३ ॥ युक्तात्मा ह्मणतां ये रीती । असे निर्गुणोपासकांतेंही हे स्थिती । ज्ञानी आणि सगुणभक्त असती । महिमा त्यांचा ये स्थळीं ॥ २४ ॥ ह्मणूनि ह्मणतो देव । कीं " आस्थितः स हि युक्तात्मा मामेव " । ह्मणजे मी जो देवाधिदेव । तो युक्तात्मा या मातेंचि भजतो ॥ २५ ॥ निर्गुणयोगींही युक्त । तो युक्तात्मा आणि अनुरक्त । मज सगुणीं ह्मणूनि मद्भक्त । दाखवूनि ऐसीं दोन्हीं बोलिला ॥ २६ ॥ कीं योग योजीत असोनी । भक्त सगुणातें समपत्वें जाणे ह्मणोनी । तूंही जाण ऐसें अध्यायादिश्लोकें करूनी । अर्जुनातें अपरा प्रकृति बोलिला ॥ २७ ॥ ये स्थळीं ते दोन्ही प्रकार । भक्ताचे सांगे सर्वेश्वर । कीं जो मी सगुण साकार । त्या मातें युक्तात्मा तो भजतसे ॥ २८ ॥ एवं युक्तात्मा होऊनी । मातेंचि भजे ह्मणोनी । ते त्रिविध थोर परि त्यांहूनी । हा थोर कीं आत्माच हा ॥ २९ ॥ चतुर्विधांत हा ज्ञानी । केवळ आत्माच युक्तात्मा ह्मणोनी । थोरपण तेव्हां इतकियाचवरूनी । आतां सगुणभजनीं विशेष काय ॥ ७३० ॥ ऐसें पुसेल येथें श्रोता । ह्मणूनि थोरपण जें तत्त्वता । तें स्पष्ट येथें अनंता । बोलणें लागलें ॥ ३१ ॥ कीं भक्तींचेंचि त्यास कोड । भक्तीपुढें मुक्तीही न वाटे गोड । ऐसें निर्निमित्त प्रेम अवघड । नसे निर्गुणोपासकां ॥ ३२ ॥ पूर्वी भक्तमहिमा देव । बोलतां निघाला जरी हा भाव । तें स्पष्ट आतां देवाधिदेव । येथें चतुर्थचरणीं बोलतो ॥ ३३ ॥ ॥ चतुर्थचरण ॥ मामेवानुत्तममां गतिं ॥ टीका ॥ येथें " मामेव " ह्मणोनी । मां एव शब्दें करूनी । मातेंचि भजतो यावरूनी । न भजे इतरां हें दिसे ॥ ३४ ॥ तरी हे निपट पलीकडे । या वेगळें त्रिविध त्यांसही घडे । कीं न पाहोनि इतरांकडे । मज भजती उदार यालागीं ॥ ३५ ॥ येथें ' एवं ' शब्दाचा हा अर्थ । कीं मोक्षानिमित्तही तो कृतार्थ । मज न भजे यथार्थ । मातेंचि भजे ह्मणतो ह्मणोनी ॥ ३६ ॥ बंध मिथ्या जैसा । मोक्षही लटिकाचि तैसा । मजहूनि तो त्यास कैसा । आवडेल ॥ ३७ ॥ आवडी मुख्य मोक्षाकडे । तदर्थ ईश्वर आवडे । त्यास भक्त ह्मणती ते वेडे । तो भक्त आपुल्या मोक्षाचा ॥ ३८ ॥ उदरार्थ सेवा नृपाची । ते उदरसेवा राजसेवा नव्हे साची । एवं मोक्षार्थ नव्हे सेवा याची । केवळ मातेंचि हा भजतो ॥ ३९ ॥ हा अर्थ न दिसे विशद । ह्मणूनि " अनुत्तमां गतिं " ऐसें गोविंद । ह्मणे कीं माझ्या भक्तीचाच त्यास आनंद । गति उत्तम न मानी

मजहूनी ॥७४०॥ न परते जेथूनि मागुती । तेचि एक ह्मणावी गती । इतर गति तितक्या दुर्गती । कीं च्यवतां दुःख तें चुकेना ॥ ४१ ॥ परम गति मुक्ति ऐसी । तेही मजहूनि उत्तम तयासी । न वाटे कीं जयासी । गोड त्याहूनि मी वाटें ॥ ४२ ॥ ज्या मजहूनि उत्तम गती । वस्तुता नाहीं तो मी अनुत्तमगती । त्या मोतेंचि तो भजे सुमती । त्याचें थोरपण त्या करितां ॥ ४३ ॥ पहिली होती जरी मुमुक्षा । सर्वात्मभक्ति त्या दक्षा । गोड वाटतां मग मोक्षा । न अपेक्षी ऐसा जो थोर ॥ ४४ ॥ मोक्षाकारणेंच तोंडवासी । न भजे मज सगुण सर्वेश्वरासी । त्या निर्गुणमात्र उपासकासी । सरी कैसी याची येणार । ॥ ४५ ॥ प्रथम दोघांसही मुमुक्षा । दोघे भजती अंबुजाक्षा । ज्ञान होतां सगुणभजनपक्षा । एकें सोडिलें ॥ ४६ ॥ एकें ज्ञान होऊनिही । सगुणभजन सोडिलें नाहीं । तो भक्ति गोड लागतां कांहीं । चाड मोक्षाचीही धरीना ॥ ४७ ॥ दोघांसही मोक्ष । परि निर्गुणोपासका बहुत सापेक्ष । यास गोड अंबुजाक्ष । नलगे ह्मणे मोक्षसिद्धी ॥ ४८ ॥ काकुळतीनें दरिद्री जन । दातया मागती भोजन । प्रार्थूनि आणिले महाजन । तेंचि तेही जेविती ॥ ४९ ॥ अन्न दोघांचें समान । परि महाजनां अधिक सन्मान । ऐसा मोक्षसुखनिधान । सम निर्गुणोपासकां आणि भक्तां ॥ ७५० ॥ एवं चतुर्विध भक्तही थोर । त्यांत ज्ञानी भक्त थोर फार । तो कां तरी ऐसा विचार । त्याच्या थोरपणाचा वर्णिला ॥ ५१ ॥ ज्ञान होऊनि केवळ । सगुणभक्ति ऐसी प्रांजळ । तो दुर्लभ कीं बहुत जन्मफळ । ऐसें ह्मणतसे या श्लोकीं ॥ ५२ ॥

॥ श्लोक ॥ बहूनां जन्मनामंते ज्ञानवान्मां प्रपद्यते ।
वासुदेवः सर्वमिति स महात्मा सुदुर्लभः ॥ १९ ॥

॥ टीका ॥ पुण्यें करितां जन्म कोटी । ज्ञानेच्छा उपजे पोटीं । त्या ज्ञानसाधनीं अगा किरीटी । लोटती बहुत जन्म ॥ ५३ ॥ ऐशाही बहुत जन्माचिया । अंतीं अगा धनंजया । ज्ञान होऊनि जया । भक्ति माझी ॥ ५४ ॥ तो दुर्लभ अत्यंत । कीं मी ईश्वरेश्वर भगवंत । त्या मज भजतो ज्ञानवंत । सर्व मी वासुदेव ह्मणोनि ॥ ५५ ॥ सर्वभूतीं माझा वास । तो मी वासुदेव जगन्निवास । इतका अनुभव जयास । तोचि तो ज्ञानी दुर्लभ ॥ ५६ ॥ ज्या माजी सर्व भूतांचा वास । ज्यांत सर्व भूतें तो जगन्निवास । वासुदेव परि भूताकार भास । ते तों माया ॥ ५७ ॥ तेव्हां वा-

---

१ च्यवतां.

सुदेव सकळ । हें नेणे जो ज्ञानीच केवळ । ज्ञानी आणि भक्ति पुष्कळ । तो वासुदेव सर्व हें जाणे ॥ ५८ ॥ कीं माया आणि निर्गुण । दोन्ही मिळोनि सगुण । तो साक्षी सर्वज्ञ निपुण । विश्वरूपें आपणातें कल्पितो ॥ ५९ ॥ हें नुसता ज्ञानी तोही जाणे । परि सगुण भजनावीण हें न बाणे । ईश्वररूपें भक्त शहाणे । पाहती विश्व ॥ ७६० ॥ यांत काय भजावें काय न भजावें । काय ध्यावें काय त्यजावें । भास मिथ्यात्व कां वर्जावें । सर्वही वासुदेव ॥ ६१ होऊनि नाना आकार । निर्गुणीं न लागे कांहीं विकार । इतकियाच कारणें विचार । कळला असावा मायेचा ॥ ६२ ॥ तथापि तो शक्त ते शक्ती । तो अव्यक्त ते त्याची व्यक्ती । ऐसें चित्तीं धरोनि भक्ती । करी सर्व वासुदेव ह्मणोनी ॥ ६३ ॥ आपण आणि भजन आपलें । देखिलें आणि न देखिलें न ऐकिलें । सगुण निर्गुण सकळ एकलें । वासुदेवाख्य तत्त्व जो पाहे ॥ ६४ ॥ आणि वासुदेवचि सर्व ह्मणे । कीं जगत्कारण वासुदेवचि ऐसें जाणे । कीं ज्याच्या प्रसादें बाणे । सर्वही तो ह्मणोनी ॥ ६५ ॥ निर्गुणोपासकाचा भाव । "सर्वं खलु ब्रह्मैव" । हा ह्मणे सर्व वासुदेव । जो सर्वसाक्षी सर्व कल्पितो ॥ ६६ ॥ निर्गुण आणि सगुण । दोन्ही जगत्कारण । इतर देवतांस कार्यपण । कारणत्व नसे ॥ ६७ ॥ ह्मणतां सर्व कनक । अलंकार न उरे कोणी एक । मुद्रिका नव्हे मुकुटकुंडलादिक । सर्व मुद्रिका ह्मणतांही ॥६८॥ ऐसा भजो तो महात्मा । ह्मणोनि ह्मणे कृष्ण परमात्मा । कीं महाथोर त्याचा आत्मा । आत्मा ह्मणावें चित्तातें ॥६९॥ महाथोर साक्षी परमेश्वर । चित्त तन्मय ज्याचें तो नर । महात्मा ह्मणावा कीं सविस्तर । विश्व वासुदेव रूपें जो पाहे॥७७०॥ ज्याच्या मतें जगत्कारण । एक श्रीकांत नारायण । इतर देवतांतें कार्यपण । जाणे जरी कार्यें पाहे कारणत्वें ॥ ७१ ॥ जो भजे जें दैवत । तो तेंचि ह्मणे सर्व निश्चित । शाब्दिकत्व त्याचें अद्वैत । महात्मा सुदुर्लभ तो न ह्मणवे ॥ ७२ ॥ सर्व देवता एक । कीं सकळ अलंकार कनक । परि मुद्रिका मागतां किरीटादिक । न ये हाता तयाच्या ॥ ७३ ॥ जो मागे एक कनक । तो पावे मुकुटकुंडलादिक । भजतां वासुदेव एक । सर्वही देव वासुदेव ॥ ७४ ॥ तोचि जगत्कारण वासुदेव । बाप ज्याचा वसुदेव । तो उपदेशितो स्वयमेव । विश्ववंद्य हे गीता ॥ ७५॥ असो तें आतां ऐसा तो दुर्लभ । ह्मणोनि ह्मणे श्रीवल्लभ । कीं भाग्यें ज्यांस जाला सुलभ । ते त्यावेगळे न उरती ॥ ७६ ॥ तो दुर्लभचि मागुती । कीं कोणास न कळे ज्याची स्थिती ।

त्यांस त्याची कळली गती । कीं तोचि जे जाले ॥ ७७ ॥ भेटी त्यांच्या शरीराची न घडे । हें बोलणें अलीकडे । कीं जनकादिकीं पर्वत कडे । सेविले नसती ॥ ७८ ॥ कोणीं प्रारब्धें वनीं । कोणी प्रारब्धें जनीं । एवं देह न दिसे नयनीं । दुर्लभत्व ऐसें न ह्मणवे ॥ ७९ ॥ सु शब्दें शोभनपण । ह्मणिजे दुर्लभत्वाचा चांगला गुण । कीं सुलभ ज्यास त्यास आपण । करूनि मागुती दुर्लभ ॥ ७८० ॥ कीं तो कोणास भेटलाच नाहीं । देह भेटला तरी तितकाही । साडेतीन हातांच्या देहीं देही । अगा तो नव्हे कीं तो अनंत जगदात्मा ॥ ८१ ॥ तो स्वयें सर्वही परी । कळे तरी जरी अनुग्रह करी । अनुग्रह करितां नुरे उरी । वेगळेपणाची ॥ ८२ ॥ एवं जो त्या सुखांत मिळाला । तोही स्वयें तोचि जाला । पुन्हा दुर्लभ होऊनि उरला । तो जगीं ॥ ८३ ॥ ऐसें जें दुर्लभत्व । त्यास ऐसें सुदुर्लभत्व । कीं दुर्लभत्व देवूनिही सुलभत्व । परि तें दुर्लभत्व बहु बरें ॥८४ ॥ सुदुर्लभत्वीं हा भाव । येथें दावी देवाधिदेव । कीं त्याचें हें वैभव । संत शिष्य त्याचेचि जाणती ॥ ८५ ॥ एवं ज्ञानाविण । न कळे भक्तांची खूण । आणि तैशा भक्तांस जें थोरपण । तें नसे नुसतिया ज्ञानियातें ॥८६॥ आणि इतर उपासक जन । त्यांत ज्यांस हरीचेंचि भजन । ते थोर त्यांतही सर्वात्मकज्ञान । ते भक्त थोर अत्यंत ॥ ८७ ॥ आणि जे दुष्कृती । ते हरीतें न भजती । जे अनेक जन्म सुकृती । तेचि भजती मुकुंदातें ॥ ८८ ॥ ऐसा सिद्धांत जाला । कीं भगवंत ते दुष्कृती ह्मणोनि बोलता जाला । आपणास भजती तयातें ॥ ८९ ॥ आणि हरिभजनहीन जो मानव । तो बोलिला कीं असुरभाव । तेव्हां उपास्य ज्यास देवाधिदेव । ते दैवी संपत्तीचे हें सूचविलें ॥ ७९० ॥ स्पष्ट ऐसें बोलिला । तों संदेह कांहीं प्राप्त जाला । ह्मणूनि येथें आरंभिला । आणखी श्लोक ॥ ९१ ॥ तो संदेह ये रीती । कीं जरी दुष्कृती हरीतें भजती । तरी वेद शास्त्र पुराणें होती । सर्वही निरर्थक ॥ ९२ ॥ कीं वेद शास्त्रें पुराणें । प्रवर्त्तलीं याच कारणें । की स्वहित इच्छिती तिहीं करणें । भजन मुक्तिप्रदा मुकुंदाचें ॥ ९३ ॥ शुद्ध होऊनि सज्जनीं । नित्य नैमित्तिक सावधानीं । संध्योपासना प्रतिदिनीं । करा ह्मणोनि वेद ह्मणे ॥ ९४ ॥ श्रुति ॥ त्रीणि पदा विचक्रमे विष्णुर्गोपा अदाभ्यः। अतो धर्माणि धायन् । विष्णोः कर्माणि पश्यत ॥ श्रुत्यर्थ ॥ श्रुति ह्मणे तीन्ही भुवनें स्वचरणें । श्रीविष्णूनें आक्रमिलीं याकारणें । या विष्णूचे धर्म धरणें।

१ अस्तित्व.

धर्म धरूनि पाहणें कर्मे तयाचीं ॥ ९५ ॥ गोपा ह्मणूनि श्रुती । ह्मणते येथें जनांप्रती । गो शब्दें इंद्रियें जे पाळिती । गोप शब्दें ते घ्यावे ॥ ९६ ॥ कीं इंद्रियांचविण । न भजवे ब्रह्म सगुण। इतर साधन गुण । न लगती कांहीं ॥ ९७ ॥ असलिया वित्त । वित्तशाठ्य लागेल या निमित्त । वेंचावें मुख्य इंद्रियें चित्त । यावांचूनि न घडे सगुणभजन ॥ ९८ ॥ ह्मणूनि इंद्रियवंतांप्रती । अरे गोप हो ह्मणे श्रुती । कीं भजनसाधनें ज्यांस असती। ते तुह्मी हे आज्ञा वेदाची आइका ॥ ९९ ॥ कीं जे बधिर असती । काय हें सांगोनि त्यांप्रती । एवं जे हें न आयकती । बधिरही तेचि जाणावे ॥ ८०० ॥ असो ते अरे गोप हो धर्म । विष्णुचे धरूनि विष्णूचें कर्म । पाहा ह्मणूनि सांगे वर्म । वेद हिताचें जनाचिया ॥ १ ॥ विष्णूचे धर्म धरा । ह्मणजे त्याची उपासना करा । कीं त्याचीं कर्मे त्याच्या उपासनापरा । गोड वाटती तैसीं इतर न वाटती ॥ २ ॥ असो श्रुत्यर्थाचे चमत्कार । हें विधिवाक्य एतत्प्रकार । यावरूनि जाला निर्धार । कीं विष्णुच हा भजावा ॥ ३ ॥ इतरदेवताभजन । करा ह्मणूनि वेदवचन । न देखती नेत्र अथवा कान । न आइकती जनांचे ॥ ४ ॥ कोठें वेदीं ' यजामहे ' । कोठें वेदीं ' भजामहे ' । पाहतां यजन भजन शब्द हे । उपासकांचे ॥५ ॥ कोठें " विद्महे, धीमही " । जप करणारांचे बोलतेही । एवं वेद आपणाहूनि कांहीं । कोणास भजा ऐसें न ह्मणती ॥ ६ ॥ " यजामहे " ह्मणजे यजूं आह्मीं । " भजामहे " ह्मणजे भजों आह्मीं । परि अरे गोपहो तुह्मी । भजा ऐसें येथेंचि वेद बोले ॥ ७ ॥ भजा ह्मणे श्रुती । त्यास विधिवाक्य ह्मणती । एवं च वेदाज्ञा नसे ये रीती । भजा आणिका अमक्रियातें ह्मणूनी ॥८॥आज्ञा वेदांची ये रीती । स्मरतां श्रुत्यर्थ जाल्या स्मृती । आणि श्रुतिविरुद्ध स्मृति दिसती । तेथें श्रुति प्रमाण स्मृति ह्मणे ॥९॥ स्मृति ॥ श्रुतिस्मृतिविरोधे तु श्रुतिरेव बलीयसी ॥स्मृत्यर्थ॥ एक पक्ष बोले श्रुती । त्यासी विरुद्ध असली स्मृती । तेथें ऋषी बलवंत बोलती । श्रुतीतें ॥८१०॥ याकारणें श्रुती । विष्णुभजन जैसें बोलती । ऐशाच बोलती स्मृती । विरुद्धपक्षीं श्रुति बोले तें साच ॥ ११ ॥ हा भजनविषयीं श्रुतिस्मृतिविचार । वरकड महिमा वर्णीत अपार । आकारमात्रीं जें निराकार । त्यास लक्षूनि महिमा बोलती ॥ १२ । सद्वस्तु एक निर्विकार । तेंचि कल्पूनि नानाकार । श्रुति ऋषि बोलती ऐसा निर्धार । श्रुतिच बोलती ॥ १३ ॥ श्रुति ॥ एकं संतं बहुधा कल्पयंति ॥ आणिखी श्रुती ॥ एकं सद्विप्रा बहुधा वदंत्यग्निं यमं मा-

तरिश्वानमाहुः ॥ श्रुत्यर्थ ॥ सद्वस्तु एक । नानारूपीं नामें अनेक । विप्र बोलती व्यासादिक । अग्नि यम वायु इत्यादि ॥ १४ ॥ हा श्रुतिस्मृतिनिर्णय । परी भजनविधीचा निश्चय । विष्णुभजनींच सिद्धांत होय । श्रेष्ठ सत्त्वोपाधि मुक्तिप्रद ह्मणोनी ॥ १५ ॥ हा श्रुतिस्मृतिविचार सारा । आतां इतिहासपुराणांचा पसारा । ज्या पुराणाच्या अंगीं जो वारा । तें पुराण सांगे भजन त्याचेंचि ॥ १६ ॥ शेवटीं पुराणें सकळ । विचार हाचि वदती प्रांजळ । कीं सत्त्वोपाधि निर्मळ । मोक्ष भजनें तयाच्या ॥ १७ ॥ आणि या इतिहासपुराणांत । वेद पांचवा महाभारत । तेथें व्यास सत्यवतीसुत । ऐसें बोले ॥ १८ ॥ कीं जें येथें भारताभीतरीं । तेंचि असे पुराणांतरीं । येथें न वदे जे वैखरी । ते कोठेंचि नाहीं ॥ १९ ॥ व्यासवाक्य ॥ यदिहास्ति तदन्यत्र यन्नेहास्ति न तत्क्वचित् ॥ वाक्यार्थ ॥ कीं जें येथें असे । तेंचि सर्वत्र वसे । आणि जें येथें नसे । तें नसे कोठेंही ॥८२०॥ त्या या महाभारतीं । सर्वत्र ऐसीच व्यासभारती । या विष्णुमहिमश्रवणें उभारती । रोमांच देहीं संतांच्या ॥ २१ ॥ तत्रापि उपनिषद्वाणी । मथूनि आपण चक्रपाणी । परमहंसाच्या सुखाची खाणी । ते परमहंससंहिता गीता बोलतो ॥ २२ ॥ जो सिद्धांत एथें समर्थ । बोलेल तोचि अर्थ । वेदीं भारतीं पुराणीं यथार्थ । अन्यथा असेल तो अन्यथाचि ॥ २३ ॥ सकळ शास्त्रें ये रीती । भगवद्भजन मुख्यत्वें बोलती । ऐसें असोनि जे दुष्कृती । ते न भजती मुकुंदातें ॥ २४ ॥ ह्मणूनि एथें संशय । कीं तरी शास्त्रांचा प्रताप काय । कीं तें वाचूनि आइकोनिही पाय । न धरिती जगद्गुरू श्रीपतीचे ॥२५ ॥ आतां ह्मणावें ये रीतीं । कीं जे वेद शास्त्र पुराणें नेणती । ते हा महिमा काय जाणती । तरी वाचिलें पढलें तेंही असे ॥२६॥ ते पंडित ह्मणावे दुष्कृती । तरी वेदशास्त्र पुराणें वांया जातीं । तेव्हां जे असतील सुकृती । ते सुकृतेंच भजतील कां शास्त्र ॥ २७ ॥ कीं शास्त्र असे तें समर्थ । तरी दुष्कृतियांसही मानतां अर्थ । सुकृतचि समर्थ तरी किमर्थ । प्रवृत्ति वेदशास्त्रादिकांची ॥ २८ ॥ अथवा पुण्याचकारणें । प्रवर्तोत वेद शास्त्र पुराणें । विष्णुभक्ति सर्वाधिक्यपणें । व्यर्थ बोलती ॥ २९ ॥ या संशयाचें हें स्थळ । तत्परिहारार्थ मेघनीळ । शास्त्र समर्थूनि प्रांजळ । हेतु बोलतो अभजनीं या श्लोकीं ॥ ८३० ॥

॥ श्लोक ॥ कामैस्तैस्तैर्हृतज्ञाना प्रपद्यंतेन्यदेवताः ।
तं तं नियममास्थाय प्रकृत्या नियताः स्वया ॥ २० ॥

॥ टीका ॥ अगा वेदशास्त्रांचें प्रयोजन । कीं श्रवणपठणें व्हावें ज्ञान । मग सुकृती होती सज्ञान । हतज्ञान होती दुष्कृती ॥ ३१ ॥ ह्मणूनि जे हतज्ञान जन । ते न करिती माझें भजन । जो मी एक भवभंजन । आत्मा दैवत परमहंसांचें ॥ ३२ ॥ शास्त्र जनांचा मायबाप । ज्ञान देणें हा त्याचा प्रताप । परी उभें राहोनि पाप । करी हतज्ञान ॥ ३३ ॥ पाहोनि बरवा पती । मायबापें कन्या उजविती । परी ते वंध्यासुत तीतें न होती । पूर्वपापें ॥ ३४ ॥ दाता देऊं जाणे धन । मूर्ख करूं नेणे जतन । कोणी तें धनसाधन । करिती नरकदुर्गतीचें ॥ ३५ ॥ करी किंवहुना पर्जन्य । सर्वा जगासही धन्य । परि ऊखर भूमीस धान्य । अथवा तृणही कोठें उपजेना ॥ ३६ ॥ आतां शास्त्रें दिधलें ज्ञान । आणि पूर्वपापें केलें हतज्ञान । ऐसें ह्मणतांही मन । साशंक होतें श्रोतया जनाचें ॥ ३७ ॥ कीं वेदीं शास्त्रीं भरले । आणि ते अध्ययन नाहीं विसरले । तेही कैसे घसरले । श्रुतिशिखरापासूनी ॥ ३८ ॥ ऐशा शंकेचें स्थळ । ह्मणूनि ह्मणे मेघनीळ । कीं ज्ञान असोनिही खळ । हतज्ञान ते जाले ॥ ३९ ॥ कीं अन्यदेवतांच्या कामना । गोड लागल्या ज्याच्या मना । त्या त्या कामीं त्यांच्या ज्ञाना । हरूनि नेलें ॥ ८४० ॥ त्या देवतांचें भजन । त्या भजनाचें विधिविधान । कळों लागलें तेंचि ज्ञान । सार सर्व विद्यांचें मानिती ॥ ४१ ॥ नियम जे जे ज्या ज्या भजनीं । फलप्रद ते ते मानूनी । उक्त प्रकारें अनुष्ठूनी । भजती अन्य देवतांतें ॥ ४२ ॥ असोनिही ज्ञान । जाले कैसे हतज्ञान । तरी ते ऐसें ह्मणूनि समाधान । केलें जरी ॥४३॥ तरी उरलीच शंका कांहीं । कीं मोक्षासमान फळ नाहीं । आणि ऐसा मोक्ष तोही । न दे कोणी विना मुकुंद ॥ ४४ ॥ वेद वेदांत वाखाणिती । ते तों हे गोष्टी जागती । ऐसें असोनी बुद्धि नेणती । कैसी जाली ह्मणावी ॥ ४५ ॥ ऐसेंही असोनि ज्ञान । कैसे जाले हतज्ञान । तरी ऐसें ह्मणूनि समाधान । चतुर्थचरणीं करीतसे ॥४६ ॥ चतुर्थ चरण ॥ प्रकृत्या नियताः स्वया ॥ टीका ॥ अगा ज्याची जे नैसर्गिक मती । ती त्याची ह्मणावी स्वप्रकृती । कीं सोडितांही न सुटती । सहज स्वभाव ॥ ४७ ॥ धुतां वस्त्रांचा मळ सुटे । परी बिब्व्याचा[1] डाग न फिटे तैसा नैसर्गिक स्वभाव न सुटे । सच्छास्त्र सत्संगें करूनिही ॥ ४८ ॥ ऐशीं-या नैसर्गिका मती । त्या ह्मणाव्या स्वप्रकृती । कीं आत्मा वाटे अहंकृती ते त्या रंगें रंगले अत्यंत ॥ ४९ ॥ जो ज्याचा स्वभाव । त्यास तो मी

१ भरड, खरांट.

ह्मणोन वाटे भाव । यालागीं ह्मणे देवाधिदेव "प्रकृत्या नियताः स्वया" ह्मणोनी ॥ ८५० ॥ कीं जे नैसर्गिक मती । ते त्याची स्वप्रकृती । त्या प्रकृतीनें नियोजिलें असती । सकामभजनीं इतर देवांच्या ॥ ५१ ॥ त्या देवतांचे नियम । नाना व्रतें उद्यापनें संभ्रम । करितां गोड वाटती परम । बळें नैसर्गिक स्वभावाच्या ॥ ५२ ॥ कामाचि वाटे पुरुषार्थ । मोक्षप्रसंग ह्मणती व्यर्थ । कीं विषयभोगाचे पदार्थ । मोक्षांत कैंचे ॥ ५३ ॥ कोणी ह्मणती मोक्ष । एक शुक पावला दक्ष । "शुको मुक्तो" ह्मणोनि प्रत्यक्ष । प्रमाण दाविती येविषयीं ॥ ५४ ॥ अरे शुकचि जाला मुक्त । तरी जनक काय अमुक्त । वेदांत वाचूनि क्षुद्र देवतासक्त । गोष्टी ऐशा बोलती ॥५५॥ प्रारब्ध जनकाचें विचित्र । शुकप्रारब्ध देह मात्र । ह्मणोनि बोले कोठें शास्त्र । "शुको मुक्तो" ह्मणोनी ॥ ५६ ॥ घेड कापिला केळाचा । निष्फळ वृक्ष कदलीचा । भोग सरोनि तैसा शुकाचा । देह उरला भक्तीकारणें ॥ ५७ ॥ मुक्त जनक ही देही विदेही । परी सुखदुःख भोगी देहीं । मुक्त होऊनि कांहीं । जीवदशेतें जो स्पर्शे ॥ ५८ ॥ पूर्वी बोलिला हा विचार । याच टीकेंत वारंवार । एवं "शुको मुक्तो" याचा प्रकार । ऐसा ते काय जाणती ॥ ५९ ॥ कोणीं ह्मणती वेद । उगाच बोलतो अर्थवाद । वेदांतवाचा वाच्य परि अभेद । कैंचा कोणीं देखिला ॥८६० ॥ स्वभाव नैसर्गिक ऐसे । मुक्तिप्रदास ते भजती कैसे । शास्त्रें वाचूनिही न दिसे । विष्णुभजन मुख्यत्वें ॥ ६१ ॥ वाईल वाटे गोड । तो सासूचें पुरवी कोड । मुक्तीची नलगे ते झोड । कां भजती मातें मुकुंदातें ॥ ६२ ॥ एवं शास्त्रें दिलें ज्ञान । परी कामें केलें हतज्ञान । या श्लोकीं समाधान । हें करी ॥ ६३ ॥ आतां यानंतर श्लोक । तो कां बोले उत्तमश्लोक । त्याचें निमित्त सुज्ञ लोक । परिसोत आधीं ॥ ६४ ॥ शास्त्रज्ञही जाले मूढ । कां ह्मणोनि हे शंका गूढ । ते हरूनि केलें दृढ । समाधान आह्मां अर्जुनादिकांचें ॥ ६५ ॥ तों आणीक उठली शंका । कीं या जगदात्मया शेषपर्यंका । इतर देवता श्रीवत्सांका । कां वेगळ्या वाटती ॥ ६६ ॥ आणि कोण्या एका प्रसंगें । जरी वेगळीं मानिलीं आपलीं अंगें । तरी सर्वां जनांतें या श्रीरंगें । कां स्वभजनींच योजूं नये ॥ ६७ ॥ ऐसें संदेहाचें स्थळ । जाणोनियां नवमेघनीळ । समाधान याचें प्रांजळ । करीतसे आतां या श्लोकीं ॥ ६८ ॥

---

१ नेमिले, प्रवृत्त केले. २ लोंगर, गुच्छ.

॥ श्लोक ॥ यो यो यां यां तनुं भक्तः श्रद्धयार्चितुमिच्छति ।
तस्य तस्याचलां श्रद्धां तामेव विदधाम्यहम् ॥ २१ ॥

॥ टीका ॥ अगा देवतांतरें । माझींच सर्वेही शरीरें । परी ज्या तनूतें जो आदरें । भक्त होऊनि पूजूं इच्छितो ॥ ६९ ॥ त्या त्यास श्रद्धा अचळ । त्या त्या तनूच्या ठायीं केवळ । तेचि देतों मी जगन्मंगल । अगा अर्जुना ॥ ८७० ॥ कीं कल्पवृक्षस्वभाव । मी स्वयें देवाधिदेव । जो सद्बुद्धि मागेल मानव । त्यातेंचि देतों ॥ ७१ ॥ जे ऐसें न प्रार्थिती । जरी मी वर्तवीत असतों त्यांच्या मती । तरी विषमफलप्राप्ति कां होती । सर्वां जनां॥७२॥ विषमफळें तों दिसती । एक दरिद्री एक भूपती । जरी कर्मी मी प्रेरीत असतों जगत्पती । तरी हे विषमता लागतीच मजलाही ॥ ७३ ॥ पंचमाध्यायांत मी चक्रपाणी । बोलिलों कीं "न कर्तृत्वं न कर्माणी" । "लोकस्य सृजति प्रभुः" इत्यादि वाणी । कीं कर्म करविता मी नव्हें ॥ ७४ ॥ परि माझ्या सत्ते करूनी । बुद्धींद्रियें चळती ह्मणोनी । तेंच अचळ श्रद्धा देतों ऐसें यावरूनी । मी बोलतों ॥ ७५ ॥ कीं ज्याचा जैसा भाव । त्याचा प्रकाशक मी स्वयमेव । ह्मणोनि ज्यास जो आवडे देव । ते श्रद्धा मीच देतों ह्मणतसें ॥ ७६ ॥ बरें वाईट फळ । हे तों प्रारब्धाचेच खेळ । त्याची श्रद्धा अचळ । त्या प्रसंगें ते होते ॥ ७७ ॥ कांहीं होतां कल्याण । त्या भजनाचा मानी सफळ गुण । वाईट होतां आपण । कांहीं चुकला तें स्मरे ॥ ७८ ॥ दोहितां दुभतें लात हाणे । तें त्या देवें केलें हेंचि जाणे । आतां धरूं अनसूट ह्मणे । त्याच्या वारीं आणि नवरात्रीं ॥ ७९ ॥ तो त्याच्या नांवें करी नवस । परि मीच तेथें असें जगन्निवास । प्रारब्ध त्याचें फळतां त्यास । देवपण मी कां न दाखवूं ॥ ८८० ॥ जे वारीं तो चुके भक्त । दूध दिसे आरक्त । अहो पहा दुधाचें रक्त । देवें केलें तो ह्मणे ॥ ८१ ॥ देव वाटे हा खरा । आतां नलगे ह्मणे देव दुसरा । शरण मी महिषासुरा । जो सद्यः प्रचीत दावितो ॥ ८२ ॥ तों तों श्रद्धा अचळ । ते अवघे माझेच खेळ । त्याच्या प्रारब्धाचें त्यास फळ । देऊनि वाढवी ते श्रद्धा ॥ ८३ ॥ कीं तेंचि दुभतें मरों बैसे जयीं । लोळे त्याच देवतेचे पायीं । न वांचे तरी त्याचे ठायीं । अभक्ति न धरी ह्मणे कपाळ ॥ ८४ ॥ प्रतीति येतां कांहीं । तेथून मन विटत नाहीं । मी अचळ श्रद्धा देतों तेही । इत्यादि रीती ॥८५॥ एवं देवतांतरें । तींही अगा माझींच शरीरें । आणि जें जयाच्या अंगीं वारें । तेंचि अचळ मी करितों ॥ ८६ ॥ तेंचि त्यास वाटे परम । मी

बुद्धिभेद न करीं सम । त्यांतें मुरडितां मी विषम । होतों ह्मणोनि हें न करीं ॥ ८७ ॥ परि त्या रूपें भजन । माझें आणि फलप्रदान । मीच करितों ऐसें कमलनयन । बोलतसे या श्लोकीं ॥ ८८ ॥

॥ श्लोक ॥ स तया श्रद्धया युक्तस्तस्याराधनमीहते ।
लभते च ततः कामान्मयैव विहितान्हितान् ॥ २२ ॥

टीका ॥ त्या देवतांचा भक्त । त्या माझ्याच रूपीं जो आसक्त । ते श्रद्धें करूनि युक्त । जे मीच अचळ करितों बोलिलों ॥ ८९ ॥ त्या श्रद्धें करूनि तो । आराधन त्याचें करितो । आणि त्यापासूनि फळ पावतो । तेंही मीच देतसें ॥ ८९० ॥ कृष्णसंग अपेक्षित । ह्मणूनि देवी कात्यायनीचें व्रत । गोपी करिती अत्यंत । श्रद्धेंकरूनी ॥ ९१ ॥ शेवटीं द्यावया वर । शुद्ध सत्त्वोपाधि सर्वेश्वर । आपण येऊनि हा विचार । स्पष्ट तेव्हां दाखवी ॥ ९२ ॥ कीं करितां देवताभजन । फलप्रद मीच भवभंजन । ह्मणूनि वर दे जगज्जीवन । आपण स्वयें गोपींतें ॥९३॥ परि मागुती अत्यंत । त्यांतें विरहदुःख दे भगवंत । कीं अन्यरूपीं मी अनंत । नश्वर फळेंचि देतसें ॥ ९४ ॥ या कारणें भगवंत । पूज्य फलप्रद ऐसें येथपर्यंत । तत्त्व बोलोनि तें फळ अंतवंत । ह्मणूनि ह्मणतो आतां या श्लोकीं ॥ ९५ ॥

॥ श्लोक ॥ अंतवत्तु फलं तेषां तद्भवत्यल्पमेधसाम् ।
देवान्देवयजो यांति मद्भक्ता यांति मामपि ॥ २३ ॥

॥ टीका ॥ अन्यदेवतारूपें मातें । जे भजती तयांतें । मीच देतसें फलातें । सकळ फलदाता सर्वेश्वर ॥ ९६ ॥ परि तें फल अंतवंत । त्यास होतें नाशवंत । कीं विष्णुरूपेंचि मी भगवंत । नित्य फळ मोक्ष देतसें ॥ ९७ ॥ अगा ते अल्पबुद्धी । कीं ज्यांपासूनि न घडे मोक्षसिद्धी । काम्यफलाची तेही समृद्धी । जे न करिती भजती तयांतें ॥ ९८ ॥ माझेंच ते रूपभेद । श्रेष्ठत्वेंही वर्णिती वेद । परि त्यास भजतां संसारखेद । न तुटे कधीं ॥ ९९ ॥ कीं एकाच पुरुषाचा देह । करचरण नेत्र कर्ण निःसंदेह । परि साधकें त्याचा धरावा स्नेह । साधे स्वकार्य ज्या अंगें ॥ ९०० ॥ जें घडावें करें करूनी । तो गुडघा करील ह्मणोनी । राहे गुडघाच धरूनी । तरि हस्तसाध्य कार्य केंवि घडे ॥ १ ॥ या लागीं अल्पबुद्धी । कीं सत्त्वोपाधि भजनें सत्त्वशुद्धी । रजतमाचीच होते वृद्धी । रजतमप्रधाना जो भजे ॥ २ ॥ आत्मत्वें मीच सारा । मीच गुणत्रयाचा पसारा । परि मीच नाशितों दुःखसंसारा । स्वसत्त्वोपाधींकरूनी ॥ ३ ॥ लोखंडाचीच

बेडी । लोखंडाचेंच शस्त्र तोडी । अल्पबुद्धि ते न धरी आवडी । मुक्तिप्रदा माझ्या सत्त्वरूपाची ॥ ४ ॥ मीचि स्वयें निर्गुण । आणि जरी मीच त्रिगुण । परि मुक्ति देणें हें समर्थपण । शुद्ध सत्त्वीं ॥ ५ ॥ एकचि असतां गुण । तरि समान असतें समर्थपण । भेद नसोनिही विलक्षण । सामर्थ्यें जालीं गुणत्रयांचीं ॥ ६ ॥ मीच जालों सर्व देव । मीच जालों देवाधिदेव । परि ज्या रूपीं ज्याचा भाव । तो तदनुरूप फळ पावे ॥ ७ ॥ ह्मणूनि देवातें यजिती । ते त्याचि देवातें पावती । मद्भक्तही मजप्रती येती । तैसेच ॥ ८ ॥ मीच स्वयें देव । आणि मीच स्वयें देवाधिदेव । द्विविध गति ही स्वयमेव । मीच असें ॥ ९ ॥ देवास पावोनि पुनरावृत्ती । मातें पावती ते न परतती । पाहतां दोन्ही गती । मागुती मीच असें ॥ १० ॥ परंतु नाशवंत । ते देव ते लोक पावती अंत । मी अनंत प्राप्तीही अनंत । माझी अगा ॥ ११ ॥ या लागीं अंतवंत । फल त्यांस कीं अत्यंत । अल्पबुद्धि कीं जो मी अनंत । त्या मातेंचि ते न भजती ॥ १२ ॥ आतां यानंतर श्लोक । तो कां बोले उत्तमश्लोक । त्याचें निमित्त सुज्ञलोक । परिसोत आधीं ॥ १३ ॥ इतर देवतांतें भजती । ते मूढ अल्पमती । कीं अंतवंत फळें पावती । हें पूर्वश्लोकीं बोलिला ॥ १४ ॥ कीं आपण अनंत । फळ देतों त्यासही नसे अंत । इत्यादि पूर्वश्लोकपर्यंत । सिद्ध जालें ॥ १५ ॥ कितीएकांस एथें संदेह । कीं देवासारिखा यासही देह । देह तेथें समूह । गुणत्रयाचा ॥ १६ ॥ कीं तमोगुणावांचूनी । आकार न दिसे लोचनीं । आणि इंद्रियें रजोगुण ह्मणोनी । रजोगुणप्राधान्यही दिसतें ॥ १७ ॥ जेव्हां हा देह पावला । इतर देवांसमान जाला । श्रेष्ठ देवांहूनि याला । कोण्या गुणें मानावें ॥ १८ ॥ आतां ईश्वर जो श्रेष्ठ अत्यंत । त्याचे अवतार स्वेच्छाकल्पित । ऐसें ह्मणावें तरी निश्चित । त्रिगुणही तोचि कल्पितो ॥ १९ ॥ एवं जो देह पावला । तो सर्वांसमान जाला । थोर तोच कीं ज्याला । देह नसे असे निराकार ॥ २० ॥ ऐसें संदेहाचें स्थळ । ऐशा गोष्टी बोलती खळ । हा पूर्वपक्षही मेघनीळ । हरितो आतां या श्लोकें ॥ २१ ॥

॥ श्लोक ॥ अव्यक्तं व्यक्तिमापन्नं मन्यंते मामबुद्धयः ।
परं भावमजानंतो ममाव्ययमनुत्तमम् ॥ २४ ॥

॥ टीका ॥ मी जो अव्यक्त निराकार । तो व्यक्ति पावलों ह्मणजे पावलों शरीर । ह्मणूनि जे बुद्धिहीन नर । ते मज ऐसें मानिती ॥ २२ ॥ इतकाच पूर्वार्धाचा अर्थ । परि आकार पावला हें तों यथार्थ । ऐसें बो-

लती त्यांतें व्यर्थ । बुद्धिहीन कां ह्मणावें ॥ २३ ॥ व्यक्ती नाहीं पावला । तरी कोण ऐसें बोलिला । वदन वाणी नसे ज्याला । तो कैसा गीता हे उपदेशितो ॥ २४ ॥ आतां कर्मानुबद्धजीव । त्यासारिखा नव्हे हा देहभाव । अर्थ ऐसा करावा तरी देव । तैसेंचि बोलता ॥ २५ ॥ कीं जीवासारिखी व्यक्ति पावला । बुद्धिहीन ऐसें ह्मणती मला । ऐसें श्रीकृष्ण असता बोलिला । तरी घडता अर्थ ऐसाही ॥ २६ ॥ मी अव्यक्त त्या मला । अबुद्धि ह्मणती व्यक्ति पावला । श्रीकृष्ण ये रीती वदला । अर्थ याचा तो नव्हे ॥ २७ ॥ आतां व्यक्ति पावला तें असत्य । तरी जीवांचे देह काय सत्य । ते कर्मे देह पावले अगत्य । हा लीलाविग्रह पावला ॥ २८ ॥ अव्यक्त पावला व्यक्तीतें । काय दोष या गोष्टीतें । अबुद्धि ह्मणोनी भगवंतें । ते कां निंदिले ॥ २९ ॥ आपला प्रभाव नेणती । आणि व्यक्ति पावला ऐसें ह्मणती । उत्तरार्धावरोनी ये रीती । जरी अर्थ याचा बोलावा ॥ ९३० ॥ कीं जे नेणती प्रभाव । त्यांचे दृष्टी प्राकृत मानव । तरी मानव भलता देहभाव । पावलाच असे ॥ ३१ ॥ हा परमात्मा ऐसें नेणती । आणि मनुष्य साधारण ऐसें ह्मणती । या दोषासि नसे गणती । गान्हाणें काय याच गोष्टीचें ॥ ३२ ॥ कीं अव्यक्ता मला । अबुद्धि ह्मणती व्यक्ति पावला । हा परमेश्वर असें कळेना ज्यांला । ते व्यक्ति पावला ह्मणती हेंही घडेना ॥ ३३ ॥ व्यक्ति पावला अर्जुन । व्यक्ति पावला धर्मनंदन । व्यक्ति पावला दुर्योधन । ऐसें कोणी न ह्मणती ॥ ३४ ॥ ज्यांच्या दृष्टीस माधव । दिसे प्राकृत मानव । ते हा कृष्ण एक यादव । इतकेंचि ह्मणती ॥ ३५ ॥ व्यक्ति पावला वसुदेव । हेंही कोणी न ह्मणती मानव । ते व्यक्ति पावला वासुदेव । कां ह्मणती ॥ ३६ ॥ या कारणें भलतसा । अर्थ करितां अनर्थ ऐसा । आतां अर्थ बोलावा कैसा । तो आयका श्रोते हो ॥ ३७ ॥ व्यक्ति पावती जीव । व्यक्तिच पावतो देव । मत्स्यादिरूपें देव देव । जो अवतरतो प्रतियुगीं ॥ ३८ ॥ द्विविध देहही असत्य । ज्या प्रकाशें प्रकाशती तो सत्य । प्रत्यक्षीं अगत्य । परप्रकाश्य मिथ्या मानावें ॥ ३९ ॥ तंतु सत्य मिथ्या पट । माती सत्य मिथ्या घट । तंतु माती यांकडे पाहतां निपट । पट घट धुंडितां न सांपडे ॥ ९४० ॥ तंतु असोनि बाळ नेणे । परि पासोडी ह्मणोनि जाणे । तैसा देह सत्य ह्मणे । जीव अज्ञानें करूनी ॥ ४१ ॥ शुद्धसत्त्व विद्यामय । मत्स्यकूर्मादि अवतार ऐसा निर्णय । देह दिसोनिही त्या सत्त्वीं निश्चय । चित्स्वरूपें आत्माचि ह्मणूनि

॥ ४२ ॥ जीवांचे कर्मज देह तेही । देह न वाटती ज्यास कांहीं । त्यास अवतारीं देहाची भावनाही । नसे हें ह्मणावेंचि लागेना ॥ ४३ ॥ एवं मत्स्यादि अवतार । हे देह ऐसें नेणे ईश्वर । अज्ञानें जीव पामर । देह ह्मणूनि देहातें जाणती ॥ ४४ ॥ जे देह ह्मणूनि जाणती । तेचि ह्मणावे कीं देहातें पावती । देह ह्मणोनि नेणे तो कोणे रीती । देहातें पावला ह्मणावा ॥ ४५ ॥ जो हार ह्मणोनि जाणे । तो काय त्यास सर्प ह्मणे । सर्पत्व ज्यांच्या दृष्टीस बाणे । ते आपणासम त्यातें मानिती ॥४६ ॥ हारास सर्पत्वें नयन । देखती तेचि दृष्टिहीन । हारचि देखे तो स्वसमान । ते मानिती ॥ ४७ ॥ तैसे बुद्धिहीन नर । सत्य जाणोनि पावले शरीर । तैसेच मत्स्यादि अवतार । मी देह पावलों ते ह्मणती ॥ ४८ ॥ जे समयीं कृष्णावतार । त्याकाळीं जे पामर नर । ते ऐसें ह्मणूनि सर्वेश्वर । न निंदी तयांतें ॥४९॥ जे कृष्ण मनुष्य ऐसें जाणती । ते हा अव्यक्त व्यक्ति पावला ह्मणती । व्यक्ति पावोनी सर्व असती । तैसाच कृष्ण वाटे तयांतें ॥९५० ॥ एवं जे दुष्कृती हीं शास्त्रें पाहती । तेथें सर्वां देवांसही श्रुती । ब्रह्मभावें थोर ह्मणती । व्यक्ति चतुर्मुखादिक त्याचिया ॥ ५१ ॥ त्यांत ज्याचे नानावतार । तोही क्षीराब्धिकन्येचा वर । देह धरितो तेव्हां ब्रह्मादि सुर । तैसाच हा ॥ ५२ ॥ आणि आपणास देह जैसे । साच वाटती मजही तैसे । वाटत असतील ह्मणूनि ऐसें । मी व्यक्तीतें पावलों ते ह्मणती ॥ ५३ ॥ इंद्रादिकांचें शरीर । तैसे माझे अवतार । मानूनि बुद्धिहीन नर । भजती इतर देवतांतें ॥५४॥ ह्मणती जें निराकार । तेंचि सर्वांत थोर । तो विष्णु ह्मणावा तरी अवतार । व्यक्ति नाना तो पावतो ॥ ५५ ॥ व्यक्ति पावतो ह्मणती । त्यांस अबुद्धि ह्मणे श्रीपती । कीं माझी देहप्राप्ति ते पाहती । आपणासमान ॥ ५६ ॥ सत्य वाटे शरीर । तरी शरीर पावलों ह्मणे नर । तैसे मी पावतों आकार । ऐसें मानिती ॥ ५७ ॥ आणि अवलंबूनि सर्वज्ञपण । ह्मणती आकार तितुका त्रिगुण । द्रव्यशक्ति तमोगुण । तीवीण खूण शुद्धसत्त्वीं न दिसे आकृतीची ॥ ५८ ॥ हे शुद्धसत्त्वाची कल्पना । अवतारमूर्ति नाना । ऐसें बोलतां त्रिगुणरचना । काय कल्पना त्याची न ह्मणावी ॥ ५९ ॥ एवं च जैसी त्रिगुणरचना । तैसीच अवतारशरीरकल्पना । ऐसें साधूनि नाना । कुयुक्ति बोलती ॥ ९६० ॥ पूर्वपक्षसीमा येथवरी । सिद्धांत तयाचा याउपरी । पूर्वपक्ष हरूनि श्रीहरी । बोलतो उत्तरार्धें श्लोकाचिया ॥ ६१ ॥ उत्तरार्द्ध ॥ परंभावमजानंतो ममाव्ययमनुत्तमम् ॥

॥ टीका ॥ माझा परमभाव । जो अत्यंत थोर प्रभाव । अवघा हरि ऐसें वैभव । ते नेणती ॥ ६२ ॥ अव्यय ह्मणजे ज्यास नाश नसे । अनुत्तम ह्मणजे उत्तम ज्यापरीस न दिसे । ऐसा प्रभाव माझा समरसे । अवतारव्यक्तिरूपें करूनी ॥ ६३ ॥ ऐसा माझा परंभाव । ह्मणजे थोर प्रभाव । जो अविद्या नासोनि जीव ब्रह्मचि करी ॥ ६४ ॥ ते त्या प्रभावातें नेणती । त्रिगुण व्यक्ति पावला ह्मणती । त्रिगुण कल्पनेसमान गणिती । दिव्य अवतार व्यक्ति माझिया ॥ ६५ ॥ प्रभाव नेणती ह्मणे । यांत सुज्ञ याचें समाधान जाणे । कीं निंदेनेंचि तोंड त्याचें घाणे । प्रभाव विष्णुव्यक्तीचा नेणतां ॥ ६६ ॥ कीं त्रिगुण ही ईश्वरकल्पना । आणि कल्पनाच अवतार नाना । महिमा नेणोनि हा तनोंना । ते करिती ॥ ६७ ॥ कीं कल्पनाच जीवांची अविद्या । आणि कल्पनाच अविद्यानाशिनी विद्या । भवरोगा आणि भवरोगवैद्या । सम मानिती प्रभाव न कळोनी ॥ ६८ ॥ कल्पनाच दुःख । आणि कल्पनाच दुःखनाशक सुख । दोन्ही सम ह्मणती मूर्ख । महिमा ऐसा न कळोनी ॥ ६९ ॥ कल्पिली त्रिगुणसृष्टी । कीं हे सत्य वाटावी जीवदृष्टी । कांहीं सुखी कांहीं कष्टी । कर्मानुरूप होती ते जीव ॥ ९७० ॥ जीवदृष्टी अनुसरोनी । हे सृष्टि कल्पिली ह्मणोनी । अहंकार भूतें इंद्रियें होऊनी । त्रिगुण मोहिती जीवातें ॥ ७१ ॥ त्रिगुणें जीव मोहती । त्रिविध कर्मे आचरती । त्रिविध गति पावती । अनादि गुणप्रवाह हा ऐसा ॥ ७२ ॥ हे अनादि माया । तिच्या पोटीं कल्पना या । ते शुद्धसत्त्वरूपिणी गुणत्रया । जीवांकारणें कल्पिती ॥ ७३ ॥ तिचींच रूपें दोनी । आपण ब्रह्म ह्मणोनी । असे अखंडानंदानुभवें करूनी । तो ईश्वरोपाधि सर्वसाक्षी सर्वज्ञ ॥ ७४ ॥ परंतु तीस सत्ता नसे । ब्रह्मींच ईश्वरत्व दिसे । आपणास आपण अनुभवीतसे । मायें करूनि ह्मणावें ॥ ७५ ॥ काष्ठादियोगें अग्नि दिसे । मायायोगें ब्रह्म उल्लसे । एवं च ईश्वरत्व ब्रह्मीं असे । परंतु मायायोगें करूनी ॥ ७६ ॥ ते सृष्टि स्थिति संहार । ब्रह्मीं प्रवेशे प्रलयानंतर । तेव्हां योगनिद्रा करी ईश्वर । वेद ऐसें बोलती ॥ ७७ ॥ प्रतिदिनीं असत्य पाणी । निघे असे प्रवेशे किरणीं । तैसी माया निघे असे प्रवेशे निर्गुणीं । अनादि मायाप्रवाह ये रीतीचा ॥ ७८ ॥ जरी नाशतोंचि निर्गुण । तरी मोडता प्रवाह न होते गुण । यालागीं सृष्टि कल्पूनि आपण । सम सदय सगुण नव्हे विषम निर्दय ॥ ७९ ॥ हे माया-

---

१ गार्थे, वाग्जल्प. २वृष्ट होई.

कल्पना समूळ । परी आपण ब्रह्म हा अनुभव केवळ । ज्या मायेंकरूनी त निखळ । शुद्ध माया ह्मणावी ॥ ९८० ॥ जेथूनि उठे कल्पना । ते हे त्रिगुणसृष्टिरचना । तेथें संकल्प ऐसा कीं हें विश्व नाना । जीव कर्मफळ भोगावया ॥ ८१ ॥ अविद्यावंधप्रवाह जैसा । अनादि विद्याप्रवाहही तैसा । कळे विचार ज्यांस ऐसा । ते अवतार त्रिगुण कां ह्मणती ॥ ८२ ॥ जीवास मोह करीती । ह्मणूनि त्रिगुण कल्पिले ये रीती । ते त्रिगुणचि होती । पंचभूतें आणि इंद्रियें अहंकार ॥ ८३ ॥ त्यांत कल्पिला सत्त्वगुण । सहज त्याचें निर्मळपण । परि रज तम सहज आपण । मलिन तत्संगें मलिन सत्त्वही ॥ ८४ ॥ ईश्वरें त्या सत्त्वाचें करावें शुद्ध । तेव्हां ब्रह्म विद्येनें होय प्रबुद्ध । कल्पूनियां संकल्पें प्रसिद्ध । केले अवतार आपले ॥८५॥ कल्पनाच जरी अवतार । तो न ह्मणवे त्रिगुणविकार । प्रभाव अव्यय अनुत्तम याचा विचार । तो ऐसा नेणती ॥ ८६ ॥ जे ह्मणती हरी । मत्स्यादि व्यक्ति पावला तरी । देवांस त्यास समता सरी । देह साम्यें करूनी ॥ ८७॥ जोचि मी निराकार । तोचि मी साकार । सोनें आणि अलंकार । कोण वेगळे ह्मणों शके ॥ ८८ ॥ ऐसीच सर्वही सृष्टी । परि कल्पिली लक्षूनि जीवदृष्टी । ते देह साच मानूनि कष्टी । होती पावती देह ऐसें ॥८९॥ व्यक्ति पावले ह्मणावें त्याला । तैसें न ह्मणवे अर्जुना मला । आणि व्यक्ति पावला । अबुद्धि बुद्धिहीन ऐसें ह्मणती ॥ ९९० ॥ थोर मानूनि निराकार । उपेक्षिती माझे आकार । दिव्य माझे जे अवतार । ते त्रिगुण पांचभौतिक मानिती ॥ ९१॥ श्लोकार्थ ऐसा सिद्ध जाला । तों प्रभावकाश एथें देखिला । कीं अवतार दिव्यत्वें ऐसें जनाला । कां न कळे ॥ ९२ ॥ जे गुणत्रयावेगळे । अवतार सर्वांहूनि आगळे । त्या सर्वांचे देखती डोळे । आणि कां न कळे हा महिमा ॥ ९३ ॥ या प्रभाचें हें स्थळ । जों अर्जुन पुसे तों प्रांजळ । स्वयें आपण घननीळ । बोलतो या श्लोकीं ॥ ९४ ॥

॥ श्लोक ॥ नाहं प्रकाशः सर्वस्य योगमायासमावृतः ।
मूढोऽयं नाभिजानाति लोको मामजमव्ययम् ॥ २५ ॥

॥ टीका ॥ ज्या सामर्थ्यें मी जगीं वसें । तैसाच अवताररूपी असें । परी जनदृष्टी प्रगट न दिसें । झांकलों योगमायें करूनी ॥ ९५ ॥ ज्या युक्तिरचनेनें जग । मी निर्मितों तो ह्मणावा योग । त्या योगमायेंकरूनि सोंग । अवतारांचें दावितों ॥ ९६ ॥ अविद्यासृष्टि कल्पिली । ती त्रिगुणसृष्टि योगशब्दें बोलिली । तो योग कल्पूनि शुद्धसत्त्वें उरली । ते योगमा-

या ॥ ९७ ॥ ते योगमायें करूनी । मी वेष्टित ह्मणोनी । दिसें अवताररूपें नयनीं । परी नव्हें प्रगट सर्वांतें ॥ ९८ ॥ आतां ह्मणसी अर्जुना । कीं सर्व उगवला झांकेना । तरी प्रगट परि दिसेना । डोळां दिवांधाचिया ॥ ९९ ॥ तैसा अविवेंककरूनी । लोक हा मूढ होऊनी । मज देखोनीही नयनीं । ह्म अज अव्यय ह्मणोनी न जाणे ॥ १००० ॥ अज ह्मणजे जन्मरहित । अव्यय ह्मणजे नाशवर्जित । ऐसियास मज मूढ अत्यंत । ह्मणती उपजतो नाशतो ॥ १ ॥ मी अज मी अव्यय परम । त्या मज मानिती आपणासम । नेणती कीं हा पुरुषोत्तम । अज अव्यय अनंतशक्ती॥२॥हें न जाणायाचें मूळ। अविद्या त्रिगुण ओंगळ । आणि आपण सर्वज्ञ केवळ । विद्याशक्ति शुद्धसत्त्वें करोनी ॥३॥ तो त्रिगुणोपाधि जीवसमुदाय । जरी पुण्यें अगण्यें निष्पाप होय । आणि शास्त्रदृष्टीं दृढ धरी माझे पाय । तरी ज्ञानदृष्टीं ओळखे मजलागीं ॥ ४ ॥ ऐसें अध्यायपर्यंत । आतां बोलेल भगवंत । त्यांत आपण सर्वज्ञ जीव भ्रांत । आधीं बोलतो या श्लोकीं ॥ ५ ॥

॥ श्लोक ॥ वेदाहं समतीतानि वर्तमानानि चार्जुन ।
भविष्याणि च भूतानि मां तु वेद न कश्चन ॥ २६ ॥

॥ टीका ॥ जीं होऊनि गेलीं तीं हीं सारीं । आणि आहेत भूतें ज्या ज्या प्रकारीं । आणि पुढें जीं भूतें होणारीं । हीं सर्व मी जाणें ॥ ६ ॥ पंचभूतांश मिळती । त्या देहास भूतें ह्मणती । ब्रह्मयाच्या शरीराची गणती । यांत कीं ब्रह्मादि स्तंबवरी भूतेंचि ॥ ७ ॥ ब्रह्मांड ब्रह्मयाची मूर्ती । चतुर्मुख त्या मूर्तीपुढील भोगमूर्ती । आवरणरूपें ब्रह्मांडाहि वरती । भूतें तींहीं भूतें ह्मणावीं ॥ ८ ॥ भूत भविष्य वर्तमान भूतें । जाणतो ह्मणतां भगवंतें । बोलिलीं ब्रह्मांड अनंतें । भूतशब्दें करूनी ॥ ९ ॥ ऐसा स्वयें सर्वज्ञ । परि मज नेणती जीव अज्ञ । तेहि होती अभिज्ञ । बहुपुण्यें मातें जे भजती ॥ १०१० ॥ हें पुढें बोलेल निवडूनी । परि या चतुर्थचरणापासूनी । मज नेणती अविवेंककरूनी । ऐसें पुढिल्या श्लोकवरी बोलतो ॥ ११ ॥ "मां तु वेद न कश्चन" । ह्मणजे ते तो मज नेणती कोण्ही जन । कां ह्मणसी तरी भ्रांत मन । त्रिगुणभ्रमें ह्मणतसे या श्लोकां ॥ १२ ॥

॥ श्लोक ॥ इच्छाद्वेषसमुत्थेन द्वंद्वमोहेन भारत ।
सर्वभूतानि संमोहं सर्गे यांति परंतप ॥ २७ ॥

॥ टीका ॥ गोडां विषयांवरी प्रीति । वाइटांवरी अप्रीति । इच्छा आणि द्वेष ह्मणती । याच दोहीं गोष्टींतें ॥ १३ ॥ या इच्छाद्वेषापासूनी । जीं द्वंद्वें

उपजलीं तिहीं करूनी । मोह जाला ह्मणोनी । या त्रिगुणीं वाढविला संसार ॥ १४ ॥ कीं जेव्हां जीवोपाधि प्रगटती । त्यास एक सृष्टिकाळ ह्मणती । किंवा नवा देह धरूनी उपजती । तोहि सृष्टिकाळ ॥ १५ ॥ एवं जेव्हां जसे जन्मती । तेव्हां संमोह पावती । कीं देह जड तो आपण मानिती । पूर्विल्या द्वंद्वमोहें करूनी ॥ १६ ॥ दों दों गोष्टींचें जोडें । द्वंद्व नाम त्यातें घडे । त्यांत एक आवडे एक नावडे । मानापमान लाभहानि इत्यादि ॥ १७ ॥ एक आवडे एक नावडे । तदर्थ कर्म करणें घडे । त्या कर्मे करूनि जोडे । देहांतर सुखदुःखभोग ॥ १८ ॥ तेथें अत्यंत जो मोह । तो ह्मणावा संमोह । आपण कोण हा संदेह । ते जाणती मज काय ॥ १९ ॥ आपणास आपण नेणे । तो भ्रांत मज काय जाणे । ज्यास आपला बोध बाणे । तोच जाणे मजलागीं ॥ १०२० ॥ पूर्वश्लोकीं मी सर्व जाणें । आणि मज ऐसिया कोण्हीच नेणे । ह्मणतां नेणती ज्यांस ह्मणे । ते ऐसे वर्णिले ॥ २१ ॥ एवं विद्योपाधि आपण सर्वज्ञ । आणि अविद्योपाधि जीव वर्णिले अज्ञ । आतां स्वभजनें होती अभिज्ञ । ते ऐसे ह्मणूनी वर्णील ॥ २२ ॥ ते कैसे होउनी । कोणे रीती करूनी । भजती तरी ऐसें ह्मणोनी । बोलतसे या श्लोकीं ॥ २३ ॥

॥ श्लोक ॥ येषां त्वंतगतं पापं जनानां पुण्यकर्मणाम् ।
ते द्वंद्वमोहनिर्मुक्ता भजंते मां दृढव्रताः ॥ २८ ॥

॥ टीका ॥ ज्या पापें करूनी मला । जन न भजतां वायां गेला । त्या पापाचा नाश जाला । पुण्यकर्मे आचरतां ॥ २४ ॥ अनेक पुण्यकर्मे करूनी । द्वंद्वें मानापमान इत्यादि त्यांपासूनी । सुटोनि दृढव्रत होउनी । भजती मातें ॥ २५ ॥ जे परम दुष्कृती । ते आपणातें न भजती । ह्मणूनी मागें बोलिला श्रीपती । कीं पाप तेथें भजन आपलें घडेना॥२६॥येथें चतुर्मुखाचा बाप । ह्मणतो ज्याचें सकळ गेलें पाप । आणि पुण्यकर्मे पुण्याचा प्रताप । वाढला भजती तेचि मातें ॥ २७ ॥ ते मज भजतां अत्यंत । होउनियां दृढव्रत । द्वंद्वापासूनि सुटोनि निश्चित । मग मज भजती ऐसेही ॥ २८ ॥ अनेक जन्म पुण्यकोटी । तेव्हां मज भजायाची इच्छा पोटीं । भजतां भजतां शेवटीं । सुटती द्वंद्वाहीपासूनी ॥ २९ ॥ भजतां चित्तशुद्धि अत्यंत । होतां धरिती दृढ व्रत । कीं भजनींच सर्वदा रत । इतर कांहीं न इच्छिती ॥ १०३० ॥ दृढ होतां ऐसें व्रत । होऊं लागती द्वंद्वातीत । जे पिऊं लागती अमृत । ते आंबिलीनिमित्त कां लाळ घोटिती ॥ ३१ ॥ ते लाभ धनलाभें

न मानिती । ते हानि धनहानीनें न जाणती । ते मानें सुखी न होती । दुःखी न होती अपमानें ॥ ३२ ॥ धनमानादिलाभें सुख । इत्यादि हानि करूनि दुःख । या निश्चयाहूनि आणिक । मोह कोणता ॥ ३३ ॥ ज्यासी गोडी हरिभजनीं । भजनींच लोटे दिवसरजनी । चित्त लागलें भगवद्भजनीं । त्या दृढव्रतास कैंचा हा मोह ॥ ३४ ॥ पाप गेलिया माझें भजन । मग ते दृढव्रत होती पुण्यकर्मे जन । मग द्वंद्वमोहापासूनि मोचन । पावोनि मातें भजती ॥ ३५ ॥ श्लोकार्थ ऐसा जाला । परि पदाचा अन्वय नाहीं दाविला । ह्मणूनि संशय श्रोतयांला । पडेल तरी पदें हीं ऐसीं योजावीं ॥ ३६ ॥ "पुण्यकर्मणामंतगतं पापं ते"।"दृढव्रता मां भजंते"। आधीं ऐसें वदे ते भगवद्वाणी ॥३७॥ "ते तु द्वंद्वमोहनिर्मुक्ताः" ॥ "मां भजंते मुक्ताः" । कीं विना भजन मुक्तता । घडेचि ना ॥३८॥आतां यानंतर श्लोक। तो कां बोले उत्तमश्लोक । त्याचें निमित्त सुज्ञ लोक । परिसोत आधीं ॥३९॥ जे आपणास भजती। ते ऐसे निष्पाप सुकृती। ह्मणूनि अर्जुनाप्रती। श्रीकृष्ण ऐसें बोलिला॥ १०४० ॥ ते दृढव्रत भक्त । द्वंद्वमोहापासूनि मुक्त । हें आयकोनि संशययुक्त । चित्त जालें अर्जुनाचें ॥ ४१ ॥ कीं यातें न भजती दुष्कृती । आणि भजती भले सुकृती । परि सकामा ज्यांच्या प्रकृती । ते द्वंद्वमोहातीत होती हें घडेना ॥ ४२ ॥ मागें वर्णिले चतुर्विध भक्त । त्यांत आर्त अर्थार्थी कामनायुक्त । जो कामनायुक्त तो द्वंद्वमोहनिर्मुक्त। कोणी न होय ॥४३॥ विचार ऐसा असोनी । सगट हे द्वंद्वमोहरहित ह्मणोनी । कृष्ण बोलिला पूर्वपदें करूनी । येथें अर्जुन शंकला ॥ ४४ ॥ तरी हें जिज्ञासुप्रकरण । याचें पूर्वी राहिलें विवरण । त्रिविधाचें सगट श्रेष्ठपण । "उदाराः सर्व एवैते" ह्मणोनि वर्णिलें ॥ ४५॥ परि ते दोघे सकाम । जिज्ञासु हा अत्यंत निष्काम । ज्ञान होतांच सिद्ध आत्माराम । होणार हाही ॥ ४६ ॥ ते दोघे निष्काम होती । तेव्हां जिज्ञासुपदवी पावती । इतरदेवताभक्ताहूनि अति । श्रेष्ठ सुकृती जरी अत्यंत ॥ ४७ ॥ तत्त्वज्ञानेच्छा जयाला । आत्मबोधाकारणें भुकेला । जिज्ञासु ह्मणावें त्याला । प्रकरण हें तयाचें ॥ ४८ ॥ पूर्वश्लोकीं हा अर्थ । समजला नाहीं पार्थ । ह्मणूनि त्याचें जिज्ञासूपण समर्थ । स्पष्ट अर्धश्लोकें दाखवितो ॥ ४९ ॥ उत्तरार्द्धापासूनी । स्वप्रसादें तो होतसे ज्ञानी। आणि सातां प्रकारें करूनी । तो आपणातें जाणतो ॥ १०५० ॥ ऐसें अध्यायपर्यंत । बोलेल आतां भगवंत । तिन्हीं प्रकारें त्या सातांत । बोलतसे श्रीभगवान् या श्लोकीं ॥ ५१ ॥

॥ श्लोक ॥ जरामरणमोक्षाय मामाश्रित्य यतंति ये ।
ते ब्रह्म तद्विदुः कृत्स्नमध्यात्मं कर्म चाखिलम् ॥ २९॥

॥ टीका अगा पूर्वश्लोकीं भक्त । जे वर्णिले द्वंद्वमोहनिर्मुक्त । जे आधीं जिज्ञासु बुद्धीनें युक्त । कीं सुटावें अविद्यापाशापासूनी ॥ ५२ ॥ ज्या अविद्येंकरूनी । जें नश्वर जड वाटे आपण ह्मणोनी । दुःख तितकें सुख मानूनी । दुःखींच पचती ॥ ५३ ॥ आजन्म मानिलें सुख । तें सर्वही वाटे दुःख । जेव्हां ज्ञातारपणीं मुख । देखे जरेचें ॥ ५४ ॥ तेव्हांही केवळ । जो सुखी ज्याचें सुकृताचेंचि फळ । त्यासही मरणाची तळमळ । सर्वदा चुकेना ॥ ५५ ॥ खांदियावरी सूळ । त्यास चारिती खोबरें गूळ । सुळीं घालायाचें स्थळ । जवळी होतसे पदोपदीं ॥ ५६ ॥ पुण्यफळें सदा सुख । तरी न चुके जरामरणदुःख । गर्भवासादि दुःखें आणिक । न स्मरती तरी हीं ठाउकीं सर्वांसी ॥ ५७ ॥ एवं पाहतां जरामरण । होतें सकळ दुःखांचें स्मरण । कीं मरण आणि ज्ञातारपण । विदित असे सकळांसही ॥ ५८ ॥ विचार ऐसा ह्मणोनी । कृष्ण ह्मणे जरामरणापासूनी । सुटावया माझा आश्रय धरूनी । यत्न करिती जिज्ञासु जे ॥ ५९ ॥ ते ब्रह्मकर्मादि सात । जाणती ह्मणे भगवंत । जाणणें ह्मणजे विद्या निश्चित । अविद्यानाशें हे जाणावी ॥ १०६० ॥ तेव्हां जरामरणादी । दुःखमूळ अविद्या अनादी । एवं येथें भजन उपपादी । अविद्या नाशाकारणें ॥६१॥ अविद्येस विद्या संहरी । त्या ब्रह्मविद्येचा धनी हरी । या कारणें नव्हे अविद्या दूरी । हरिभजनावांचूनी ॥ ६२ ॥ या भावें ह्मणे श्रीपती । कीं जे सुकृती मजला भजती । त्या भजनें पावती । ब्रह्मविद्या ॥ ६३ ॥ माझा आश्रय धरोनी । माझ्या प्रसादें ज्ञान होईल ह्मणोनी । दृढनिश्चय ऐसा करोनी । करिती प्रयत्न ॥ ६४ ॥ उपनिषद्भाग ऐकती । ईश्वरभावें गुरूतें भजती । यत्न इत्यादि करिती । जिज्ञासु ब्रह्म कळावया ॥ ६५ ॥ ते जाणती ब्रह्म । हें व्यतिरेकज्ञान परम । तेंचि सर्व स्थावरजंगम । हें अन्वयज्ञान त्याउपरी ॥ ६६ ॥ तें ब्रह्म आत्मत्वें जाणावें । मग सर्व तेंचि हें अद्वैत बाणावें । अध्यात्म ऐसें ह्मणावें । त्या ज्ञानातें ॥ ६७॥ तरी अध्यात्मही ते जाणती । "स्वभावोऽध्यात्ममुच्यते" ऐसें श्रीपती । पुढील अध्यायांत अर्जुनाप्रती । स्वयेंचि बोलेल ॥ ६८ ॥ सर्व आपण हा भाव । यास ह्मणावें स्वभाव । अध्यात्मशब्दार्थ देव । बोलेल ऐसा ॥ ६९ ॥ आणि ते जाणती कर्म । कीं निर्माण होती स्थावरजंगम । हें कर्म तेंही ब्रह्म । सर्व कर्म ज्या कर्मी आटतें ॥ १०७० ॥

ह्मणोनि कर्म अखिल । तें जाणती ह्मणे मेघनीळ । अखिल ह्मणजे अशेष सकल । गहन भाव हा पुढें विशदही होणार ॥ ७१ ॥ सातांत तीन जालीं । जीं ब्रह्म अध्यात्मकर्में बोलिलीं । आतां चार जीं उरलीं । तीं बोलतसे या श्लोकीं ॥ ७२ ॥

॥ श्लोक ॥ साधिभूताधिदैवं मां साधियज्ञं च ये विदुः ।
प्रयाणकालेपि च मां ते विदुर्युक्तचेतसः ॥ ३० ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुन संवादे अर्जुनविषादयोगो नाम सप्तमोध्यायः ॥ ७

॥ टीका ॥ अधिभूत हें दृश्य नश्वरस्वभाव । जीव पुरुष तो अधिदैव । अधियज्ञ तो साक्षी स्वयें देव । हें पुढें देवाधिदेव बोलेल ॥ ७३ ॥ परि यांत जीव अधिदैवत । त्यातें ऐसें जाणती ह्मणे अच्युत । कीं अधिभूता नश्वरा जडासहित । आणि मी जो अधियज्ञ त्यासह ॥ ७४ ॥ साधिभूत आणि साधियज्ञ । अधिदैव मी जो त्यातें जाणे अभिज्ञ । ह्मणोनि ह्मणे सर्वज्ञ । गीतार्थ येथें विरळ जाणती ॥ ७५ ॥ बहुतीं हा अर्थ टाकिला । ह्मणोनि टीकाशब्दें झांकिला । विचार येथें नाहीं केला । कीं या दों पदींच कां सकार सह शब्द ॥७६॥ या सह शब्दीं तत्त्व खोल । तें स्फुरे तरी हे समजती बोल । सगर्भ शब्द मानिले फोल । दृष्टी तत्त्वीं न पडतां ॥ ७७ ॥ या अधिभूतादि शब्दांचे अर्थ । पुढें बोलेल जो समर्थ । त्याच अर्थी अर्थ यथार्थ । होती या सकारासह शब्दाचे ॥ ७८ ॥ पुढिल्या अध्यायांत देव । अधिभूत ह्मणेल क्षरभाव । क्षरभाव ह्मणजे नश्वर स्वभाव । चराचर स्थूल देह जीवांचे ॥ ७९ ॥ या अधिभूतांसहित । अधिदैवातें जाणती ह्मणे अच्युत । अधिदैवाचा अर्थ भगवंत । ह्मणेल पुरुष ह्मणोनी ॥ १०८० ॥ पुर देह अधिभूत त्यांत । अविद्येनें जो निद्रित । तो पुरुषांश प्रतिबिंब निश्चित । अधियज्ञा ईश्वराचा ॥ ८१ ॥ त्या अधियज्ञासहित । अधिदैव जाणती ह्मणे भगवंत । कीं बिंबावांचूनि न कळे निश्चित । अंश प्रतिबिंबरूपत्वें ॥८२॥ प्रतिबिंबांश ईश्वराचा । जीव ह्मणोनि बोलती वेदवाचा । निर्णय मागें जाला पुढेंही याचा । होणार निर्णय ॥ ८३ ॥ ज्यांत प्रतिबिंब तें निर्मळ । सत्त्व जैसें निवळ जळ । प्रतिबिंबयोगें तेंचि केवळ । जीव जालें ह्मणावें ॥ ८४ ॥ कीं ज्या उदकीं दिसे प्रतिमुख । तें उदकचि तें मुख । कीं उदकावांचूनि आणिक । न सांपडे कांहीं तयांत ॥ ८५ ॥ ह्मणोनि परा प्रकृती । जीवत्वें वर्णितो श्रीपती । आणि

" ममैवांशो जीव" हेंही जगत्पती । पंचदशीं बोलेल ॥ ८६ ॥ एवं पुरुष ह्मणतां अधिदेव । तदर्थ सत्त्व जळही सूचवी देव । परि जळास घट तैसा स्थूलदेहभाव । अधिभूत चराचर क्षरभाव ॥ ८७ ॥ आणि सत्त्वाचे वृत्तिभेद । बुद्धि अव्यक्त ह्मणती वेद । त्या वृत्तिभेदातें गोविंद । त्रयोदशीं वर्णील क्षेत्र ह्मणोनी ॥ ८८ ॥ " महाभूतान्यहंकारो बुद्धिरव्यक्त " । इत्यादि पंचभूतां क्षरांसंयुक्त । क्षेत्र बोलेल जें क्षरत्वें उक्त । " अधिभूतं क्षरो भावः" ह्मणोनि या प्रसंगीं ॥ ८९ ॥ लिंगदेहासहित । क्षेत्र नश्वर निश्चित । कीं अंतीं ज्ञान परिपाकीं अंत । होतसे जयाचा ॥ १०९० ॥ एवं जीवोपाधि निश्चित । अधिभूत क्षरभाव त्यासहित । प्रतिबिंब पुरुष अधिदैवत । अधियज्ञ बिंबासहित जाणावा ॥ ९१ ॥ कीं दर्पण आणि बिंब । तरीच दिसे प्रतिबिंब । नसतां हे दोन्ही अवलंब । तें नसे ॥ ९२ ॥ याकारणें साधिभूत । ह्मणजे अधिभूत स्थूल सूक्ष्म त्यांसहित । आणि साधियज्ञशब्दें बिंब स्वयें अच्युत । त्यासहित प्रतिबिंबा अधिदैवातें जाणती ॥ ९३ ॥ अधियज्ञाचा अर्थ देव । बोलेल कीं अधियज्ञ 'अहमेव' । 'अहमेव' ह्मणजे मीच देवाधिदेव । बिंब स्वयें त्या प्रतिबिंबाचा ॥ ९४ ॥ कीं अधिदैव जैसा प्रतिबिंब । तैसा नव्हे मी बिंब । मीच त्याचा अवलंब । अंशा अधिदैवा आणि अधिभूता उपाधीचा ॥ ९५ ॥ कीं प्रतिबिंबयुक्त नीर । घट पाहिजे त्यास आधार । तैसें जीवा सत्त्वास शरीर । स्थूल अधिभूत क्षरभाव पाहिजे ॥ ९६ ॥ आणि जडनिषेधाविण । न कळे तयाची खूण । हेंही सर्वज्ञ सगुण । सूचवी एथें ॥ ९७ ॥ ह्मणोनी साधिभूत । अधिदैव जाणे ह्मणे अच्युत । आणि बिंबाविणें न दिसे निश्चित । प्रतिबिंब तें ॥ ९८ ॥ या कारणें साधियज्ञ । कीं अधियज्ञासह ते अभिज्ञ । अधिदैव जाणती ह्मणे सर्वज्ञ । एवं प्रतिबिंब अधिदैव हें बोले ॥ ९९ ॥ आतां तेंचि प्रयाणकाळीं । मातें जाणती ह्मणे वनमाळी । तरी आपण सकळ सकळीं । हे जाणती तिहीं हेंचि प्राणप्रयाणीं स्मरावें ॥ ११०० ॥ ऐशा प्रकारीं जे जाणती । तेचि प्रयाणकालीं स्मरती । जेव्हां धरूनि आत्मस्मृती । सोडिती शरीर ॥ १ ॥ एवं स्मरती ह्मणावें ये स्थळीं । ऐसें असोनिही वनमाळी । जाणती ह्मणे प्रयाणकाळीं । हें कां एथें विचारावें ॥ २ ॥ कां जें नसेल विदित । त्यास जाणती ह्मणों नये निश्चित । विदित असेल जें अत्यंत । तें स्मरती ऐसें ह्मणावें ॥ ३ ॥ स्मरती ह्मणावें जेथें । जाणती ह्मणों नये कां तेथें । ऐसे विचार एथें । करितां तत्त्वार्थ सांपडे ॥ ४ ॥ आतां जा-

णियानें स्मरावें । या भावें जाणती ह्मणे ह्मणावें । तरी जाणणियानेंचि विसरावें । सर्वही त्याणेंचि होतसे ॥ ५ ॥ जाणती ह्मणजे स्मरती । अगत्याच बोलावें ये रीती । कीं अर्थ न लागे ह्मणूनि गती । कल्पावी भलतैसी ॥ ६ ॥ दुसरें जया प्रयाणकाळीं जाणती । तें प्रयाण साधे कोणे रीती । ब्रह्म आपण तोचि उरती । उरी कैंची प्रयाणातें ॥ ७ ॥ ज्ञानियाचें चित्त । देहादि चेतवी प्रारब्धानिमित्त । जोंवरी वायु तोंचि पर्यंत । तरंग जैसा सागरीं ॥ ८ ॥ वायु राहतां सागरीं । सागराचि होय ते लहरी । ब्रह्मीं चित्त यापरी । ब्रह्म होय सरतां प्रारब्ध ॥ ९ ॥ आतां कैचें प्रयाण । हेंही न विचारी जरि निपुण । एथेंही अगत्यपण । लागे गीता वाखाणितां ॥ १११० ॥ मुख्यार्थ न सांपडे । तेव्हां ऐसें संकट पडे । भलतसा अर्थ योजणें घडे । टीकाकारासही तो ॥ ११ ॥ याचा अर्थ भगवंत । बोलेल पुढील अध्यायांत । तेथें याहूनि श्रीकांत । प्रयाण बळकट बोलेल ॥ १२ ॥ कीं अंतकाळीं मातें । स्मरत सोडील शरीरातें । आणि जाय तो माझ्या भावातें । पावे एथें संशय असेना ॥ १३ ॥ मोक्ष एथें निर्गुण । कोणी वाखाणिती निपुण । मुक्तिसुखाची हे खूण । नुरे जेथें ॥ १४ ॥ पक्कज्ञानियास सद्य मोक्ष । आणि अपक्क ज्ञानी हटयोगीं दक्ष । याच्या मोक्षातें क्रममोक्ष । शास्त्रें ह्मणती ॥ १५ ॥ ते ब्रह्मरंध्र भेदोनि जाती । ब्रह्मयासह मोक्ष पावती । कोणी एथें ते गती । वाखाणिती टीकाकार ॥१६॥ तरी या श्लोकीं या ज्ञानी । युक्तचित्त ह्मणोनी । श्रीकृष्ण ह्मणे यावरूनी । सद्य मोक्षचि युक्त चित्तातें॥१७॥उत्तराध्यायांत कमलेक्षण । वेगळेंचि त्या मोक्षाचेंही लक्षण । बोलेल तेथेंही विवरण । विशद टीकेंतही होणार ॥ १८ ॥ एवं एथें मोक्ष सगुण । बोले सर्वज्ञ आपण । दृष्टि तिकडे देती निपुण । मुख्य अर्थ त्यांत सांपडतो ॥ १९ ॥ सगुणमोक्षीं प्रयाणसिद्धी । वैकुंठगमन हेंही प्रसिद्धी । त्या मोक्षीं अनुभवसमृद्धी । मुक्त असती जाणती ते ऐसें ॥ ११२० ॥ " प्रयाणकालेपि " ह्मणोनी । व्याकरणें या सप्तमीविभक्तीकरूनी । प्रयाणकालीं जाणती हा अर्थ होउनी । अर्थ आणिकही होतसे ॥२१॥ "प्रयाणकालेपि " ह्मणे श्रीपती । ह्मणजे प्रयाणकाले 'सत्यपि' ऐसे रीती । अर्थ वाखाणितां सिद्ध होती । मुख्य अर्थ सर्वत्र ॥ २२ ॥ आणि 'अपि' शब्देंकरूनी । कैवल्यमोक्ष जाणणें नसे ह्मणोनी । सूचवूनि बोले या वचनीं । कीं या मुक्तींतही मज जाणती ॥ २३ ॥ कीं जाला असतांही प्रयाणकाळ । त्यावरी जेव्हां मुक्तीचा सुकाळ । तेव्हांही मातें जाणती के-

वळ । कीं अनुभव बुडेना भक्तांचा ॥ २४ ॥ निर्गुण मोक्षापरीस । सगुण मोक्षामृत बहुत सुरस । म्हणूनि सूचवी जगन्निवास । कीं प्रयाणकाळ जाला असतांही जाणती ॥ २५ ॥ कीं जाला असतां प्रयाणकाल । मुक्त होऊनि असती सकळ । तेव्हांही जाणती केवळ । मातें अखंडानंदानुभवें ॥ २६ ॥ हें भक्तांच्या गतीचें प्रकरण । निर्गुणमोक्षास विलक्षण । ऐसें सूचवी कमलेक्षण । कीं निर्गुणमोक्षीं हें नसे ॥ २७ ॥ वैकुंठीं स्वानंदानुभव । निर्गुणीं नसे सधर्मभाव । ज्या सत्त्वें अनुभवावें सर्व वैभव । तें वैभव असोनिही सत्त्व नसे ॥ २८ ॥ अमृतास नाहीं रसना । त्याची गोडी त्याला कळेना । अद्भुत सगुण मोक्षरचना । कीं स्वरूपामृतीं सत्त्वमूर्ति रसना ते ॥ २९ ॥ चित्ताचें जाय चित्तपण । उरे अनुभववर्जित निर्गुण । काय जाणेल येथें खूण । स्थिति ब्रह्मात्मत्वाची तेही जाय ॥ ११३० ॥ त्याचें जाणणें ओसरे । यास निर्गुणत्वें सगुण स्फुरे । विष्णुरूप पावोनि उरे । सत्त्व अक्षय्यपणें वैकुंठीं ॥३१॥ जैसें ईश्वरोपाधि सत्त्व । तैसेंच याच्या सत्त्वासही अक्षयत्व । मुक्त वैकुंठ विष्णुरूप यांचें तत्त्व । हेंच कीं सत्त्वानित्यत्व सम सर्वांचेंही ॥ ३२ ॥ योगनिद्रेच्या अवसरीं । जैसा ईश्वर तैसे परी । निर्गुणत्वेंचि उरती आणि जेव्हां हरी । साकार होतां हेही होती साकार ॥ ३३ ॥ येथें नश्वरत्वप्रसंग । बोलती त्यांचा पुढें मुखभंग । चतुर्दशीं होईल जेव्हां श्रीरंग । परिहरील उत्पत्तिनाश या मुक्तांचा ॥ ३४ ॥ टीका चतुर्थाध्यायाची । तेथें यज्ञप्रसंगें या मोक्षाची । रीति वर्णिली ते साची । मोक्ष शब्देंचि होतसे ॥ ३५ ॥ मोक्ष म्हणावें ज्याला । नश्वर म्हणावें त्याला । तेव्हां नित्य म्हणावें याही बोला । अनित्य म्हणोनि कां न वाखाणावें ॥ ३६ ॥ तेज म्हणावें ज्याला । तम मानावें त्याला । यास आणि मोक्ष अनित्य या बोला । नव्हे काय एककोटित्व ॥३७॥ तें असो या प्रस्तुतीं । येथें म्हणे श्रीपती । कीं प्रयाणकाल जाला असतांही जाणती । मातें म्हणोनि त्याचा हा इत्यर्थ ॥ ३८ ॥ कोणी म्हणती भगवंत । याचा अर्थ अष्टमाध्यांत । बोलेल कीं प्रयाणसमयांत । स्मरोनि मातें जे जाती ॥ ३९ ॥ ते सद्भावातें पावती । तरी जाणती म्हणजे स्मरती । हा अर्थ कां घडेना ये रीती । म्हणतील जरी या प्रसंगीं ॥ ११४० ॥ तरी याहीपुढें जो श्लोक । तेथें बोलेल उत्तमश्लोक । कीं ज्या ज्या भावातें जे लोक । स्मरती अंतीं पावती तो भाव ॥ ४१ ॥ त्याही पुढें म्हणेल कीं या कारणें । अर्जुना युद्धही करी माझ्याच स्मरणें । कीं माझ्या स्मरणशील अंतःकरणें । निःसंदेह मज पावसी

॥ ४२ ॥ स्मरणभक्तीचा महिमा हरी । कळावया बोलेल या उपरी । कीं माझ्या स्मरणें देह सोडिल्यावरी । पावे माझ्या भावातें ॥ ४३ ॥ पावे माझ्या भावातें । ह्मणतां सूचवी या अर्थातें । कीं भाव ह्मणजे सारूप्यातें । पावे तो जाणेच मातें मुक्तींतही ॥४४॥ कीं आणिकही जो जो भाव । अंतकाळीं स्मरे जीव । तोचि भाव पावे हें देव । बोलेल भावशब्दें आकार ॥ ४५ ॥ हा स्मरणमहिमा । कीं अंतकाळीं स्थावर अथवा जंगमा । स्मरतां पावे तयां तैसा पुरुषोत्तम । मजही स्मरतां पावसी ॥ ४६ ॥ एवं भाव शब्दें आकार । आणि बोलावया स्मरणाचा बडिवार । स्मरत सोडिती कलेवर । ऐसें ह्मणे ॥ ४७ ॥ आणि जाला असतां प्रयाणकाळ । मज जाणती ह्मणे मेघनीळ । यावरूनी प्रश्न होतां त्याचें उत्तर प्रांजळ । मद्भावातें पावती हें ह्मणतां होणार ॥४८॥ "कथं ज्ञेयोसि" ह्मणोनी । अर्जुन पुसेल या वरूनी । समजेल कीं साकार मोक्षेंकरूनी । जाणती ह्मणतो आपणातें ॥ ४९ ॥ प्रयाणकाल जालियानंतर कैसा । जाणावया योग्य आहेसि ऐसा । प्रश्न होईल त्यास आकाराचा ठसा । मद्भावशब्दें सूचवील ॥ ११५० ॥ हें भावार्थ गहन । कृपादृष्टि सूचवी कमलनयन । तें बहुतेक समजे अर्जुन । न समजे तेथें प्रश्न करी ॥ ५१ ॥ ते प्रस्तुत सात प्रकार । याचा न कळतां अर्थविचार । प्रश्न करील हा चमत्कार । कृपासिंधु जगद्गुरूचा ॥ ५२ ॥ कीं अपरोक्षाकारणें । या अर्जुनें यावें शरण । " किं तद्ब्रह्म " ह्मणतां विवरण । अपरोक्षाचें करावें ॥ ५३ ॥ हें पुढें बोलणेंचि असे । एवं मोक्ष सगुण येथें दिसे । इतर अर्थ येथें न वसे । विचार करितां ॥ ५४ ॥ आरंभीं ज्ञान सगुण । ज्ञानी सगुण भक्तामध्यें वर्णिले निपुण । अंतीं सगुण भक्तीची खूण । सर्वोत्कर्षें या अध्यायांत बोलिली ॥ ५५ ॥ ऐसा अध्याय सप्तम । आणि या सातांत जो सप्तम । तो पुरुषार्थ याकारितां उत्तम । कीं भक्ति हातींची नव जाय ॥५६॥ ज्ञान असोनि अनुरक्ती । श्रीकृष्णचरणीं हे भक्ती । अत्यंत थोर चारी मुक्ती । ओंवाळिल्या इजवरोनी ॥ ५७ ॥ सकळां उपनिषदांचें सार । हे गीता हरी दुःखसंसार । ते वाखाणितां मूलानुसार । भक्ति सम कांहीं चुकेना ॥ ५८ ॥ जो स्वयें गीताकार । तोचि स्वयें टीकाकार । भगवत्सुवर्ण वामन आकार । विकार नसे सुवर्णत्वीं ॥ ५९ ॥ तथापि कांहीं तो जरी न करी । सर्व सम अकर्ता परी । भक्ति करिती ते तों हरी । करी प्रार्थिला कल्पवृक्ष ॥ ११६० ॥ जो मागे जें फळ । कल्पवृक्ष दे तोंचि केवळ । गीता केली तैसा प्रांजळ । अर्थ करी

ह्मणतां करीतसे ॥ ६१ ॥ ज्यांस अनन्य शरणागती । ते हेंचि या कल्पवृक्षा मागती । ह्मणोनि यथार्थ अनुसंधानगती । तोंचि ऐशा करीतसे ॥६२॥ कीं नसे देवतांतराची भीड । अथवा कांहीं फळाची चाड । कीं अभक्तास वाटेल अवघड । हेही शंका असेना ॥ ६३ ॥ टीका उदंड जाल्या । परी देवतांस तदुपासकास भ्याल्या । यथार्थ अर्थ नाहीं बोलिल्या । तैसी नव्हे हे टीका ॥ ६४ ॥ ह्मणोनि यथार्थदीपिका । नांव पावली हे टीका । कीं अद्वैत आणि भजावें एका । श्रीवत्सांका जगद्गुरूतें ॥ ६५ ॥ विघ्न न हो ह्मणोनी । आरंभीं देवा एका प्रार्थुनी । स्फूर्ती देईल हे इच्छा धरोनी । प्रार्थना एका आणिकाची ॥ ६६ ॥ टीका ऐसी आरंभते । आणि भक्ति अव्यभिचारिणी बोलिजेते । आणि पदोपदीं निषेधिजेते । उपासना अन्य देवतांची ॥ ६७ ॥ त्यांचें परोपदेशपांडित्य । गीताच प्रकट करिते सत्य । कीं टीकेंत बोलणें लागे अगत्य । तुच्छत्व इतर देवताभजनाचें ॥ ६८ ॥ आणि जेथें गहन अर्थ । तेथें घडेना यथार्थ । जरी मानिती कृतार्थ । टीका आपुली ॥ ६९ ॥ "अंतवत्तु फलं तेषां" ह्मणोनी । याच अध्यायांत या श्लोकें करोनी । जें बोलिलें तें येतें दिसोनी । तुच्छफळप्रदत्व त्यांतें ॥ ११७० ॥ कीं टीका निर्विघ्न जाली । आणि रचना स्फूर्तीही आली । तथापि होऊनि आली । ते विरुद्ध मूळासी ॥ ७१ ॥ इतरदेवताभजन । टीकेंत निषेधिती महाजन । आणि आरंभीं करिती नमन । त्या इतर देवांतें ॥ ७२ ॥ वाखाणावी गीता । तीही आदि अंतीं एका अनंता । वंदावें मध्यें ज्या भगवंता । मुख्य सेव्यत्वें वर्णावें ॥ ७३ ॥ त्यांस सर्वही ब्रह्म दिसे । ह्मणोनी त्या देवां वंदिती ऐसें । ऐसें ह्मणावें तरी ह्मणतसे । कृष्ण काय गीतेंत ॥ ७४ ॥ सर्व मी सर्व माझे उपासक । परि तें भजन अविधिपूर्वक । उपास्यदैवत मीच एक । इतरें पहावींन मद्रावें ॥ ७५ ॥ ब्रह्म जरी विघ्नाचा हर्ता । तरी ह्मैसासुर काय परता । अद्वैताश्रयें या वार्ता । फोल अवघिया ॥ ७६ ॥ असो तें हे टीका शेषशयन । स्वयें करी आकर्णनयन । गीताटीका तो आणि वामन । भिन्न अणुहीं न दिसती ॥ ७७ ॥ आत्मत्वें भजतां तया । त्या जगदात्मयाची होतां दया । हात जोडिती सर्व देवता या । परि कोण पाहे त्यांकडे ॥ ७८ ॥ कोणाची नसे भीड । आणि कोणाची नसे चाड । अनन्यभाक्ति लागतां गोड । या भगवद्गीतेंत ये रीती ॥ ७९ ॥ वाचोत जे वाचिती । न वाचोत जे वाईट मानिती । संतुष्ट होय एक जगत्पती । या यथार्थ निरूपणें ॥ ११८० ॥ जे अनुभवी

आणि भक्त । जे इतर फळीं विरक्त । आणि जे समजती युक्तायुक्त । ते क्षणही न सोडिती हे टीका ॥ ८१ ॥ भ्रमरा कमळें प्रार्थावें । कीं चकोरा चंद्रें आमंत्रण द्यावें । कीं मयूरास मूळ पाठवावें । धराधरीं ॥ ८२ ॥ चंद्र नावडे तस्करा । ह्मणोनि वीट येना चकोरा । कुमुदें लाजती भास्करा । ह्मणोनि कमळें मुख न झांकिती ॥८३॥ जगद्वंद्य श्रीमद्भागवत । तेथें अप्रीति धरिती कुत्सित । अभक्त आणि कुमार्गरत । त्यांस तैसी हे टीका॥८४॥बौद्धीं वेद दूषिले । तरी काय ते वांयां गेले । स्वहिततत्पर रसज्ञ भले । तेच वाचिती हे टीका ॥ ८५ ॥ असो तें आतां अर्जुनरथाचे ठायीं । जो गीता उपदेशितो शेषशायी । प्रतिपदीं अर्पिली त्याच्या पायीं । हे यथार्थ दीपिका वामन ह्मणे ॥ ११८६ ॥

॥ वामनकृतसंस्कृत श्लोक ॥

भक्तिर्मुकुंदे जगदात्मनीशे नान्यत्र कस्मिन्फलदेस्त्वनीशे ।
यः सप्तमे सप्त जगाद पार्थे सर्वं तदस्माकमहो कृतार्थम् ॥ १ ॥

इति श्रीमद्वामनपंडितविरचितायां यथार्थदीपिकायां सप्तमोऽध्यायः ॥

अध्याय ८.

श्रीमते भगवते भगवत्तमाय जगदादिगुरवे सर्वोत्तमाय नमः॥ जय जय सर्व सर्वापरोक्ष । जय जय पारोक्ष्यहेतुहरणदक्ष । जय जय कृष्ण पुंडरीकाक्ष । अर्जुनगुरो जगद्गुरो मद्गुरो ॥ १ ॥ जय जय ब्रह्मात्मसाक्षात्कार । जयजयाध्यात्मविद्याविचारसार । जय जय भूतभावोद्भवविसर्गकर । कर्मब्रह्मभावनाबोधा ॥ २ ॥ अधिभूतक्षरतरंगसागर । अधिदैव प्रतिबिंब बिंबेश्वर । सकळ शरीरगत परात्पर । सर्वज्ञ अधियज्ञ ॥३॥ जाते सति प्रयाणकालेंपि । अखंडत्वें न वेद्योसि मुक्तावपि । आब्रह्मलोकाः पुनरावर्तिनोपि । कोपि त्वां प्राप्य वैकुंठं न निवर्तते ॥४॥ जयजयानन्यभक्तिगम्य । जय जय साम्य हतसकलवैषम्य । जय जय रमामनोरम्य । सगुण सुंदर भक्तवत्सल ॥ ५ ॥ जय जय स्मरणलभ्यचरण । जय जय जगत्पावनाचरण । जय जय जगत्कारणाकारण । नारायण जगत्पते ॥ ६ ॥ जय जय प्रपन्नसुलभ । जय जय दुग्धसिंधुदुहितावल्लभ । जय

१ मेघानीं.

जय सजलजलदसन्निभ । श्रीवत्सांक शेषपर्यंक ॥ ७ ॥ जय जय दशाव-तारा़ष्टम । जय जय देवकीतनयाष्टम । जय जय सप्तोपदेष्टाष्टम । जय जयाष्टैश्वर्य ॥ ८ ॥ देवा वेदवाणी संस्कृत । लोकवाणी प्राकृत । परि यथार्थ अर्थ व्याकृत । जोडती त्यांचेंचि पद तुझें ॥९॥ ते तुझे चरणकमल । जे निववितो श्रीकरतळ । ध्यातां करिती शीतळ । त्रिपातप्त हृदयातें ॥ १० ॥ करूनियां पायांतें नमन । तुझीं रूपें श्रोते जन । तूं अर्थ दाविसी निवेदन । तें त्यांप्रती करीन अष्टमाध्यायाचें ॥ ११ ॥ श्रुति ह्मणे आत्मा रथी । देह रथ बुद्धि सारथी । बुद्धिस्थानीं पार्थ रथी । सारथि जाला जग-द्गुरु ॥ १२ ॥ बाह्य सारथ्याकारणें । नरें प्रार्थिला नारायण । अमृत क-रीच आपला गुण । पितां उदक मानूनिही ॥ १३ ॥ बुद्धिस्थानीं बसे हरी । मग बोद्धव्यास काय उरी । जाणायाची सीमा जेथवरी । तेथवरीच पात्रें बुद्धीतें ॥ १४ ॥ बुद्धींत सर्वांच्या असे । परि जैसा काष्ठीं सर्वत्र अग्नि बसे । मथिला प्रगट अग्निहोत्रीं दिसे । तैसा रथीं अर्जुनाच्या ॥ १५ ॥ काष्ठीं काष्ठ प्रकाशक । परि न दावी महिमा कौतुक । तैसे जे भजनहीन लोक । त्यांच्या बुद्धींत तैसा परमात्मा ॥ १६ ॥ जैसा अर्जुनाचे रथीं । तैसा भक्तियुक्त मनोरथीं । बुद्धिस्थानीं होतो सारथी । जो सारथि अर्जुनाचा ॥ १७ ॥ जेथें न पात्रे वेदवाणी । परते मागें लाजिरवा-णी । तेथें पाववी चक्रपाणी । बुद्धि आपुल्या भक्तांची ॥ १८ ॥ तो स्वयें सारथि जाला । काय उणें मग तयाला । गीतोपदेश आरंभि-ला । याच लागीं ॥ १९ ॥ परंतु अपरोक्ष ब्रह्मविद्या । जे उपदेशितां नासे अविद्या । जिणें जगत्कारणा आद्या । परोक्ष केलें अपरोक्षास-ही ॥ २० ॥ दृष्टीस रज्जु दिसे । तेव्हां भ्रम उठे सर्प भासे । अपरोक्ष अ-सोनि न गवसे । परोक्ष आत्मा ऐसा अविद्येनें करोनी ॥ २१ ॥ त्या मिथ्या सर्पातें निषेधी । सत्य रज्जु त्यातें बोधी । ऐसा गुरु भेटे तरी अवधी । शरणागताची तो पाहे ॥ २२ ॥ कीं क्षुधा असेल जया । तो काकुळती अन्नदातया । करील तैसा गुरुराया । मागेल ब्रह्मविद्या मुमुक्षु ॥ २३ ॥ क्षुधा नसेल ज्याला । मिष्टान्न घालितां त्याला । न रुचे न पचे व्यर्थ गेला । तैसा गुरूचा उपदेश ॥ २४ ॥ चतुर्थाध्यायटीकेंत या रीती । वर्णिल्या त्याच वदतां मागुती । ग्रंथ वाढेल एवं गुरूप्रती । शरण न येतां करूं नये उपदेश ॥ २५ ॥ अर्जुन अपरोक्षाचें पात्र । कृपेनें ओळखला कमलनेत्र । परि संप्रदायपालनार्थ मात्र । वाट पाहे प्रश्नाची ॥२६ ॥ द्वितीयाध्यायांत-

शरण । आला वंदूनि चरण । मी शिष्य ह्मणूनि दीनपण । निवेदिलें ।।२७।। परंतु भीष्मादिकां मारूं कैसा । मनीं याच शोकाचा वळसा । तें बोलतां प्रसंग ऐसा । ग्रंथ आला येथवरी ॥ २८ ॥ अध्यायांत तिसरिया । ह्मणे बुद्धिपरता आत्मा धनंजया । जाणूनि मग मारीं या । वैरिया कामातें ॥ २९ ॥ ज्ञानाचें श्रेष्ठपण । प्रतिपदीं आपण । बोलोनि ह्मणे ब्रह्म सगुण । कीं तें तूं जाण अर्जुना ॥ ३० ॥ चतुर्थी "तद्विद्धि प्रणिपातेन" । या श्लोकें जगज्जीवन । ह्मणे संतांपासूनि तें ज्ञान । जाण अर्जुना ॥ ३१ ॥ षष्ठाध्यायांत लक्षण । योगाचें बोलिला कमलेक्षण । आणि पूर्वाध्यायांत समपण । आपलें जाणशील ऐसेंचि बोलिला ।। ३२ ॥ कीं आतां सांगतों परोक्ष । हेंचि होईल अपरोक्ष । जेव्हां पुसतील तूं दक्ष । ब्रह्म कैसें ह्मणोनि हा भाव ॥ ३३ ॥ यांत तत्त्वसाक्षात्कार अपरोक्ष । होय ऐसें न बोले अंबुजाक्ष । जें जें वदला तें तें परोक्ष । उपदेश अपरोक्ष हा नव्हे ॥ ३४ ॥ ब्रह्म अध्यात्मकर्मादि सात । शेवटीं सप्तमाध्यायांत । तेथेंही बोलिला भगवंत । मज ऐसें जाणती ह्मणोनी ॥ ३५ ।। एवं च येथपर्यंत । जें जें बोलिला भगवंत । तें ऐकोनि जाला बुद्धिमंत । परि ब्रह्म अनुभवा न आलें ॥ ३६ ॥ शब्दपीयूषाची वृष्टी । मेघश्यामाच्या वाटल्या गोष्टी । ब्रह्म पहावें आत्मदृष्टी । हे अपेक्षाच उपजेना ॥ ३७ ॥ ह्मणोनि ब्रह्म अध्यात्म इत्यादि रीति । भक्त सप्तप्रकारें जाणती । हें चमत्कारें बोलिला श्रीपती । कीं प्रश्न अर्जुनें येथें करावा ॥ ३८ ॥ कीं या सातां प्रकारांतें । अर्जुन नेणेचि तो आपणातें । प्रश्न करील मग तयातें । या मिसें सांगावें अपरोक्ष ॥ ३९ ॥ सहज बोलतां ब्रह्मस्थिती । तरी प्रश्नापेक्षा होती अथवा न होती । ब्रह्म अध्यात्मादि सुकृती । जाणती ह्मणूनि बोलिला ॥ ४० ॥ तरी कोण्याप्रकारें जाणती । हें पुसूं या कृष्णाप्रती । प्रश्नापेक्षा ये रीती । दाटूनि निर्मिली स्वयें येथें ॥ ४१ ॥ पान्हा दाटला स्तनीं । निद्रिता बाळातें जननी । पाजी दाटूनि उठवूनि । कृपाळु तैसा श्रीकृष्ण ॥ ४२ ॥ सांगों नये प्रश्नाविणें । तो तरी न करी प्रश्न आपण । या कारणें ब्रह्म सगुण । करी येथें चमत्कार ॥ ४३ ॥ कीं ब्रह्म जाणती सुकृती । तें ब्रह्म कैसें ये रीती । प्रश्न करील आपणाप्रती । येथें अर्जुन ॥ ४४ ॥ प्रश्न ऐसा करील पार्थ । तेव्हांच करावा तो कृतार्थ । हा संप्रदायपालनार्थ । उपाय करी जगद्गुरू ॥ ४५ ॥ ऐसें बोलोनि सप्तम । अध्याय संपवी सर्वोत्तम । उगा राहे तों पांडवोत्तम । प्रश्न हा करी अर्जुन ॥ ४६ ॥

अर्जुन उवाच ॥ किं तद्ब्रह्म किमध्यात्मं किं कर्म पुरुषोत्तम ।
अधिभूतं च किं प्रोक्तमधिदैवं किमुच्यते ॥ १ ॥
अधियज्ञः कथं कोऽत्र देहेऽस्मिन्मधुसूदन ।
प्रयाणकाले च कथं ज्ञेयोऽसि नियतात्मभिः॥२॥

॥ टीका ॥ अर्जुन ह्मणे " किं तद्ब्रह्म " । प्रश्न सातांत हा प्रथम । प्रश्न-निमित्त हे कीं पुरुषोत्तम । तें "ब्रह्म तद्विदुः कृत्स्नं" ह्मणोनि बोलिला॥४७॥ ब्रह्म जाणती केवळ । आणि तें ब्रह्मचि सकळ । दों प्रकारें तें सुकृती कुशळ । ब्रह्म जाणती ॥ ४८॥ पूर्वाध्यायांत अधोक्षज । बोलिला ऐसें प्रश्नबीज । त्यावरूनी कुंतीचा आत्मज । दों प्रकारें पुसतो तें ब्रह्म ॥ ४९ ॥ " किं तद्ब्रह्म " हीं चारी अक्षरें । वाखाणावीं दों प्रकारें । "किं ब्रह्म किं तत् " ऐसा आदरें । प्रश्न करितो येथें ह्मणावा ॥ ५० ॥ " किं ब्रह्म " ह्मणजे कैसें ब्रह्म । ' किं तत् ' ह्मणजे कैसें तें जें तूं सर्वोत्तम । बोलिलासि संपतां सप्तम । " तद्विदुः कृत्स्नं " ह्मणोनी ॥ ५१ ॥ जें पूर्वी बोलिलें । त्यांत पुसतां जें उरलें । तें तत् शब्दें सूचविलें । कीं तेंचि सर्व ह्मणूनि बोलिलासि तें कैसें ॥ ५२ ॥ दों परी ब्रह्म जाणती । ऐसें बोलिला श्रीपती । दोहीं परी तें कैसें ऐसें त्याप्रती । पुसतसे श्रोताही ॥ ५३ ॥ ऐसेंच या प्रश्नाचें उत्तर । दों परी ब्रह्म सर्वेश्वर । बोलेल यालागीं ऐसा प्रकार । प्रश्नाचाही बोलावा ॥ ५४ ॥ व्याकरणसिद्ध अर्थ । प्रश्नबीजानुरूप बोले पार्थ । श्रीकृष्ण सूचवी तें कां व्यर्थ । टाकूनि वरिच्यावरी उडावें ॥ ५५ ॥ प्रश्न प्रथम ऐसा बरा । कैसें अध्यात्म हा दूसरा । कैसें कर्म हा तिसरा । प्रश्नबीजा सातांत ॥ ५६ ॥ आणि बोलिलें अधिभूत । तें कैसें सांग निश्चित । हा चौथा प्रश्न आणि अधिदैवत । कैसें बोलिजेतें हा पांचवा ॥ ५७ ॥ सहावा प्रश्न ऐसा । कीं अधियज्ञ एथें या देहीं कैसा । एथें कांहीं समजोनिसा । अर्जुन पुसे ॥ ५८ ॥ साधियज्ञ ह्मणजे अधियज्ञासहित । मज अधिदैवा जाणती ह्मणूनी भगवंत । बोलिला इतकेंचि ऐसियांत । अधियज्ञ देहीं आहे ऐसें समजला ॥ ५९ ॥ तरी हा संवाद सन्मुख । बोलतां हस्त नेत्र मुख । तदनुरूपें चेष्टतां अंतर्मुख । बुद्धि अर्थी होतसे ॥ ६० ॥ अधिभूतासह जाणती निपुण । ऐसें बोलतां ब्रह्म सगुण । हातें करूनी दाखवी खूण । देहाकडे अर्जुनाच्या ॥ ६१ ॥ आणि ह्मणतां साधियज्ञ । हात आपणाकडे सर्वज्ञ । दावितां समजला श्रोता अभिज्ञ । कीं अधियज्ञ हा स्वयें श्रीकृष्ण ॥ ६२ ॥ अधिदैव मी त्या मातें जाणती ह्मणे । परि दावितां नये

त्याचे खुणे। बिंबात्मता समजे तोचि जाणे । प्रतिबिंबचैतन्या तयातें ॥ ६३ ॥ एवं साधिभूत ह्मणतां देहासहित । जें काय असेल अधिदैवत। त्यातें जाणत असतील आणि निश्चित। अधियज्ञ हा स्वयें श्रीकृष्ण ॥ ६४ ॥ कीं मी अधियज्ञ त्या मजसहित । अधिदैवातें जाणती हें भगवंत। खुणेनें दावितो अत्यंत। स्पष्ट उघडूनी ॥ ६५ ॥ अधिदैव अधिभूतासहित। ह्मणतां देहाकडे दाविला हात। तेव्हां समजला कीं अधिदैव याच देहांत। असेल जे रीती असेल ॥ ६६ ॥ कीं अधिभूत ह्मणतां हात। देहाकडे दावितो भगवंत। अधिदैव नसतां या देहांत। या देहासहित कोठें ह्मणूनि जाणावा ॥ ६७ ॥ देह देहापरता न दिसे। ऐसिया देहासहित जेव्हां गवसे। तेव्हां जाणावें कीं वसे। अधिदैव कोण तो याच देहांत ॥ ६८ ॥ आणि हा अधियज्ञ आपण। यासहित त्या अधिदैवाची खूण। जाणती तेव्हां निपुण। तेव्हां हाही असेल याच देहांत ॥ ६९ ॥ कीं हा जरी या देहीं नसे। तरी देहीं यासहित कैसें। अधिदैव जाणती ऐसें। तर्क करूनि पुसे ह्मणावा अर्जुन ॥ ७० ॥ ऐसें न ह्मणतां या देहीं। मी अधियज्ञ आहें हें कांहीं। प्रश्नबीज बोलतां नाहीं। श्रीकृष्ण बोलिला ॥७१॥ "साधियज्ञं च ये विदुः" ह्मणोनी। ह्मणतां या देहीं अधियज्ञ ये रीती करूनी। न समजतां "अधियज्ञः कथं कोत्र देहेस्मिन् " ऐशा वचनीं। कैशावरूनि हा पुसे ॥ ७२ ॥ एवं करादिसंकेत। दाविता जाला श्रीनिकेत। त्यावरूनि ह्मणावा पांडुसुत। " अधियज्ञः कथं कोत्र देहेस्मिन्" ह्मणुनी पुसतसे॥७३॥ तरी हे गोष्टी त्यातें समजली। समजोनि मागुती कां पुसिली। शंका ऐशी उपजली। तेव्हां न घडे ह्मणावा जरी हा अर्थ ॥ ७४ ॥ तरी करिती या शंकेचा परिहार। अर्जुनप्रश्नशब्दाचे चमत्कार। कीं अधियज्ञ कोण कैसा हा प्रकार । सांग अजी मधुसूदना ॥७५॥ कीं देहीं अधियज्ञ आहे ये रीती। समजलों जी श्रीपती। तथापि शंका उपजली चित्तीं। अधियज्ञ कैसा या देहीं ह्मणोनी पुसतो हा भाव ॥ ७६ ॥ ब्रह्म कैसें अध्यात्म कैसें । कर्म कैसें अधिभूत कैसें। अधिदैव कैसें ह्मणवूनि ऐसें। येथवरी पुसे कैसें कैसें ह्मणूनि इतकेंचि ॥७७॥ अधियज्ञ कैसा कोण। येथें देहीं याच देहीं ह्मणूनि बोले निपुण। भाव कीं तूं ह्मणसी तो आपण। हें कैसें घडे ॥ ७८ ॥ कीं तूं मधुसूदन। ज्याणें केलें मधुदैत्यहनन । तोचि तूं यदुनंदन। अवतरलासि या रूपें ॥ ७९ ॥ जेथें तेथें रूपवंत। तूं सगुण भगवंत । निर्गुण ह्मणों तरी तें अत्यंत। निर्धर्म धर्म कोणी त्याला लागेना ॥ ८० ॥ अधियज्ञ यज्ञाचा अधिष्ठाता। तो

निर्गुण नव्हे कीं तें उभीच सत्ता । सगुण तूं मधुदैत्यहंता । तो कैसा देहवंत या देहीं ॥ ८१ ॥ या रूपें मधुसूदना । या देहीं कैसा तूं हें कळेना । या कारणें यदुनंदना । तो कोण ॥ ८२ ॥ "कथं कोत्र देहेस्मिन्मधुसूदन" । कैसा कोण येथें देहीं याच देहीं ह्मणे अर्जुन । येविषयींच अत्यंत शंकित मन । दाखवी या प्रश्नशब्दप्रवहांत ॥ ८३ ॥ येथें देहीं याच देहीं । आश्चर्य सूचवी तिन्ही शब्दींही । कीं माझिया मतें घडत नाहीं । कीं या देहीं ह्मणावास तूं अधियज्ञ ॥ ८४ ॥ अत्र ह्मणजे येथें या प्रसंगांत । कीं या सातांत अधियज्ञ या देहांत । कैसा कोण आणि तूं भगवंत । ह्मणावा तरी देहांत याच तूं कैसा ॥ ८५ ॥ तूं वैकुंठीं अथवा जेथें । अवतरोनि फिरसी अससी तेथें । तो कोणे रीतीं येथें । ह्मणावयास या देहीं ॥ ८६ ॥ आणि मजसमोर दिससी । तो देहांत कैसा अससी । आणि याच देहीं निघालासी । श्रीकृष्णा काय तूं ॥ ८७ ॥ ऐसें मानूनि नवल । अर्जुन बोलिला हे बोल । भावार्थ त्यांत अत्यंत खोल । ये रीती ॥ ८८ ॥ कीं ऐको न जाणे निर्गुण । आणि अवतरतो तो हा कृष्ण सगुण । कीं युगायुगीं अवतरतो आपण । हें चतुर्थी येथें श्रीकृष्ण बोलिला ॥ ८९ ॥ तिसरें व्यापक सगुण । तें न कळे कळेना जों निर्गुण । तें कळेल आतांच जेव्हां खूण । कळेल अपरोक्षें ब्रह्मात्मतेची ॥ ९० ॥ " किं तद्ब्रह्म " याचें उत्तर । " अक्षरं ब्रह्म परमं " ऐसें सर्वेश्वर । देतां अपरोक्षसाक्षात्कार । होतां व्यापक सगुणही कळेल ॥ ९१ ॥ कीं शुद्धसत्त्वें अनुभव । हेंचि सगुणत्वाचें वैभव । मग मीच अधियज्ञ ह्मणेल देव । संदेह उरेल मग कैंचा ॥ ९२ ॥ या देहीं अधियज्ञ कोण कैसा । प्रश्न अर्जुनाचा ऐसा । देहीं अधियज्ञ पुसावा हा ठसा । कोठूनि बैसला त्याच्या चित्तांत ॥ ९३ ॥ ऐसा करितां विचार । बोलणें लागलें हें गुह्यसार । श्रीकृष्ण वक्ता हें वारंवार । काय ह्मणवूनि बोलावें ॥ ९४ ॥ आतां अर्जुन सर्व जाणे । हें लोकांकारणें सांग ह्मणें । ऐसें ह्मणतां सद्य वाणे । अश्रद्धा सकळांसही ॥ ९५ ॥ लटिकाच पुसतो अर्जुन । लटिकेंचि त्याचें समाधान । त्यास गीतोपदेशें जालें ज्ञान । सर्व मिथ्या ॥ ९६ ॥ सप्तमपर्यंत परोक्ष । अष्टमीं तत्त्व अपरोक्ष । एकादशीं आरंभींच दक्ष । अर्जुनही बोलेल ॥ ९७ ॥ हा विचार सकळीं सांडिला । तो भगवंतें एथें मांडिला । उगाचि गीतासिंधु ओलांडिला । तरी त्यांतील रत्नें कैसीं सांपडतीं ॥ ९८ ॥ कूर्मरूपें मंदर । पाठी धरी सगुण सुंदर । अजितरूपें अमृतसागर । मथूनि रत्नें तो काढी ॥ ९९ ॥ असो आतां यावरी । सा-

तवा प्रश्न अर्जुन करी । कीं प्रयाणकाळीं कैसे परी । जाणिजेतोसि तूं देवा ॥ १०० ॥ कीं साहा प्रकारें तूंतें । जाणती सुकृती जया चित्तें । नियत केलें त्या चित्तातें । सर्वदा जिहीं तुझ्या ठायीं ॥ १ ॥ नियतचित्त जे ऐसे असती । तेचि जाणती तूतें जी श्रीपती । पुन्हा प्रयाणकाळीं कोणे रीती । तूं तिहीं जाणिजेतोसी ॥ २ ॥ जाला असतां प्रयाणकाळ । त्यावरी मुक्तिदशेचीच वेळ । ते समयींही सगुणमुक्ति केवळ । जाणती हा अर्थ पार्थ नाहीं समजला ॥ ३ ॥ म्हणोनि ऐसें हा प्रश्न केला । तरी याचें उत्तर देव त्याला । देईल कीं सगुण मोक्षांत मजला । जाणती न बुडे अनुभव हा त्याचा भाव ॥ ४ ॥ सातही प्रश्न ये रीती । आइकता जाला श्रीपती । अनुक्रमें उत्तरें त्याप्रती । देतसे प्रश्नानुरूप ॥ ५ ॥ प्रश्न सातांतही प्रथम । ऐसा कीं 'किं तद्ब्रह्म' । याच्या उत्तराच्या मिसें परम । स्वरूपसाक्षात्कार-उपदेश ॥ ६ ॥ ज्यानिमित्त प्रश्नबीज । पूर्वाध्यायांत अधोक्षज । बोलता जाला कीं अर्जुन मज । पुसो 'किं तद्ब्रह्म' म्हणोनी ॥७॥ त्या प्रश्नाचें उत्तर । व्यतिरेक अन्वयरीती परमेश्वर । बोलतो जगद्गुरुतर । षड्गुणसंपन्न ऐसें श्रीभगवान् ॥ ८ ॥

॥ श्रीभगवानुवाच ॥ अक्षरं ब्रह्म परमं स्वभावोऽध्यात्ममुच्यते ॥

॥ टीका ॥ जें नव्हे क्षर । तें म्हणावें अक्षर । तें ब्रह्म म्हणे गुरुवर । व्यतिरेक उपदेशी इतकियांत ॥ ९ ॥ कीं ब्रह्म तें अक्षर । म्हणजे तें नव्हे जितकें क्षर । जडभाग तितका क्षर नश्वर । आत्मा नव्हे ॥ ११० ॥ निषेधिला जड अनात्मभाव । तेव्हां क्षर नव्हे म्हणोनि बोलिला देव । वाच्यांश निरसतां स्वयमेव । लक्ष्यांश आत्माच उरला ॥ ११ ॥ कीं शब्द अहंकारापासुनी । तोही निषेधिला जेथूनी । शब्द परतला तेथूनी । उरलें निःशब्द तें ब्रह्म ॥ १२ ॥ "यतो वाचो निवर्तंते" । हे श्रुति तें ब्रह्म बोलते । बुद्धि अनुभवें त्यास जाणते । तें ऐसें कीं तैसें न बोलवे ॥ १३ ॥ यालागीं तें अक्षर । म्हणजे तें कीं जें नव्हे क्षर । हें व्यतिरेकमुखें उत्तर । दे शाखाचंद्रन्यायें श्रीगुरु ॥ १४ ॥ उपदेश अनिर्वाच्य आत्मयाचा । कैसी करूं शकेल वाचा । शब्द मूळ शाखेसहित जड वृक्षाचा । निषेध होतां उरे दिसे तोचि चिच्चंद्र ॥ १५ ॥ म्हणूनि वाच्य जितकें । क्षर जड म्हणावें तितकें । तें सर्व नव्हे म्हणतां श्रीवत्साकें । दाविलें निषेध शेषस्वरूप शिष्यातें ॥१६॥ ब्रह्म पुसों लागला । तो स्वयेंचि ब्रह्म होऊनि उरला । राजा स्वप्नीं राजद-

---

१ नाशवंत, नश्वर.

र्शना गेला । जागा होतां राजा आपण ॥ १७ ॥ नवल गुरुराजवाणी । नवल गुरुराज अभय वाणी । नवल गुरुरायाची करणी । कीं ब्रह्मचि करी जीवातें ॥ १८ ॥ लोहास लागे परिस । मग काळिमा कैंची तयास । गुरुकृपा होतां जीवास । जीवत्व कैंचें ॥ १९ ॥ लोहत्व करूनि दूरी । परिस लोहास सोनें करी । परी देऊं शकेना सरी । आपुली तया ॥ १२० ॥ कीं लोहांतराचें हेम । करूं न शके परिसासम । जीव होय स्वयें ब्रह्म । ब्रह्म करी आणिकातें ॥ २१ ॥ काय वर्णवेल गुरुमहिमा । वेदास ज्याची वाणी सीमा । जें न बोलवे निगमा । तें निःशब्दशब्दें जो दावी ॥ २२ ॥ शब्द राहे शाखेवरी । दृष्टि चंद्रातें धरी । श्रीगुरुरूपी ऐसा हरी । शब्दें दावी निःशब्द ॥ २३ ॥ शाखेवरी चंद्र पाहे । ह्मणतां शब्द शाखेवरीच राहे । पुढें काय खूण आहे । कीं तेथें चंद्रमा सांगावा ॥ २४ ॥ गळे जें अक्षर । तेणें दाविलें अक्षर । बाप समर्थ गुरुवर । शब्दें दावी निःशब्द ॥ २५ ॥ श्रीगुरुमहिमा अपार । वर्णितां ग्रंथ वाढेल फार । हे गीताटीका जो जो प्रकार । बोले तो तो महिमा तयाचाच ॥ २६ ॥ एवं निषेधूनि क्षर । उरला आत्मा तो दाविला अक्षर । आणि 'किं तद्ब्रह्म' याचें दिधलें उत्तर । कीं हें अक्षर अगा ब्रह्म ॥ २७ ॥ क्षरभाग निषेधितां अनेक । कळलें अक्षर ब्रह्म एक । हा क्षराअक्षरांचा विवेक । व्यतिरेक बोध बोलावा ॥२८॥ नेणे आपणातें आपण । हें अविद्येचें होतें आवरण । याच्या परिहाराचें कारण । व्यतिरेकबोध हा केला ॥२९॥ ब्रह्म ह्मणतां अक्षर । तें अक्षर कळलें निषेधितां क्षर । भगवत्कृपा पात्र चतुर । ब्रह्मात्मखुणे तें पावला॥१३०॥परि क्षरभाग जड निषेधिला । तो दृश्यत्वें दिसों लागला । ह्मणोनी नाहीं बिंबला अद्वैतबोध ॥३१॥ बुद्धि घेऊनि इंद्रियविकार । देखे जडभाग नानाकार । हा जो अविद्येचा प्रकार । विक्षेप ह्मणावें यालागीं॥३२॥या विक्षेपाचा परिहार । कीं सोनेंचि दिसे अलंकार । ऐसें ब्रह्मचि दिसे नानाकार । तो अन्वयबोध बोलावा ॥ ३३ ॥ या दोंपरी ब्रह्म जाणे । त्यातेंचि अद्वैत बोध बाणे । यालागीं सप्तमीं कृष्ण ह्मणे । कीं ब्रह्म जाणती । दोंपरी ॥ ३४ ॥ ब्रह्म जाणती सुकृती । आणि तेंचि सर्व ऐसें जाणती । हें प्रश्नाचें बीज श्रीपती । सप्तमीं शेवटीं बोलिला॥३५॥तदनुरूप प्रश्नही जाला। प्रश्न दोंश्लोकीं तो वाखाणिला । तदनुरूप कृष्णही बोलिला । "अक्षरं ब्रह्म परमं" ह्मणोनी॥३६॥यांत हा 'अक्षरं ब्रह्म' हें एक । उत्तर देतां उपदेशिला व्यतिरेक । आतां एक तेंचि अनेक । समजे ऐसें परमशब्दें उपदेशितो ॥३७॥ " अक्षरं ब्रह्म परमं " ह्मणोनी ।

यांत दीधलीं उत्तरें दोनी । व्यतिरेक 'अक्षरं ब्रह्म' येणें करूनी । परमश-ब्दें अन्वय आतां दावितो ॥ ३८ ॥ अक्षर ह्मणतां निषेधिलें क्षर । कीं सोनें नव्हे कुंडलाकार । जे अलंकार होऊनि निर्विकार । त्या आकारांत तें परम ॥ ३९ ॥ परम तंतु पटीं । परम माती घटीं । परम सोनें ज्याणें गो-मटीं । दिसती भूषणें ॥ १४० ॥ "तद्विदुःकृत्स्नं" ह्मणोनी । प्रश्नबीज या मार्गे करूनी । सप्तमीं बोलिला त्यावरूनी । परम शब्दें क्षरांतही दाखवी ब्रह्म ॥ ४१ ॥ सर्व तें ब्रह्म जाणती । कीं कारण कार्यांत पाहती । कार्याहूनि परम ह्मणती । कारणातें ॥ ४२ ॥ तंतु रूपातें न सोडी । जे ऐसी पासोडीची दसोडी । ते दावितां पासोडी । लटकी होऊनि तंतुचि दिसे ॥ ४३ ॥ पटांत तंतु परम । तैसें जडीं ब्रह्म । तंतुचि पट तैसें स्थावरजंगम । ब्रह्म सकळ ॥ ४४ ॥ प्रथम तंतुरूपें दिसे आत्मा । पटरूपें तेव्हां दिसे अनात्मा । परम या कारणें ह्मणे जगदात्मा । कीं जें नाहीं त्यातें दावी आणि प्रकाशी तें पर-म ॥ ४५ ॥ सोनियावीण अलंकार । न दिसे असत्य आकार । तैसें ज्या-वीण चराचर । न दिसे परम कैसें तें नव्हे ॥ ४६ ॥ परि आधीं दिसे द-सोडी । मग त्यास दावितां पासोडी । तींत परम ह्मणतां न सोडी । दृष्टि मग तंतूतें ॥ ४७ ॥ तैसें ओळखोनि अक्षर । आहे द्वैतरूपें क्षर । तो परम ह्मणतां सर्वेश्वर । ब्रह्मचि सर्वही तो देखे ॥४८॥होती जाती तरंग आकार । ते आकार बोलावे क्षर । परि पाणी परम त्यांत तें अक्षर । आदिमध्यांतही तरंगीं जें ॥ ४९ ॥ मृगतृष्णा नीर । उपजे असे तें नासे क्षर । परम किरण सूर्याचे अक्षर । आदिमध्यांत त्या मिथ्या जलाचे ॥ १५० ॥ वेदीं इत्या-दि हे दृष्टांत । ते सूचवूनि भगवंत । परम शब्दें अनंत । अन्वय ऐसा उप-देशी ॥ ५१ ॥ ब्रह्म जाणती केवळ । मग तेंचि ब्रह्म जाणती सकळ । ऐसें बोलोनि घननीळ । व्यतिरेक अन्वय बोलिला सप्तमींच ॥ ५२ ॥ तरी तेव्हां हीतें परोक्ष । अष्टमीं जालें अपरोक्ष । परम शब्दें समजला दक्ष । कार्य क्ष-रांत अक्षर कारण ॥ ५३ ॥ कार्य न दिसे कारणाविण । परम ह्मणतां कळ-ली खूण । दृष्टांतकोटी विचक्षण । समजला इतकियांत ॥ ५४ ॥ या दृष्टां-ताचे विचार । द्वितीयाध्यायटीकेंत निर्धार । जाले आसतां वारंवार । बो-लतां ग्रंथ वाढतो ॥ ५५ ॥ न कळे दृष्टांतावांचूनी । बोलावें अगत्य या गोष्टीवरूनी । कोण्ही कुयुक्ति चालिती ह्मणोनी । पूर्वी सिद्ध केलेच हे दृष्टां-त ॥ ५६ ॥ प्रथम प्रश्न उत्तर । ऐसें देवूनी सर्वेश्वर । द्वितीयप्रश्नीं श्रीधर । आतां उत्तर देतसे ॥ ५७ ॥ अध्यात्मशब्दें स्वभाव । बोलिजे तो ह्मणे

देव । स्वभाव ह्मणिजे आपला भाव । उत्तर इतकेंचि परम शब्दासारिखें ॥ ५८ ॥ परम शब्दें करूनी । कार्य तितकें कारण ह्मणोनी । दाविलें तें स्वयें ज्ञाताच यावरूनी । पूर्वोक्त अद्वैत दृढ करितो ॥ ५९ ॥ कीं स्वयेंचि आपण । या जगाचें उपादान कारण । स्वभाव ह्मणजे कार्यपण । आपलाचि भाव ॥ १६० ॥ ह्मणिजे दृश्य तितकें जग । तें आपणाचि सोनेंचि जेवीं नग । अलंकारीं सुवर्णाची झगमग । तैसा सर्वत्र आपण ॥ ६१ ॥ तेव्हां सर्वही आपण । कीं अलंकार तोही सुवर्ण । अध्यात्में बाणे अद्वैतपण । आपलें ऐसें पाहतां ॥ ६२ ॥ कारणचि कार्य आहे । ऐसें उगाचि जरी पाहे । द्रष्टा आपण राहे । द्वैत अवलंबूनी ॥ ६३ ॥ ह्मणूनि जो द्रष्टा आपण । तोचि जगाचें कारण । आपला भावचि कार्यपण । नग सोनेंचिही स्वभाव अध्यात्म ॥ ६४ ॥ एवं प्रथम प्रश्न उत्तर । तेथें ज्ञान जें त्रिप्रकार । तेंचि अध्यात्म ज्ञानसार । आत्मप्रत्ययें अनुभवावें हा विशेष ॥ ६५ ॥ या ज्ञानाचा विचार । तोही ब्रह्मीं हेमीं अलंकार । शेवटीं हाचि निर्धार । कीं ब्रह्मचि अध्यात्मज्ञानही॥ ६६ ॥ अधिष्ठूनि आत्माच असे । ऐसें स्थावरजंगम दिसे । अध्यात्म शब्दें होतसे । अर्थ ऐसा ॥ ६७ ॥ दृष्टि पावे जेथें । नगीं सोनेंचि दिसे तेथें । दार्ष्टांतीं आत्माच एथें । जगीं जेथें मन पावे ॥ ६८ ॥ आत्माचि तें चित्स्वरूप । जो जडप्रकाशक स्वयंज्योति दीप । हा जो अनुभवाचा प्रताप । याला ह्मणावें अध्यात्म ॥ ६९ ॥ जडीं चैतन्यमात्र स्मरे । तेव्हां आपण वेगळा उरे । आणि सर्व आपण ऐसें स्फुरे । तें अद्वैत अध्यात्म बोलावें ॥ १७० ॥ यालागीं जाणती ब्रह्म । आणि जाणती सर्व तेंचि परम । तथापि जाणती अध्यात्म । या विशेषें ऐसें बोलिला॥७१॥ आतां तृतीय 'प्रश्न किं कर्म' । त्यास उत्तर कर्मही ब्रह्म । हें समजावया गुह्य वर्म । सर्व कर्म ज्यांत तें बोलतो उत्तरार्धें ॥ ७२ ॥

॥ उत्तरार्ध ॥ भूतभावोद्भवकरो विसर्गः कर्मसंज्ञितः ॥ ३ ॥

॥ टीका ॥ भूतें आणि भूतांचे भाव । या सकळांचा जो उद्भव । उद्भव ह्मणजे ज्यापासूनि उत्कर्षें संभव । ह्मणजे कारणसमुदाय त्यांचा ॥ ७३ ॥ ऐसा कारणसमुदाय उद्भव । त्याही उद्भवातें करी जो स्वयमेव । विसर्ग ह्मणूनि त्याचें नांव । कर्मसंज्ञा तयाला ॥ ७४ ॥ भूतें हींच पंचभूतें । भाव ह्मणावें भूतांश देहातें । उद्भव बोलिजे कारणातें । या सर्वांचिया ॥ ७५ ॥ त्या उद्भवातें निर्माण करी । विसर्ग ह्मणे त्यातें हरी । गहन भावें वैखरी । चाली ऐशी ये स्थळीं ॥ ७६ ॥ त्यास ह्मणावें कर्म ।

तें कर्म जाणावें ब्रह्म । कीं सर्व ब्रह्म हा अवगम । पूर्वींच बोलिला ॥ ७७ ॥ यांत सर्वही कर्म आटे । आणि कर्म पाहतां ब्रह्म वाटे । कीं कार्य तितकें ऐक्यें भेटे । कारणासी ॥७८॥ कर्म ह्मणावें विसर्गातें । विसर्ग तो जो करी उद्भवातें । उद्भव ह्मणावें उपजण्यातें । देहाच्या आणि भूतांच्या कारणांच्या ॥ ७९ ॥ विसर्ग आणि उद्भव । अर्थ एक भिन्न नांव । तेव्हां उद्भवास उद्भव करी ऐसें देव । सर्वज्ञ अयुक्त कां बोलेल ॥ १८० ॥ विविध सृजी जग । अनादि सृष्टिकाळ तो विसर्ग । निमित्त कारण जगाचें श्रीरंग । बोले यथार्थ हा अर्थ ॥ ८१ ॥ कुंभार आणि माती । घटासि दोनी कारणें असती । त्यांत निमित्तकारण बोलती । कुंभारातें ॥ ८२ ॥ कराया मृत्तिकापात्र । कुंभार होतो निमित्तमात्र । माती न सोडी सर्वत्र । उपादान कारण ते ह्मणावी ॥ ८३ ॥ ब्रह्मीं अनादि सृष्टीची वेळ । तेव्हां पहिला प्रगटतो काळ । महत्तत्त्वादि कारणें तत्काळ । उपजती ॥ ८४ ॥ पंचभूतांपासूनि ज्याचा संभव । भूतांश हे देह जे ह्मणावे भाव । उत्पन्न होती हे सर्व । त्या महदादिकांपासनी ॥ ८५ ॥ देह भूतांचे होती । त्या भूतांची महदादिकांपासूनि उत्पत्ती । उद्भव शब्दें श्रीपती । सूचवी महदादिकारणांतें ॥ ८६ ॥ देहाचीं कारणें भूतें । त्यांचा उद्भव ह्मणावें त्याच्या कारणातें । तें महदादिकें त्यांतें । करी विसर्ग ह्मणजे सृष्टिकाळ॥ ८७ ॥ त्यास ह्मणावें कर्म । कीं त्यामुळें सर्व क्रिया धर्म । आटलें कर्माकर्म विकर्म । जीवांचें यामध्यें ॥ ८८ ॥ कीं जीव कर्मानुसार । रचे पंचभूतांचें शरीर । आणि देहयोगें जोडती संस्कार । पुढें कर्में होती तदनुरूपें ॥ ८९ ॥ एवं कर्म विसर्गपर्यंत गेलें । यांत जीव काळ ईश्वर कर्तृत्वही आलें । तें ब्रह्मीं पाहतां जालें । किरणीं जैसें मृगजल ॥ १९० ॥ किरणचि तें मृगजल । चलन तरंगांचें तेंही जल । उपजणें अलंकारांचें तेंही केवळ । सोनेंचि ज्यावीण किमपिही नसे तयांत ॥ ९१ ॥ तीं प्रश्नांचें उत्तर । या श्लोकीं देता जाला सर्वेश्वर । उरले चार त्यांत जगदाधार । तीनी उत्तरें देतसे या श्लोकीं ॥ ९२ ॥

॥ श्लोक ॥ अधिभूतं क्षरो भावः पुरुषश्चाधिदैवतम् ।

॥ टीका ॥ अगा अधिभूताचा अर्थ । प्रश्न तुझा चतुर्थ । कीं क्षररूप भावमात्रचि यथार्थ । अधिभूत तूं जाण ॥ ९३ ॥ ब्रह्म ह्मणतां अक्षर । दृश्य तितुकें कळलें क्षर । क्षर ह्मणजे नश्वर । नाशवंत ॥ ९४ ॥ नव्हे क्षर तें अक्षर । ऐसें ब्रह्म ह्मणतां कळलें क्षर । परि जरी क्षरशब्दें नश्वर ।

कळलें तेथेंचि अर्जुना ॥ ९५ ॥ पुन्हां बोलणें यास्तव । कीं अधिभूतांसहित अधिदैव । जाणावें ह्मणोनि बोलिला देव । प्रश्नबीज सप्तमीं बोलतां ॥९६॥ तरी अधिदैव अधिभूताहूनी । विलक्षण प्रतिबिंबांश ह्मणोनी । हें बोलतो सूचवूनी । जें स्पष्ट पंचदशीं बोलेल ॥ ९७ ॥" द्वाविमौ पुरुषौ लोके " या श्लोकें करूनी । क्षर सर्व भूतें आणि कूटस्थ अक्षर ह्मणोनी । पुढें बोलेल तें येथें सूचवूनी । अधिभूत अधिदैवशब्दें बोलतसे ॥९८॥ ब्रह्म अक्षर कीं जें नव्हे क्षर । प्रतिबिंबांशही ह्मणावा अक्षर । त्यासारिखें नव्हे शरीर । अधिभूत जो क्षरभाग ॥९९॥ यालागीं अधिभूत क्षरभाव । आणि पुरुष ह्मणावा अधिदैव । पंचदशीं यालाचि देव । ह्मणेल कूटस्थ ह्मणोनी ॥ २०० ॥ आणि अधिभूतास सर्वेश्वर । ह्मणेल कीं क्षर नश्वर । यालागीं येथें जगदाधार । ह्मणे अधिभूत क्षर भाव ॥ १ ॥ आणि नश्वर तितुकें क्षर । ब्रह्म तें नित्य अविनाशी अक्षर । दोहींस ऐक्य न घडे पामर । ह्मणती तेही शंका हरीतसे ॥ २ ॥ उगेंच क्षर अधिभूत । येथें न ह्मणोनि अच्युत । क्षरभाव ह्मणतां अत्यंत । गहन भाव या भावशब्दीं दाखवी ॥ ३ ॥ कीं भाव भास मात्र क्षर । वस्तुतः आहे ब्रह्म अक्षर । कीं स्त्रीभाव दावी नर । क्षरभाव भासमात्र तो ह्मणावा ॥ ४ ॥ नाचतां नाचतां नट । पदर करी उत्तरीय पट । स्त्रीभाव दावूनी निपट । पुरुषभाव दावितां नासे तो भाव ॥ ५ ॥ सुवर्णांत जो अलंकार । नश्वर ह्मणावा तो आकार । भाव आकार भिन्न प्रकार । शब्द दीसती परि अर्थ एक ॥ ६ ॥ तरंगांचा आकार । तो भावचि ह्मणावा क्षर । तो भाव पावे जें नीर । तें नश्वर न ह्मणवे त्यासह ॥७॥अधिभूत क्षरभाव । या भावें ह्मणे देव । जयासहित जाणती अधिदैव । ह्मणूनि सप्तमीं बोलिला ॥ ८ ॥ एवं व्यापक जें ब्रह्म अक्षर । त्याचा भाव अधिभूत क्षर । यासचि ह्मणावें नवद्वार पुर । यांत वसे तो तोचि पुरुष अधिदैवत ॥ ९ ॥ अधिष्ठूनि सकळ अधिदैवतें । जो देहीं असे तयातें । अधिदैव ह्मणावें कीं सर्वांतें । जीववितो पुरुष हा जीव ॥ २१० ॥ कीं इंद्रियांचे देव । देहीं निघाले सर्व । तऱ्ही विना एक जीव । देह शवरूपें हा असे ॥ ११ ॥ आणि देव तेही । इंद्रियें वर्तविती जें कांहीं । ते शक्तीही त्यांस नाहीं । विना जीव ॥ १२ ॥ एवं जीवविती सकळां देहीं । यावांचूनि सर्वथा नाहीं । कीं व्यापक अक्षर ब्रह्म तेंही । क्षरभाव दावी शवाचाच ॥ १३ ॥ शव व्यापूनि तें असे । जाणें येणें त्याला नसे । बाहेर निघतां प्रवेशतां दिसे । पुरुष अधिदैव हाचि ॥ १४ ॥ " उत्क्रामंतं स्थितं वापि "

ह्मणोनी । पंचदशीं या श्लोकेंकरूनी । उत्क्रमण ह्मणिजे निघणें देह सांडूनी । "ममैवांशो" ह्मणूनि बोलिला त्यातेंचि ॥ १९ ॥ एवं व्यापकही तें न जीववी देहातें । चेतवूं न शके इंद्रियदैवतें । ह्मणूनि अधिष्ठूनि असे दैवतातें । अधिदैवत पुरुष हा जीव ॥ १६ ॥ आणि इंद्रियदेवतासमूह । त्यांसहि असती देह । त्या देहांस निःसंदेह । अधिदैव पुरुष जीववी ॥ १७ ॥ ऐसा पांचवा प्रश्न जाला । आतां आधियज्ञ कैसा कोण याच देहीं ह्मणोनी पुशिला । तो अधियज्ञ अनुभवें त्याला । सांगतो उत्तरार्धें करूनी ॥ १८ ॥

॥ उत्तरार्ध ॥ अधियज्ञो हमेवात्र देहे देहभृतांवर ॥ ४ ॥

॥ टीका ॥ "अधियज्ञोहमेव" । ह्मणजे अधियज्ञ मीच स्वयमेव । कीं अधिदैव मीच परि तो अंश जीव । स्वयेंचि देवाधिदेव मी अधियज्ञ ॥ १९ ॥ अत्र ह्मणजे येथें । या जगीं तूं पहासील जेथें । मी स्वयेंचि आहें तेथें । अधियज्ञ नामें ॥ २२० ॥ या देहीं तूं कैसा । आणि याच माझ्या देहीं कैसा ह्मणूनि ऐसा । अर्जुनें प्रश्न केला तैसा । बोलतो श्रीगुरू त्याप्रती ॥ २१ ॥ 'अत्र' या जगीं ह्मणूनि मागुती । देहीं ह्मणे श्रीपती । तें तुझ्या देहीं ह्मणूनि त्याप्रती । सूचवी येथें ॥ २२ ॥ परि वरकडा देहीं । अगा अर्जुना मी ऐसा नाहीं । प्रसन्न होऊनि जैसा कांहीं । देहीं तुझे मी असें ॥ २३ ॥ हा भाव दावी सर्वेश्वर । ह्मणे तो 'देहभृतांवर'। कीं सर्वा देहधारियांत श्रेष्ठतर । तूं अगा अर्जुना ॥ २४ ॥ गौरवितां एक अर्जुन । गौरविले सकळ भक्तजन । कीं प्रसन्न मी भवभंजन । तुह्मां भक्तांचिया हृदयांत ॥ २५ ॥ कळतां अधियज्ञशब्दार्थ । कळेल हे प्रसन्नता यथार्थ । यज्ञ ह्मणजे होमिला पदार्थ । अग्निच होय अग्नींत ॥ २६ ॥ तैसें सर्व कर्म जीव कर्म । ब्रह्मचि देखे सगुणसाक्षी सधर्म । अधिष्ठूनि जीवाचें कर्माकर्म विकर्म । ये रीतीं असे साक्षी अधियज्ञ ॥ २७ ॥ त्यांत इतराचें कर्म । उगेंचि पाहे फळ दे सर्वोत्तम । प्रार्थिल्यावीण कल्पद्रुम । फळ नेदी आपण न मागतां ॥ २८ ॥ आपुलाली शिदोरी । कल्पवृक्षातळीं जेविती जरी । तो नेदी लवणही परी । अलवण अन्नें जेवितां रडतही ॥ २९ ॥ जाणेल कल्पवृक्षपणें । आणि मागेल त्यासी काय उणें । भक्त श्रेष्ठ या गुणें । कीं जाणोन भक्ति त्याचीच त्यातें मागती ॥ २३० ॥ देवा नको विषयवासना । गोडी तुझीच लागो मना । तोडी सकळही कामना । दे भक्तीच तुझिया पायांची ॥ ३१ ॥ जे ऐसें मागती अभिज्ञ । त्यांस तैसेंचि दे कल्पवृक्ष सर्वज्ञ । ज्याच्या देहीं ऐसा अधियज्ञ । देहभृतांवर ह्मणावें त्यातेंचि ॥ ३२ ॥

अर्जुनालागीं या भावें । ऐसें कृपेनें देवें । आळविलें देवाधिदेवें । 'देह भृतांवर' ह्मणोनी ॥ ३३ ॥ ऐशीं साह उत्तरें । दीधलीं कृपेच्या सागरें । आतां सप्तम प्रश्नाचेंही बरें । उत्तर देतो या श्लोकीं ॥ ३४ ॥

॥ श्लोक ॥ अंतकाले च मामेव स्मरन्मुक्त्वा कलेवरम् ।
यः प्रयाति स मद्भावं याति नास्त्यत्र संशयः ॥ ५ ॥

॥ टीका ॥ आतां अंतकाळींहो नर । जो स्मरत मातेंचि कलेवर । सोडोनि जातो मृत शरीर । तो माझ्या भावातें पावतो ॥ ३५ ॥ येथें संशय नाहीं ह्मणे देव । कीं निश्चयेंशीं माझा पावतो भाव । कीं चतुर्भुज मी देवाधिदेव । तो तैसाच पावतो भाव माझा ॥ ३६ ॥ जाला असतांही प्रयाणकाळ । माझ्या अनुभवाचा सुकाळ । या भावें बोले सप्तमीं मेघनीळ । कीं "प्रयाणकालेपि च मां ते विदुः" ॥३७॥ हें तेथें पार्थ न समजला । ह्मणूनि प्रश्न ऐसा केला । कीं ते ज्ञानीच आणि तुजला । प्रयाणीं जाणती तें काय ॥३८॥ तें ये स्थळीं सूचविलें । माझ्या भावातें पावती ऐसें जेव्हां बोलिलें । कीं निर्गुणीं निर्गुणत्व मात्र उरलें । तो नव्हे हा मोक्ष ॥ ३९ ॥ हें ऐकोनि लाळ घोटी । गुदगुल्या होऊं लागल्या पोटीं । परि ह्मणी निर्गुण मोक्ष होय ऐसा किरीटी । संशय मानूं लागला ॥ २४० ॥ कीं कळलें जें निर्गुण । तें निर्गुणचि आपण । यावरूनि निर्गुणपण । मी बहुतेक मोक्षीं पावेन ॥ ४१ ॥ हा त्याचा संशय । दूरि होय ऐसा निश्चय । दाखवी कीं येथें नाहीं संशय । माझ्या भावातेंचि पावतो ॥ ४२ ॥ त्यास हेंचि कारण । कीं देह सोडितां सगुणमूर्तिस्मरण । ह्मणूनि मी जो साकार सगुण । त्या मातें स्मरत देह सोडावा ॥४३॥ या भावें ह्मणे देव । "अंतकाले च मामेव" । ह्मणजे मातें सगुणातें स्मरे तो मद्भाव । पावे येथें संशय असेना ॥४४॥ आतां याउपरी । श्लोक बोलेल जो हरी । तो कां ह्मणूनि तरी । पूर्वानुसंधानें निमित्त ऐसें तयाचें ॥ ४५ ॥ कीं ज्ञानावांचूनि नाहीं मुक्ति । त्यांत ज्ञान होऊनिही ज्यांस भक्ति । त्यांस सगुण मोक्षीं व्यक्ति । सगुणासारिखी निश्चित ॥४६॥ परंतु देहावसानीं । जरी सगुण स्मरत देह सोडी ज्ञानी । तरीच सारूप्य पावे ह्मणोनी । ज्ञानीही ध्याती सगुण श्रुति ह्मणे ॥ ४७ ॥ श्रुति ॥ यदा-पश्यत्पश्यते रुक्मवर्णं कर्तारमीशं पुरुषं ब्रह्मयोनिम् । तदा विद्वान्पुण्यपापे विधूय निरंजनः परमं साम्यमुपैति दिव्यम् ॥श्रुत्यर्थ॥ वाखाणिला अध्याय मागें चतुर्थ । तेथें विशद या श्रुतीचा अर्थ । बोलिला मुख्य हा इत्यर्थ । कीं सगुण ध्यातां परम साम्य सगुणाचें ॥ ४८ ॥ हेंचि बोलिलें सप्तमीं ।

विशद त्याच्याच प्रभामिसें अष्टमीं । बोलतो स्वयें स्वामी । वैकुंठींचा ॥४९॥ कीं स्मरत मातें सोडी शरीर । तो मद्भाव पावे नर । येथें संशय नाहीं ह्मणे सर्वेश्वर । संशय वाटतां अर्जुनातें ॥ २५० ॥ स्मरण तेथें निमित्त । कीं देहावसानीं मातें स्मरे चित्त । तरी माझें सारूप्य पावे निश्चित । मद्भाव ह्मणतां हें सूचवी ॥ ५१ ॥ कीं स्मरे जरी ज्ञानी । मद्भाव देहावसानीं । तरी मद्भावचि पात्रे ह्मणोनी । सिद्धांत केला ॥ ५२ ॥ कीं ज्ञान नाहीं त्याला । मोक्ष नाहींच बोलिला । आणि हा प्रसंग ज्याचा त्याला । ब्रह्म अध्यात्मादिकें ठाउकीं ॥ ५३ ॥ आतां मद्भाव ह्मणतां स्वरूपता । हाचि कां अर्थ तत्त्वतां । तरी पुढिल्या श्लोकीं अनंता । भावशब्दार्थ बोलणें असे हाची ॥ ५४ ॥ कीं एथें नसे संशय । ह्मणूनि पूर्वश्लोकीं बोलिला निश्चय । तरी मनीं धनंजय । निःसंशय जालाचि नाहीं ॥ ५५ ॥ कीं देह सोडितां स्मरे यातें । तो पावेलचि याचि भावातें । ये विषयीं कांहीं मातें । प्रमाण न दिसे ॥ ५६ ॥ कीं जो सगुण । तो काय नव्हे निर्गुण । अलंकारीं सुवर्णाविण काय असे ॥ ५७ ॥ निर्गुणत्वही याचाच भाव । कीं निर्गुणचि हा देवाधिदेव । वहुतेक या भावेंचि बोलतसे देव । माझ्या भावातें पावे ह्मणोनी ॥ ५८ ॥ चुकोनिही जन्ममरण । मुक्तींत आत्मानंद स्फुरण । एव्हडें सभाग्यपण । अघटित अत्यंत वाटतें ॥ ५९ ॥ एथें नाहीं संशय । ह्मणूनि बोलिला निश्चय । तो निर्गुण प्राप्तीच्या विषयींच निर्णय । असेल दृढ केला ॥ २६० ॥ हा हृदयांतील भाव । जाणोनि देवाधिदेव । तो पुसतां स्वयमेव । पूर्वोक्त दृढ करीतसे या श्लोकीं ॥ ६१ ॥

॥ श्लोक ॥ यं यं वापि स्मरन् भावं त्यजत्यंते कलेवरम् ।
तं तमेवैति कौंतेय सदा तद्भावभावितः ॥ ६ ॥

॥ टीका ॥ अगा जो जो आणीकही भाव । स्मरत देह सोडी जीव । त्या त्याच भावातें तो पावतो ह्मणे देव । अनादिप्रवाह हा ऐसा ॥ ६२ ॥ अज्ञानी अथवा ज्ञानी । जें स्मरे देहावसानीं । रूप तेंचि पावे ह्मणोनी । स्मरे मद्भाव तो मद्भावचि पावतो॥६३॥हा अनादि प्रवाह । कधीं न मोडे हा निर्वाह । कीं जें आठवे सुटतां देह । त्या रूपातेंचि तो पावे॥६४॥ब्रह्मीं अनादि सृष्टी । अचूक होय तैशा कितीएक या गोष्टी । अचूक होतीच लोक कष्टी । व्यर्थ होती कीं कां ऐसें ह्मणोनी ॥ ६५ ॥ बंध तों जों अज्ञान । मोक्ष तेव्हां जेव्हां ज्ञान । कर्म फलरूपें करी बंधन । ईश्वरीं अर्पितां तें चुके ॥ ६६ ॥ सृष्टि स्थिति संहार । प्रपंच हा वारंवार । ब्रह्मीं होतो हे प्रकार । न मोडती

मोडिल्याही॥६७॥ तैसें हेंही न मोडे। कीं अंतीं स्मरण जें जें घडे। रूप तें तेंचि जोडे। प्रवाह हाही अनादि॥६८॥जो जें स्मरे तेंचि गती। पावे या लागीं मातें स्मरती। ते माझ्याच भावातें पावती। नियम अनादि हा ऐसा॥६९॥ ज्या भावाचें स्मरण। त्या भावातें पावतो ह्मणतां खूण। अर्जुनास बाण्ली कीं रूप सगुण। भाव शब्दें पूर्वश्लोकीं बोलिला ॥ २७० ॥ हें ऐकोनि अर्जुन। पावला जरी समाधान। कांहीं एक शंकित मन। मागुतीं जालें ॥ ७१ ॥ कीं ज्यास निर्गुणमात्र उपासना। देहासावनीं त्याच्या मना। सगुण आठवे तरी त्या जना। सगुण मोक्ष नलगे तो होय कीं ॥ ७२ ॥ आणि ज्या ज्ञानियातें सगुणभक्ती। जे न अपेक्षिता निर्गुण मुक्ती। त्यांस लागे प्रवेशणें अव्यक्तीं। अंतीं अव्यक्त निर्गुणचि जरी आठवे ॥ ७३ ॥ कीं रूप स्मरतां पावे रूप। तरी निर्गुण स्मरतां निर्गुण स्वरूप। पावेच कीं ऐसा प्रताप। मरणकाळींचिया स्मरणाचा ॥ ७४ ॥ आणि एका देवाचा उपासक। त्यास आठवे आणिक एक। तरी तो नव्हे ज्याचा सेवक। पावे तयातें ॥ ७५ ॥ इत्यादि शंका मनीं। ते सर्वसाक्षी जाणोनी। श्लोकचतुर्थचरणें करूनी। समाधान करितो ॥ ७६ ॥ ॥ चतुर्थचरण ॥ सदातद्भावभावितः ॥ ॥ टीका ॥ अगा तेंचि आठवे देहावसानीं। कीं सदा त्याच्या भावनें करूनी। चित्त रंगेल दिवसरजनीं। भलतें न आठवे ते वेळे ॥ ७७ ॥ भाव शब्दें भावना ह्मणजे ध्यान। ध्यान त्याचेंचि ज्याचें भजन। किंवा विषयप्रीति विषयचिंतन। तेंही ध्यान कीं आठवे तें रूप ॥ ७८ ॥ एवं ज्याची आवडी जया। तेंचि देहावसानीं आठवे तया। गतीही तेंचि धनंजया। आवडी ज्याची अत्यंत ॥ ७९ ॥ निर्गुणोपासका निर्गुण मुक्ती। सगुणमुक्ति ज्याला सगुणभक्ती। अन्यदेवताभक्तां व्यक्ती। त्याच देवाची ॥ २८० ॥ तैसाच ज्यास जो प्रिय। मनीं ध्यानीं दिसे तोचि विषय। त्याचेंचि त्याला स्मरण होय। प्राणप्रयाणीं ॥ ८१ ॥ भरत राजा विवेकी उद्दंड। ज्याच्या नांवें हें भरतखंड। तो हरिणशिशु आठवितां अखंड। हरिणचि अंतीं जाला ॥ ८२ ॥ इत्यादि भाव धरून पोटीं। तो कृष्ण ह्मणे अगा किरिटी। देहावसानसंकटीं। जें स्मरे तेंचि रूप तो पावे ॥ ८३ ॥ कीं सर्वदा ज्याची भावना। ध्यान लागलें असे मना। तेंचि आठवे मग अर्जुना। देह सोडोनि पावे तें रूप ॥ ८४ ॥ तूं जालासि अपरोक्षज्ञानी। आतां भक्त माझा होऊनी। मज सगुणास पावेन ह्मणोनी। अपेक्षितोसि अत्यंत ॥ ८५ ॥ तरी सांगेन तें आइक। ह्मणुनि

आपला वेध उत्तमश्लोक । लागे ऐसा आणिक एक । श्लोक बोलतो याविषयीं ॥ ८६ ॥

॥ श्लोक पूर्वार्ध ॥ तस्मात्सर्वेषु कालेषु मामनुस्मर युध्य च ।

॥ टीका ॥ अर्जुना सदा ज्याचें स्मरण । तेंचि आठवे होतां मरण । देह सोडूनि तो आपण । पावे तयातें ॥ ८७ ॥ हें तों तुवां अर्जुना । ऐकिलें आणि बिंबलें मना । आतां माझ्या या वचना । दृढ धरीं हृदयांत ॥८८॥ ज्ञानें पावोनिही मुक्ती । मुक्तींत घडे माझी भक्ती । जरी देह सोडोनि पावे व्यक्ती । माझी दिव्य ॥ ८९ ॥ त्यास हेंचि कारण । कीं सदा माझें अनुस्मरण । तरीच देहास येतां मरण । स्मरण माझें घडेल ॥ २९० ॥ स्मरणास कारण प्रीती । ज्याची प्रीति त्याची स्मृती । स्मृति ज्याची अंतीं गती । तेचि त्याला ॥ ९१ ॥ तस्मात्कारण अर्जुना । अवघियाही काळीं पांडुनंदना । अरे मज भवभंजना । अनुस्मर प्रीतीनें हा भाव ॥ ९२ ॥ अगा माझी विस्मृतीच फटकाळ । पवित्रपणाचा दुष्काळ । माझें स्मरण तोचि सुकाळ । पवित्रपणा सर्वांचा ॥ ९३ ॥ चांडाळाचा स्पर्श जाला । गंगास्नान वर्ज त्याला । जो बोलेल या बोला । चांडाळ तोचि ॥ ९४ ॥ माझ्या स्मरणास काळ । कोणी एक फटकाळ । ऐसें नसे एकाचि विटाळ । विस्मरणाचा होऊं नये ॥ ९५ ॥ काळ असो भलतसा । आपण असो जैसा तैसा । माझ्या स्मरणाचा वेध मानसा । लागला असो ॥ ९६ ॥ याभावें शेषशायी । ह्मणे सर्वां काळांचियाहि ठायीं । चित्त लावूनि माझ्या पायीं । स्मरे मातें ॥ ९७ ॥ माझ्या भक्ति नवविधा । स्मरणेंचि पावल्या जीवनसुधा । माझिया सर्वा भजनातें क्षुधा । अखंड माझिया स्मरणाची ॥९८॥ केंवी घडे श्रवणकीर्तन । अथवा पादसेवन अर्चन वंदन । दास्य सख्य आत्मनिवेदन । स्मरणावीण घडे कैसे परी ॥९९॥ विविध अन्न घृतपाचित । तरी वेगळेंही वाढिती घृत । स्मरण तैसें नवविधांत । जरी स्मरणें श्रवणादि भक्ति साधती ॥ ३०० ॥ देह असतांचि कौतुक । स्मरतां भृंग होतो कीटक । देह सोडोनि काहीं एक । होणें स्मरणें नवल काय ॥ १ ॥ या भावें ह्मणे हरी । कीं सर्वकाळीं स्मरण करीं । पावों इच्छितोस जरी । माझिया भावा ॥ २ ॥ आयकोनि ऐसी गोष्टी । अर्जुन पावला परम तुष्टी । शरीर पावलें पुष्टी । तटतटी कवच सर्वांगीं ॥ ३ ॥ कृष्णाकडे पाहात असे । निर्गुण सगुण भिन्न न दिसे । सुवर्णावांचूनि कोंवि गवसे । दृष्टीस मूर्ति सोन्याची ॥ ४ ॥ यथास्थित निर्गुणपण । दिसोनि दिसे मूर्ति सगुण । अनुभ-

वा आली खूण । निर्गुण सगुण ऐक्याची ॥ ५ ॥ उदकाचें द्रवत्व मृदुत्व । तेंचि गारेचें घनत्व कठिणत्व । तैसें चित्स्वरूपचि शुद्धसत्त्व । अवयवरूपें अलंकारासह दिसे ॥ ६ ॥ निर्गुणोपासकां नसे सगुण । परि सगुणभक्तां विना निर्गुण । न कळे सगुण मूर्तीची खूण । विना सुवर्ण न दिसे प्रतिमा सुवर्णाची ॥ ७ ॥ दृष्टीस न दिसे पाणी । तों प्रत्यय न उपजे गारपणीं । बुद्धि स्पर्शे निर्गुणीं । तेव्हां चक्रपाणि तीस कळे ॥ ८ ॥ ज्ञानियाचें स्मरण । निर्गुणींचि सगुणमूर्तिस्फुरण । आत्मा निर्गुण अंतःकरण । देह जितांच पावे सगुणता ॥ ९ ॥ जळे मेण ओते रस । आयती मूर्ति पडतां मूस । देह पडतां मानस । भगवद्रूप करणेंचि नलगे ॥ ३१० ॥ निर्गुणीं होऊनि निर्गुण । त्या प्रकाशें पाहे मूर्ति सगुण । मनीं बाणली हे खूण । निर्गुण सगुण दोन्हीं तेंचि ॥ ११ ॥ ऐशा सुखें अर्जुन । पाहे दृष्टी कमलनयन । तल्लीन जालें मन । निजानंदीं ॥ १२ ॥ कृष्ण अर्जुनातें पाहे । कीं अर्जुन कृष्णचि जाला आहे । तों प्रारब्ध त्याचें उभें राहे । कीं कौरववध राज्यभोग अदृष्टीं तयाच्या ॥ १३ ॥ प्रारब्धकर्माचा क्षय । भोगेंचि घडे हा निर्णय । जरी जाला धनंजय । कृष्णरूप ॥ १४ ॥ तीं प्रारब्धाचीं फळें । ईश्वर भोगवी आपल्या बळें । तीं तया समयांत सकळें । देखिलीं त्याच ईश्वरें अर्जुनाचीं ॥ १५ ॥ त्यास मूळ हें युद्ध । ज्या कारणें दोन्हीं दळें सिद्ध । आणि तें युद्ध वाटलें विरुद्ध । अर्जुनातें ॥ १६ ॥ ते याच कृष्णाची करणी । दया वातली अंतःकरणीं । कीं अविद्या नाशूनि आपुल्या स्मरणीं । अपरोक्षानुभवें तो योजावा ॥ १७ ॥ जरी उगाच युद्ध करिता । तरी कां बोलणें लागतें अनंता । कां प्रगट होती गीता । नाव तारक जगाची ॥ १८ ॥ तो सत्यसंकल्प जाला । जेव्हां ग्रंथ येथपर्यंत आला । अपरोक्षानुभवें निवाला । तोही अर्जुन ॥ १९ ॥ ज्याच्या प्रसादें मोह गेला । अपरोक्ष साक्षात्कार जाला । आतां श्रीगुरूच्या कोणत्या बोला । शिरीं न वंदी तो शिष्य ॥ ३२० ॥ पूर्वी अर्जुना तया । युद्ध करीं ऐसें ह्मणावया । बोलणें लागलें देवराया । बहुतां परी ॥ २१ ॥ या समयांत जों पाहे । तों केवळचि आज्ञाधारक जाला आहे । ह्मणूनि एकत्रि गोष्टि बोलिला हे । कीं युद्धही करीं ॥ २२ ॥ सर्व काळीं मातें । स्मर आणि करीं युद्धातें । भोग पूर्वकर्माचा हा ऐसें त्यातें । अष्टादशीं स्पष्ट बोलेल ॥ २३ ॥ " स्वभावजेन कौंतेय " । " निबद्धः स्वेन कर्मणा " ह्मणूनि निश्चय । बोलेल कीं करूं न इच्छिसी जें काय । तें करिसी प्रकृतीस वश होउनी ॥ २४ ॥ कीं तो निरूपणाचा

शेवट । आणि युद्धाचा काळ अति निकट । ह्मणूनि हें रहस्य प्रकट । करी-ल तेव्हां ॥ २५ ॥ येथें निर्गुणीं मन । होउनियां तल्लीन । प्रेमें परिपूर्ण नयन । वेधले रूपीं आपुल्या ॥ २६ ॥ ह्मणूनि मातें सर्व काळींहि स्मर । ऐसें बोलतांच जाला तत्पर । तों त्यास ह्मणे सर्वेश्वर । कीं युद्धही करीं ॥२७॥ हे गोष्टी पडतां कानीं । आज्ञा शिरसा वंदूनी । युद्ध करावेंचि हें मनीं । धरिता जाला ॥ २८ ॥ परि जैशी मुलगी धाकुटी । सासरियां जाय अति संकटीं । ऐसा विह्वळ पोटीं । किरीटी जाला ॥ २९ ॥ हृदयांत भाव ऐ-सा । कीं होईल युद्धाचा वळसा । स्मरणभक्तीचा लाभ कैसा । घडेल तेव्हां ॥ ३३० ॥ मनीं काय काय भावना । दृढ जडती हें कळेना । देहावसानीं या भवभंजना । स्मरणें मग कैंचें ॥ ३१ ॥ हृदयांतील हा भाव । जाणोनि सर्वसाक्षी देव । भरंवसा देतो देवाधिदेव । या उत्तरार्धे ॥ ३२ ॥

॥ श्लोकोत्तरार्ध ॥ मय्यर्पितमनो बुद्धिर्मामेवैष्यस्यसंशयम् ॥ ७ ॥

॥ टीका ॥ अर्जुना धाविरा जरी होसी । आगा तूं मातेंचि पावसी । मन बुद्धि जेव्हां अर्पिसी । माझ्या ठायीं ॥ ३३ ॥ मन आणि बुद्धि निश्चित । माझ्या ठायीं तुझीं अर्पित । तेव्हां मी जो भगवंत । त्या मातेंचि पावसी ॥ ३४ ॥ दृढ धरीं हा निश्चय । या गोष्टीस कांहीं नाहीं संशय । ऐसा करु-णावरुणालय । देताजाला भरंवसा ॥ ३५ ॥ इतकाच अर्धाचा अर्थ । परि कांहीं यांत भावार्थ । कृष्णेंचि दाविला तो यथार्थ । संक्षेपें तरी बो-लावा ॥ ३६ ॥ बुद्धि एकली अर्पित । होतां मनही निश्चित । अर्पित होणार भगवंत । मन बुद्धि दोन्हीं कां बोले ॥ ३७ ॥ मन राहेल वेगळें । ह्मणतां चित्त काय न असेल निराळें । इंद्रियें अनर्थमूळें । तीं काय अर्पितें नसावीं ॥ ३८ ॥ तेव्हां कांहीं गूढ भाव । या गोष्टींत दावी देव । आणि तोचि देवाधिदेव । सूचवीही ॥ ३९ ॥ कीं युद्ध होतां दारुण । लक्ष लक्षितां हाण-तां बाण । लक्ष लक्षा शरांचें उडाण । क्षणामाजीं ॥ ३४० ॥ होतां ऐसें रण । कैंचें तेव्हां राहे स्मरण । हा तों मनाचा सहज गुण । कीं एक स्मरतां एक विसरावें ॥ ४१ ॥ परि जो मनीं स्वार्थ धरिला । आणि तदर्थेचि यत्न मांडिला । त्याच यत्नांत त्याला । तो स्वार्थही आठवतो काय सर्वदा ॥ ४२ ॥ ज्या राज्यानिमित्त रण । आरंभिलें अंगीकारूनि मरण । नसे तेव्हां त्या राज्यलाभाचें स्फुरण । ज्या कारणें हे प्रयास ॥ ४३ ॥ परि संस्काररूपें मनीं । राज्य प्राप्त हो ह्मणूनी । गोष्टी जैसी असोनी । जरी न स्फुरे सर्वदा ॥ ४४ ॥ तरी बुद्धीचा निश्चय । कीं राज्यप्राप्ति आणि जय ।

हो ह्मणूनि तैसा आशय । भगवत्स्मरणीं असावा ॥ ४५ ॥ ऐसा अंतरीं आशय । तेचि बुद्धि जो ऐसा निश्चय । जरी स्मरणास गोचर न होय । मन लोकधंद्याकडे लागतां ॥ ४६ ॥ ज्या गोष्टींत सुख आहे ह्मणोनी । बुद्धि असे निश्चय करूनी । मन चहूंकडेही भोंवोनी । मागुतीं तेथेंचि तें आरे ॥ ४७ ॥ प्रस्तुतीं ऐसा भाव । येथें दाखवी देवराव । कीं युद्धादिकर्मी विसरे तरी ठाव । मनाचा आशयांत बुद्धीच्या ॥ ४८ ॥ कोणी स्वार्था आपलिया । विसरोनि बोलतां आठवी तया । तेव्हां तो आला ठाया । लोक ऐसें बोलती ॥ ४९॥ एवं बुद्धीचा निश्चय । तेथेंचि मन कल्पनामय । स्थिर होय हा निर्णय । अर्जुनातें कळावा ॥ ३५० ॥ एवंच निश्चय पोटीं । मन फिरोनि ये तेथें शेवटीं । मन बुद्धि दोनी यासाठीं । येथें बोले श्रीकृष्ण ॥५१॥ कीं बुद्धि निश्चयरूपिणी । ते अर्पिली ज्याच्या चरणीं । मन घालीच तेथें लोळणी । ओढोनि नेलें तरी परते तेथेंचि ॥ ५२ ॥ आणि रक्षील या निश्चयें शरण । जो ज्यास असेल त्याचे चरण । विसरला तरी मन स्मरण । संकटीं करील निश्चित तयाचें ॥ ५३ ॥ कीं तो रक्षील ह्मणोनी । असे बुद्धि निश्चय धरूनी । संकटीं मन त्यावांचूनी । स्मरेल कोणा आणिका ॥ ५४ ॥ तरी संकटांत थोर संकट । मरण येतां अति निकट । तेव्हां जो रक्षक उत्कट । स्मरेच मन तयातें ॥ ५५ ॥ तेधवां जें आठवे । तो तयातेंचि पावे । भगवत्स्मरणाची सवे । अगत्य असावी याकरितां ॥ ५६ ॥ ऐसा बुद्धीचा निश्चय असे । तरी मनातें स्मरण कां न गवसे । आणि जे सर्वदा स्मरती ऐसे । ते कां न पावती तयातें ॥५७॥ ह्मणूनि ह्मणे भगवंत । कीं मन बुद्धि माझ्याठायीं अर्पित । करीं ह्मणजे पावसी निश्चित । मातेंचि अगा धनंजया ॥ ५८ ॥ जीवाचा जाला धणी । मग काय चिंता आहे रणीं । तैसा भरंवसा अंतःकरणीं । धरिला अर्जुनें या गोष्टीनें ॥ ५९ ॥ कीं याच्या स्मरणें याला । पावेन ऐसा भरंवसा त्याला । होतां तो संशय उपजला । आशा करितां युद्धाची ॥ ३६० ॥ कीं युद्धीं अंतःकरण । लागतां कैचें याचें स्मरण । स्मरणाभ्यास राहतां चरण । मरणकाळीं कां आठवती ॥ ६१ ॥ अंतकाळीं याचे चरण । आठवावयास जें कारण । युद्ध करितां तें स्मरण । न घडे संशय हा होता ॥ ६२ ॥ संशय होता अंतःकरणीं । याकरितां चक्रपाणी । संशय नाहीं ह्मणूनि वाणी । या अर्धश्लोकें बोलिला ॥ ६३ ॥ कीं मी तुझा संशय । जाणोनि तुझा आशय । संशय नाहीं ह्मणूनि निश्चय ।

---

१ सवई.

बोलतों ऐसें हा भाव ॥ ६४ ॥ आतां यानंतर श्लोक । तो कां बोलेल उत्तम श्लोक । त्याचें निमित्त सुज्ञ लोक । परिसोत आधीं ॥ ६५ ॥ मोक्ष ज्ञानेंचि करूनी । त्यांत ज्ञान अपरोक्ष होउनी । जो तत्पर सगुण भजनीं । तो पावतो सगुण सारूप्य ॥ ६६ ॥ कीं सर्वकाळीं जें स्मरे । तेंचि देहावसानीं स्फुरे । निर्गुण स्मरतां निर्गुणचि उरे । सगुण स्मरतां सारूप्य ॥ ६७ ॥ परि देहांतीं स्मरे सगुणास । तोचि कीं ज्यास तोचि अभ्यास । ह्मणूनि पूर्वश्लोकीं अर्जुनास । स्मरण आपलें बोलिला ॥ ६८ ॥ परि हें मोक्षसाधन । न घडे विना निर्गुणात्मज्ञान । तें सोडोनि उगलें ध्यान । करितां पडे बहुत दूरी ॥६९॥ आत्मप्रीती सहज । तोचि आत्मा वाटे अधोक्षज । तरीच भक्ति निर्दोष निर्व्याज । आत्मसाक्षात्कार भजनींही ॥ ३७० ॥ हा सदा स्मरणभक्तियोग । घडे तरीच होतां कर्मज देहाचा त्याग । घडे स्मरणसंयोग । आत्मत्वें सगुण मूर्तीचा ॥ ७१ ॥ अर्जुनासही देवें । स्मरण सांगीतलें याचि भावें । कीं प्रारब्ध युद्धादि भोगावें । आणि मातें स्मरावें सर्वदा ॥ ७२ ॥ कीं बुद्धि माझे पायीं अर्पित । तरी मन विसरोनिही स्मरे निश्चित । ऐसें तुझें जेव्हां व्रत । तेव्हां निःसंशय मातेंचि पावसी ॥ ७३ ॥ त्या पावण्याचें निमित्त । देहावसानीं जरी स्मरे चित्त । जें सांगीतलें निश्चित । पुनः पुन्हा ॥ ७४ ॥ तें ऐसें स्मरण । कीं सगुणध्यानीं आत्मत्वस्फुरण । ह्मणूनि आतां विवरण । करीतसे या श्लोकीं ॥ ७५ ॥

॥ श्लोक ॥ अभ्यासयोगयुक्तेन चेतसा नान्यगामिना ।
परमं पुरुषं दिव्यं याति पार्थानुचिंतयन् ॥ ८ ॥

॥ टीका ॥ पुनःपुन्हा जे चित्तास । चिदात्मस्फूर्ती तो अभ्यास । एतद्रूप योग जो त्यास । अभ्यासयोग ह्मणावा ॥ ७६ ॥ ज्ञानी आणि सगुणभक्त । त्याणें त्या अभ्यासयोगें युक्त । चित्त करावें जें अनुरक्त । सगुणध्यानयोगीं ॥ ७७ ॥ तें चित्त ते चिदात्मस्फूर्ती सोडूनी । अन्यत्र न जाय ऐसें करूनी । त्या चिदात्मस्फूर्तीस घेउनी । ध्यावें परमपुरुषा सगुणातें ॥ ७८ ॥ चित्त जें जें स्मरे । तेथें चिदात्मत्व आधीं स्फुरे । परि अविद्यासंस्कारें नुरे । स्मृति ऐसी ज्ञानियासही ॥ ७९ ॥ यालागीं जो ज्ञानी भक्त । त्याणें अभ्यासयोगयुक्त । चित्त करूनि नित्य मुक्त । ध्यावा परमपुरुष त्या चित्तें ॥३८०॥ अविद्याकृत अशेष । तैसा नव्हे जो साकार पुरुष । जो परम आणि निर्दोष । दिव्य चित्स्वरूपरूप जो ॥ ८१ ॥ चराचर हीं चित्स्वरूप । परि जीव मानिती जडरूप । रज्जू न कळोनि आरोप । साच

मानिती सर्पाचा ॥ ८२ ॥ एथें तैसें कांहीं नसे । प्रत्यय निर्गुणाचाच गवसे । आकारकल्पना दिसे । जे ज्ञानें सगुण पाहती त्यांतें ॥ ८३ ॥ ज्या अनुभवें ईश्वर । कल्पितो आपुलें शरीर । त्याचि अनुभवें ध्यातां सादर । सगुण साक्षात्कार ध्यान तें ॥ ८४ ॥ ज्यास नाहीं ज्ञान । दूरि पडिलें त्याचें ध्यान । साक्षात्कारें चिंतन । तें ऐसें ॥ ८५ ॥ ह्मणूनि अनुभवैक्य सेव्य । परमपुरुष जो दिव्य । तो ऐसा ह्मणूनि ध्यान कर्तव्य । ऐसेंचि त्याचें तो बोले ॥ ८६ ॥ कीं चित्त अभ्यास योगें करूनी । मुक्त ह्मणजे चित्स्वरूप स्मरोनी । दिव्य परमपुरुष कल्पूनी । ध्यावा चित्तें ऐशिया ॥ ८७ ॥ ऐसेंचि करितां चिंतन । जो देह सोडी करी गमन । तो पावे तया जो कमलनयन । परमपुरुष दिव्य वैकुंठनाथ ॥ ८८ ॥ मज पावसी ह्मणोनी । बोलिला पूर्वश्लोकें करोनी । तो ऐसा ध्यातां आणि देहावसानीं । ऐसें चिंतितां पावसी हा भाव ॥ ८९ ॥ ज्ञानी जाणोनि निर्गुण । ध्याती भक्तियोगें सगुण । तिहीं ऐसें ध्यावें हे खूण । या श्लोकीं श्रीकृष्ण बोलिला ॥ ३९० ॥ जे या गीतेचा अर्थ । जाणों इच्छिती यथार्थ । आणि जे अनुभवी कृतार्थ दोघांस संमत अर्थ हा ॥ ९१ ॥ व्यतिरेक मात्र जाणती । अन्वयें जडही चैतन्य ऐसें नेणती । ते न समजोनि एथें ह्मणती । कीं निर्गुणें ध्यावें सगुण हें न घडे ॥९२॥ उगेंचि मानिती मिथ्या जग । परि नगीं सुवर्ण देखोनि नग । मिथ्या ह्मणावी झगझग । अंतर्बाह्य कनकचि तें साच ॥९३॥ दिसे सोन्याची झगझग । तेव्हां दिसे मिथ्या नग । तैसें चैतन्य देखोनि जग । मिथ्या ह्मणती ते ज्ञानी ॥ ९४ ॥ तरी काय डोळां दिसतें । इतकेंचि बोलती नुसतें । नगीं सोनें तैसें गवसतें । नेत्रीं आणि रूपीं हें कळेना ॥ ९५ ॥ गार दृष्टीस वाटे दगड । जलत्व समजे जिव्हाचि सुघड । इंद्रियांस वाटे प्रचंड जड । बुद्धि ब्रह्मत्वें देखे त्या इंद्रियांसहित ॥९६॥ जे हा अनुभव नेणती । ते हे ध्यानकळा काय जाणती । आत्मांश मात्र कळला ते ह्मणती । ऐसें ध्यान कैंवी घडे ॥ ९७ ॥ ऐसियांस या ध्यानगोष्टी । न कळती कीं एथें न पावे दृष्टी । आणि निखळ निर्गुणोपासक कष्टी । होती एथें जे साभिमान ॥ ९८ ॥ कीं ज्ञानियास पाहिजे निर्गुण । त्यास कां ह्मणती ध्यान सगुण । त्यांत जे निरभिमान ते हे खूण । जाणती अन्वयबोधें करून ॥ ९९ ॥ कीं विश्व जें त्रिगुण । तेंही तरंगनीरन्यायें[१] निर्गुण । शुद्ध सत्त्वमय सगुण । ध्यान कां न घडे ऐसें तयाचें ॥ ४०० ॥ परि दिव्य परमपुरुष ।

---

१ जलतरंगन्यायानें.

या श्लोकीं तो निर्गुण निर्विशेष । सगुण कां ह्मणावा ह्मणोनि दोष । ठेविती लटिके वरी ॥ १ ॥ परंतु ते निरभिमान । मागुतीं पावतील समाधान । जेव्हां पूर्वापर अनुसंधान । पाहती बरें ॥ २ ॥ कीं सातांपरी भक्त जाणती । सप्तम संपतां ह्मणे श्रीपती । त्यांत सप्तमप्रश्नीं बोलतां गती । ग्रंथ येथवरी चालिला ॥३॥ देह सोडोनि जातो । तो तेचि गति पावतो । कीं देह सोडितां जें स्मरतो । देह सोडोनि जातो त्याप्रती ॥ ४ ॥ येथवरी येचि रीती । मोक्ष बोलिला जगत्पती । विचारितां हे पूर्वरीती । निर्गुण मोक्ष हा न घडे ॥ ५ ॥ देह सोडोनि जातो । कैवल्य मोक्ष न घडेच तो । कीं प्रारब्ध सरतां उरतो । आत्मा केवळ निर्गुण ॥ ६ ॥ या प्रसंगें देह सोडितो । आणि जातो आणि पावतो । एवं सगुण मोक्ष सिद्ध होतो । पूर्वानुसंधानें करूनी ॥ ७ ॥ एथें " याति पार्थानुचिंतयन् " ह्मणोनी । निर्गुणचि पावतो हें या श्लोकें करूनी । बोलावें तेव्हां त्यावरूनी । चिंतन निर्गुणाचें बोलावें ॥ ८ ॥ कीं सदा स्मरे अंतःकरण । तेंचि देहांतीं स्फुरण । देहांतीं जें स्मरण । तें पावे हेंही प्रकरणीं याचि बोलिलें ॥९॥ चिंतनहीं निर्गुणाचें बोलावें । शब्दातें तद्नुरूप योजावें । तरी हें चिंतन देवें । पुढिल्या श्लोकीं विशद बोलिजेतें ॥४१०॥ चिंतन सगुणाचें श्रुती । बोले आणि प्राप्तिही जे रीती । या श्लोकें आणि पुढिल्या श्लोकें श्रीपती । सगुणचिंतन सगुणप्राप्ति बोलतो ॥११॥

॥ श्लोक ॥ कविं पुराणमनुशासितारमणोरणीयांसमनुस्मरेद्यः ।
सर्वस्य धातारमचिंत्यरूपमादित्यवर्णं तमसः परस्तात् ॥ ९ ॥

॥ टीका ॥ पुरुष दिव्य परम । चिंतितां पाविजे सर्वोत्तम । ह्मणूनि बोलिलों मी पुरुषोत्तम । पूर्वश्लोकीं ॥ १२ ॥ त्याचा समजोनि महिमा । जो स्मरे त्या पुरुषोत्तमा । तोचि पावे त्या सर्वोत्तमा । तरी महिमा स्मरे तो या रीती ॥ १३ ॥ कीं तो कवि ह्मणजे ज्ञानी । ज्ञानी ह्मणावा सर्वज्ञ ह्मणोनी । आणि तें ज्ञान कोणापासूनी । प्राप्त जालें न ह्मणवे ॥ १४ ॥ एकापासून एक । ज्ञान पावले ऐसे अनेक । ज्ञानी हा उत्तमश्लोक । स्वतःसिद्ध ऐसें श्रुती ही बोलती ॥ १५ ॥ श्रुति ॥ स्वाभाविकी ज्ञानबलक्रिया च ॥ श्रुत्यर्थ ॥ स्वाभाविकी ह्मणजे स्वभावसिद्ध । ज्ञानबलक्रियादि शक्ति प्रसिद्ध । कर्में यत्नें समृद्ध । इतरांचिया ॥ १६ ॥ स्वभाव ह्मणजे वस्तुस्वभाव । कीं बीजापासूनि अंकुराचा उद्भव । किरणांपासूनि संभव । स्वयेंचि मिथ्या जळाभासाचा ॥ १७ ॥ माया ईश्वरोपाधि । सर्वज्ञत्वादि गुणें आधीं । प्रगट होतां ब्रह्मयास निर्मूनि बोधी । इतरांस परंपरेनें हें ज्ञान ॥ १८ ॥ येचि रीतीकरू-

नी । ब्रह्मादिकांस त्याचपासूनी । सृष्टिसामर्थ्यादि शक्ति ह्मणोनी । हें ईश्वर तो ईश्वरेश्वर सर्वज्ञ ॥ १९ ॥ स्वतःसिद्ध ज्ञानी जरी । एक ईश्वर नसता तरी । न येतेंचि या भूमीवरी । ज्ञान हें ऐसें ॥ ४२० ॥ त्यावेगळे जीव सकळ । अविद्योपाधि ओंगळ । आत्मज्ञान जगन्मंगल । कोणा कोणास सांगता ॥ २१ ॥ मग कैंचा मोक्ष निर्गुण । अथवा कैंचा मोक्ष सगुण । आत्मत्वाची आधीं खूण । कोण जाणता ॥ २२ ॥ यालागीं स्वतःसिद्ध कवी । ब्रह्मा त्यापासूनि तो आदिकवी । ज्याच्या उपदेशें अनुभवी । ब्रह्मा जाला श्रुति ह्मणे ॥ २३ ॥ श्रुति ॥ ॥ यो ब्रह्माणं विदधाति पूर्वं यो वै वेदांश्च प्रहिणोति तस्मै । तं ह देवमात्मबुद्धिप्रकाशं मुमुक्षुर्वै शरणमहं प्रपद्ये ॥ ॥ श्रुत्यर्थ ॥ मुमुक्षू ह्मणे त्या पुरुषोत्तमा । शरण मी जो उपजवितो ब्रह्मा । आणि वेद देतो त्या ब्रह्मया सुरसत्तमा । बुद्धिप्रकाशक जीवांचा जगद्गुरू ॥ २४॥ यालागीं आदिकवी । तो ब्रह्मा प्रथम अनुभवी । ऐसें पुराणें बोलती कवी । स्वतःसिद्ध पिता ब्रह्मयाचा ॥ २५ ॥ सकळ वेदसार । श्लोकचतुष्टयें सर्वेश्वर । ब्रह्मयातें उपदेशी हा विचार । श्रीमद्भागवतींही पहावा ॥ २६ ॥ "ब्रह्मणोऽप्यादिकर्त्रे" ह्मणोनी । अर्जुनही स्वमुखेंकरूनी । गीतेंत बोलिला यावरूनी । कवि आपण ऐसें श्रीकृष्ण सूचवी ॥ २७ ॥ हा कवि शब्द निर्गुणाकडे । लागेल हें तों न घडे । पुराण शब्दें सांपडे । अर्थ निर्गुण ह्मणूनिही ॥ २८ ॥ पुरातनास ह्मणती पुराण । तेंचि निर्गुण तेंचि सगुण । परि पुढिल्या पदीं न सांपडे खूण । निर्गुणपणाची ॥ २९ ॥ कर्मानुरूप शासन करी । तो अनुशासिता चराचरीं । कर्मसाक्षित्व असेल तरी । अनुशासिता ह्मणावा ॥ ४३० ॥ एवं ह्मणतां अनुशासिता । सगुणत्व सिद्ध जालें तत्त्वतां । देहांतीं चिंतितां सगुणता । सगुणमोक्ष तेव्हां सगुणमुक्तिप्रकरण हें सिद्ध ॥ ३१ ॥ आतां अनुशासिता मानिला जरी । चैतन्यभेद मानावा तरी । कीं जीवैक्य मानितां शासन करी । काय आपणातेंचि आपण ॥३२॥ ह्मणूनि मानावा भेद । तरी ऐक्य बोलती सर्व वेद । परि शास्ता ह्मणतां न घडे अभेद । शासनार्हास शास्त्यासी ॥ ३३ ॥ परंतु हे शंका करिते खेद । कीं जरी ऐक्य मोडोनि होता भेद । ऐक्य असोनिही वेद । भेद भोगापुरताच बोलती ॥ ३४ ॥ कीं एक सूर्य बहुतां जळीं । प्रतिबिंबोनि जैसा डळमळी । तैसा सत्त्वीं निर्मळीं । प्रतिदेहीं जगदीश ॥ ३५ ॥ त्यांत कर्मानुरूप जीव । पावे अति सूक्ष्मही देहभाव । प्रतिबिंबोनि त्या उपाधींतही देव । तितकाच सुखदुःखें भोगितो

॥ ३६ ॥ तो लहान दिसे देह लहानांत । थोरांत थोरही दिसे अत्यंत । आणि बिंब स्वयें अनंत । तो लहान थोरही न ह्मणवे ॥ ३७ ॥ त्यास लहान लहानाहुनी । थोर थोराहुनी ह्मणोनी । प्रतिबिंबत्वेंकरूनी । श्रुति वर्णिती ॥ ३८ ॥ श्रुति ॥ अणोरणीयान् महतो महीयानात्मा गुहायां निहितोऽस्य जं तोः ॥ श्रुत्यर्थ ॥ ॥ अणु अणुहीहुनी । थोर जो थोराहीहुनी । तो आत्मा आणि याचे गुहेंत असे ह्मणोनी । गुहा शब्दें बुद्धि श्रुति बोले ॥ ३९ ॥ गुहा जीव अहंबुद्धी । ते देहापुरतीच हे प्रसिद्धी । मी लहान होतों तो वृद्धी । पावलों जालों एव्हडा ह्मणोनी ॥ ४४० ॥ देहाइतकाच अभिमान । तितकाच मी हें ज्ञान । प्रतिबिंब बुद्धींत जीस अज्ञान । बिंब प्रतिबिंब दोहींचें ॥ ४१ ॥ देह लहान जितका । जीव त्यांत भोक्ताही तितका । प्रतिबिंबरूपें देवा एका । लहान थोरपण तदनुरूप ॥ ४२ ॥ ह्मणूनि अणुहूनीहि सूक्ष्म । आणि थोराहुनीही थोर परम । ऐसें बोले निगम । अर्थ न घडे अन्यथा ॥ ४३॥ कीं तुटोनि वेगळा न पडे । तोंवरी अंश सूक्ष्मत्वें न सांपडे । जैसें हें बोलणें न घडे । कीं पर्वत मोहरीहूनिही अति सूक्ष्म ॥ ४४ ॥ मोहरीहूनि सूक्ष्म अत्यंत । पर्वताचा भाग तोही पर्वत । परि पर्वत मोहरीहूनि सूक्ष्म ह्मणतां संमत । गोष्टी कोणास वाटेल हे ॥ ४५ ॥ तोचि आरसियांत पर्वत । सूक्ष्म दिसे अत्यंत । तैसा सूक्ष्म उपाधींत अनंत । सूक्ष्म सूक्ष्माहुनी दिसे ॥ ४६ ॥ यालागीं वेदांचा अर्थ । युक्तिसिद्ध तोचि यथार्थ । युक्ति विरुद्ध तो व्यर्थ । येथें तरी युक्ति हीं वेद बोलती ॥ ४७ ॥ एवं ऐक्य आणि भेद । प्रतिबिंबत्वें बोलती वेद । आतां अनुशासनीं ऐसा खेद । न उपजे कांहीं ॥ ४८ ॥ एवं शासनकर्ता ह्मणोनी । जो बोलिला आणि जे त्याच्या शासनीं । त्यांस ऐक्यत्व या श्रुती करूनी । स्मरे ऐसें प्रस्तुतीं भगवंत बोलतो ॥ ४९ ॥ सूक्ष्मत्व अणोरणीन् यास ह्मणोनी । आणि "सर्वस्य धातारं" या शब्दें करूनी । थोरपण श्रुत्यर्थ बुद्धींत धरूनी । अनुस्मरे ऐसें बोलतो ॥ ४५० ॥ अणुहूनि अणुत्व हें सूक्ष्मत्व । आणि सर्वांचा धाता हें महत्व । कीं जीवत्व आणि जडत्व । दोन्ही तोचि ऐसें जो स्मरे ॥ ५१ ॥ ब्रह्मांड सर्वांत थोर । तें चतुर्मुखा ब्रह्मयाचें शरीर । या ब्रह्मांडकोटीस आधार । तो धाता सर्वांचा ॥ ५२ ॥ धाता ह्मणजे धर्ता जो धरी । जैंवि समुद्र धरी सर्व लहरी । सर्व शब्दें ब्रह्मांड कोटी यापरी । जो धरी तो धाता तो सर्वांचा ॥ ५३ ॥ "महतो महीयान्" या श्रुतीचा अर्थ । "सर्वस्य धाता" या शब्दीं सूचवी यथार्थ । थोराहूनि थोर तोचि तोचि

समर्थ । थोरां सर्वां ब्रह्मांडातें जो धरी ॥ ५४ ॥ ब्रह्मांड थोराही परीस । थोरपण असे जयास । प्रतिबिंबत्वें प्रवेश त्यास । ब्रह्मांड पिंड सर्वांत ॥ ५५ ॥ घटा मृत्तिके नसे भेद । तैसा जडा चैतन्या अभेद । एवं दोन्ही भेद खेद । हरूनि स्मरे हा भाव ॥ ५६ ॥ एवं लहान लहानाहुनी । आणि थोर थोराहुनी । तो स्वयें अनंत ह्मणोनी । अचिंत्यरूपें जो स्मरे ॥ ५७ ॥ हें अचिंत्यरूपत्व । दावी सगुणत्व आणि निर्गुणत्व । परि या पुढिल्या पदें जें सगुणत्व । निर्गुणत्व तेथें न बोलावें ॥ ५८ ॥ कीं स्मरे आदित्यवर्ण । ह्मणजे आदित्यासारिखा वर्ण । विश्वरूप दिसेल तेव्हां परिपूर्ण । सूर्यसहस्रदीप्ति पार्थ देखेल ॥ ५९ ॥ "दिवि सूर्यसहस्रस्य" ह्मणोनी । सहस्र सूर्यप्रकाश या श्लोकें करूनी । अर्जुन देखेल दिव्य नयनीं । तें तों निर्गुणत्त्व न ह्मणवे ॥ ४६० ॥ कीं अनेक वक्त्र नयन । अनेकाद्भुतदर्शन । ऐसें देखेल अर्जुन । तें काय निर्गुण ह्मणों ये॥ ६१ ॥ ह्मणतां लक्षवादियाचें कश्मल मत । तें सिद्ध होतें नियत । इंद्रियगोचरत्व अत्यंत । साधतें निर्गुणासी ॥ ६२ ॥ एवं आदित्यवर्ण । ह्मणावाच सगुण । आणि तमापरता तो आपण । अविद्येपरता ह्मणोनी ॥ ६३ ॥ केवळ अविद्येच परता ह्मणोनी । न ह्मणवे तम शब्दें करूनी । कीं ईश्वरत्व चिंतितो जाणोनी । तेथें शंकाचि अविद्येची लागेना ॥ ६४ ॥ शंकेचा अवकाश नसतां । कां ह्मणावा अविद्येपरता । तेथें निर्दोष साकारता । स्मरतो ऐसें ह्मणावें ॥ ६५ ॥ जेथवरी देहाकृती । तम त्या पांचभौतिकां ह्मणती । पंच भूतें उत्पन्न होती । तमापासूनी ॥६६॥ एवं स्थावर जंगम । देह तितकेहि तम । तैसा नव्हे साकार पुरुषोत्तम । देह तमापरता त्याचा ह्मणावा ॥ ६७ ॥ आदित्यवर्ण आणि तमापरता । देह ईश्वराचा स्मरे कीं जो धाता। लीलाविग्रह तोचि तत्त्वता । स्वेच्छा कल्पित ह्मणोनी ॥ ६८ ॥ श्रुति ह्मणे "रुक्मवर्ण" । रुक्मवर्ण ह्मणजे सुवर्ण । गीता ह्मणे आदित्यवर्ण । बाळसूर्य सुवर्ण दोन्ही सारिखे ॥ ६९ ॥ जरी सजल मेघनील । तरी स्वप्रकाश जैसा इंद्रनील । वर्ण कोणी तरी हो प्रांजळ । प्रकाशयुक्त तेजस्वी रूप तें ॥४७० ॥ बहुविध बोलावें लक्षण । त्यांत एक लक्षण बोले विचक्षण । त्यास ह्मणावें उपलक्षण । कीं त्या उपलक्षणें बहु लक्षणें जाणावीं ॥ ७१ ॥ ब्राह्मण सर्व साधारण । थोर ह्मणतां एक ब्राह्मण । जरी वर्णिला गौरवर्ण । तरी त्यांत श्याम काय न घ्यावा ॥ ७२ ॥ जो रूप आपुलें दाउनी । मातें स्मरा ध्यानीं ह्मणोनी । ह्मणतो तो कृष्ण मेघश्याम बाबरूनी । आदित्यवर्ण उप

लक्षण ॥ ७३ ॥ एवं सर्वसाक्षीही निराकार । रूप तितके अवतार । कोण तरी एक वर्ण आकार । ध्यातां त्यातेंचि पाविजे ॥ ७४ ॥ या दों श्लोकेंकरूनी । सगुण चिंतनानुरूप प्राप्ति ह्मणोनी । श्रीकृष्ण बोलिला येथू- नी । मोक्षविषयीं दुसरें प्रकरण ॥ ७५ ॥ जिहीं गुरुकुळीं केला वास । अपरोक्ष पावले करूनी शास्त्राभ्यास । आणि सगुणभक्ति करितां ज्या पदा- स । पावले हें संक्षेपें ऐसें वर्णिलें ॥७६॥ आतां शूद्रादिक जाती । वेदशास्त्र अभ्यास नेणती । आणि संतांचे कृपेनें पावती । व्यतिरेकअन्वयबोधातें ॥ ७७ ॥ कोणी तैसेच होऊनिही ब्राह्मण । शास्त्राभ्यासावीण । ओळखती आपलें चिदात्मपण । गुरुकृपेनें ॥ ७८ ॥ त्यांत कोणीं धरिलें निर्गुण । को- णी भजों लागले सगुण । ते शास्त्राभ्यासाहीविण । दोघे दोनी गति पावती ॥ ७९ ॥ कीं ज्ञान भक्ति वैराग्य । ज्यांस ते मुक्ति पावती सभाग्य । वि- शेष शास्त्र असिलिया योग्य । गुरुत्वपदवीस ते होती ॥ ४८० ॥ कैसा तरी हो परी । ज्ञान पावोनि अभ्यास करी । तो मुक्ति पावे लौकरी । निर्गुण अथवा सगुण हो ॥ ८१ ॥ कोणी ज्ञान पावले । आणि हटयोगा- कडे लागले । सगुण निर्गुण दोन्ही टाकिले । जिहीं अभ्यास ॥ ८२ ॥ त्यासही मोक्ष परी । सावधान देह सोडिती जरी । ब्रह्मयासह तेही बरी । पावती मुक्ति निर्गुण ॥ ८३ ॥ हें चौं श्लोकें करूनी । श्रीकृष्ण बोलेल ये- थुनी । जो अनंत वेद मथुनी । हे गीता उपदेशितो ॥ ८४ ॥

॥ श्लोक ॥ प्रयाणकाले मनसाचलेन भक्त्या युक्तो योगबलेन चैव ।
भ्रुवोर्मध्ये प्राणमावेश्य सम्यक् स तं परं पुरुषमुपैति दिव्यम् ॥ १० ॥

॥ टीका ॥ प्राप्त होतां प्रयाणकाळ ॥ तेव्हां मन करूनि अचळ । आणि आत्मप्रीती जे निर्मळ । युक्त होय त्या भक्तीनें तेधवां ॥८५॥ हो आपणातें सद्गती । हे जे आपली प्रीती । तेचि भक्ति ऐसे रीती । भक्तीनें युक्त ते- धवां ॥ ८६ ॥ साहाही चक्रें भेदुनी । ब्रह्मरंध्र भेदिती क्रमें करूनी । त्यांत आज्ञाचक्र ह्मणोनी । दों दळांचें ॥ ८७ ॥ दोंही भोंवयांत त्याचें स्थळ । तें चक्र तेथें द्विदळ । करूनियां योगबळ । त्या चक्रीं घाली प्राणातें ॥८८ ॥ योगबळ ह्मणतां यावरूनी । पांच चक्रें पंचभूतें भेदुनी । प्राण आज्ञाचक्रास ने ह्मणोनी । सूचवी योग मार्गातें ॥८९॥ गुह्य द्वारावरी । मूळाधार चक्र- दळें चारी । पृथ्वीतत्त्व त्या भीतरी । असे आधार होऊनि देहाचें ॥४९०॥ त्यातें भेदूनियां प्राण । षट्दळ चक्र स्वाधिष्ठान । तें जलतत्वाचें स्थान । भेदी तया ॥ ९१ ॥ त्यावरी नाभिस्थल । तेथें मणिपूरचक्र दश-

दल । तत्त्व तेथें अनल । भेदी तया ॥ ९२ ॥ त्यावरी तेथूनि हृदयांत । चक्र द्वादशदळ अनाहत । वायुतत्त्व तेथें नियत । भेदी तया ॥ ९३ ॥ तयावरी कंठस्थानीं । षोडशदळ विशुद्धचक्र ह्मणोनि । तेथें आकाशतत्त्व त्यातें भेदुनी । भौंवयांत ने प्राणातें ॥ ९४ ॥ तें आज्ञाचक्र द्विदळ । मन तेथें तत्त्व केवळ । त्या मनातें करूनि अचळ । प्राण तेथें प्रवेशवी ॥ ९५ ॥ या भावें ह्मणे भगवंत । कीं प्राण प्रवेशवूनी भौंवयात । जो जातो तो पावतो योगरत । त्या दिव्य पुरुषातें ॥ ९६ ॥ जो पुढिल्या श्लोकीं पुरुष । बोलिजेल निर्विशेष । जो गुरुमुखें निषेधशेष । चित्स्वरूप तेंचि वळखिल ॥ ९७ ॥ ज्ञानावांचूनि न घडे मोक्ष । सर्व जाणती हा पक्ष । हें न बोलत अंबुजाक्ष । प्राप्तीच त्याची बोलतो यालागीं ॥९८॥ ज्ञान होऊनि अभ्यास । टाकूनी धरी हटयोगास । षट्चक्र भेदायाचे आयास । सूचवी प्राणप्रवेश भौंवयांमध्यें बोलतां ॥ ९९ ॥ तेथूनि प्राण मस्तकीं । ठेवी ह्मणूनि तिसरिया श्लोकीं । श्रीकृष्ण बोलेल या भावें कीं । भेदूनि जातो ब्रह्मरंध्र ॥ ६०० ॥ ब्रह्मयासह त्याला । ब्रह्मलोकीं मोक्ष बोलिला । परि सगुणभाव नसे जोडला । तो निर्गुणातें पावे यालागीं ॥१ ॥ ह्मणोनि त्या दिव्य पुरुषातें । पावतो ह्मणूनि भगवंतें । या श्लोकीं बोलियेलें अनंतें । हटयोग त्याचा दाखवूनी ॥ २ ॥ पावतो दिव्यपुरुषा तया । तो तों कैसा ह्मणसी धनंजया । तरी ऐसा ह्मणूनि बोलतो या । पुढिलिया श्लोकीं ॥ ३ ॥

॥ श्लोक ॥ यदक्षरं वेदविदो वदंति विशंति यद्यतयो वीतरागाः ।
यदिच्छंतो ब्रह्मचर्यं चरंति तत्ते पदं संग्रहेण प्रवक्ष्ये ॥ ११ ॥

॥ टीका ॥ अगा जे वेदवेदांत जाणती । ते अक्षर ह्मणूनि ज्यातें ह्मणती। तो त्यातें पावे ह्मणूनि श्रीपती । आणि हा शास्त्रहीन ऐसें सूचवी ॥ ४ ॥ वीतरागी होऊनि यती । ते ज्या स्वरूपीं प्रवेशती । हा पावतोच त्याप्रती । कीं हाही पुढें प्रवेशेल हा भाव ॥ ५ ॥ वीतरागी हाही । परंतु सद्यःप्रवेश नाहीं । यति संन्यासी अथवा कांहीं । काम्य न करी यति ऐसाही बोलिला ॥ ६ ॥ आणि ज्या प्राप्तीकारण । सर्वदा सेविती गुरुचरण । ब्रह्मचर्य ह्मणती निपुण । गुरुगृहवास तयांतें ॥ ७ ॥ जे इच्छूनि सुमती । गुरुगृहीं ब्रह्मचर्य आचरती । आणि जितांच पावती । तयातें ॥ ८ ॥ ते सद्य अनायासें मुक्ति पावती । हा आयासें पावे ब्रह्मलोकाप्रती । हा भाव दावी संतांचा पती । इतरांतें वर्णितां ॥ ९ ॥ जाणोनि वेदवेदांत । करूनि गुरुसेवा भाग्यवंत । पावती त्या पुरुषास हा अत्यंत । प्रयासें पावतो ह्मणतां हा तैसा नव्हे

हें सूचवी ॥५१० ॥ तीं चरणीं हा भाव । दाखवूनि देवाधिदेव । पुढें याचे प्रयास बोलेल देव । ते सांगेन ह्मणतो चरणीं चौथिया ॥ ११ ॥ चतुर्थ चरण ॥ 'तत्ते पदं संग्रहेण प्रवक्ष्ये ॥ टीका ॥ पाविजे तें जें स्थळ । तें पद ह्मणावें केवळ । आणि ज्या प्रयत्नें यत्नशील । पावती त्यासही पद ह्मणावें ॥ १२ ॥ पद सांगतों ह्मणूनी । प्राप्त्युपाय बोलेल पुढिलिया श्लोकेंकरूनी । प्राप्ती उपायाच वरूनी । पद शब्दार्थ बोलावा ॥ १३ ॥ कीं पढोनि वेदांत । गुरुसेवा ब्रह्मचर्य अत्यंत । ते उपाय तों निश्चित । नाहीं तयाला ॥ १४ ॥ आतां याचे उपाय । देव बोलेल काय । ह्मणूनि विचारी धनंजय । तों ह्मणे " संग्रहेण प्रवक्ष्ये " ह्मणोनी ॥ १५ ॥ संग्रह ह्मणिजे संग्रहण । ह्मणिजे आवरावे प्राण । प्राणायामक्रमें ग्रहण । करणें प्राणांचें ॥ १६ ॥ षट्चक्र भेदूनि मस्तकपर्यंत । न्यावा प्राण योगबळें त्यांत । साहवें चक्र भोंवयांत । तेथवरी मार्ग वर्णिलें ॥ १७ ॥ आतां ब्रह्मरंध्र भेदूनी । जावें तें पुढिल्या श्लोकें करूनी । कांहीं त्या पुढिल्या श्लोकें वदूनी । नीट हटयोगरीती बोलेल ॥ १८ ॥ या कारणें प्राणसंग्रह । करूनि सोडोनि देह । जाणार तो निःसंदेह । ह्मणूनि " संग्रहेण प्रवक्ष्ये " ह्मणतसे ॥ १९ ॥ ' संग्रहेण ' या शब्दाचा अर्थ । संक्षेपें ह्मणूनि बोलती तो व्यर्थ । संक्षेपेंचि करूनि कृष्ण समर्थ । सर्वत्र बोलतो गीतेंत ॥ ५२० ॥ तथापि न ह्मणोनि संक्षेप । जरी बोलेल संक्षेपरूप । तरि काय अर्जुनास कोप । येणार येथें ॥ २१ ॥ संग्रहेण प्राणसंग्रह । त्या संग्रहें करूनि सोडोनि देह । गति पावतो यास तों संदेह । नसतां अर्थ हाचि कां न घडे ॥ २३ ॥ आतां हटयोग धारणा धरूनी । भोंवयाही वर्ता कोणे रीती करूनी । प्राण नेतो तरि ऐसा ह्मणोनी । बोलतसे ॥ २३ ॥ भोंवयापर्यंत प्राण नेला । चक्रें भेदूनी ह्मणूनि या बोला । श्रीकृष्ण सूचवी परि नाहीं बोलिला । क्रममार्ग योगाचा ॥ २४ ॥ भोंवयांपर्यंत नेतां पहिलें । योगबळ कैसें करणें लागलें । आणि भोंवयांपर्यंत नेऊनि काय केलें । हें बोलतसे या श्लोकें ॥ २५ ॥

॥ श्लोक ॥सर्वद्वाराणि संयम्य मनो हृदि निरुध्य च ।

॥ टीका ॥ अगा आज्ञाचक्र भोंवयांत । योगबळें प्राण तेथपर्यंत । ज्या रीतीं नेतसे अत्यंत । निरोध प्रकार तो ऐसा ॥ २६ ॥ दारें प्राणाचीं सर्व कोंडी । त्यांत दोन खालीं सात तोंडीं । महातटाकीं जैशा सांडी[1] । पर्जन्यकाळीं जळाच्या ॥ २७ ॥ सांडी असती उदंड । त्या कांहीं वाहती अखंड ।

---

[1] पाणी जाण्याच्या वाटा.

जळ तुंबतां प्रचंड । फोडी सांडी बुजाल्याही॥२८॥मुख एक नासिका दोनी । प्राण या द्वारत्रयेंकरूनी । सदा वाहे अपानीं । समय विशेषें गुह्यद्वारींही तो भरे॥२९॥ परि निरोधितां तुंबळ । भलत्या द्वारें फुटे प्रबळ । याकारणें द्वारें सकळ । कोंडावीं कोंडितां प्राणातें ॥ ५३० ॥ श्रवण नेत्र नासिका तीनी । रंध्रें एक एकास दोनि दोनी । हीं साहा आणि सातवें वदनीं । मळमूत्रद्वारासह नव ॥३१॥ एका पायांची टांच । दडपूनि बुजिती गुदद्वाराची खांच । नखांसहित बोटें पांच । स्पर्शती उफराटीं आसनातें ॥ ३२ ॥ तैसीच टांच दुसरी । ठेविती शिश्नाउपरी । दडपूनि त्या द्वारातें बरी । असे ऐसी ॥ ३३ ॥ मुखीं द्वारें सात । दोन्ही अंगुष्ठ दों श्रवणांत । दोहीं नेत्रांवरी अत्यंत । दृढ तर्जनीद्वय ठेविती ॥ ३४ ॥ घ्राणद्वारें दोनी । दोनी मध्यांगुळीं करूनी । ओष्ठ दोन्हीं दोहींकडोनी । अनामिका कनिष्ठिकायोगें ॥ ३५ ॥ ऐशींही नवही द्वारें । करचरणयोगें एकसरें । कोंडोनि योगधारणा आदरें । अनुष्ठी ऐसा ॥ ३६ ॥ सिंह पुढें जातो । मागें परतोनि पाहतो । योगरीति ऐसी बोलतो । सिंहावलोकनन्यायें ॥ ३७ ॥ संयम ऐसा नव द्वारीं । करूनि प्राण त्यावरी । भोंवयापर्यंत न्यावा परी । तोचि आधीं बोलिला ॥ ३८ ॥ बोलोनि भोंवयांत प्राण । मग हें त्यांचें बोले कारण । आणि हृदयीं मनाचें स्फुरण । तोंच कीं प्राण हृदयावरी न चाले ॥ ३९ ॥ मन हृदयीं निरोधूनी । सर्वद्वारें कोंडूनी । प्राण भोंवयांत घालितो ह्मणोनी । ह्मणतां पूर्वार्धी सूचविला हा क्रम ॥ ५४० ॥ चक्र मस्तकीं जैसें कमळ । अधोमुख तें सहस्रदळ । भोंवयांत आज्ञाचक्र द्विदळ । तें भेदितां तेथें निघे तो प्राण ॥ ४१ ॥ भोंवयांपर्यंत ऐसा क्रम । या पूर्वार्धपर्यंत पुरुषोत्तम । बोलोनि मोक्षस्थान उत्तम । प्रवेश तेथें उत्तरार्धें बोलतो ॥ ४२ ॥

उत्तरार्ध ॥ मूर्ध्न्याधायात्मनः प्राणमास्थितो योगधारणाम् ॥१२॥

॥ टीका ॥ मस्तकीं ठेवूनि आपल्या प्राणा । अनुष्ठी ऐसी योगधारणा । ब्रह्मरंध्र भेदावयाच्या खुणा । सूचवी येथें ॥ ४३ ॥ कीं नवही द्वारें कोंडी । कोंडिती जैशा जळाच्या सांडी । तें जळ जेव्हां फुगारा मांडी । निर्बळस्थळीं फोडी पाळीतें ॥ ४४ ॥ तैसें दशम द्वारीं । चर्ममात्र असतें शिरीं । जें बाळपणीं टाळूवरी । स्पष्ट रंध्र झांकलें दिसतें ॥ ४५ ॥ अस्थि जेथें आड नसे । चर्म मात्र त्यावरी वसे । थोरपणीं रंध्रसें न दिसे । कठिण होतां तें चर्म ॥ ४६ ॥ मस्तकीं कोंडतां प्राण । बळें जेव्हां करी उठाण । भेदूनि तें करी प्रयाण । सत्यलोकातें ॥ ४७ ॥ मस्तकीं प्राण धरी । या

कारणें ह्मणे हरी । तें पुढिल्या श्लोकें मुरारी । सूचवील बोलतां प्रयाण ॥४८॥ पूर्वार्धी सिंहावलोकनरीती । बोलिला जे योगगती । त्याचा अभ्यास श्रीपती । सिंहावलोकनेंच पूर्वदशेचा बोलेल ॥ ४९ ॥ कीं अर्जुन ह्मणेल मनीं । अत्यंत चंचळत्व या पवनीं । मुख नासिका रंध्रें करूनी । बहिर्मुख वावरे ॥ ५० ॥ तो अंतर्मुख समीर । होऊनि मूळाधारीं स्थिर । कैसा जाला कीं सोडूनि शरीर । मस्तकाकडे चालों लागला ॥ ५१ ॥ हा प्रकार अर्जुनातें । चतुर्थाध्यायीं अनंतें । सांगतां विविधा यज्ञांतें । प्राणायामयज्ञ सांगीतला ॥ ५२ ॥ प्राणायाम अति पावन । प्रथम या योगास साधन । प्राणसंयमें शुद्ध मन । आणि प्रणवावृत्तीनें स्मरण देवाचें ॥५३॥ हें योगसाधन प्रथम । येथें बोलिला नाहीं पुरुषोत्तम । ह्मणूनि प्राणसंयम । स्वस्मरणरूप पूर्वार्द्धे बोलतो या श्लोकीं ॥ ५४ ॥

॥ श्लोक ॥ ओमित्येकाक्षरं ब्रह्म व्याहरन्मामनुस्मरन् ॥

॥ टीका ॥ अगा अर्जुना ओंकार । हें ब्रह्म एकाक्षर । जैसीं रामकृष्णादि रूपें साकार । तैसें अक्षररूपी ब्रह्म हें ॥ ५५ ॥ या एकाच अक्षराचा महिमा । ऐसा कीं जैसी शुद्धसत्त्वप्रतिमा । आधीं प्रणव मग सर्वांनिगमां । उच्चारिता जाला ईश्वर ॥ ५६ ॥ जैसी शुद्धसत्त्वमाया प्रथम । ब्रह्मीं प्रकटतां सर्वोत्तम । पद्मनाभरूप पुरुषोत्तम । त्या मायेनें प्रथम अवतरला ॥५७॥ मग त्या मायेनें कल्पना । केली ते हे त्रिगुणरचना । तैसा ओंकार मग नाना । शब्द आणि भाषा प्रगटल्या ॥ ५८ ॥ मग नाना अवतार । त्याच सत्त्वें करी ईश्वर । तैसे अनंत वेद अपार । त्रिगुणसृष्टीपूर्वी प्रगटले ॥५९॥ प्रणव एकचि अक्षर । ह्मणूनि हें ब्रह्म एकाक्षर । तैसेंच ब्रह्म चतुरक्षर । वासुदेव नारायण ह्मणोनी॥ ६० ॥ तैसेंच उपनिषदीं । दोनि अक्षरें हरिपदीं । हें द्व्यक्षर ब्रह्म वेदीं । जैसा प्रणव एकाक्षर ब्रह्म ॥ ६१ ॥ ऐशींच जीं जीं हरिनामें । जैसीं रामकृष्णादिरूपें अभिरामें । तैसीं ध्वनिरूपरूपें सर्व सुगमें । अक्षर ब्रह्म नामें समस्तही ॥६२॥ परंतु वेदीं पुराणीं । प्रसिद्ध ज्या ज्या नामें चक्रपाणी । तें तेंचि अक्षर ब्रह्म लोकवाणी । नामें वदे तीं ऐसीं ह्मणूनि न ह्मणवे ॥ ६३ ॥ रण सोडी कान्होबा गोंवळ । इत्यादि लोकवाणी केवळ । भावेंचि करूनि फळ । परि तारकशक्ति नसे तैसी स्वतःसिद्ध ॥ ६४ ॥ स्वयेंचि गोड केळ । त्यांत दूध तूप गूळ । मेळवितां होय केवळ । अमृतरूप ॥६५॥ तैसीं नामें वेदसिद्धें । किंवा वेदवेत्ते बोलती पुराणप्रसिद्धें । तीं स्वयें तारकशक्ति समृद्धें । भक्तिनें स्मरती विशेष अत्यंत ॥६६॥

लावूनिया गूळ । दगड चोखिजे केवळ । तैसें रण सोडी कान्होबा गोवळ । गोड भक्तीच करूनी ॥ ६७ ॥ महिमा शर्करेचा न कळे । तरी गोडी देखुनि ते गिळे । दगड गुळावांचूनि चघळे । तैशीं भक्तीवांचूनि हीं नामें ॥ ६८ ॥ एवं वेदीं पुराणीं नामें अनेकें । तीं महिमा न कळे तरी तारकें । लोकवाणींत नाम तितुकें । सफळ भक्तीनें होत न स्वतां ॥ ६९ ॥ कीं महाभारतीं भीष्म । धर्मास सांगे सहस्रनाम । तेथें करी प्रथम नियम । ऐसाच या श्लोकें ॥ ५७० ॥ महाभारतश्लोक ॥ यानि नामानि गौणानि विख्यातानि महात्मनः । ऋषिभिः परिगीतानि तानि वक्ष्यामि भतये ॥१॥ टीका ॥ भीष्म ह्मणे अगा भूपती । हरिनामें सांगेन तुजप्रती । जीं नामें ऋषि गाती । गुणानुरूपें हरीचीं ॥ ७१ ॥ तींचि नामें ऋषि गाती । ज्यांची वेदीं असे ख्याती । पुराणीं वेदव्यासादि वर्णिती । आणि गाती कीर्तनें करूनी ॥७२॥ एवं च नामें लोकवाणी । तीं नव्हती स्वयें सुखाचिया खाणी । वेदीं पुराणीं काय वाणी । कीं सावळ्या गोंवळ्या जगजेठी ह्मणावें॥ ७३ ॥ एवं पुराणप्रसिद्धें । तीं नामें वेदसिद्धें । तारकशक्तीनें समृद्धें । रूपें सगुण ब्रह्मांचीं ॥ ७४ ॥ प्रणवास एकाक्षर ब्रह्म । या भावें ह्मणे सगुणब्रह्म । कीं प्रणवही एक नाम । हें सप्तदशीं स्वयेंचि बोलेल ॥ ७५ ॥ सप्तदशाध्यायश्लोक ॥ ओं तत्सदिति निर्देशो ब्रह्मणस्त्रिविधः स्मृतः ॥ टीका ॥ 'ओं तत् सत् ' शब्द तीनी । त्रिप्रकार ब्रह्म ह्मणोनी । कृष्ण ह्मणेल यावरूनी । ओंकारही हरिनाम ॥ ७६ ॥ ओंकार नाम वेदसिद्ध । 'तत् सत् ' हेंही वेदींच शुद्ध । आणि वेदींच ऐसें प्रसिद्ध । कीं इतिहास पुराणेंही वेद पांचवा ॥ ७७ ॥ एकाक्षरब्रह्म ओंकार । तैसें ' तत् सत् ' एकएकचि अक्षर । हरिनाम ब्रह्म अक्षर । वेदप्रसिद्ध ॥ ७८ ॥ श्रुति ॥ हरिं हरं तमनुयंति देवाः ॥श्रुत्यर्थ॥ वाईट तितकें परिहरी । ह्मणूनि हरितो तो हरी । त्यातें देव अनुसरती ऐसी वरी । टीका श्रुतीत्र करी हरिनामाची ॥ ७९ ॥ हरितो जो तो हरी । श्रुति इतकेंच बोले परी । वाईट तितकें परि हरी । ऐसें तों न बोले ऐसें जरी ह्मणावें ॥५८०॥ तरी वाईट कीं बरें । हरायास नसे तिसरें । तेव्हां वाईट तितकें हेरी सारें । हें स्वयेंचि साधतें ॥ ८१ ॥ आतां बरेंही हरितो । ऐसें ह्मणतां अर्थचि न घडे तो । कीं सूर्य तमातेंचि संहरितो । प्रकाशही हरितो न ह्मणवे ॥ ८२ ॥ सूर्य जैसा प्रकाशरूप । हरि तैसा सुखस्वरूप । सुखाचे आर्गीं हाचि अताप । कीं दुःखचि तें परिहरी ॥ ८३ ॥ ऐसेंचि नाम

१ हरण करितो.

अनंत । हें त्र्यक्षरब्रह्म निश्चित । चतुरक्षरही वेदसंमत । नारायण वासुदेव इत्यादि ।। ८४ ।।एवंच जैसीं वेदसिद्धें । तैशींच नामें पुराणप्रसिद्धें । जैसीं भगवद्रूपें तारकें शुद्धें । तैशींच नामेंही रूपेंचि त्याचीं ।। ८५ ।। रूपें बुद्धीस कळती लोचनीं । नामें बुद्धीस कळती कानीं । आणि उच्चारितां वाचें करूनी । बुद्धि जाणे ।। ८६ ।। नेत्र जैसे इंद्रिय । कानही इंद्रियचि हा निश्चय । जे जिव्हा नामें गाय । वागिंद्रिय नव्हे काय तेंही ।। ८७ ।। दृष्टीस न दिसे वारा । तरी कळतो लागतां शरीरा । आणि आइकों येतो भरारा । श्रोत्रेंद्रियातें ।।८८ ।। दृष्टीस वारा न दिसे । तरी काय ह्मणावा न असे । तैसा वाचेस कानास गवसे । तो काय नव्हे स्वयें ईश्वर ।। ८९ ।। ईश्वर स्वयें निराकार । तो नेत्रांस दाखवी शरीर । ते अवतार तैसेंच हे अवतार । कानास वाचेस जाणवी ।। ५९० । अवताररूपीं अधिकपण । आणि नामपणीं उणा आपण । ऐसें वेद अथवा स्मृति पुराण । कोणीच न ह्मणे ।। ९१ ।। ऐसें असोनि जन । नाम न मानिती रूपासमान। हेंही हरिलें ह्मणावें ज्ञान । अविद्येनें जनांचें ।। ९२ ।। तें अविद्येतें जाळी । ऐसी गीता श्रीवनमाळी । प्रकट करितो ये काळीं । गुह्य हेंही बोलतो ।। ९३ ।। परि मिळाली अणीस अणी । तेव्हां गीता हे चक्रपाणी । उपदेशितो ह्मणोनी वाणी । न वदे सविस्तर ।। ९४ ।। शब्द थोडे अर्थ फार । या गीतेचा ऐसा प्रकार । परि शब्द ऐसें कीं टीकाकार । जे हरिभक्त ते समजती भावार्थ त्यांतील ।। ९५ ।। प्रणवमहिमा या या प्रस्तुती । जरी उगाचि बोलता जगत्पती । तरी ह्मणतां " ओमित्येकाक्षरं ब्रह्म " येचि रीती । 'एकाक्षरं' ऐसें न बोलता एथें ।।९६।। उगेंचि अक्षर ब्रह्म । ह्मणता तरी अक्षररूप हें ब्रह्म । ऐसा होतां अर्थावगम । एकाक्षरब्रह्म ह्मणणें किमर्थ ।। ९७ ।। आपल्या नामाचा महिमा । गीतेंत बोलणें पुरुषोत्तमा । कीं मथूनि सर्वां निगमागमां । हे गीता उपदेशितो ।। ९८ ।। ह्मणूनि उगेंचि अक्षरब्रह्म । न वदोनि ह्मणे एकाक्षरब्रह्म । स्वनाममहिमा पुरुषोत्तम । एकाक्षर ब्रह्म ह्मणतां सूचवी ।। ९९ ।। कीं ओंकारीं एकचि अक्षर । ह्मणूनि हें ब्रह्म एकाक्षर । तेव्हां कृष्णनाम द्व्यक्षर । ब्रह्मरूप तेंही ऐसें सूचवी ।। ६०० ।। कीं ओंकारही बोले निगम । निगमचि बोले कृष्णनाम । हें एकाक्षर तेव्हां द्व्यक्षरब्रह्म । कृष्णनामही विराजे श्रुतिशिरीं ।। १ ।। श्रुति।। उद्धृतासि वराहेण कृष्णेन शतबाहुना।। श्रुत्यर्थ ।। श्रुत्यर्थ श्रुतीचा असो । कारण कृष्णनाम उपनिषदीं दिसो । आणि भावार्थ ऐसा गवसो ।

कीं द्व्यक्षरब्रह्म कृष्णनाम ॥ २ ॥ आतां प्रणव नव्हे नाम । कोणी ह्मणतील यालागीं पुरुषोत्तम । सप्तदर्शी बोलेल सर्वोत्तम । कीं "ओं तत् सत्" हें त्रिविध नाम । ब्रह्म सगुणाचें ॥ ३ ॥ एकाक्षर ब्रह्म येथें । कीं ज्या नामीं जितकीं अक्षरें जेथें । तें तितकिया अक्षरांचें तेथें । ब्रह्म अक्षररूप बोलावें ॥ ४ ॥ कोणी ह्मणतील वेदब्रह्म । तें गीतेंत जें एकाक्षरब्रह्म । त्याचा अर्थ एकाक्षर निगम । तरी हें उत्तम त्याहुनी ॥ ५ ॥ कीं "वेदो नारायणः साक्षात्" ह्मणोनी । हें प्रमाणसिद्ध यावरूनी । ब्रह्मरूप वेदरूप महिमे दोन्ही । प्राप्त जाले नामातें ॥ ६ ॥ कीं एकाक्षर वेद ओंकार । कृष्णनाम हरिनाम वेदद्व्यक्षर । अनंतनाम वेद त्रिक्षर । निगम चतुरक्षर नारायण ॥ ७ ॥ कोणी ह्मणती प्रथम । प्रणव जाला तोचि एकाक्षरब्रह्म । तरी पद्मनाभ प्रथम पुरुषोत्तम । तोचि ब्रह्मरूप आणि काय कृष्ण नव्हे ॥ ८ ॥ फटकाळ जैसे हे बोल । तैसाच बोल हाही फोल । भावार्थ टाकूनि खोल । कां वरिच्या वरी उडावें ॥ ९ ॥ कोणी उपदेशूनि ओंकार । सांगती ब्रह्मविद्यासार । प्रणवार्थ तदनुसार । वाखाणिती ॥ ६१० ॥ तरी गायत्री ब्रह्मचि सारी । नारायण वासुदेव इत्यादि नामांतरीं । ब्रह्मसाक्षात्कार होय यापरी । नसती अर्थ काय ॥ ११ ॥ नर जीव अंश प्रतिबिंब । नारें जडतत्त्वें त्यांचा त्यांस अवलंब । आश्रय अधिष्ठान बिंब । अनुभव नारायणपणाचा । ये रीती ॥ १२ ॥ मंत्र संन्यासी यांचा ओंकार । तिहीं त्याचा वाढविला बडिवार । पाहतां अनुभवप्रकार । कोठें नसे ॥ १३ ॥ व्यतिरेकें कळे निःशब्द । तें प्रणव नव्हे अथवा वेद । अन्वयें सर्व अभेद । तेथें प्रणवचि काय एकला ॥ १४ ॥ आतां लोकवाणी बंध करी । वेदवाणी बंध हरी । त्यांत प्रणव थोर तरी । कीं तें नाम ब्रह्माचें ॥ १५ ॥ ज्यास न कळे ब्रह्म । आणि संन्यास घेतला परम । त्यास एकचि अक्षरब्रह्म । थोर सांगीतलें सर्वांत ॥ १६ ॥ जडचैतन्यविवेक । प्रणव न सांगतां व्यतिरेक । उपदेशिला अद्वितीय एक । न कळे काय शिष्यासी ॥ १७ ॥ तैसाच अन्वय । अलंकार जैसा सुवर्णमय । तैसें कार्य कारणचि हेंही काय । विना प्रणव न कळे शिष्यासी ॥ १८ ॥ एवं च संन्यासी याचा हा मंत्र । तिहीं थोर केला प्रणव मात्र । पाहतां हरिनाम सर्वत्र । वेदीं तितकें ब्रह्मरूप ॥१९॥ हें सुचवाया पुरुषोत्तम । ह्मणावें जें उगेंचि अक्षरब्रह्म । तें एकाक्षरब्रह्म । ह्मणुनी येथें बोलिला ॥ ६२० ॥असो हें बोलतां फार । ग्रंथ वाढेल अपार । प्रस्तुत बोले सर्वेश्वर । प्राणायाम अंग योगाचें ॥ २१ ॥ त्यास अंतरंग

ओंकार । त्याचा वर्णिला बडिवार । कीं त्याचा करितां उच्चार । मातें स्मरे ॥ २२ ॥ सिंहावलोकनन्यायें । प्राणायाम येथें देवरायें । सूचविला कीं धनंजयें । प्रथम अभ्यास हाही समजावा ॥ २३ ॥ कीं सोळा प्रणवीं पूरक । आणि बत्तिसां प्रणवीं रेचक । चौसष्ट प्रणव होती तो कुंभक । प्राणायाम एक हा ऐसा ॥ २४ ॥ अभ्यासें समीर । राहों लागे स्थिर । द्विगुण त्रिगुण इत्यादि सधीर । प्राणायाम योगी वाढविती॥ २५ ॥ द्विगुण करितां रेचक । द्विगुण करावा पूरक । द्विगुण धरावा कुंभक । द्विगुण ऐसा प्राणायाम हा ॥ २६ ॥ ऐसा त्रिगुण चतुर्गुण । प्राणायाम करिती योगनिपुण । जों जों वाढे तों तों प्राण । अंतर्मुख होतसे ॥ २७ ॥ गुदद्वाराच पासीं । मूळाधार तेथें प्राणासीं । स्थिरता तों ब्रह्मरंध्रासी । जावयासि मार्ग होतसे ॥ २८ ॥ जैसा लागतां वारा । वाळोनि चिखलाचा थारा । मोकळा होतो मार्ग सारा । ये रीतीं ॥ २९ ॥ वेळू जैसा पोकळ । परि कांडोकांडीं मांथि पुष्कळ । तैसीं चक्रें सकळ । ब्रह्मरंध्रपर्यंत ॥ ६३० ॥ लोहशलाकेंकरूनी । जैसीं कांडीं भेदूनी । मार्ग करिती तैसा भरोनी । प्राण षट्चक्रें भेदितो ॥ ३१ ॥ तो क्रम पूर्वीं दाविला । हा उपाय बोलतां राहिला । तो स्मरणप्रसंगें बोलिला । सूचविला प्रणव उच्चारें करूनी ॥ ३२ ॥ कीं करितां प्राणायाम । षट्चक्रमार्ग होतो सुगम । आणि आपलें स्मरण परम । प्रणवाच्या करितां आवृत्ती ॥ ३३ ॥ नाकपुडी डावी धरी । पूरक उजविया रंध्रें वारा धरी । सोळा संख्या आवृत्ति जोंवरी । ओंकाराच्या ॥ ३४ ॥ दोहीं पुटांसहित प्राण । धरितां मूळाधारीं कोंडे प्राण । त्यास ह्मणती योग निपुण । कुंभक ह्मणोनी ॥ ३५ ॥ प्रणवाचिया आवृत्ती । चौसष्टी जेव्हां होती । त्यास कुंभक ह्मणती । योगशास्त्रीं ॥ ३६ ॥ धरूनि उजवी नाकपुडी । डावेवाटे हळु हळु वारा सोडी । प्रणवाच्या आवृत्ति मांडी । बत्तीस तेव्हां ॥ ३७ ॥ तो प्रणव एकाक्षरब्रह्म । त्यातें जपत साधकोत्तम । मातें स्मरे ह्मणे पुरुषोत्तम । या भावें करूनी ॥ ३८ ॥ प्राण ब्रह्मरंध्रपर्यंत । जायास उपाय हा अत्यंत । स्मरणप्रसंगें भगवंत । सिंहावलोकनें हें वदे ॥ ३९ ॥ येथें टीकाकार इतर । अर्थ हा प्राणायामपर । न करिती ह्मणती सर्वेश्वर । ह्मणतो जपत ओंकार मातें स्मरतो ह्मणोनी ॥ ६४० ॥ तरी ओंकार एकाक्षर । जपत स्मरत मातें नर । हें पूर्वार्धीं बोलोनि दामोदर । गति बोलतो उत्तरार्धें ॥ ४१ ॥ कीं ऐसा जपत मातें स्मरत । जो देह सोडोनि असे ज्यांत । तो परमगतीतें असे पावत । दोहीं अर्धीं दिसतसे अर्थ हा ॥ ४२ ॥ आणि याहूनी पूर्वश्लो-

कीं । बोलोनि प्राण मस्तकीं । या श्लोकीं ह्मणतो कीं । प्रणव उच्चारित स्मरत जातो ह्मणोनी ॥ ४३ ॥ तेव्हां प्राण चढला मस्तकावरी । राहिल्या परा पश्यंती मध्यमा वैखरी । प्रणव उच्चार त्याउपरी । घडे कैसा ॥ ४४ ॥ प्राण भेदूनि चक्रें साही । मस्तकासि जातां तळीं देहीं । प्राणचि जेथवां नाहीं । उच्चार करी कोण तेव्हां ॥ ४५ ॥ तैसेंचि पूर्वश्लोकीं पूर्वार्धी । मन हृदयांत बोलोनि उत्तरार्द्धीं । प्राण मस्तकीं ह्मणे हेही प्रसिद्धी । ऐसीच टीकेंत वर्णिती ॥४६॥ हेही गोष्टी अघटित । कीं प्राण तेथें मन निश्चित । प्राणमनाचें बंधन असे अत्यंत । प्रसिद्ध वेदीं पुराणीं योगींही ॥ ४७ ॥ येथें पुढील बोलोनि योगगती । सांगे मागील साधनरीती । सिंहावलोकनन्यायेंच श्रीपती । सिद्धि बोलोनि साधनें बोलतो॥४८॥प्राण मस्तकास नेती । ते भूमींतही पुरोनि घेती । ऐशा समाधींत कोणे रीती । उच्चार करील ओंकाराचा ॥ ४९ ॥ नवनीतादि मर्दन । करूनि समाधि त्याचा जन । उतरिती ऐसिया समयीं मन । कचें हृदयांत कैंचा प्रणवोच्चार ॥ ६५० ॥ समाधि न ह्मणावा तैसा । तरी मस्तकीं प्राण चढला कैसा । आणि "आस्थितो योगधारणां" ऐसा । श्रीकृष्णही कां ह्मणे ॥ ५१ ॥ ज्ञानयोगधारणा ह्मणावी । तरी सर्वद्वारें कां कोंडावीं । एवं च इतर क्लिष्टकल्पना सांडावी । बोलावी हटयोगधारणाच हे ॥ ५२ ॥ प्रणवोच्चार करीत । प्राण मस्तकीं ठेवूनि असे जात । हा अर्थ येथें विरुद्ध अत्यंत । बोलतां नये॥ ५३ ॥ येथें सिंहावलोकनन्यायें । प्राणायामचि सांगतो ह्मणावा निश्चयें । कीं मस्तकीं प्राण जावयाचें धनंजयें । प्राणायामसाधन समजावें हा भाव ॥ ५४ ॥ आतां असो हे खटपट । जे विवेकी ते समजतील नीट । विरुद्धार्थ निपट । कैसा अंगिकारावा ॥ ५५ ॥ योगधारणाधरूनी । मस्तकीं प्राण ठेवुनी । पुढें काय करितो तें उत्तरार्धें करूनी । बोलोनि बोलतो गति त्याची ॥ ५६ ॥

उत्तरार्ध ॥ यः प्रयाति त्यजन्देहं स याति परमां गतिम् ॥ १३ ॥

॥ टीका ॥ मस्तकीं प्राण ठेवुनी । असे ऐसें पूर्वश्लोकेंकरूनी । बोलिलों आतां ऐसा जो प्रकर्षेंकरूनी । देह सोडोनि जातसे ॥ ५७ ॥ तो परमा गतीतें । पावतो ह्मणूनि भगवंतें । ब्रह्मरंध्र भेदूनि जातो गतीतें । सूचविलें हेंही ॥ ५८ ॥ कीं कोंडी द्वारें सकळ । हें पूर्वींच बोलिला मेघनीळ । आणि प्रयाति ह्मणजे जातो करूनि प्रकृष्टबळ । ऐसें येथें बोलिला ॥ ५९ ॥ आधीं कीं मस्तकीं वारा यथेष्ट । कोंडितां बळ करूनि प्रकृष्ट । जें दशमद्वार बाळपणीं स्पष्ट । दिसे तें फुटे बळें प्राणाच्या ॥ ६६० ॥ यालागीं कीं मस्तकीं

प्राण शिरे । तो इतरांच्या प्रयासें उतरे । तो स्वयें मस्तकींहूनि न फिरे । समाधी उतरिती लोक त्याचा ॥ ६१ ॥ ज्यास करणें काळवंचना । तो दशमद्वार भेदूनि जाईना । हा ज्ञानवंत यास वासना । परमागतीची ॥६२॥ ह्मणूनि दशमद्वार पवित्र । ज्यावरी असे चर्म मात्र । तें भेदूनि सोडोनि गात्र । परमागतीतें पावतो ॥ ६३ ॥ तो सत्यलोकास जातो । तेथें ध्यानयोगातें दृढ करितो । मग ब्रह्मा चतुर्मुख जेव्हां मुक्ति पावतो । मुक्ति पावतो हाही तेव्हां ॥ ६४ ॥ होईल हें पुढें स्पष्ट । याच्या जावयाची वाट । उत्तरायण शुक्लगति उत्कट । पुढें प्रसंगें भगवंत बोलेल ॥ ६५ ॥ कीं ज्ञानी आत्मज्ञ खरा । परि आत्मयोग साधिला नाहीं बरा । तरी कष्टेंकरूनि मस्तकासि वारा । नेऊनि बांधिली मोट वायूची ॥ ६६ ॥ ज्ञानावांचूनि नाहीं मोक्ष । यासि तों मोक्ष बोलिला अंबुजाक्ष । ह्मणूनि आत्मज्ञ मानवापरी दक्ष । हटयोगी जैसा तैसा आत्मयोगी न ह्मणवे ॥ ६७ ॥ जो पक्व आत्मज्ञानी सुजाण । प्रारब्ध सरतां त्याचे प्राण । न निघती समुद्रीं लवण । लय पावती तैसे स्वरूपीं श्रुति ह्मणे ॥ ६८ ॥ श्रुति ॥ न तस्य प्राणा उत्क्रामंति इहैव स विलीयते ॥ श्रुत्यर्थ ॥ प्राण त्याचे न निघती । येथेंचि लय पावती । ऐसें स्पष्ट बोले श्रुति । तेणें मस्तकीं प्राण कां न्यावा ॥६९॥ ब्रह्म मस्तकींच त्यास । तेव्हां देह सारा पडला काय ओस । स्वदेहासह चराचर जयास । ब्रह्मचि दिसे ॥ ६७० ॥ तो कां सर्व द्वारें कोंडी । कां तो योगधारणा मांडी । अखंडत्व ज्याला अखंडीं । अखंड बाणे ॥ ७१ ॥ एवं च पक्वज्ञानी असता । तरी या खटपटीतें न झोंबता । तेव्हां तो मानिजेता । कीं सद्यचि पावलों मुक्तीतें ॥ ७२ ॥ अथवा ज्ञानी आणि भक्त । असतां सगुणचरणीं अनुरक्त । तरी देह सोडितां ध्यानयुक्त । सगुणमुक्तीतें पावता ॥ ७३ ॥ कीं जो जें सर्वदा स्मरे । तें त्यास देहावसानीं स्फुरे । एवं सगुणभक्त ज्ञानी बरे । ते सगुणस्मरणें कृतकृत्य ॥ ७४ ॥ त्यांसही मुक्ति तत्काळ । ज्यांस ज्ञानभक्तीचा सुकाळ । त्यांच्या दृष्टीस फटकाळ । हटयोग हा ॥ ७५ ॥ ते जरी हटयोग जाणती । तरी न अनुष्ठिती या योगरीती । प्रारब्ध सारायातेंच जिती । देह ज्यांचे ॥ ७६ ॥ ते आत्मत्वें कृष्णचरण । स्मरती अंतीं तेंचि स्मरण । भगवद्रूप ज्यांचें अंतःकरण । भृंगकीटन्यायें जितांचि ॥ ७७ ॥ एवं मोक्ष निर्गुण । त्यांत सद्यमुक्ती पावती

---

१ यथा पेशस्कृता विद्धः कुड्यायां तमनुस्मरन् । तद्रूपं ध्यानयोगेन बिभर्ति स्वस्वरूपताम् ॥ १ ॥

पक्क निपुण । त्यांचें देह त्यजूनि उत्क्रमण । हटयोगें बोलिलें ॥७८॥ यासही कैवल्यमोक्ष । कीं नव्हे भक्तियोगीं दक्ष । ज्ञानी अपक्क होऊनि धरिला पक्ष । हटयोगाचा ॥ ७९ ॥ ब्रह्मरंध्र भेदूनि गेला । पुन्हा जन्म न घडे त्याला । आणि पक्कज्ञानी नाहीं जाला । ह्मणूनि मुक्तिही न घडे तत्काळ ॥ ६८० ॥ जन्म योगभ्रष्टास मागुतीं । मागें बोलिला जगत्पती । यालागीं कीं ब्रह्मरंध्र भेदूनि हे गती । तो नाहीं पावला ॥ ८१ ॥ जाय ब्रह्मरंध्र भेदूनी । तो नये पुन्हा परतोनी । परंतु मोक्षज्ञानावांचूनी । न घडे सर्वथा ॥ ८२ ॥ यालागीं हा ज्ञानी । परंतु अपक्क ह्मणोनी । गेला ब्रह्मरंध्र भेदूनी । ब्रह्मलोका ॥ ८३ ॥ तो दों परार्धांचे अंतीं । ब्रह्मयासह पावेल कैवल्यगती । ऐसे अनेक असती । ब्रह्मलोकीं ॥ ८४ ॥ ते ब्रह्मयाचा दिवस आणि रजनी । मोजिती मोक्षप्रतीक्षा करूनी । सत्यलोकीं असती ह्मणोनी । पुढें चतुर्थश्लोकीं बोलेल ॥ ८५ ॥ "तेहोरात्रविदो जनाः" ह्मणोनी । चतुर्थ श्लोकें करूनी । बोलेल भगवंत त्यावरूनी । गति याची एथें ऐशी वदावी ॥ ८६ ॥ ये विषयीं श्लोक । या पुढेंचि बोलणार उत्तमश्लोक । परि आयकोनि याचें कष्ट आत्यंतिक । ह्मणी शंकेल अर्जुन ॥ ८७ ॥ कीं ब्रह्मरंध्र भेदिल्यावीण । मोक्ष नव्हे सगुण अथवा निर्गुण । ह्मणूनि व्याकुळ अंतःकरण । ह्मणी होय आपल्या भक्ताचें ॥ ८८ ॥ ह्मणूनि भक्तास आपण । सुलभ आणि सुलभत्व लक्षण । बोलतां प्रकरण । वाढेल श्लोकत्रयपर्यंत ॥ ८९ ॥ ह्मणूनि "तेहोरात्रविदो जनाः" । ऐसें चतुर्थश्लोकीं या अनुसंधाना । योजूनि बोलेल प्रस्तुत स्वजना । सुलभ आपण हें बोलतो या श्लोकीं ॥ ६९० ॥

॥ श्लोक ॥ अनन्यचेता सततं यो मां स्मरति नित्यशः ।
तस्याहं सुलभः पार्थ नित्ययुक्तस्य योगिनः ॥ १३ ॥

॥ टीका ॥ अगा जडभाग तितका अन्य । अन्य नव्हे आत्मा चैतन्य । तथापि जडातरंगीं धन्य । त्या चित्समुद्रातें देखती ॥ ९१ ॥ ज्या चित्तें हा अनुभव । त्या चित्तास अनन्यवैभव । ऐसें चित्त ज्याचें तो मानव । अनन्यचेता ह्मणावा ॥ ९२ ॥ ऐसा अनन्यचेता सर्वदा । स्मरे नित्य मज मुकुंदा । निर्गुण ज्ञानी आणि चरणारविंदा । स्मरे माझिया ॥ ९३ ॥ पार्था मी श्रीवल्लभ । त्यास अत्यंत सुलभ । त्याला मोक्ष नसे दुर्लभ । सुलभ मोक्षस्वरूप मी जेव्हां ॥ ९४ ॥ होऊनि दुर्लभ आत्मज्ञान । जे मोक्षार्थ मांडिती इतर साधन । त्यांस दुर्लभ मी जगज्जीवन । ह्मणूनि मोक्षकष्टें तयां-

सी ॥ ९५ ॥ होऊनिही ज्ञानी । मातें त्या अनन्यचित्तें करूनी । स्मरे त्यास नं उरती दोंनी । एक मी आणि एक मोक्ष ॥ ९६ ॥ चित्त चैतन्य जालें । तेव्हांच निर्गुणात्मत्वें धालें । स्मरतां मातें त्यालाचि आलें । मद्रूपत्व अर्जुना ॥ ९७ ॥ चित्ता चित्स्वरूपत्व स्फुरे । तेव्हां अनन्यत्वें तें नुरे । मग मज सगुणातें स्मरे । चित्प्रकाशें मदाकार होउनी ॥ ९८ ॥ कां त्याणें निरोधावीं द्वारें । कां मस्तकास न्यावे वारें । देह पडतां माझिया आकारें । शुद्धसत्त्व उरे तें चित्त ॥ ९९ ॥ आत्मा तरी जगद्व्यापक । मद्रूप चित्त मदात्मक । देह पडतां हेंचि कौतुक । दिसों लागे अनायासें ॥ ७०० ॥ ज्ञानींच होय पूर्वी बोलिला जो तोही । परंतु ज्ञानयोगीं प्रयत्न केला नाहीं । प्राणनिरोधप्रवाहीं । क्रामिलें आयुष्य ॥ १ ॥ हा नित्ययुक्त योगी । चित्त नित्य चैतन्यसंयोगीं । आणि मातें स्मरे यालागीं । त्यास मी सुलभ अत्यंत ॥ २ ॥ अनन्यचित्त सतत । आणि नित्यशः मातें स्मरत । 'सतत, नित्य' या दों शब्दीं भगवंत । दोन्ही सूचवी ॥ ३ ॥ अनन्यचित्त सतत । सतत ह्मणजे सर्वदा अनन्यचित्त । आणि नित्यशः मातें असे स्मरत । नित्यशः ह्मणजे प्रतिदिनीं ॥ ४ ॥ नित्यशः ह्मणजे नित्य नित्य । ह्मणजे प्रतिदिनीं अगत्य । जैसें प्रतिमादिपूजाकृत्य । तैसा प्रतिदिनीं ध्यातो मातें हा भाव ॥ ५ ॥ ह्मणजे विश्व भगवद्रूपें । लक्षितो अनन्यचित्स्वरूपें । या अनुभवाच्या प्रतापें । अनन्यचित्त सतत सर्वकाळीं ॥ ६ ॥ आणि नित्य नित्य प्रतिदिनीं । ध्यानीं श्रवणीं कीर्तनीं । नित्यशः स्मरे मातें ह्मणोनी । सूचवी भाव॥७॥सतत ह्मणजे अखंड । अनन्यत्वीं चित्तास न पडे खंड । कीं सगुण भजनही करी उदंड । तरी अनन्यत्व खंडेना ॥ ८ ॥ कीं भगवद्रूप सगुण । तद्रूपें चित्त आपणातें आपण । कल्पी आत्मप्रकाशें निपुण । अनन्यत्वेंचि चित्त तें ॥९॥ आत्मप्रत्ययाविण । चित्त काय कल्पूं शकेल सगुण । सुवर्णमूर्तीविना सुवर्ण । सिद्धचि नव्हे ॥ ७१० ॥ सुवर्णें सुवर्णमूर्ति जाली सिद्ध । सुवर्णावांचूनि न दिसे हेंही प्रसिद्ध । आंत बाहेर अवघें समृद्ध । सोनेंचि तें ॥ ११ ॥ तैशी आत्मप्रकाशाविना । कल्पनाचि चित्ताची घडेना । कल्पिली मूर्ति अनुभवा येना । आत्मप्रकाशावांचूनी ॥ १२ ॥ ऐसा स्मरे नित्य सगुण । तरी अनन्यत्वाची न तुटे खूण । अखंड अनन्यचित्तें ऐसा निपुण । आणि नित्य नित्य स्मरे सगुणही ॥१३ ॥ ऐसा योगी नित्ययुक्त । आणि सगुणभजनेंकरूनि भक्त । तो देह असतांचि मुक्त । जेव्हां सुलभ भगवंत ऐसा ॥ १४ ॥ परंतु प्रारब्धाचा देह । सकळ दुःखांचें गृह ।

अशाश्वत पडणार । निःसंदेह कर्मफळ पूर्वील भोगवी ॥ १८ ॥ म्हणूनि तो पडल्यावरी । मज पावणें हे एक उरी । तो मज पावे तदुपरी । कानीं न पडे कर्मदेहवार्ताही ॥१६॥ याकारणें आपणातें । पावलियावरी त्यातें । पुन्हा या दुःखरूपा कर्मलोकांतें । येणेंचि न घडे म्हणतसे या श्लोकीं ॥१७॥

॥ श्लोक ॥ मामुपेत्य पुनर्जन्म दुःखालयमशाश्वतम् ।
नाप्नुवंति महात्मानः संसिद्धिं परमां गताः॥ १५ ॥

॥ टीका ॥ पावोनियां मातें । पुन्हा न पावती जन्मातें । मद्रूप होऊनि ज्यांतें । असणें मजसमीप ॥ १८ ॥ उपशब्दें समीप ऐसा अर्थ । दावूनि सगुणमोक्षभावार्थ । येथें दावी समर्थ । निगुर्णमोक्ष चरणीं चौथिया ॥ १९ ॥ "संसिद्धिं परमां गताः" म्हणोनी । परमा सिद्धीतें पावले येणें करूनी । कैवल्यनिगुर्णमोक्ष सूचवुनी । हटयोगियाहूनि उभयगतिश्रेष्ठत्व वर्णितो ॥ ७२० ॥ कीं पावोनि मातें सगुणातें । आणि परम संसिद्धीतें पावले त्यांतें । पुनर्जन्म नाहीं या उभयांतें । जें पुनर्जन्म गृह दुःखाचें ॥ २१ ॥ मातें म्हणिजे सगुणातें । येथें कोणी म्हणतील हेंही निर्गुणातें । म्हणूनि योजी उप शब्दातें । उप म्हणिजे समीप ॥ २२ ॥ निर्गुणीं निर्गुणचि उरे । तेथें दूरत्व अथवा समीपत्व न स्फुरे । सायुज्यमोक्षीं न शिरे । अर्थ उप शब्दाचा ॥ २३ ॥ सामीप्य सारूप्य सालोक्य गती । उप शब्दें सूचवी श्रीपती । कीं वैकुंठ आणि वैकुंठाचा पती । दोन्ही एक ॥ २४ ॥ जैसे रामकृष्णादि अवतारदेह । नगराकार रूप तेंही निःसंदेह । परि नगराकारीं न वसे स्नेह । उपासकांचा ॥ २५ ॥ म्हणूनि रामकृष्णादि अवतार । त्याती हेचि भगवदाकार । जन्मकर्म दिव्यें परि मनुष्यानुसार । गोड मनुष्यां लागती ॥ २६ ॥ म्हणूनि हे अवतार । जनास वाटती भगवदाकार । वैकुंठनगर स्वयें सर्वेश्वर । शास्त्रसिद्ध आणि अनुभवी जाणती ॥ २७ ॥ हे त्रिगुणरचना । भगवद्रूपावीण असेना । तथापि हे त्रिगुणकल्पना । अनादि जीवकर्मभोगार्थ ॥ २८ ॥ त्यांतचि भगवदवतार । मुक्तिप्रदें भगवदाकार । आणि मुक्तिरूप सर्वेश्वर । अनादि वैकुंठरूप स्वयें प्रगटतो ॥ २९ ॥ एवं च वैकुंठातें पावला । ऐक्य आणि समीपत्वही त्याला । त्यांत कोणास सामीप्य मोक्ष बोलिला । कोणास सारूप्य सालोक्य ॥ ७३० ॥ त्यांत वैकुंठनाथाचें रूप । सामीप्य म्हणिजे त्यासमीप । वैकुंठ लोकही भगवत्स्वरूप । तेव्हां समीपत्व हें सकळांसही ॥ ३१ ॥ वैकुंठनाथसमरूप । वैकुंठीं त्यास

१ जीवाला कर्मांच्या भोगाकरितां. २ मुक्ति देणारा. ३ विष्णुसारखें रूप.

ह्मणती सारूप्य । तें वैकुंठही भगवत्स्वरूप । तेव्हां समीपत्व त्यासही ॥३२॥ वैकुंठींच वैकुंठाकार स्थळ । ज्यांत वैकुंठरचना सकळ । मुक्त तेथें नांदे प्राणी केवळ । नित्यमुक्त वैकुंठनाथचि नांदतो ॥ ३३ ॥ हा सालोक्यमोक्ष बोलिला । तोही समीपचि पावला । कीं वैकुंठीं त्याला । तें वैकुंठचि वैकुंठनाथ तो ॥ ३४ ॥ उपशब्दें ऐसें सूचवुनी । "संसिद्धिं परमां गताः" या वरूनी । निर्गुण कैवल्यमोक्ष बोलोनी । पुनर्जन्म नाहीं ह्मणूनि बोलतो ।।३५॥ या दोहीं मोक्षांस पावले । ते महात्मशब्दें थोर केले । कीं महा थोर अत्यंत जाले । आत्मे ह्मणिजे चित्तें जयांचीं ॥३६ ॥ "यो वै भूमा तत्सुखं" * श्रुती । ह्मणे जो भूमा त्यास सुख ह्मणती । ज्यास आदि मध्य अंत नसती । तो भूमा अनंत तोचि आनंद ॥ ३७ ॥ महा शब्दें भूमा । चित्तास ह्मणावें आत्मा । तदाकार चित्तें अनुभविती तो महिमा । महात्मशब्दें ते पुरुष ॥ ३८ ॥ एवं च देहपतनपर्यंत । आनंद ऐसा अत्यंत । यावरूनी सूचवी भगवंत । कीं थोर त्या हटयोगियापरीस हे ॥ ३९ ॥ कीं हे पावले शाश्वत । पुन्हा जन्मदुःखालय अशाश्वत । न पावती ह्मणे यावरूनि भगवंत । ब्रह्मलोकगति त्यांची अशाश्वत ऐसें सूचवी ॥ ७४० ॥ कीं हे ज्ञानी दक्ष । सद्यचि पावले मोक्ष । तो ज्ञानी परि धरूनि हटयोगपक्ष । ब्रह्मलोकास पावला ॥४१॥ तो ब्रह्मलोक आणि ब्रह्मा । होतां त्यांच्या शतवर्षांची सीमा । नाश पावती या साधकोत्तमा । मोक्ष तेव्हां जरी होणार ॥४२॥ मुक्ति होय तों पर्यंत । सत्यलोकीं दिवस मोजित । गति पावोनि शाश्वत । असावें तेणें ॥ ४३ ॥ ह्मणूनि नश्वर गती । ह्मणावें हटयोगी पावती । या भावें सर्व जगत्पती । श्लोकद्वय बोलतो ॥ ४४ ॥ आणि इतर देवतोपासक । त्या त्या देवांचेच पावती लोक । परंतु न चुके पुनर्जन्म शोक । प्रसंगें हेंही सूचवी या श्लोकीं ॥ ४५ ॥

॥ श्लोक ॥ आब्रह्मभुवनाल्लोकाः पुनरावर्तिनोऽर्जुन ।
मामुपेत्य तु कौंतेय पुनर्जन्म न विद्यते ॥ १६ ॥

॥ टीका ॥ ब्रह्मयाचें भुवन । सत्यलोक ज्याचें अभिधान । तें धरूनि जें जें स्थान । ज्या ज्या ब्रह्मादिदेवांचें ॥ ४६ ॥ अर्जुना हे लोक सकळ । थोरा थोरा पुण्याचें फळ । तथापि पुनरावृत्तिशीळ । जे पावले पुन्हां जन्मलेच ते ॥ ४७ ॥ हे गोष्टी आयकोनी । शंकित जाला अर्जुन मनीं । ऐसाच वैकुंठही लोक ह्मणोनी । शंका उपजली ॥ ४८ ॥ कीं लोक मात्र

---

१ जन्म आणि दुःख यांचें घर. २ नांव.

जितका । पुनरावृत्ति देणार तितका । तेव्हां पुनरावृत्तीचा ठका । वैकुंठवासीं यासही ॥ ४९ ॥ हा अर्जुनाचा भाव । जाणोनियां देवाधिदेव । संदेह निरसे ऐसें वासुदेव । उत्तरार्धें बोलतो ॥ ७५० ॥ कीं मातें पावोनि कुंतीसुता । पुनरावृत्तीची वार्ता । कानीं पडे हें न घडे तत्त्वता । कीं लोक माझा तो मीच हा भाव ॥ ५१ ॥ सकळ लोक आणि लोकपती । मीच स्वयें जगत्पती । परि ते लोकपाळ मानिती । कीं आह्मीं धनी या लोकांचे ॥ ५२ ॥ कीं गुण अविद्यामय । ते लोक हा निश्चय । मी ईश्वर अद्वय । मीच माझा लोक मज वाटे ॥ ५३ ॥ जे ऐसे मद्रूप होती । तेचि त्या लोकातें पावती । वैकुंठ अपुनरावृत्ति गती । यालागीं बोलतां अर्जुना ॥५४॥ मातें ह्मणतां हा भाव । एथें सूचवी देवाधिदेव । एथेंही उपशब्द देव । पूर्वोक्त भावें बोलतो ॥ ५५ ॥ कीं मातें ह्मणतां मी निर्गुण । त्या मातें पावती ह्मणतो सगुण । ऐसें ह्मणी कोणी शब्द निपुण । बोलती एथें ॥ ५६ ॥ ह्मणोनि ह्मणतां उप । अर्थ याचा समीप । तेव्हां मी वैकुंठनगररूप । त्या मातें ऐसें सूचवी ॥ ५७ ॥ वैकुंठ माझें स्वरूप । तेथें जे असती पावोनि मद्रूप । तितकेही मजसमीप । हें उप शब्दें सूचवी ॥ ५८ ॥ आणि या प्रकरणींच पुरुषोत्तम । यापुढें जो श्लोक पंचम । तेथें ह्मणेल कीं "तद्धाम परमं मम" । आधीं "यद्गत्वा न निवर्तंते" ह्मणोनी ॥ ५९ ॥ ज्यास अव्यक्त[1] अक्षर[2] ह्मणती । ज्यास ह्मणती परमगती[3] । ज्यातें पावोनि न परतती । तें परम धाम गृह माझें ऐसें बोलेल ॥ ७६० ॥ तो अव्यक्त अक्षर आपण । तोचि धाम आपलें ह्मणे हे एथें खूण । सूचवी सर्वज्ञ निपुण । जें मातें ह्मणूनि या श्लोकीं बोलिला ॥६१॥ ऐसें ज्या पंचम श्लोकीं । त्यासही कोणी ह्मणतील कीं । सगुणाचें धाम निर्गुण इतकी । गोष्टी तेथें बोलतील ॥ ६२ ॥ ह्मणूनी त्याही पुढें श्लोक । तेथें ऐसें बोलेल उत्तमश्लोक । कीं "तद्धाम परमं मम" ह्मणजे वैकुंठलोक । अर्थ हाचि सिद्ध होय ॥६३॥ "पुरुष स परः पार्थ । भक्त्या लभ्यस्त्वनन्यया" ऐसें समर्थ । बोलेल याचा विशदही अर्थ । होईल पुढें ते स्थळीं॥ ६४ ॥ एवं च पावेल मातें । हें ह्मणे वैकुंठ लोकातें । कीं जो पावला त्यातें । पुनर्जन्म न घडे ॥ ६५ ॥ कीं वैकुंठनाथ आणि वैकुंठवासी । चिद्रूपचि वैकुंठ वाटे इतकियांसी । मातें पावे ह्मणूनी अर्जुनासी । आणिका गहन भावेंही बोलिला ॥ ६६ ॥ कीं वैकुंठीं स्थळें दोनी । मुक्तस्थळ अमुक्तस्थळ ह्मणोनी । मुक्तस्थळास भक्त

१ अगोचर. २ अविनाश. ३ ज्या गतीस पोंचल्यावर पुनः जन्म घेत नाहीं-

ज्ञानी । जाती न परतती ते पुन्हा ॥६७॥ ज्यांस नसोनि आत्मज्ञान । तीव्र घडलें सगुणध्यान । होतां देहावसान । तेंचि आठवे ॥ ६८ ॥ जो जें स्मरे देहांवसानीं । तो तेंचि रूप पावे ह्मणोनी । याच अध्यायीं स्वमुखेंकरूनी । मागें श्रीकृष्ण बोलिला ॥ ६९ ॥ देहावसानीं हरिस्मृती । त्या स्मरणें भगवदाकृती । परि संसारबीज प्रकृती । आत्मयोगें न भाजली ज्ञानाग्नींत ॥ ७७० ॥ अमुक्तस्थळ त्यांकारणें । तैसेंचि अनादि कल्पिलें नारायणें । तेथें त्यांस भेद स्फुरणें । आपण आणि तो लोक भिन्न ह्मणोनी ॥ ७१ ॥ तेथें द्वारपाळ जय विजय । त्यांसि अविदित ब्रह्म अद्वय । शाप ज्यां दोघांस होय । सनकादिकांचा ॥ ७२ ॥ तयांस भेदाचा प्रत्यय । ह्मणूनि च्यवले जय विजय । उगेंच वैकुंठ ह्मणतां संशय । पुनरावृत्तीचा पडेल ॥ ७३ ॥ हा पुराणोक्त त्यांचा इतका परिहार । बोलतां गीता वाढेल फार । ह्मणूनि मातें पावती ते न जन्मती मत्पर । इतकेंचि बोले ॥७४॥ कीं अद्वैत अनुभविती भक्त । तेचि त्या वैकुंठींचे मुक्त । ज्यांस न वाटे विभक्त । आपण वैकुंठ वैकुंठनाथही ॥ ७५ ॥ जेथें नसे द्वैतस्फुरण । तितकेंचि मी नारायण । आपले दृष्टीनें तो आपण । नव्हे ऐसें कांहीं असेचिना ॥ ७६ ॥ ह्मणूनि मातें पावले । ते पुन्हा जन्मास नाहीं आले । इतकेंचि भगवंत बोले । वैकुंठ न ह्मणे यास्तव ॥ ७७ ॥ प्रस्तुतीं हटयोगियांस । साधनीं सांगोनि अति आयास । सिद्धीही जे तयांस । तेही ऐसी जेथूनि पुन्हा परतती ॥ ७८ ॥ आतां जे कर्मफळें । ब्रह्मलोकास गेले पुण्यबळें । त्यांतेंचि पुनरावृत्ति काळें । योगिया ऐसिया तों परतणें असेना ॥७९॥ त्यांत हाही हटयोगी । ब्रह्मरंध्र भेदूनि जगीं । पावोनि राहिला मोक्षालागीं । ब्रह्मलोकीं तया ॥ ७८० ॥ पुनरावृत्ति यास नसे । आणि ब्रह्मयासह मुक्ति गवसे । गति तों वाईट न दिसे । हटयोगिया ज्ञानियाची ॥ ८१ ॥ तेव्हां ज्ञानी आणि भक्त त्याहुनी । बरे बहुत काय ह्मणोनी । हेही शंका या श्लोकें करूनी । परिहरितो श्रीकृष्ण ॥ ८२ ॥

॥ श्लोक ॥ सहस्रयुगपर्यंतमहर्यद्ब्रह्मणो विदुः ।
रात्रिं युगसहस्रांतां तेऽहोरात्रविदो जनाः ॥ १७ ॥

॥ टीका ॥ युगें चारि क्रमती । त्यास एक युग ह्मणती । ऐसीं सहस्र युगें होती । तो ब्रह्मयाचा दिवस एक ॥ ८३ ॥ तैसा युग सहस्रांचा अंत । होय इतका काळ पर्यंत । रात्रीही थोर अत्यंत । ब्रह्मयाची ॥ ८४ ॥ ऐसे

१ देह समाप्ति. मृत्यु. २ द्वैताभास. ३ मी तूं पण.

दिवस ऐशा राती । अगा अर्जुना ते जाणती । जे प्राण मस्तकास नेऊनि जाती । परम गतीतें ह्मणूनि तूतें बोलिलों ॥ ८५ ॥ याकारणें ते । जन अगा अहोरात्र जाणते । दिवस जाला रात्रि होते । सत्यलोकीं ऐसें जाणती ॥ ८६ ॥ ऐसा क्रमतां काळ अत्यंत । होती ब्रह्मयाचीं वर्षे शत । काळाच्या मुखीं तोंपर्यंत । असावें तिहीं ॥ ८७ ॥ ऐसिया युगांच्या कोटी । क्रमतां अगा किरीटी । जेथें त्यांचे देह तो लोक शेवटीं । पडेल दाढेस काळाच्या ॥ ८८ ॥ जरी त्यांस पुनरावृत्ति नाहीं । असती काळाचिया चपेटियांत तेही । हे वार्ताही नेणती कांहीं । सद्य निर्गुण सगुण मोक्ष ज्यांला ॥ ८९ ॥ अगा जोंवरी काळाच्या प्रवाहीं । तोंवरी त्यांस सुख नाहीं । सुख जें वाटतें कांहीं । तेंही दुःखचि नश्वरत्वें ॥ ७९० ॥ अहोरात्र जाणती ते । ह्मणूनि भगवद्वाणी बोलते । त्यांत पूर्वानुसंधानें दाविते । भावार्थ इत्यादि ॥ ९१ ॥ कीं ज्ञानावांचूनि मोक्ष न घडे । तें ज्ञान होऊनि हटयोगाकडे । भरले ते बापडे । ठकले ऐसा हा भाव ॥ ९२ ॥ देऊनि हातींचा विडा । तांबूल मागे वेडा । ज्यास होता ज्ञानें मोक्ष रोकडा । तो दाढेस पडला काळाच्या ॥ ९३ ॥ मोजूं लागला दिवस राती । युगसहस्रें ज्यांत जाती । हारवूनि हातींचें मोतीं । खडे मोजूं लागला ॥ ९४ ॥ घर पुसत नवरी आली । ते सेजारियास अनुकूळ केली । तीस कन्या होईल ते आपली । स्त्री करीन धरिली हे आशा ॥ ९५ ॥ ज्ञानें मोक्ष तत्काळ । तो टाकूनि योग फटकाळ । धरूनि मोजूं लागला काळ । ब्रह्मलोकीं मोक्षाकारणें ॥ ९६ ॥ योगभ्रष्ट मागें बोलिला । तो याहुनी कोटिगुणें भला । कीं एक जन्म जरी अपक्व वाया गेला । दुसरेच जन्मीं तो सिद्ध ॥ ९७ ॥ एवं च हटयोगगती । ज्ञानियांस मागें वदला श्रीपती । "तेऽहोरात्रविदो जना" ह्मणूनि मागुती । ते ह्मणूनि तेथें पूर्वोक्त दाखविले ॥ ९८ ॥ कोणीं टीकाकार । हें अनुसंधान पूर्वापर । सोडोनि उगेंच इतर । "तेऽहोरात्रविदो" ह्मणोनी वाखाणिती ॥ ९९ ॥ पूर्वी बोलिले असावे । तरी ते ह्मणोनि सूचवावे । ज्यास जे मागें नसतीच ठावे । त्याणें ते ह्मणतां समजावे ते कोण ॥ ८०० ॥ न अनुसंधान सांपडे । भलतीकडे भरती बापडे । अनन्यशरणागततेंचि ठायीं पडे । यथार्थ अर्थ भगवद्वाणीचा ॥ १ ॥ इतर देवता पोटीं । भगवद्भक्ति ओंठीं । भक्ति ह्मणावी तेथें थोटी । हाता गीतार्थ केवीं लागे ॥ २ ॥ तत्रापि हटयोगाचा बडिवार । ज्यास मिरवणें वारंवार । त्यास एथें चमत्कार । दृष्टी न पडती ॥ ३ ॥ हटयोगें पावले सिद्धी । हटयोगें आपल्या केल्या प्रसिद्धी । त्यांस हट

औरेंचि वाटे समृद्धी । मोक्षाची ॥४॥ असो आतां हा श्लोक जाला । श्लोक दुसरा पुढें आला । तो हा श्लोक कां बोलियेला । तें निमित्त आधीं विचारावें ॥ ५ ॥ ब्रह्मयाचे दिवस आणि राती । जागती जे पावले ब्रह्मलोकगती । ह्मणूनि बोलिला वैकुंठपती । तरी तेथें कोणे रीती दिवस रातीही ॥ ६ ॥ उदय अस्त सूर्याचा नसे । दिनरात्री जाणती ते कैसे । ह्मणूनि ऐसें अर्जुन पुसे । तों स्वयेंचि बोलतो या श्लोकीं ॥ ७ ॥

॥ श्लोक ॥ अव्यक्ताद्व्यक्तयः सर्वाः प्रभवंत्यहरागमे ।
रात्र्यागमे प्रलीयंते तत्रैवाव्यक्तसंज्ञके ॥ १८ ॥

॥ टीका ॥ अगा ब्रह्मयाच्या दिवसाचा आगम । होतां सकळां भूतांचा उगम । प्रकृतीपासूनि होतां अवगम । ते जागती त्याच्या दिवसाचा ॥८॥ आगम होतां रात्रीचा । लय होतो भूतांचा । तो रात्रिभाग ब्रह्मयाचा । जाणती ते ॥ ९ ॥ हीं भूतें दिवसा कोठोनि आलीं । आणि रात्रीं कोठें लय पावलीं । जेथूनि उपजलीं तेथें निमालीं । तें काय ॥ ८१० ॥ ऐसें पुसेल धनंजय । ह्मणूनि येथेंचि जगन्मय । हा ब्रह्मयाचा दिनप्रलय । आणि सृष्टि प्रतिदिवसाची हे सांगतो ॥ ११ ॥ अव्यक्तापासूनी । व्यक्ति होती ह्मणोनी । कारणापासूनि कार्य उपजे हें सूचवुनी । प्रतिदिनसृष्टि सांगतो ॥१२॥ व्यक्ति ह्मणजे आकृती । जीपासूनि होती ते प्रकृती । स्वयें आकृतिहीन यालागीं ह्मणती । अव्यक्त तीतें॥ १३ ॥ त्या अव्यक्ततत्त्वप्रकृतीपासुनी । स्थावरजंगमरूपें करूनी । व्यक्ति उपजती ह्मणोनी । अव्यक्त कारण व्यक्तीचें॥१४॥अव्यक्तापासूनी व्यक्ति होती । तो ब्रह्मयाचा दिवस ह्मणती । उपजल्या क्रमें लय पावती । त्याच अव्यक्तीं रात्रीं ते ॥ १५ ॥ युगें सहस्र क्रमती । तेव्हां आरंभे राती । मेघ पर्जन्यवृष्टि न करिती । मानवी वर्षें शतपर्यंत ॥ १६ ॥ अग्नीहूनि तीक्ष्ण । सूर्य तपेल ऐसें उष्ण । ते शोषितील किरण । रस वृक्षौषधिधान्यांचे ॥ १७ ॥ अन्नापासूनि उत्पन्न । तीं शरीरेंचि होती अन्न । अन्नावांचूनि क्षुधापन्न । एक एकांस भक्षिती ॥ १८ ॥ अन्नें भूमीपासूनि उपजती । तीं पुरिलीं पेरिलीं होतात माती । आपल्या कारणीं लय पावती । अन्नें ऐसीं ॥१९॥ शेषाचीं मुखें दशशत । विषाचा अग्नि त्यांतूनि अत्यंत । निघेल तो स्वर्गपर्यंत । करील भस्म ॥ ८२० ॥ मानवी शत वर्षपर्यंत । ऐसें अवर्षण होतां अत्यंत । त्यावरी वर्षती वर्षें शत । प्रलयमेघ दिनरात्री ॥ २१ ॥ हस्तीचे जैंवि शुंडादंड ।

---

१ इंद्रियागोचर जें तत्त्व ह्म० ब्रह्म त्याच्या मायेपासून.

धारा स्थूळ ऐशा अखंड । मेघ वर्षतां जळ उदंड । आणि समुद्र तेव्हां सर्व लोटती॥ २२ ॥ स्वर्ग मृत्यु पाताळ । तिहीं लोकीं तेव्हां एक जळ । भस्महीं नाहीं ऐसें सकळ । लोक तिन्ही विवरती ॥२३॥ महर्लोकापासूनी । वरील लोक प्रतिदिनीं । न जळती न बुडती ह्मणोनी । शास्त्र बोले ॥ २४ ॥ तेव्हां जीवोपाधि सकळ । अव्यक्ततत्त्वीं केवळ । तन्मय होती जैसें आटतां जळ । प्रतिबिंबें बिंबीं तैसे ब्रह्मीं जीवांश ॥२५॥ सृष्टि प्रलय ऐसा जगीं । तेचि दिवस आणि रात्री ते योगी । जाणती ह्मणूनि बोलणें लागलें यालागीं । सृष्टि आणि प्रलय हा ॥ २६ ॥ ऐसा सृष्टिसंहार । विशद वर्णितां ग्रंथ वाढेल फार । परंतु अर्जुन समजला सविस्तर । महिमा चरणसंनिधानाचा ॥ २७ ॥ विश्वरूपीं श्लोक दुसरा । तेथें अर्जुन बोलेल सर्वेश्वरा । कीं सृष्टि संहार विस्तारें बरा । म्यां आइकिला तुजपासुनी॥ २८ ॥ एवं च महत्तत्त्व आदिकरूनी । एक एकापासूनी तत्त्वें उपजोनी । सर्व एकत्र मिळोनी । उद्भवलीं भूतें ॥ २९ ॥ जें ज्यापासूनि जालें । तें प्रलयीं त्यामध्यें मिळालें । प्रलयलक्षण बोलिलें । याप्रकारें ॥ ८३० ॥ शेवटीं उरे प्रकृती । अव्यक्त तत्त्व तीस ह्मणती । तीपासूनी मागुतीं उपजती । त्याचे क्रमें व्यक्त तत्त्वें ॥३१॥ होतां महाप्रलय । हें अव्यक्ततत्त्वही पावे ब्रह्मीं लय । महासृष्टिकाळीं पुन्हा उदय । होय या अव्यक्तरूपिणी मायेचा ॥ ३२ ॥ अव्यक्ताचा लय उदय । न सांगतां दाखवी अभिप्राय । कीं सृष्टिसंहार ऐसा होय । ब्रह्मयाच्या प्रतिदिनीं प्रतिरात्रीं ॥ ३३ ॥ मागील हा प्रकार । पुढेंही वारंवार । ऐसेंचि होणार । ह्मणूनि ह्मणतो या श्लोकीं ॥ ३४ ॥

॥ श्लोक ॥ भूतग्रामः स एवायं भूत्वा भूत्वा प्रलीयते ।
राज्यागमे वशः पार्थ प्रभवत्यहरागमे ॥ १९ ॥

॥ टीका ॥ अगा पूर्वीं भूतग्राम नाशला । तोचि हा जो दिसतो तुजला । उद्भव तरंगांस आतां जाला । परि मागील तरंगही हेच ॥ ३५ ॥ जें कालचें मृगजळ । तेंचि आजिचें हें केवळ । तैसा तोचि हा भूतांचा मेळ । खेळ त्याच प्रकृतीचा ॥ ३६ ॥ तें मृगजळ होत होत । अकस्मात् लयातें असे पावत । उपजे मध्यान्हकाळीं निश्चित । अवश्य लयातें पावे सायान्हीं ॥ ३७ ॥ तैसा भूतग्राम हा अत्यंत । वृद्धीतें पावत पावत । अवश्य लयातें असे जात । रात्रि आरंभतां ब्रह्मयाची ॥३८॥ ज्या अव्यक्त तत्त्वापासूनि होय । त्याचिमध्यें पावे लय । हा प्रतिदिन उद्भव प्रलय । प्रवाह ऐसा सर्वदा ॥३९॥मागुती दिवसाचा आगम । होतां उपजतो हा भूतांचा ग्राम । अनादि

मायाप्रवाह नियम । अगा पार्था ये रीती ॥ ८४० ॥ आइकोनि हा उक्रम लय । शंकित जाला धनंजय । कीं सर्वही भगवंत अद्वय । तरी काय हाचि उ-पजतो नाशतो ॥ ४१ ॥ आणि हा तों अविनाशी नित्य । आणि हाचि न-श्वर विश्व । सर्व हें सत्य । विश्व नाशतां अगत्य । नश्वरत्व लागे यास ही ॥४२॥ ऐसा त्याचा भाव । जाणोनिहि देवाधिदेव । तो पुसे तों स्वय-मेव । संशय परिहरितो या श्लोकीं ॥ ४३ ॥

॥ श्लोक ॥ परस्तस्मात्तु भावोऽन्योऽव्यक्तो व्यक्तात्सनातनः ।
यः स सर्वेषु भूतेषु नश्यत्सु न विनश्यति ॥ २० ॥

॥ टीका ॥ अगा जो भाव ह्मणिजे सत्ता । सनातन ह्मणिजे ज्यास नित्य-ता । तो अव्यक्त ज्याला व्यक्तता । कधींच नसे ॥४४ ॥ अव्यक्त ह्मणूनि येथवरी । जें मी बोलिलों तें तरी । मायातत्त्वविकार कारण परी । कार-ण तेंही अव्यक्त ॥ ४५ ॥ त्या मायातत्त्वा अव्यक्ताहुनी । हें वेगळें जें सत्तारूप अव्यक्त ह्मणोनी । तुज सांगतों यावरूनी । सत्ताहीन माया अ-व्यक्तत्व जाण ॥ ४६ ॥ सत्ताहीन अव्यक्त । तें कार्यरूपें होतें व्यक्त । व्यक्त ह्मणजे नानाकारें दिसे विभक्त । तें नश्वर कार्यरूप त्या अव्यक्त तत्त्वाचें ॥ ४७॥ एवं च सत्ताहीन । अभाव त्याचें अभिधान । ह्मणूनि भाव शब्द गहन । सत्तावाचक यालागीं ॥ ४८ ॥ कारणीं सत्ता नाहीं । तेव्हां कार्यास सत्ता नाहींच कांहीं । ज्यास सत्ता तें न पडे प्रवाहीं । कार्याचिया ॥ ४९ ॥ ब्रह्मही कारण माया प्रवाहाचें । परि माया मिथ्या ब्रह्म साचें । त्यास कार्यरूप होणें कैंचें । रज्जू जाला कधीं सर्प ॥ ८५० ॥ यालागीं अव्यक्त सत्ता मात्र चैतन्य । तें सत्ताहीना अव्यक्ततत्त्वाहूनि अन्य । परि सत्तेवांचूनि सत्ताहीन शून्य । कांहींच नसे ॥ ५१ ॥ ऐसें जतन होऊनि अद्वैत । नित्या अनित्यास साधे द्वैत । ऐसा चमत्कार भगवंत । बोलतसे या प्रसंगीं॥५२॥ कीं जो भाव सनातन । नश्वरा भूतीं असोन । भूतें नश्वरें पावती निधन । तो सत्तास्वरूप भाव नित्य नासेना ॥ ५३ ॥ सत्तास्वरूप तोचि भाव । सत्ताहीन भाग तो अभाव । यांत मायाशब्दार्थ देव । सूच-वी टीकाकारातें ॥५४॥ मा ह्मणजे नसे । या ह्मणजे नसोनि दिसे । न दिस-तीच ते तरी ऐसे । विचार तिचे कां होते ॥ ५५ ॥ यालागीं जें दिसे । आणि विचारितां न गवसे । त्यास अभाव ह्मणती जैसे । अलंकार ॥ ५६ ॥ ज्यास सत्ता असे । स्वप्रकाशें स्वयें दिसे । त्यास भाव ह्मणावें ऐसें । दृष्टांत सूचवी एथें भगवंत ॥ ५७ ॥ कीं भाव जैसें कनक । भाव नाना अलंका-

री एक । हेम असे ते नसती अनेक । अभाव नांव त्या अलंकारांचें ॥५८॥[1] सुवर्ण भाव तें नित्य । अभाव नग ते अनित्य । सोनें नित्य आणि सत्य । अनित्य असत्य ते अलंकार ॥ ५९ ॥ अलंकार नासती सकळ । सोनें त्यांत नासेना निखळ । यालागीं अव्यक्त मानावें केवळ । सुवर्ण तें ॥ ८६० ॥ आणि त्या सुवर्णी जे शक्ती । जे पावली या अलंकाराची व्यक्ती । ते स्वयेंचि पावली अभिव्यक्ती । नाना स्वकार्यरूपाची ॥ ६१ ॥ कार्यरूपें होतें व्यक्त । परि कारणरूपें तेंही अव्यक्त । एवं अव्यक्त ह्मणणें युक्त । सुवर्णास सुवर्णशक्तीसहीं ॥ ६२ ॥ सुवर्णी शक्ति नसे । तरी सुवर्णत्वचि नासे । अलंकाररूपें जेव्हां दिसे । नासे दुग्धत्व जैसें दधि होतां ॥ ६३ ॥ दुधाचें जालें दहीं । दूधपण तेव्हां त्यास नाहीं । अलंकार होऊनिही कांहीं । विकार न घडे सुवर्णातें ॥ ६४ ॥ ऐसी चालतां युक्ती । सुवर्णी सांपडे शक्ती । किरीटकुंडलादि व्यक्ती । विलास कार्यरूपें हे तिचे ॥ ६५ ॥ तेही माया ह्मणावी ऐसी । कीं सुवर्णांत न दिसे जैसी । नाहीं ह्मणावी तरी कसी । अलंकारसृष्टि होते तीविण ॥ ६६ ॥ जें दुग्धाचें दधिपण । तें ह्मणावें शक्तिविण । विकारी निर्विकार सुवर्ण । शक्ती ऐसी दुग्धीं असेना ॥ ६७ ॥ ऐसी ब्रह्मीं माया । ते अव्यक्त ह्मणावी धनंजया । ती अभाव तीपरता भाव जो तया । अव्यक्त सनातन ह्मणावें ॥ ६८ ॥ जैसें नश्वरा अलंकारीं सुवर्ण । तैसें नश्वरा भूतीं तें पूर्ण । भूतें नाशतां तें आपण । नाश न पावे अलंकार नाशतां सोनें कदापिहीं ॥ ६९ ॥ जैसा हा दृष्टांत । तैसेंच अनुभविती संत । तैसिया टीकाकारास भगवंत । तैसे दृष्टांत येथें सूचवी ॥ ८७० ॥ जों सुवर्णाची झगमग । दृष्टी दिसेना तों नग । न दिसे तैसें दिसेना जग । जों न दिसे जग नगप्रकाशक सुवर्ण ॥ ७१ ॥ तेव्हां सोनेंचि आहे नग । ब्रह्मचि आहे जग । कार्य कारण दोनी प्रसंग । उडती ऐसे ॥ ७२ ॥ घट आणि जेंवि माती । कीं सुवर्ण आणि अलंकारजाती । ब्रह्म आणि जग तैसें ह्मणती । उपनिषद्भाग ॥ ७३ ॥ हे वेदोक्त दृष्टांत । अनुभव जाणती भक्त संत । परि भेदवादी विवादी अत्यंत । ते कोण्हेंनि युक्ति काढिती ॥ ७४ ॥ कीं सुवर्ण घडतें मोडतें । ब्रह्मसाम्य त्याला केंवि घडतें । ऐसें ह्मणती कीं न ह्मणतां उडतें । भेदवाद मत तयांचें ॥ ७५ ॥ नाहीं दृष्टांतीं सर्व साम्य । हें तरी केवळ अनुभवगम्य । कमलासारिखे नेत्र रम्य । ह्मणतां येतें अंधत्व ॥ ७६ ॥ सिंह माल्लनियां गजातें । ये पर-

[1] अनुभवानें समजतें.

तोन आपल्या स्थळातें । शत्रु जिंकोन नगरातें । राजा पावला या दृष्टांतें ॥ ७७ ॥ क्रूरत्व शूरत्व सिंहाचें । दृष्टांतीं साम्य इतकेंचि साचें । सर्व साम्य घडणार कैंचें । दृष्टांत दार्ष्टांतिक दोहींस ॥ ७८ ॥ सिंह गेला आला एकला । राजा सेनेसहित गेला आला । सिंहास पुच्छ राजयाला । पुच्छ नसे ॥ ७९ ॥ घडे मोडे सुवर्ण । ब्रह्म अखंड परिपूर्ण । परि जगा नगा असत्यपण अनित्यपण । सत्यत्व नित्यत्व कनकातें ॥ ८८० ॥ ब्रह्मचि सर्व जग । सोनेंचि सर्वही नग । ब्रह्मत्व सुवर्णत्व दोहींस भंग । नसे दुग्धत्वभंग जैसा दधित्वीं ॥८१॥ आपल्या पाडें न नासे हेम । आपल्या पाडें न नासे ब्रह्म । निर्विकारत्वीं दोन्हीं सम । अनित्यांत नित्यें सम दोन्हीं ॥८२॥ विश्व अलंकार असत्य । ब्रह्म सोनें दोन्ही सत्य । विश्व अलंकार अनित्य । ब्रह्म हेम नित्य हे दोन्ही ॥८३॥ आयता घडला सुवर्णाचा नग । तैसें ब्रह्मीं ह्मणतां जग । अद्वैताचा मानूनि उबग । कां पूर्वदशा स्मरावी सुवर्णाची ॥८४॥ गोड जैसा गूळ । तैसेंचि गोड हें केळ । ऐसें बोलती सकळ । विरुद्ध सर्वथा ह्मणवेना ॥८५॥ पूर्वदशा स्मरावी गुळाची । मग गूळ समता केळास कैंची । ऊंस रस पाक पिळणी क्रिया साची । गुळाची नये केळातें ॥ ८६ ॥ हें विरुद्धत्व जैसें । कनक घडमोडीचें तैसें । अत एव सर्व शास्त्रें बोलती ऐसें । नाहीं दृष्टांतें सर्व साम्य ह्मणोनी ॥८७॥घडमोडी पूर्वदशा सुवर्णाची । ऊंस रस पिळणी पाक पूर्वदशा गुळाची । हें केळास नसोनि उपमा साची । केळ गुळाची पावतें ॥८८॥घडमोडी नसे ब्रह्मीं । घडमोडी असे हेमीं । तथापि उपमा निगमीं । हे प्रसिद्ध ॥८९॥ अरे आह्मांस सहाय वेद । कीं सहाय वेदवक्ता गोविंद । अनुभवगम्यही अभेद । संहारी प्रत्यक्ष भेदास तुमचिया॥८९०॥ जे अनुभवाचे अधिकारी । ते आशंका हे होऊनि वरी । गोष्टी येथवरी येतां शिरीं । धरिती अनुभवाह्लानें पूर्वींहो ॥९१॥ तुह्मीं होवूनेही निरुत्तर । सोडणार न ह्मा[1] करकर । कीं पित्तातुरास साकर । कडू लागे ॥९२॥ चंद्र नावडे तस्करा । प्रिय अत्यंत जो चकोरा । सूर्य पक्षियां रजनीचरा । दिसेचि ना ॥९३॥ असो ते प्रस्तुतीं संदेह । हरतां पार्थ निःसंदेह । जग नश्वर तेव्हां ब्रह्म नश्वर हा मोह । पळे रज्जू कळतां सर्प जैसा ॥९४॥ नश्वरीं असोनि नव्हे नश्वर । तो सत्तास्वरूपभाव ऐसें सर्वेश्वर । वर्णूने त्याचे ठायीं आदर । भोल्यास उपजवितो या श्लोकें ॥९५॥

---

१ मुबडास.

॥श्लोक॥ अव्यक्तोऽक्षर इत्युक्तस्तमाहुः परमां गतिम् ।
यं प्राप्य न निवर्तंते तद्धाम परमं मम ॥२१॥

॥ टीका ॥ अगा सत्तास्वरूप भाव । जो पूर्वश्लोकीं मी देवाधिदेव । तुज बोलिलों त्याचा प्रभाव । आईक पार्था ॥ ९६ ॥ याभावें ह्मणे सर्वेश्वर । कीं तो भाव अव्यक्त अक्षर । ह्मणूनि वेदांतवेत्ते चतुर । बोलती ॥ ९७ ॥ व्यक्ति नाहींच जया । अव्यक्त ह्मणावें तया । व्यक्ति तितकिया माया । तेही माया त्या वेगळी असेना ॥ ९८ ॥ ह्मणूनि सर्वही तो । वेदीं वेदांतीं बोलिजेतो । युक्ति अनुभवेंही दिसतो । अव्यक्तभाव० तोचि सर्व ॥ ९९ ॥ परि पाहतां मागुती । यथास्थित त्याची स्थिती । अव्यक्त ह्मणावें ये रीती । कीं ते सत्ताच आकार त्रिकार मायेचे ॥ ९०० ॥ तो तीहूनि जेव्हां परता । मायेच्या कार्यरूपास येते क्षरता । यालागीं तो अक्षरही तत्त्वता । वेदा वेदांतीं बोलिला ॥ १ ॥ इति ह्मणजे याप्रकारें । अव्यक्त अक्षर या विचारें । तो बोलिजेतो निर्धारें । वेदीं आणि वेदांतीं ॥ २ ॥ आणि कैवल्य परम गती । ते तोचि जो भाव सत्तामात्र बोलती । कीं पावोनि कोण्ही न परतती । त्या सत्तास्वरूप भावातें ॥ ३ ॥ गति उदंडा असती । परि तेथूनि मागुती परतती । ह्मणूनि हे परमागती । न परततीं पावोनि ज्या गतीतें ॥ ४ ॥ जेथूनि कोण्ही न परतती । मुक्ति ह्मणावी ते गती । ते चतुर्विध चतुर्विधांतही होती । प्रकार दोन्ही ॥ ५ ॥ कीं सायुज्यमोक्ष तो निर्गुण । सामीप्य सारूप्य सालोक्य सगुण । इतर गति स्थळें त्रिगुण । पुनरावृत्ति यालागीं ॥ ६ ॥ त्यांत तिसरिया चरणपर्यंत । निर्गुणमोक्ष बोलिला भगवंत । चतुर्थ चरणीं अनंत । सगुण मोक्षही तोचि भाव ऐसें बोलतो ॥ ७ ॥ चतुर्थचरण ॥ " तद्धाम परमं मम " ॥ टीका ॥ अगा माझें धाम । धाम ह्मणिजे गृह वैकुंठ परम । तेंही तेंचि सत्तामात्र निर्गुण ब्रह्म । कीं इतर प्रत्यय जेथें असेना ॥ ८ ॥ कीं जेथें रज तम । तेथें न स्फुरे सत्तामात्र निर्गुण ब्रह्म । शुद्ध सत्त्वें तेंचि परम । स्फुरे यालागीं तोचि तें ॥ ९ ॥ धाम शब्दें घर । वैकुंठ शुद्ध सत्त्वाकार । तें सत्त्व आणि अव्यक्त अक्षर । न स्फुरती जेथें भिन्नत्वें ॥ २१० ॥ यालागीं तेंचि आपलें धाम । वैकुंठनगराकार परम । जैसें त्रिगुण अविद्यारचित स्थावर जंगम । धाम तैसें नव्हे तें माझें ॥ ११ ॥ आब्रह्मभुवन लोक । तेथें पुनरावृत्तीचा असे शोक । मातें पावोनि कोण्ही एक । न परते ऐसें मागें बोलिला ॥ १२ ॥ आणि मीच वैकुंठ लोक । या भावें त्या श्लोकीं उत्तमश्लोक । बोलिला कीं

मातें पावोनि तो कोणी एक । पुनर्जन्म नाहीं पावला ॥ १३ ॥ तेंचि येथें स्पष्टतर । बोलतसे सर्वेश्वर । कीं जें अव्यक्त अक्षर । माझें परम धाम तें तेंचि ॥ १४ ॥ कीं मीच तें अव्यक्त अक्षर । तें अव्यक्त अक्षरचि माझें घर । तेव्हां त्यातें जे पावले नर । ते मातेंचि पावले ॥ १५ ॥ मोक्ष बोलोनि निर्गुण । त्यापुढेंचि बोलतो मोक्ष सगुण । हे येथें दावूनि खूण । स्पष्ट चतुर्दशीं बोलेल ॥ १६ ॥ "परं भूयः प्रवक्ष्यामि" । या श्लोकीं मुमुक्षूचा स्वामी । या ज्ञानें मोक्ष निर्गुण ब्रह्मीं । सर्वही मुनि पावले ह्मणेल ॥ १७ ॥ "इदं ज्ञानमुपाश्रित्य" या श्लोकीं । सगुण मोक्ष बोलेल कीं । माझें साधर्म्य वैकुंठलोकीं । याचि ज्ञानें पावले ॥ १८ ॥ ते सृष्टिकाळीं न जन्मती । ते प्रळयीं व्यथेतें न पावती । तेंचि या मोक्षप्रकरणीं श्रीपती । द्विविध मोक्षही बोलतो ॥ १९ ॥ अर्थ ऐसा असोनी । जे अभक्त निर्गुण ज्ञानी । तें सगुणाचें धाम निर्गुण ह्मणोनी । "तद्धाम परमं मम" वाखाणिती ॥ ९२० ॥ पुढिलिया श्लोकें करूनी । तो पुरुष अनन्यभक्तिलभ्य ह्मणोनी । बोलेल त्यावरूनी । समाधान याही शंकेचें होणार ॥ २१ ॥ आतां सगुण टाकूनि निर्गुण एक । उपासिती अभक्त निर्गुणोपासक । त्यांस वैकुंठ नसे हें वैकुंठनायक । त्या पुढिलिया श्लोकीं बोलेल ॥ २२ ॥ आणि सगुण भक्त ज्ञानहीन । तेही न पावती कीं विना ज्ञान । मोक्ष नसे जे ज्ञानी भक्तजन । तेचि पावती ह्मणतसे या श्लोकीं ॥ २३ ॥

॥ श्लोक ॥ पुरुषः स परः पार्थ भक्त्या लभ्यस्त्वनन्यया ।

॥ टीका ॥ जो वसे त्या वैकुंठपुरीं । तो पुरुष ह्मणावा यापरी । ज्ञानियास वास वैकुंठनगरीं । त्याच्या अनन्य भक्तीनें ॥ २४ ॥ या भावें ह्मणे पार्था आइक । जो वैकुंठ वैकुंठनायक । जो वैकुंठपुरवासी वैकुंठदायक । लभ्य तो पुरुष तो अनन्य भक्तीच करूनी ॥ २५ ॥ अन्य नव्हे आपला आत्मा । तोचि अपरोक्ष होतां परमात्मा । जे आत्मत्वप्रीति परमा । तेचि परमात्मयाची होतसे ॥ २६ ॥ बृहदारण्य उपनिषद्भागीं । याज्ञवल्क्य मैत्रेयी स्वस्त्रियेलागीं । आत्मत्व उपदेशी महायोगी । भक्तियोगेंचि करूनी ॥ २७ ॥ कीं भ्रतारास बाईल । स्वनिमित्तचि प्रिय होईल । सुत धन वित्त सकळ । आवडे ज्या आत्मयाच कारणें ॥२८॥ तो आत्मा जाणावा । तो श्रवण मनन निदिध्यासें पहावा । एवं पावणें सर्वात्मभावा । याच आवडी करूनी ॥ २९ ॥ प्रिय आत्मा सर्वांहूनी । तो सर्व तोचि आत्मा ह्मणोनी । उपासिती भक्त जे ज्ञानी । मानूनि तेंचि सर्व गुणत्व

॥ ९३० ॥ त्या आत्मप्रीतीनें तें सगुण । अनन्यत्वें भजतां तेंचि निर्गुण । ऐसे जे ज्ञानी भक्त निपुण । वैकुंठपुरपति पुरुष लभ्य त्यांतेंचि ॥ ३१ ॥ पूर्व श्लोकीं "तद्धाम परमं मम" । ह्मणवां सूचविलें वैकुंठ धाम । येथें ह्मणे पुरुषोत्तम । तो पुरुष 'अनन्यभक्तिलभ्य' ह्मणोनी ॥ ३२ ॥ वैकुंठीं मुक्ति सगुण । मुक्ति तेही नसे ज्ञानाविण । चतुर्दशीं बोलिल हे खूण । "इदं ज्ञानमुपाश्रित्य" या श्लोकीं ॥ ३३ ॥ ज्ञान ज्यास भक्तीवांचूनी । निर्गुण मोक्ष पावती ते ज्ञानी । ज्ञानें आणि भक्तीकरूनी । वैकुंठ लभ्य ॥ ३४ ॥ सगुणीं ज्ञानियां भक्ती । ते अनन्य भक्ती दे सगुण मुक्ती । त्या सगुण मुक्तीची अभिव्यक्ती । वैकुंठ लोकीं मग नित्य ॥३५॥ यालागीं "तद्धाम परमं मम" । ऐसें पूर्वश्लोकीं वैकुंठधाम । स्वस्वरूप बोलोनि येथें पुरुषोत्तम । अनन्य भक्तिलभ्य ह्मणतसे तो पुरुष ॥ ३६ ॥ भक्ति शब्द गीतेंत जेथें । सगुणोपासना सिद्ध तेथें । ह्मणूनि ह्मणे भगवंत येथें । "भक्त्या लभ्य" ह्मणोनी ॥ ३७ ॥ तथापि भक्ति जे ज्ञानावांचूनी । मुक्ति नव्हे ते भक्तीकरूनी । अनन्य पद येथें ह्मणोनी । भक्ति शब्दीं योजिलें ॥ ३८ ॥ आतां अनन्य भक्तीकरूनी । निर्गुणोपासकचि पावती ह्मणोनी । ह्मणतां सगुण भजनावांचुनी । भक्त न ह्मणवे तयांतें ॥ ३९ ॥ कीं भक्तीची खूण । जे ते नेणे निर्गुण निर्धर्मपण । त्याच्या भक्तीनें कवण । फलप्राप्ती ॥ ९४० ॥ मागें चतुर्थी हा विचार । जाला पुढेंही होणार । चित्तचि करणें निर्गुणाकार । भक्ति करणें साक्षिया सगुणाची ॥ ४१ ॥ ज्ञान ज्याचें तो निर्गुण । भक्ति ज्याची तो सगुण । ऐसा भगवदुपदेशें होऊनि निपुण । द्वादशीं अर्जुन ऐसें बोलेल ॥४२॥ द्वादशाध्याय श्लोक ॥ एवं सततयुक्ता ये भक्तास्त्वां पर्युपासते । ये चाप्यक्षरमव्यक्तं तेषां के योगवित्तमाः ॥ टीका ॥ ऐसे सर्वदा युक्त । जे तूतें उपासिती भक्त । आणि जे उपासिती अक्षर अव्यक्त । यांत कोण अधिक योगवेत्ते तें सांग ॥ ४३ ॥ एवं च उपासिती अव्यक्त अक्षर । अर्जुन भक्त न ह्मणे ते नर । जे सगुणभजनीं तत्पर । भक्त तेचि ॥ ४४ ॥ हे आलीकडील अध्याय । येथें संकेत हे धनंजय । समजूनि करूनि निश्चय । भक्त ते सगुण भक्तचि ह्मणतसे ॥ ४५ ॥ कीं भक्ताची भक्ति जैसी । प्रीति देवाची त्यावरी तैसी । सप्तमीं स्पष्ट रीति ऐसी । बोलिली आणि चतुर्थी "ये यथा मां" या श्लोकीं ॥४६॥ सप्तमीं ह्मणे भगवंत । कीं प्रिय ज्ञानिया भक्तास मी अनंत । आणि तोही प्रिय मज अत्यंत । ह्मणे

"प्रियो हि ज्ञानिनोत्यर्थमहं" या अर्थी ॥ ४७ ॥ निर्गुणीं भक्ति तरी घडती । कीं परस्पर प्रीति जरी दिसती । एवं च निर्गुणध्यान सगुणीं प्रीती । प्रस्तुतीं प्राप्ति सगुणाची बोलिली अनन्यभक्तीनें ॥ ४८ ॥ कीं येथें भक्तीच करूनी । लभ्य तो पुरुष ह्मणोनी । श्रीकृष्ण ह्मणे यावरूनी । तो पूर्वश्लोकोक्त सगुणचि लेखावा ॥ ४९ ॥ तो तरी अव्यक्त अक्षर । ह्मणूनि ह्मणे सर्वेश्वर । उगाच अर्थ त्याचा करावा सगुणपर । तरी माझें धाम जो पूर्वश्लोकीं ह्मणतो तो श्रीकृष्णही सगुण ॥ ९५० ॥ तेव्हां सगुण सगुणाचें धाम । तें ह्मणावें वैकुंठचि परम । जरी अव्यक्त अक्षर निर्गुण ब्रह्म । तरी भक्तिलभ्य तो न ह्मणवे ॥ ५१ ॥ "ये यथा मां प्रपद्यंते" या श्लोककरूनी । "तांस्तथैव भजाम्यहं" ह्मणोनी । कृष्ण ह्मणे यावरूनी । निर्धर्म भक्तीनें फळप्रद सगुणही होईना ॥ ५२ ॥ आतां भक्तीनें ज्ञान होतें ह्मणोनी । लभ्य तो पुरुष भक्तीकरूनी । ह्मणावें तरी प्रकरणावरूनी । अर्थ बोलावा ॥ ५३ ॥ ज्ञानप्राप्तिप्रकरणीं । योजिल तैसी गोविंदवाणी । ज्ञानिया भक्तास भक्तवर्णी । मुक्ति येथें बोलतो ॥ ५४ ॥ भक्ति न फळे निर्गुणीं । आणि ते भक्ति पावेना सगुणीं । एवं भक्ति ह्मणतां कार्णी । नव्हे निर्गुणाची आणि प्रसंग मुक्तीचा ॥ ५५ ॥ कीं त्यास ह्मणती परमागती । ज्यास पावोनियां न परतती । तो भक्तीनें लभ्य ह्मणे श्रीपती । प्रसंगचि मुक्तिप्राप्तीचा ॥ ५६ ॥ एवं तो पुरुष भक्तीकरूनी । लभ्य ह्मणतां यावरूनी । "तद्धाम परमं मम" ह्मणोनी । वैकुंठचि वर्णिलें हें स्पष्ट ॥ ५७ ॥ आतां अनन्य भक्तीकरूनी । बोलिला तो लभ्य ह्मणोनी । तें अनन्यत्वचि स्वमुखेंकरूनी । उत्तरार्धे विशद बोलतो ॥ ५८ ॥

॥ उत्तरार्ध ॥ यस्यांतःस्थानि भूतानि येन सर्वमिदं ततम् ॥ २२ ॥

॥ टीका ॥ अगा तो पुरुष असता अन्य । तरी भक्ति न घडती अनन्य । अनन्य भक्ती करिती धन्य । कीं तो अनन्य ह्मणोनी ॥ ५९ ॥ तरंग जैसे सागरीं । ऐसीं भूतें ज्या अंतरीं । तरंग सागरें व्यापिले यापरी । ज्याणें व्यापिलें हें सर्व ॥ ९६० ॥ ऐसा अनन्यत्वें भजती । सुलभ त्यांस तो वैकुंठपती । आत्मत्वें पूर्वोक्त रीती । ध्याती जयातें ॥ ६१ ॥ भृंगकीटकन्यायें करूनी । ध्येयचि होती जीवंत असोनी । देह पडतां तद्रूप होउनी । त्यास पावती नवल काय ॥६२॥ जों विश्वात्मत्व न कळे मना । तों आत्मत्वें ध्यान वाणेना । विश्वात्मत्वें जाणोनि जगज्जीवना । आत्मत्वें

१ श्लोकार्धांत.

ध्यातां तोचि तें ॥ ६३ ॥ ऐसें मोक्षप्रकरण । प्रसंगें अन्या गतींचेंही विव-रण । करितो जगद्वंद्यचरण । कीं त्यांत पुनरावृत्ति कळाव्या ॥ ६४ ॥ त्या गति पुनरावृत्ती । आणि मोक्ष पावले ते न परतती । त्या मोक्षांत दोन रीती । एक निर्गुण सगुण एक ॥ ६५ ॥ ज्ञानावांचूनि मोक्ष न घडे । त्यांत सगुणमोक्ष लागला भक्तांकडे । निर्गुणोपासकां निर्गुण आवडे । त्यांस निर्गुण मोक्ष कैवल्य ॥ ६६ ॥ त्या निर्गुणमोक्षीं भिन्न रीती । यद्यपि कोणासही नसती । परि प्राप्ति त्यांची बोलती । एक सद्य एक क्रमें करूनी ॥ ६७ ॥ ज्ञानयोगींच ज्यांचा श्रम । ते देह पडतांचि पावती ब्रह्म । जे हटयोगीं मांडिती आक्रम । क्रममुक्ती बोलिली तयांसी ॥ ६८ ॥ कीं हटयोगाकडे भरले । ज्ञानीं अपक्क होऊनि उरले । ते ब्रह्मलोकास अनुसरले । ब्रह्मरंध्र भेदूनी ॥ ६९ ॥ त्यांचा बोलतां श्रमप्रसंग । ह्मणी सभय होय अर्जुनाचें अंतरंग । ह्मणूनि "अनन्यचेता" या श्लोकीं श्रीरंग । भक्तांस सुलभ आपण ऐसें बोलिला ॥ ९७० ॥ सुलभ होऊनि अत्यंत । सुख जें देतो त्यास नाहीं अंत । ह्मणूनि "मामुपेत्य" या श्लोकें अनंत । अपुनरावृत्ति आपली प्राप्ति बोलिला ॥ ७१ ॥ ज्या हटयोगियांच्या कष्टा-वरूनी । भक्तांस अनायासें लभ्य ह्मणोनी । बोलिला ते हटयोगीही ब्रह्म-लोक पावोनी । कैवल्य अपुनरावृत्तीच पावती ॥ ७२ ॥ गति भक्तांची न पावले । तरी निर्गुणोपासकांसमान आले । ह्मणूनि "आब्रह्मभुवनाल्लो-का" हा श्लोक बोले । त्या श्लोकापुढेंचि उत्तमश्लोक ॥ ७३ ॥ कीं हट-योगी ब्रह्मलोकाप्रती । डोई फोडोनि घेऊनि जाती । परि तेथें इतर पावले ते च्यवती । कीं ब्रह्मादि सर्व देवतास्थानें ऐसींच ॥ ७४ ॥ बरें ज्या ब्रह्म-लोकातें पावले । तेथूनि इतर जरी च्यवले । हे तों महाप्रलयपर्यंत राहिले । तेव्हां तरी पावलेच कैवल्य ॥ ७५ ॥ ह्मणूनि मागुतीं निर्गुणोपासकां-समान । त्यांतें ह्मणी मानील अर्जुन । यद्यपि या प्रसंगींच्या हटयोगियांसही ज्ञान । तरी अपक्कमोक्ष बहु विलंबें करूनी ॥ ७६ ॥ ह्मणूनि ब्रह्मयाचा दिवस । लांबच लांब क्रमणें तयांस । लांबच लांब रात्रीही जयांस । क्रम-णें मोक्षेच्छे करूनी ॥ ७७ ॥ एक अमृतपान करिती । एक त्याकारणें लाळ घोटिती । बहुता विलंबें तेही पिती । तरी बहु उणें त्याहूनी ॥ ७८ ॥ या भावें ब्रह्मयाच्या दिनराती । सहस्र युगपर्यंत या श्लोकें श्रीपती । वर्णी तेथें खुणावी अर्जुनाप्रती । कीं "ते ऽहोरात्रविदो जनाः" ह्मणोनी ॥ ७९ ॥ तों ब्र-

---

१ ज्याचे चरण जगाला वंद्य. २ पुनर्जन्म नाहीं अशी. ३ चलन पावतात.

कथार्थ अहोरात्र कैसें । ते जाणती ह्मणूनि अर्जुन पुसे जों ऐसें । "अव्य-क्ताद्व्यक्त" या श्लोकें जगन्निवासें । केलें त्याचें समाधान ॥ ९८० ॥ त्या प्रसंगें उत्तमश्लोकें । "भूतग्रामः स एवायं" या श्लोकें । सांगितलें अर्जुनास इतुकें । कीं तोच हा ग्राम भूतांचा ॥ ८१ ॥ प्रतिदिनीं प्रकृतीपासूनि उपज-तो । प्रतिरात्रीं तीमाजीं लय पावतो । परि हटयोगियाचा प्रसंग तो । तुटला नाहीं ॥ ८२ ॥ या प्रसंगें भूतें नश्वर । परि भूतात्मा अविनाशी अक्षर । ऐसें बोलिला सर्वेश्वर । परि प्रसंग त्याच हटयोगियाचा ॥ ८३ ॥ कीं तदर्थ ब्रह्मयाच्या दिनराती । सांगतां भूतें उपजती नाशती । त्या प्रसंगें ह्मणे जगत्पती । कीं भूतें क्षर तो अक्षर ॥ ८४ ॥ ह्मणूनि अव्यक्ताक्षर । या पूर्वश्लोकीं सर्वेश्वर । त्याच्या ठायीं उपजवी आदर । कीं तोचि परमग-ती तोचि धाम माझें ॥ ८५ ॥ या श्लोकीं अनन्यभक्तीकरूनी । तो पुरुष-लभ्य ह्मणोनी ॥ बोलिला स्वमुखें करूनी । परि प्रसंग त्याच हटयोगियाचा ॥ ८६ ॥ आतां ब्रह्मलोकास जाती । ते ह्मणावी उत्तरायणगती । कीं ते उत्तरायणकाळही अपेक्षिती । त्या काळीं भेदिती ब्रह्मरंध्र ॥ ८७ ॥ अपक्व तरी ज्ञानी । आणि उत्तरायणीं ब्रह्मरंध्र भेदूनी । जाती ते परतनी । ब्रह्म-लोक तो ॥ ८८ ॥ न सांपडे उत्तरायण । आणि त्याकाळीं दक्षिणायन । तरी योगी परतती हें जगज्जीवन । येथूनि पुढें बोलेल ॥ ८९ ॥ परि हट-योगियांचें प्रकरण । बोलतां मध्यें आलें ऐसें विवरण । ह्मणूनि जगद्वंद्य-चरण । प्रसंगें अनुसंधान लाविती या श्लोकीं ॥ ९९० ॥

॥ श्लोक ॥ यत्र काले त्वनावृत्तिमावृत्तिं चैव योगिनः ।
प्रयाता यांति तं कालं वक्ष्यामि भरतर्षभ ॥ २३ ॥

॥ टीका ॥ यत्र ह्मणजे ज्या मार्गी । काले ह्मजजे ज्या काळीं ते योगी । गेले ते जाती अपुनरावृत्तिलागीं । ह्मणूनि त्या मार्गातें त्या काळातें सां-गेन ॥ ९१ ॥ आणि ज्या मार्गी ज्या काळीं योगी । गेले ते जाती पुनरा-वृत्तीलागीं । तो मार्ग तो काळही यथाविभागीं । सांगेन तुज ॥ ९२ ॥ एथें भरतर्षभा ह्मणूनी । अर्जुनातें या नांवें करूनी । आळवी हृदयीं धरूनी । गूढभाव ॥ ९३ ॥ कीं सोमदत्ताचा पुत्र । बाल्हीकाचा पौत्र । तोही भरत-कुलोत्पन्न पवित्र । युद्धीं हटयोगें शरीर सोडील ॥ ९४ ॥ द्रोणपर्वी जय-द्रथवधीं । सात्यकी अर्जुनातें व्यूहांत शोधी । त्याशीं भूरिश्रवा भांडे तधीं । छेदील बाहु त्याचा अर्जुन ॥ ९५ ॥ त्याणें ऐसा उचलिला कर । त्या घायें तुटे सात्यकीचें शिर । तों दुरूनि अर्जुनें हाणोनि शर । बाहु च

त्याचा उद्धरिला ॥ ९६ ॥ बाहू गेलियावरी । तो एणींच बाण पसरी । बैसोनि त्या आसनावरी । जाय ब्रह्मरंध्र भेदूनी ॥९७॥ त्यास देखोनि मन-नीं । अर्जुन हा प्रसंग स्मरेल मनीं । तेव्हां भक्त थोर हटयोगियाहूनी । तैसी स्मरेल ॥ ९८ ॥ हे खूण अर्जुनातें एथें न वाणे । परि भविष्य भगवंत जाणे । त्या भाविंकरूनि ह्मणे । अगा भरतर्षभा ह्मणोनी ॥ ९९ ॥ श्लोकार्थ एतत्प्रकार । परि एथें टीकाकार । यत्र शब्द काळ शब्द यांचा अर्थविचार । वेगळा न करिती ॥ १००० ॥ एथेंचि वाट चुकती । पुढें भोंवों लागती । मग जैसी तैसी गती । कल्पिती पुढिल्या श्लोकांची ॥ १ ॥ एथें ह्मणे सांगतों काळ । आणि पुढें बोलेल जंजाळ । अग्निज्योती ज्वाळ । आणि धूमादिकें मार्गी दुसरिया ॥ २ ॥ आणि पूर्वानुसंधानप्रसंग । मागील हटयोगियाचा योग । त्यातें ब्रह्मलोकीं क्रममुक्तियोग । हें कांहींच न सुचे तयांसी ॥ ३ ॥ सद्यमुक्ती ज्यांला । त्यांचा हा प्रसंग वाटे त्यांला । तेव्हां उत्तरायणत्र ज्ञानियांला । अगत्य नसे हें श्रुतिसिद्ध ॥ ४ ॥ आणि या शुक्ल कृष्णगती । सांगोनि त्यापुढें श्रीपती । ह्मणेल कीं " नैते सृती । पार्थ जानन् योगी मुह्यति कश्चन " ॥५॥ कीं पार्था या गती । जाणोनि योगी न मोहती । तरी तूं अगा महामती । होईं योगयुक्त सर्वदा ॥ ६ ॥ एवं च सद्य मोक्षातें पावती । त्यांचा प्रसंग न वदे हा श्रीपती । ऐसें पूर्वापर न पाहती । आणि सगट वाखाणिती हे गीता ॥ ७ ॥ असो तें पुढें वाईट बरें । अवघेंचि कळेल खोटें खरें । परंतु निर्मत्सरीं आदरें । पाहावा अर्थ ॥ ८ ॥ जैसें बोलतो चक्रपाणी । तदनुरूपचि त्याची वर्णिजेल वाणी । ते सोडोनि कल्पित काहाणी । बोलती त्यांची भीड काय॥९॥ पुढें काळ आणि मार्ग । दोन्ही वर्णील श्रीरंग । तो सांगेन ह्मणतो प्रसंग । यत्र आणि काळ ह्मणूनि या दों शब्दीं ॥ १०१० ॥ " यत्र प्रयाता गच्छंति " । आणि " यत्र काले प्रयाता " ऐसे रीती । यत्र शब्दाचे अन्वय ऐसें सूचविती । मार्ग आणि काळ दोहींतें ॥ ११ ॥ "न तद्भासयते सूर्यो " या श्लोकांत । " भासयते " हा शब्द सूर्याजवळींच भगवंत । बोले परि शशांक पावकपर्यंत । तिहीं ठायीं दावी " भासयते " योजावें ये रीतीं ॥ १२ ॥ ये रीती दोहींकडे । यत्र शब्दाचा अन्वय घडे । तरी यथास्थित अर्थ सांपडे । पुढिलिया श्लोकांचा ॥ १३ ॥ आणि ब्रह्मलोकास जाऊनि मुक्ति । पावती ह्मणतां साधे भगवंताची उक्ती । उत्तरायणीं अपुनरावृत्ती । त्या हटयोगियास ॥ १४ ॥

आतां काळ उत्तरायण । तेव्हां जातां मार्गीं कोण कोण । देवता भेटती हें नारायण । नरास सांगतो या श्लोकीं ॥ १५ ॥

॥ श्लोक पूर्वार्ध ॥ अग्निर्ज्योतिरहः शुक्लः षण्मासा उत्तरायणम् ।

॥ टीका ॥उत्तरायणीं ब्रह्मरंध्र फुटे । तो योगी ब्रह्मलोकास जातां वाटे । त्यास मूर्तिमंत अग्नि भेटे । आणि ज्योतिर्देवता मूर्तिमंत ॥ १६ ॥ या मार्गींच्याच देवता । अग्नि ज्योति दोघी मूर्तिमंता । एथूनि काळ देवता आतां । अहःशुक्ल इत्यादि ॥ १७ ॥ उत्तरायण सामास । तो देवतांचा एक दिवस । ह्मणूनि वाटेस भेटे त्यास । मूर्तिमंत दिवसही ॥ १८ ॥ ऐशा देवांचिया प्रतिदिनीं । ब्रह्मलोकमार्ग मोकळा होतो ह्मणोनी । जो जातो ब्रह्मरंध्र भेदूनी । त्यास त्या देवता पाववितो ब्रह्मलोका ॥ १९ ॥ या मार्गीं देवता जितकिया । प्रकाशरूपा तितकिया । अग्नि ज्योति दिवस इतकिया । प्रकाशरूपा प्रत्यक्ष ॥ १०२० ॥ तैसाच शुक्लपक्ष । मूर्तिमंत त्या मार्गीं त्यास होय प्रत्यक्ष । जो उत्तरायणीं जातो दक्ष । ब्रह्मरंध्र भेदूनियां ॥२१॥तैसेंच मकरसंक्रांतीपासूनि मिथुनपर्यंत । सौरमास साहा प्रकाशवंत । देवांचिया दिवसाचे भाग अत्यंत । प्रकाशरूप मूर्तिमंत ते साही ॥ २२ ॥ तैसाच उत्तरायण काळ । देवांचा दिवस मूर्तिमंत अति उज्ज्वळ । ब्रह्म भवन विशाळ । पाववितो तेथें योगिया तयातें ॥ २३ ॥ उत्तरायणाचे साहामास । उत्तरायणचि देवांचा दिवस । परि उत्तरायण काळ मानवांस । ह्मणूनि वेगळाली तद्रूपें ॥ २४ ॥ दिवसा मार्ग वाहती । देव उत्तरायणीं ये रीती । आपल्या दिवसांत पाववितो । ब्रह्मलोकीं योगियास ॥ २५ ॥ एवं ब्रह्मलोकास तो पावला । जो उत्तरायणीं योगी ज्ञानी गेला । ब्रह्मया सांगातें त्याला । ब्रह्मप्राप्तीही ॥ २६ ॥ परंतु या श्लोकीं जरी । ब्रह्म जाणे गुरुमुखें तरी । ब्रह्मयास मोक्ष होतेअवसरीं । निर्गुण ब्रह्मसायुज्य तो पावे ॥ २७ ॥ हा भाव उत्तरार्धेंकरूनी । दाखावितो स्पष्टही वेदूनी । परि तो अपक्क आणि हटयोगी ह्मणोनी । उत्तरायण अपेक्षित तयासी ॥ २८ ॥

॥ श्लोकोत्तरार्ध ॥ तत्र प्रयाता गच्छंति ब्रह्म ब्रह्मविदो जनाः ॥ २४ ॥

॥ टीका ॥ तत्र ह्मणजे तेथें । मार्गीं देवता या जेथें । आणि तत्र शब्दीं येथें । त्या काळीं हाही अर्थ ॥ २९ ॥ कीं 'तत्र प्रयाता' ह्मणजे त्या मार्गीं गेले । ते ब्रह्मवेत्ते ब्रह्म पावती ऐसें बोले । आणि "यत्र काले त्वनावृत्तिं" ऐसें श्लोकीं पहिले । बोलिला ह्मणूनि तत्र त्या काळींही ह्मणावें ॥ १०३० ॥

आणि ज्या काळीं न परते ह्मणोनी । बोलिला तो काळ उत्तरायण शब्दें करूनी । बोले आणि दैवतें कालाभिमानी । त्या प्रसंगें त्या मार्गीची वर्णिलीं ॥ ३१ ॥ एवं तत्र शब्दें त्या मार्गी त्या काळीं । जे गेले ह्मणे वनमाळी । ते पावती ब्रह्मीं केवळीं । ब्रह्मवेत्ते जन ह्मणोनी ॥ ३२ ॥ ऐसे जे ब्रह्मवेत्ते पावती ब्रह्म । ह्मणूनि विरोध बोले पुरुषोत्तम । कीं तो विरोध परिहरितां अवगम । व्हावा यथार्थ अर्थाचा ॥ ३३ ॥ कीं ब्रह्मवेत्ते याचे प्राण । देहाबाहेर न करिती प्रयाण । ऐसें श्रुति बोलती ब्रह्मनिर्वाण । ब्रह्मज्ञानियाचें ॥ ३४ ॥ प्रयाणचि मिथ्या त्याचें । त्यास वाटे देवता भेटणें कैंचें । "तत्र प्रयाता गच्छंति ब्रह्म" ह्मणूनि साचें । भगवद्वचन तों ये रीती ॥ ३५ ॥ एवं नव्हे हे सद्यमुक्ती । क्रममुक्तीविषयीं हेच उक्ती । येथें युक्ति प्रयुक्ती । राहिल्या सर्व ॥ ३६ ॥ एवं क्रममुक्ति ज्याला । उत्तरायण पाहिजे त्याला । सद्यमुक्तीच्या अधिकारियाला । श्रुति नलगे ह्मणती उत्तरायण ॥ ३७ ॥ ब्रह्मसूत्र वेदश्रुती । ज्ञानियास उत्तरायण नलगे ह्मणती । तरी हे सद्यमुक्तीस आणि जो प्रस्तुतीं । पाहिजे याला उत्तरायण ॥ ३८ ॥ तेव्हां "यत्र काले" ह्मणे चक्रपाणी । ते यथास्थित नव्हे कां भगवद्वाणी । अर्थांतराची नसती काहणी । कां मिरवावी ॥ ३९ ॥ आणि मार्गे चीं श्लोककरूनी । "मूर्ध्न्याधायात्मनः प्राणं" ह्मणोनी । ज्याची गति वर्णिली त्यावरूनी । प्रसंग चालिला येथवरी ॥ १०४० ॥ तो हटयोगी हें तों खरें । कीं कोंडोनि सर्वही द्वारें । मस्तकास ने वारें प्राणांचें ॥ ४१ ॥ आणि "ते ऽहोरात्रविदोजनाः"। ह्मणूनि पूर्वोक्त तेंचि तच्छब्दें सूचवी अर्जुना । तेच उत्तरायण मार्गगमना । अधिकारी कां नव्हती ॥ ४२ ॥ कीं सद्यमोक्ष ज्याला । मस्तकास कां प्राण नेणें लागे त्याला । कां द्वारें कोंडावीं बोला । त्या पक्कज्ञानियानें ॥ ४३ ॥ आणि कां उत्तरायण । त्यांस जे जितांच अनुभविती निर्गुण । आणि संपतां हें प्रकरण । श्रीकृष्णही हेंचि बोलेल ॥ ४४ ॥ "नैते सृती" या श्लोककरूनी । ह्मणे हे दोन्ही मार्ग आईकोनी । योगी न मोहती ह्मणोनी । कीं हे दोन्ही मार्ग नलगती पक्कज्ञानियां तयांसी ॥ ४५ ॥ "नैते सृती" याही श्लोकीं । अर्थ सद्यमुक्तीविषयीं योजिला कीं । परि हा विचार नाहीं सूचला कीं । काळ आणि मार्ग हा कां तयाला ॥ ४६ ॥ आणि या श्लोककरूनी । वर्णिले न परतती ह्मणोनी । ते ब्रह्मवेत्ते स्वमुखें करूनी । श्रीकृष्ण ह्मणे ॥ ४७ ॥ ब्रह्मशब्दें जरी ह्मणावें वेद । तरी जों न कळे ब्रह्मीं अभेद । तोंवरी न तुटे खेद । पुनरावृत्तीचा ॥ ४८ ॥ आत्म-

तें ब्रह्म जों कळेना । शब्दज्ञानें पुनरावृत्ती जनां । त्यांस अपुनरावृत्तिगमना । अधिकार कैंचा ॥ ४९ ॥ एवं हे ब्रह्मवेत्ते । ह्मणावे ब्रह्म जाणते । आणि जे ब्रह्म जाणती ते । प्राण न सोडितां येथेंचि उरती निर्गुणत्वें ॥ १०५० ॥ आतां अपक्वज्ञानी । या मार्गें गेले ह्मणोनी । तरी योगभ्रष्ट येती परतोनी । यांतें अपुनरावृत्ति बोलतो ॥ ५१ ॥ एवं अपक्वज्ञानी । आणि ब्रह्मरंध्र भेदूनी । या मार्गें जाती ह्मणोनी । नसे पुनरावृत्ति हें बोलिला ॥ ५२ ॥ तेव्हां ब्रह्मयासह । मुक्ति हेंही निःसंदेह । कीं सोडोनि जाती देह । ब्रह्मीं न मिळती तत्काळ ॥ ५३ ॥ लिंगदेहाचा न जाला ध्वंस । तरी देवतामार्ग बोलिला त्यास । लिंगदेह नसे जयास । काळ मार्ग देवता हे त्यास कैंचे ॥ ५४ ॥ ब्रह्मप्राप्ति सद्य ज्याला । देह सोडोनि कोठे जाणें घडे त्याला । क्रममुक्ति बोलतां तरी बोला । ब्रह्मलोक ॥ ५५ ॥ ऐसा गीतेचा अर्थ । न कळोनि वाखाणिती व्यर्थ । हटयोगबळें समर्थ । ह्मणविती सिद्धि दावूनी ॥ ५६ ॥ कोणी पुरूनि घेती । कोणी गगनपंथें जाती । नाना चमत्कार दाविती । चेटकी जैसे ॥ ५७ ॥ त्यांत कोणी विरळ । ब्रह्मात्मता ओळखती केवळ । ब्रह्मरंध्र भेदूं जाणती कुशळ । त्यांस गति ऐसी बोलिली ॥ ५८ ॥ ब्रह्मरंध्र ही भेदूं जाणती । आणि ब्रह्मात्मता नेणती । ते पुन्हा परतती । हें न बोलतां सिद्ध होय ॥ ५९ ॥ ऐसी अपक्व ज्ञानिया हटयोगियाची गती । सांगतों कीं तेही दक्षिणायनीं जरी जाती । चंद्रामृत सेवूनि परताती । तो मार्ग बोलतो या श्लोकीं ॥ १०६० ॥

॥ श्लोक ॥ धूमो रात्रिस्तथा कृष्णः षण्मासा दक्षिणायनम् ।
तत्र चांद्रमसं ज्योतिर्योगी प्राप्य निवर्तते ॥ २५ ॥

॥ टीका ॥ ज्या काळीं ज्या मार्गीं गती । पुनरावृत्तीची योगी पावती । तेही सांगेन तुजप्रती । ऐसें बोलिलों होतों तें आइक ॥ ६१ ॥ धूममार्गीं मूर्त्तिमंत । मूर्तिमंत रात्रि तैसाचि तम अत्यंत । कृष्ण पक्ष आणि मकर संक्रांतीपर्यंत । कर्क संक्रांतीपासूनि मास सहा ॥ ६२ ॥ दक्षिणायन देवांची राती । साहा मास साही भाग तीचे होती । तेही अंधकाररूप असती । कर्कापासूनि धनुर्मासपर्यंत ॥ ६३ ॥ मास साही मूर्तिमंत । आणि साही मिळतां तें एक दैवत । कीं देवांची रात्रि आंधारीं अत्यंत । दक्षियाणनीं ते भेटे ॥ ६४ ॥ दक्षिणायन मार्ग ये रीती । या देवता चंद्रज्योतीस पाववितीं । दक्षिणायनीं जे जाती । अपक्व ब्रह्मवेत्ते हटयोगी तयातें

---

१ पुनर्जन्म नाहींसा होण्यास.

॥ ६५ ॥ ते उत्तम लोकांतें जाउनी । चंद्रज्योतीतें पावोनी । ह्मणजे चंद्रकलामृत सेवूनी । देवांत असती ॥ ६६ ॥ पावोनि गति ऐसी । होय मागुती गर्भवासी । परतूनि ये हटयोगियासी । पुनरावृत्ति दक्षिणायनीं होतसे ॥ ६७ ॥ येथें बोलिला योगी । तो कर्मयोगी ह्मणोनि त्यालागीं । टीकाकार बहुतेक जगीं । वाखाणिती ॥ ६८ ॥ मार्ग आणि गती । हीं कर्मयोगियाचींच दिसती । कीं धूमादि मार्ग श्रुती । बोलती कर्मयोगियातेंचि ॥ ॥६९॥ तरी योगभ्रष्टलक्षण । षष्ठाध्यायांत कमलेक्षण । बोले तेथें ह्मणे आपण । कीं पुण्यकृतांच्या लोकास तो पावतो ॥ १०७० ॥ "प्राप्यपुण्यकृतांल्लोकान्" ह्मणोनी । श्रीकृष्ण या श्लोकें करूनी । ह्मणे पुण्यकर्त्यांच्या लोकातें पावोनी । शुचि श्रीमंतगृहीं जन्मतो ॥ ७१ ॥ हाही धूमादि मार्गेंकरूनी । चंद्रज्योतीतें पावोनी । पुन्हा येतो परतोनी । परि ब्रह्मात्मवेत्ता अपक्कयोगी ह्मणावा ॥ ७२ ॥ कीं कर्मयोगियांस दक्षिणायनीं । पुनरावृत्ति तैसीच उत्तरायणीं । दक्षिणायन विशेष चक्रपाणी । काय येथें वदला ह्मणावा ॥ ७३ ॥ ज्ञानहीनास अपुनरावृत्ती । कर्मयोगियास जरी उत्तरायणीं असती । तरी दक्षिणायनीं पुनरावृत्ती । उचित दिसती बोलतां ॥ ७४ ॥ अमृत विष दोहींचे दोन्ही । गुण सांगतां अमर अमृतें न मरे ह्मणोनी । मरणारचि तो मरे विषेंकरूनी । या बोलासारिखा अयोग्य या अर्थी हा बोल ॥ ७५ ॥ जो अमृतें होय अमर । तोचि विषें मरे नर । ऐसें सांगेल चतुर । मूर्ख ह्मणावा अन्यथा ॥ ७६ ॥ अमृतविषाचे गुण । सांगेन ह्मणे निपुण । आणि ज्यांची सांगे अमरत्वाची खूण । ह्मणे अमृतें तो अमर होय ॥ ७७ ॥ जो मरणारचि आपण । तो ह्मणे विष भक्षितां पावे मरण । ऐशा गोष्टी जो निपुण । तो न बोले कदापि ॥ ७८ ॥ उत्तरायण मार्गे जाती । ते ब्रह्मवेत्ते ब्रह्म पावती । जे ब्रह्मीं येथेंचि मिळती । किमर्थ उत्तरायण हा मार्ग त्यांला ॥ ७९ ॥ ते त्या पंथें न जाती । तरी ब्रह्मचि ते पावती । किमर्थ हे उत्तरायणगती । तयांला ॥ १०८० ॥ तैसेच कर्मयोगी । पुनरावृत्ति आहेच त्यांलागीं । काळ अथवा उभयमार्गविभागीं । गुण काय येथें देखिला ॥ ८१ ॥ आतां दोघांच्या दोन्ही गती । कळाया कारणें सांगे ह्मणावा श्रीपती । तरी दो प्रकारीचे योगी ये रीती । अधिकारी वेगळे न बोले ॥ ८२ ॥ जरी अधिकारी वेगळे बोलता । तरी तदनुरूपें अर्थही योजिता । या श्लोकीं तो सकळ गतिदाता । बोलतो इतकेंचि ॥ ८३ ॥ कीं ज्या काळीं जातां योगी न परतती । तो सांगेन तुजप्रती ।

आणि ज्या काळीं जातां परतोनि येती । तोही तूतें सांगेन ॥ ८४ ॥ भेद बोले काळाचे । तैसे भेद न दावी योगियाचे । योग्य अर्थ सोडोनि वाचे । अयोग्य अर्थ कां आणावा॥ ८५ ॥ जे उत्तरायणीं न परतती । तेचि दक्षिणायनीं परतोनि येती । अर्थ वदतां ये रीती । मूळानुरूपचि दिसतो ॥८६॥ जरी दोन्ही काळ न लेखिले । क्लिष्टकल्पनेनेंचि मार्ग वाखाणिले । तरी जे या मार्गें नाहीं परतले । तेचि परतले त्या मार्गें ॥ ८७ ॥ आतां काळ नलगे ज्ञानियास । ह्मणूनि मार्गचि बोलावा ब्रह्म पावावयास । तरी जितांचि ब्रह्म जाले तयांस । कां हा मार्ग कां या देवता ॥ ८८ ॥ एवं नलगे जेव्हां काळ । मार्ग देवताही फटकाळ । ज्ञानी अपक्क हटयोगी कुशल । तो ब्रह्मलोकास या काळीं या मार्गें जातो हा अर्थ ॥ ८९ ॥ अर्थ हाचि अनुकूळ । इतर अर्थ प्रतिकूळ । बलात्कारें टीका आणि मूळ । यासि एकवाक्यता घडेना ॥ १०९० ॥ ते ब्रह्मवेत्ते परतती । कैसें वदावें ह्मणोनि भीति । ज्या ब्रह्मवेत्त्यांस ऐशी गती । त्यांस दक्षिणायनीं एक जन्म पुनरावृत्तीही घडों ये॥९१॥ कीं पक्कज्ञानियाचे प्राण । न करितीच कधीं प्रयाण । हें अपक्कयांस हटयोग उत्तरायण । सांपडे तरीच मुक्ति ब्रह्मया सांगातें ॥ ९२ ॥ उत्तरायण जया न सांपडे । त्यास पुनरावृत्ति घडे । पूर्वसंस्कारें बुद्धि पडे । पुन्हा ज्ञानमार्गींच ॥ ९३ ॥ मग सद्यमुक्ति घडो । अथवा क्रममुक्तींत मागुती पडो । पूर्वसंस्कार नेदी बुडों । मृत्युसंसारसागरीं ॥ ९४ ॥ "नहि कल्याणकृत् कश्चित्" ह्मणोनी । षष्ठाध्यांत या श्लोकेंकरूनी । कृष्ण ऐसें बोलिला यावरूनी । तो वायां जाय न ह्मणावा ॥ ९५ ॥ षष्ठाध्यायांत योगभ्रष्ट । तो सद्यमुक्तिमार्गीं जाला भ्रष्ट । हा पूर्वसंस्कारें पुन्हा कष्ट । हटयोगीं करूनि अपुनरावृत्ति साधील ॥ ९६ ॥ आतां यापुढें जो श्लोक । तेथें ऐसेंचि बोलेल उत्तमश्लोक । कीं पुन्हा अपुनरावृत्ति लोक । पावेल हा ह्मणूनी ॥ ९७ ॥ एवं च या श्लोकीं योगी बोलिला । ज्ञानी अपक्क आणि हटयोगी ह्मणावें त्याला । जरी दक्षिणायनीं ब्रह्मरंध्र भेदूनि गेला । तरी परतेल हाचि सिद्धांत ॥ ९८ ॥ अनादि हे मार्ग दोनी । हें बोलेल या पुढिल्या श्लोकेंकरूनी । तेथेंही अधिकारी एकचि ह्मणोनी । बोलेल तो हा यापुढील श्लोकीं ॥ ९९ ॥

॥ श्लोक ॥ शुक्लकृष्णे गती ह्येते जगतः शाश्वते मते ।
एकया यात्यनावृत्तिमन्ययाऽऽवर्तते पुनः ॥ २६ ॥

॥ टीका ॥ शुक्लकृष्ण दोन्ही गती । शुक्ल उज्ज्वल प्रकाशास ह्मणती ।